मनोहर ग्रंथमाला, प्रकाशन ४५ वें

# नेताजींचे सहवासांत

☆

लेखक :

पुरुषोत्तम नागेश ओक

IRBK-0102626

IRBK-0102626

[ किंमत ३ रुपये ]

दा-क्र २६२८

मनोहर ग्रंथमाला, प्रकाशन ४५ वें

# नेताजींचे सहवासांत

लेखक :
पुरुषोत्तम नागेश ओ[illegible]

अनुक्रम २८८५
विभाग भा. वा.
क्रमांक १०२५
नों. दि. ३१/३/
वाचनालय

IRBK-0102626
IRBK-0102626

किंमत ३ रुपये

प्रथमावृत्ति, २ जून १९४७

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

प्रकाशक : मनोहर महादेव केळकर,
१९६/८५ टिळक रस्ता, पुणें २

मुद्रक : श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण, पुणें २

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
जा. क्र. ३६३६ नों. दि
वि. ग्रा.ना क्र.





मातामह मातामही

कै. डॉ. श्रीधर नारायण शार्ङ्गपाणी व जानकीबाई शार्ङ्गपाणी

यांचे पूज्य स्मृतीस

सादर समर्पण

— पु. ना. ओक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | सिंगापुरांत | ... १ |
| २ | कार्यास सुरुवात | ... २३ |
| ३ | नेताजी-निवास | ... ४३ |
| ४ | भोजनप्रिय नेताजी | ... ५६ |
| ५ | नेताजींचें मार्दव | ... ८३ |
| ६ | नेताजींची वीरवृत्ति | ... १०० |
| ७ | नेताजींचा सात्त्विक संताप | ... १२८ |
| ८ | इतर विविध स्मृति | ... १३६ |
| ९ | आता पुढें काय ... ? | ... १५३ |
| १० | मनोभूमिकाच बदला | ... १७० |

# सुभाषचंद्रो येन गतः स पन्थः।

इसापनीति, पंचतंत्र अथवा हितोपदेश इत्यादि ग्रंथ जसे काऊ-चिऊच्या गोष्टी सांगण्याच्या उद्देशानें लिहिले गेले नाहींत तद्वत् प्रस्तुत ग्रंथही केवळ मनोरंजनासाठीं लिहिलेला नाहीं. त्याचप्रमाणें "सुभाष-लीलामृत" अथवा "सुभाष माहात्म्य" या दृष्टीनेंही प्रस्तुत ग्रंथाकडे पाहणें चुकीचें ठरेल. सुभाषचंद्रांसारखी कांहींतरी उज्वल कृति करून दाखविण्याची वाचकांस स्फूर्ति व्हावी व साधल्यास त्या दिशेनें वाचकांचें थोडेंबहुत मार्गदर्शन व्हावें याच हेतूनें हें पुस्तक लिहिलेलें आहे. अर्थात् केवळ "राष्ट्रकार्य करावें...राष्ट्रकार्य करावें" असे वाऱ्यावरचे उद्गार काढण्याची गतानुगतिक पद्धति सोडून प्रस्तुत ग्रंथाचे शेवटल्या प्रकरणांत, प्रत्येक व्यक्तीस समाजांतील आपलें स्थान व व्यवसाय सांभाळून स्वतःस रुचेल, पचेल व झेपेल अशा तऱ्हेचें वाटेल तेवढें राष्ट्रकार्य करतां येण्यासारखें आहे, हें दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. शेवटल्या प्रकरणांत रेखाटलेला कार्यक्रम हा केवळ एक सांगाडा आहे. अशा तऱ्हेचे अनेक सांगाडे तयार करतां येतील किंवा त्याच सांगाड्यास अनेक आनुषंगिक लहानसान योजनांनीं छाघून स्वातंत्र्य-मंदिराचें एक टुमदार परंतु सुंदर असें दालन तयार करतां येईल.

प्रस्तुत ग्रंथाचें शेवटलें प्रकरण हें या ग्रंथाचे कक्षेंत नीट बसत नाहीं. सबब तें गाळून टाकावें अशी कांहीं व्यक्तींनीं सूचना केली; परंतु वाचकही अनेक प्रकारचे असल्यामुळें त्यांच्या आवडीनिवडीही भिन्न असतात. सर्वांचें समाधान करूं पाहणाऱ्या लेखकाची स्थिति इसाप-नीतींतील गोष्टीप्रमाणें गाढव विकावयास नेणाऱ्या म्हाताऱ्यासारखी व्हावयाची! आपल्या समाजांत लेखक व वाचक यांच्यांतील अन्योन्य संबंध बदलावयास पाहिजेत. गिऱ्हाइकांच्या चटावलेल्या जिभेस भजीं, भेळ, उसळ, मिसळ, सरमिसळ इत्यादि चटकदार परंतु अंतीं घातुक असे पदार्थ पुरविणारा, वाङ्मयीन उपहारगृहांतील एक गरीब व गलिच्छ असा हुकमी 'पोऱ्या,' हीच सामान्य वाचकवर्गाची सर्वसाधारण लेखका-

संबंधीं रूढ असलेली कल्पना सूक्ष्म मनोविश्लेषणांतीं दिसून येते. लेखकांचे मनांतही तोच न्यूनगंड स्पष्ट दिसतो. शाब्दिक अथवा अलंकारिक सर्कस करून लोकांची शाबासकी मिळविणें किंवा चव्हाट्यावर साहित्यिक तमाशा करून पैसे मिळविणें हें मुळांत लिखाणाचें ध्येय असतां उपयोगी नाहीं. वाचकांस संतुष्ट ठेवणें यांत लेखकाचें कसब आहेच यांत शंका नाहीं; परंतु लेखक हा केव्हांही पौष्टिक वाङ्मय निर्माण करून समाजास पुष्ट बनविणारा साहित्यिक-बल्लवाचार्य असला पाहिजे. कांहीं एका क्षेत्रात तरी स्वतंत्र विचार असणें, ते स्पष्टपणें प्रगट करण्याची हातोटी साधणें व निर्भयपणें सांगण्याची तयारी ठेवणें हेंच नामवंत लेखकांचे व वक्त्यांचे गुणविशेष असतात. अर्थात् कोणताही ग्रंथ, लेखकाचे विचार जनतेपुढें प्रगट करण्याचें एक साधन असतें. समाजाच्या विचारांस कांहीं एक प्रकारची कलाटणी मिळावी हाच कोणत्याही ध्येयनिष्ठ लिखाणाचा उद्देश असतो व याच उद्देशानें या पुस्तकाचें शेवटलें प्रकरण जसेच्या तसें ठेवण्याचें प्रस्तुत ग्रंथलेखकानें ठरविलें. त्या प्रकरणांत दाखविलेल्या दिशेनें अथवा अन्य प्रकारें वाचकांच्या हातून कांहीं राष्ट्रकार्य–समाजकार्य घडलें तरच प्रस्तुत ग्रंथाच्या जन्माचें सार्थक होईल. क्षणिक मनोरंजनासाठीं रोज शेकडोंनीं 'उत्पद्यंते–विलीयंते' अशा लघुकथांप्रमाणें 'नेताजींच्या सहवासां'तील या आठवणी सांगितलेल्या नाहींत. कांहीं एका विशिष्ट हेतूनें प्रस्तुत ग्रंथ लिहिलेला आहे व शेवटल्या प्रकरणांत या ध्येयाचा 'कळस' झालेला आहे. हा 'कळस'च काढून टाकला असता तर प्रस्तुत ग्रंथ लेखकाचे दृष्टीस तरी उघडा-बोडका व 'पडीक' दिसला असता.

"स्वातंत्र्याचें मोल रक्त आहे...मला तुमचें रक्त द्या...मी तुम्हांला स्वातंत्र्य मिळवून देण्याची हमी घेतों" असें नेताजी सुभाषचंद्र बोस नेहमीं म्हणत असत. अर्थात् स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं परिश्रम केले पाहिजेत हा त्यांतील इत्यर्थ आहे. प्रत्यक्ष परिश्रम करण्याचे तर बाजूलाच राहो, परंतु 'असल्या प्रकारचे परिश्रम करणें आपल्यापैकीं प्रत्येकाचें कर्तव्य आहे, अथवा आपलें कोठें तरी चुकतें आहे' ही जाणीवसुद्धां सर्वसामान्य

हिंदी माणसाचे जीवनक्रमांत दिसून येत नाहीं. आमरणांत जो तो आपल्याच कूपमंडूक संसारांत गुरफटलेला दिसून येतो. 'राष्ट्रकार्य अथवा देशभक्ति म्हणजे इंग्रजी जुलुमावर एक भाष्य रचून कारागृहांत जाणें' हाच अर्थ प्रत्येकाचे डोक्यांत भरलेला आहे. अर्थात् सर्वसाधारण इसमास हें शक्य नसल्यामुळे जो तो कधींकाळीं आपले देशभक्त यशस्वी होऊन स्वातंत्र्याचें पक्व फळ तोडून आपल्या हातांत देतील तेव्हां देतील अशा असहाय्य मनोवृत्तीनें त्यांच्या स्वातंत्र्यलढ्याकडे पहात असतो. मूठभर लोकांच्या प्रयत्नानें स्वातंत्र्य कधींच प्राप्त होणार नाहीं. प्रत्येकानें हातभार नाहीं तरी बोटभार हा लावायलाच हवा. या दृष्टीनें एक गोष्ट आपल्यांतील प्रत्येक जण सहज करूं शकतो. आपल्या जीवनांत "डेक्कन जिमखाना"; "पी. वाय्. सी. जिमखाना", 'क्लब'; 'स्टोअर्स'; 'रेस्टॉरंट'; 'मिसेस्' इत्यादि परकी व परदास्याच्या हिडीस प्रतीकांचा अगदीं सुळसुळाट झालेला दिसून येतो. आपल्या संस्थांचे सर्व छापील कागदपत्र व पत्रव्यवहार इ. आपल्या मातृभाषेंत अथवा राष्ट्रभाषेंत नसून सहा हजार मैलांवर राहणाऱ्या मूठभर लोकांच्या भाषेंत असतात. खेड्यापाड्यांत, जेथें इंग्रजी कोणालाच समजत नाहीं अशा ठिकाणीं आमचेच लोक इंग्रजी लिपींत पाट्या लावतात व आपल्या दुकानांस वगैरे इंग्रजी नांवें देतात. रस्त्याच्या कडेस असणारे मैलांचे दगड इंग्रजी चिन्हांकित असतात. कांहीं कांहीं ठिकाणीं तर या वृत्तीचीं अनेक हास्यास्पद व नमुनेदार उदाहरणें सांपडतात. उदा., "रेकॉडर्स् एक्स्चेंज अँड सर्क्युलेटिंग लायब्ररी" असें बाळबोधींत लिहिलेलें आढळतें. ज्याला फक्त मराठी अथवा हिंदी येतें त्याला वरील पाटी वाचतां येईल, परंतु कांहीं बोध होणार नाहीं. उलट ज्याला केवळ इंग्रजीच येत असेल त्यालाही त्या लिपी-ज्ञाना-अभावीं पाटीवर लिहिलेला वाक्प्रचार इंग्रजी असेल हें ध्यानींमनींही येणार नाहीं. एकुण दोघांनाही तें समजणार नाहीं. आपल्यांतील बहुजनसमाज कशा प्रकारचा आहे?...त्यांस समजतील व उमजतील असेच आपले सार्वजनिक व्यवहार हवेत हें आपण अगदींच विसरलों. पोषाखाच्या बाबतींतही तीच कथा. चाळीस कोटी लोकांचा अजस्र

देश मूठभर परकीयांच्या सर्वस्वी आहारीं गेल्याचें याहून करुणामय दृश्य कोणतें असूं शकेल? प्रत्येकानें निश्चय केला तर आपल्या रोमरोमांत भिनलेली ही गुलामी आपल्याला केव्हांच उपटून फेंकून देतां येईल. अधिक विचार केला असतां ही कीड आपल्यांत किती खोल रुजली आहे हें ज्याचें त्यास प्रत्ययास येईल. हीच नवी दृष्टि प्राप्त करून देणें व एक नवीन कार्यसृष्टि निर्माण करविणें हेंच प्रस्तुत ग्रंथाचें उद्दिष्ट आहे.

प्रस्तुत ग्रंथ लिहिण्याइतका नेताजींचा सहवास लेखकास घडला नाहीं असेंही कोणीं म्हटल्याचें ऐकिवांत आहे. त्याला उत्तर असें कीं, हा ग्रंथ लेखकाची किंवा प्रत्यक्ष नेताजींचीही आहे त्याहून जास्त प्रतिष्ठा वाढावी अशा उद्देशानें लिहिलेला नसून भारतीय जनतेची प्रतिष्ठा वाढावी अशा हेतूनें लिहिलेला आहे. लेखक कोण अथवा त्याचें नांव, गांव काय हा महत्त्वाचा भाग नसून ग्रंथांत प्रतिपादन केलेलीं तत्त्वें (योग्य वाटल्यासच), आत्मसात् करणें महत्त्वाचें आहे. शिवाय ग्रंथ लिहिण्यास कितीसा सहवास जरूर आहे त्याचें कांहीं मोजमाप आहे किंवा काय? प्रत्यक्ष कैलासगिरीवर आरोहण करून तेथील भूभाग पायांखालीं घातलेल्या इसमानेंच त्यासंबंधीं ग्रंथ लिहावा, कांहींशा अंतरावरून त्याकडे पाहणाऱ्यास आपले विचार प्रगट करण्याचा अधिकार राहात नाहीं असें थोडेंच आहे? कोणत्याही बाबतींत आपले विचार प्रगट करण्याचा हक्क प्रत्येक व्यक्तीस आहेच. वस्तुस्थितीपेक्षां जास्त 'नेताजींचा सहवास' घडल्याचा आव ग्रंथकर्त्यानें कोठेंच आणलेला नाहीं. ज्यांस नेताजींचा जास्त सहवास घडला असेल त्यांनीं याहून मोठीं पुस्तकें लिहावींत. नेताजींच्या उज्वल उदाहरणावरून आपल्याला काय शिकतां येईल हेंच ग्रंथकर्त्याच्या दृष्टीनें दाखविण्याचा या ग्रंथाचा मुख्य उद्देश आहे. यांत अर्थातच आपापसांतील राग-द्वेष-लोभ-मत्सर इत्यादि विसरून एकजुटीनें राष्ट्रकार्य करण्याच्या वृत्तीचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो.

— पुरुषोत्तम नागेश ओक

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 28650
विभाग बा.वा.
क्रमांक 1024
नों. 3/13/49

# सिंगापुरांत

## व्यक्तिमत्त्व

“नेताजी सुभाषचंद्र बोस” या नांवाचेमागें इतकी खडतर तपश्चर्या आहे कीं हें नांव जगाच्या कोठल्याहि कोपऱ्यांत उच्चारलें गेल्याबरोबर तावडतोब त्या नांवाचे पुलकित करून सोडणारे प्रतिध्वनि अनेक ठिकाणांहून कानांवर येऊन आदळतात. शत्रूस कर्दनकाळाप्रमाणें वाटणाऱ्या व स्वजनांस करुणाघन परमेश्वरासारखे भासमान होणाऱ्या या व्यक्तीचें नांव माहीत नसेल असा इसम, वन्य जाती सोडल्या तर इतरत्र क्वचितच आढळेल. या थोर विभूतीचें नांव सर्वतोमुखीं होण्याचीं वैशिष्ट्यपूर्ण अशीं विविध कारणें आहेत. स्वतंत्र परंतु शक्तिहीन राष्ट्रांस प्रबल करून शत्रुराष्ट्रांचे हृदयांत धडकी भरविणारे हिटलर, मुसोलिनी वा टोजोसारखे समकालीन पुढारी पुष्कळ असूं शकतील. कोट्यवधि अज्ञ, परतंत्र व हतबल जनतेचें शिरोभूषण झालेले अनेक नेते मिळणेंही कठीण नाहीं. परंतु शेसव्वाशें वर्षांचे पारतंत्र्यानें तेजोहीन झालेली जनता निःशस्त्र देशभक्तीकडे धांव घेत असतांना त्या कोट्यवधि बांधवांस “सशस्त्र लढ्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाहीं” असें कटु सत्य कंठरवाने सांगणाऱ्याच्या दुर्दम आत्मविश्वासाची व मनोमय तत्त्वनिष्ठेची कल्पना करा. स्वदेश-

शिरोमणींच्याबद्दल मनांतील पूज्य भावास यत्किंचितही फाटा न देतां, ध्येयाच्या एकवाक्यतेपुरता त्यांचेशीं संबंध कायम ठेवून, पुनः मार्ग-भिन्नत्वामुळें स्वतःचा असा निराळा धडाडीचा मार्ग आचरण्याची मुभा राखून ठेवणाऱ्या व्यक्तीची सदसद्विवेकबुद्धि देवकोटीची असेल कीं नाहीं याचा विचार करा. सशस्त्र लढ्याची संभावना करणाऱ्या या विभूतीस एकटा गांठून त्या विभूतीच्या हृदयाची स्वातंत्र्यतळमळ, लढाईसाठीं शिवशिवणाऱ्या हातापायांची वळवळ व त्या दिशेनें पहिलें पाऊल म्हणून चालू केलेली चळवळ हीं सर्व त्या विभूतीस कोंडून आणि बेड्यांनीं तिचे हातपाय आंवळून बंद पाडूं इच्छिणाऱ्या कार-स्थानी शत्रूच्या हातावर तुरी देऊन ध्येयनिष्ठेच्या मृगजळाची मृगया करण्यासाठीं जगभर हिंडणारें हें विभूतिमत्त्व लक्षांत घ्या. छत्रपति शिवाजीस औरंगजेबाचे कैदेंतून निसटतांना रायगड व स्वामिनिष्ठ मराठे सरदार तरी डोळ्यांपुढें दिसत होते. स्वदेशाच्या वाटा व भाषा हीं सुद्धां त्यास अनुकूल होतीं. परंतु श्री. सुभाषचंद्र बोस हे इंग्रजांच्या बंदिवासांतून परागंदा झाले त्या वेळेस त्यांस कोणतीं साधनें अनुकूल होतीं ?

वरील सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे येवढें स्पष्ट दिसतें कीं, स्वातंत्र्यप्राप्तीची तळमळ त्यांचे मनांत इतकी थैमान घालीत होती कीं, ‘ साधनें मिळतीं आपोआप । धडाडीनें कार्य न करणें पाप ’ असें मनाशीं ठरवून त्यांनीं त्या बंदिखान्यांतून उडी घेतली. “ रक्त सांडल्या-शिवाय स्वातंत्र्य मिळत नाहीं ” असें सांगणारेही पुष्कळ भेटतील. परंतु निर्मल सदसद्विवेक बुद्धीस सारथ्य करावयास लावून ‘ सेनयोरुभयोर्मध्ये ’ स्वतःचा रथ हाकून त्या कुरुक्षेत्रांत भगवान् श्रीकृष्णाचें व अर्जुनाचें असें दोघांचेंही कार्य एकट्यानें करणारी ही व्यक्ति कलियुगांत अद्वितीयच म्हटली पाहिजे.

हातांत एक चिमूटभर धूळ घेऊन एखाद्या मांत्रिकानें त्यावर फुंकर मारून त्यापासून एक सुंदर सुवर्णमंदिर उभें करावें तद्वतच कांहींसा नेताजींचे कार्याचा प्रकार आहे. इंग्रजांचे डोळ्यांत धूळ फेकून, कित्येक देशांची धूळ तुडवीत त्यांनीं एक स्वतंत्र राष्ट्र प्रस्थापित करून,

स्वातंत्र्यसेना उभारून इंग्रजांस रणांगणांत धूळ चारली. इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी त्यांची कृति अजरामर ठरलेली आहे. स्वदेशांतून हजारों मैल जाऊनसुद्धां कसल्याही साधनांच्या अभावीं केवळ अंतःकरणांतील आत्यंतिक कळकळीनें केवढें कार्य होण्यासारखें आहे, हें नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं अखिल मानववंशास दाखवून दिलेलें आहे. जगाच्या इतिहासांतील एकमेव उदाहरण म्हणून तें सार्वदेशीय देशभक्तांचें स्फूर्तिस्थान होईल यांत शंका नाहीं.

आपल्या चिमुकल्या संसारांतील धुंदी, स्वतःचे अन्नपाण्याविषयींची विवंचना, स्वतःचें मत लोकांत स्पष्टपणें बोलून दाखविण्याबद्दलची स्वाभाविक भीरुता, विशेषतः आपल्या चाळीस कोटी गतानुगतिक बांधवांचे व पूज्य अध्वर्यूंचे विरुद्ध 'ब्र' ही काढण्याची हिंमत न होणें—मग प्रत्यक्ष निराळा मार्ग आचरण्याचें तर दूरच राहिलें—हे सामान्य माणसांचे स्वभावविशेष असतात. या सर्व बाबतींत सुभाषचंद्र बोस हे असामान्य होत. परंतु याचेही पुढें जाऊन त्यांचे इतर गुण पारखल्यावर आपणांस असें दिसून येईल कीं, असामान्य पुरुषांचे वरचे कोटींतील ही व्यक्ति होय. एका बलिष्ठ, पाताळयंत्री व जागरूक शत्रूचे हातावर तुरी देऊन पळून जाणें व पायापासून शिखरापर्यंत सर्व कार्याची उभारणी करून त्या बालेकिल्ल्यांतून त्याच्याशीं दोन हात करणें हें कित्येक असामान्य पुरुषांचे मनांतसुद्धां येत नाहीं. मग प्रत्यक्ष त्यांचे हातून तें घडणें तर अशक्यच. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे अद्वितीय व्यक्तिमत्त्वाची थोडीशी कल्पना येण्यास येवढें विवेचन पुरें आहे.

हिंदुस्थानभर इंग्रजांचें स्वामित्व प्रस्थापित झाल्याला आज सव्वाशें वर्षांचेवर काळ लोटलेला आहे. अर्थात् त्यापूर्वी जन्मलेली व प्रत्यक्ष स्वातंत्र्य उपभोगलेली कोणीही व्यक्ति आज हयात असणें संभवत नाहीं. परंतु अतिपूर्वेत जागतिक युद्धाची अतिवृष्टि होत असतांना नेताजींच्या करांगुलीनें उचलून धरलेल्या स्वातंत्र्य-सरकारच्या गोवर्धनाखालीं आश्रय घेऊन दोन वर्षेपर्यंत प्रत्यक्ष स्वातंत्र्य उपभोगलेले

पुष्कळ लोक आज भारतांत आहेत. पारतंत्र्यांतील शेंकडों वर्षांत जें ज्ञान होत नाहीं, तें निर्भेळ स्वातंत्र्यांतील कांहीं थोड्या क्षणांत होतें. या स्वातंत्र्याचा ज्यांस लाभ घडला, त्या व्यक्ति भाग्यवान् तर खऱ्याच, परंतु त्याबरोबरच नेताजींच्या प्रत्यक्ष दैनंदिन सहवासांत जे कांहीं लोक होते त्यांचें भाग्य और्रच म्हटलें पाहिजे. स्वातंत्र्याचें वातावरण व नेताजींसारखा गुरु मागूनही कोणास मिळणार नाहीं. सुदैवानें मला हा लाभ घडला. अतिपूर्वेंत नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे निकट सहवासांत असणाऱ्या व्यक्तींत महाराष्ट्रीय असे आम्ही दोघेच होतों. एक मी व दुसरे जनरल जगन्नाथराव भोसले. नेताजी बोस हे २ जुलै १९४३ रोजीं अतिपूर्वेंत अद्‌भुत रीतीनें प्रगट झाले व १८ ऑगस्ट १९४५ रोजीं तितकेच अद्‌भुततेनें लुप्त झाले. दोन वर्षें आणि दीड महिन्याच्या या काळांत मला त्यांचा दैनंदिन असा पुष्कळ सहवास घडला.

यासंबंधींचे अनेक मनोरंजक अनुभव यापुढील वृत्तांतांत मी सांगणार आहेच, परंतु तत्पूर्वी मी त्यांचा निकटवर्ती कसा झालों ही हकीगत सांगणें अस्थानीं होणार नाहीं.

## योगायोग

मी सिंगापुरास जाऊन पोंचतों न पोंचतों तोंच आठ दिवसांत त्या प्रदेशांत युद्धाचा वणवा पेटला. दोन-सव्वादोन महिन्यांत तो विझलाही. या इवल्याशा काळांत डच, इंग्रज व अमेरिकन यांचीं अतिपूर्वेंतील साम्राज्यें एकाएकीं नष्ट झालीं. जणुं काय पॅसिफिक महासागराच्या एका अजस्र लाटेनें जगाच्या पाठीवरील हीं साम्राज्यें पुसून टाकलीं. एखादा भूभाग महासागरांत गडप व्हावा त्याप्रमाणें काळाच्या एका लाटेनें हीं साम्राज्यें लुप्त केलीं. एशिआई जनतेच्या चेहऱ्यावर आनंद दृग्गोचर होऊं लागला. पाश्चात्य साम्राज्यशाहीचें भूत कायमचें मानगुटीवर बसलें तें कधीं निघतें कोण जाणे अशी जी एक सर्वांची नैराश्यमय भावना झालेली होती, त्यांना या भूतबाधेपासून सुटल्याचें सुख लाभलें. या समंधाला सबंध गिळ-

णारा कबंध आशियांतच्च सांपडला याबद्दल सर्वांस अवर्णनीय आनंद झाला. हा आनंद चिरकाल टिकला नाहीं तरी अंधःकारमय चक्रव्यूहांत सांपडलेल्यास एकदम एखादा प्रकाशाचा किरण दिसून, अवघड कां होईना परंतु बाहेरची वाट दिसावी तसें सर्व एशिआई लोकांचें झालें. मी याला अपवाद नव्हतोंच.

साम्राज्यशाहीच्या गाड्याचें अतिपूर्वेतील चाक खचलें. त्याचीं शकलें शकलें करून तीं समुद्रांत भिरकावून द्यावीं अशा उद्देशानें सर्व एशिआई लोकांनीं कंबरा बांधल्या. मीही पुढें झालों. मागें राहून भवति न भवति करण्याचे ते दिवस नव्हते. जे जे मतामतांचा काथ्याकूट करीत राहिले त्यांचा काथ्या व कूट हीं दोन्ही कधीं संपलीं नाहींत. तीनचार महिने सिंगापुरांत कार्य करून नंतर मी सायगांवला (फ्रेंच इंडोचायनांत) गेलों. तेथें एक वर्ष प्रचारकार्य केलें. इकडे भविष्याच्या उदरांतून अतिपूर्वेत श्री. सुभाषचंद्र बोस हे प्रगट व्हावयाचे होते. विधीनें त्यांची तयारी चालविली होती. याची अर्थातच कोणासच कल्पना होणें शक्य नव्हतें. म्हणूनच कालमहिमा अगाध आहे असें म्हणावें लागतें. कृष्णजन्माबरोबरच कृष्णाचे सवंगडीही विधात्यानें आपल्या मायावी लीलेनें एकत्रित केले, तद्वत् नेताजी सुभाष यांच्या अतिपूर्वेतील अवतारकार्यास ज्यांचा हातभार वा बोटभार लागावयाचा होता त्या व्यक्ति अव्यक्त अशा लाग्याबांध्यांनीं त्या दिशेनें ओढल्या जाऊं लागल्या. माझेंही कांहींसें असेंच झालें व हाही एक अपूर्व योगायोगच म्हणावयाचा.

सिंगापुरांत जपान्यांचे हातीं सांपडलेल्या साठ हजार हिंदी युद्धबंद्यांपैकीं १८॥ हजार हिंदी, स्वातंत्र्य–सैन्यांतील स्वातंत्र्य–सैनिक बनले होते. यांचेवर जनरल ( पूर्वाश्रमींचे कॅप्टन ) मोहनसिंग यांचें आधिपत्य होतें. जपान्यांचा व त्यांचा बेबनाव होऊन डिसेंबर १९४२ चे सुमारास जपान्यांनीं त्यांस स्थानबद्ध केलें. तत्पूर्वी दोनतीन महिनेच लेफ्टनंट कर्नल जगन्नाथराव भोसले हे स्वातंत्र्य–चळवळींत सामील झाले होते. इंग्रजदत्त हुद्याप्रमाणें पाहतां सर्व युद्धबंद्यांत तेच

वरिष्ठ असल्यामुळें जपान्यांनीं त्यांस अशी विनंति केली कीं, जर्मनींतून सुभाषचंद्र बोस यांस अतिपूर्वेंत आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. तरी तोंवर आपण स्वातंत्र्य-चळवळीची धुरा धारण करावी. श्री. जगन्नाथराव भोसले यांचे हातीं या कार्याचें नेतृत्व येतांच त्यांस विश्वासू व कार्यप्रवीण अशा सुविद्य मदतनिसांची वाण भासूं लागली. त्यांच्या नेहमींचे परिचयांतील अधिकारी व्यक्तींपाशीं त्यांनीं त्या दृष्टीनें तपास सुरू केला. सर्वांनीं एकमुखानें माझें नांव व माझेबद्दलची माहिती त्यांचे कानीं घातली. अशा रीतीनें माझा-त्यांचा पूर्वपरिचय किंवा तोंडओळखही नसतांना त्यांनीं विमानानें एक अधिकारी सायगांव शहरीं पाठविला. मला त्या अधिकाऱ्यानें सांगितलें, " असें असें काम आहे. हें काम अंगावर घेण्याची तयारी असल्यास पाहा." कांहीं काळ विचार केल्यानंतर मलाही त्या कार्याचा अंगीकार करण्याची बुद्धि झाली. मी रुकार दिला आणि ताबडतोब सिंगापूरला गेलों. इ. स. १९४३ च्या जून महिन्याचे ६ तारखेस मी सिंगापुरास पोंचलों. येथपर्यंत मला पुढील महत्त्वपूर्ण घटनांची कांहींच कल्पना नव्हती. १४ जून १९४३ च्या आमच्या सिंगापुरांतील " आझाद हिंद " इंग्रजी दैनिकांत मी सुभाषचंद्र यांच्या अतिपूर्वेंतील आगमनाची आनंददायक वार्ता वाचली. तें टोकियोंत असल्याचें वृत्त त्यांत जाहीर करण्यांत आलेलें होतें. कसे आले ? केव्हां आले ? वगैरे त्यांत कांहींच उल्लेखिलें नव्हतें. युद्धकालांतील अतिमहत्त्वाचें गौप्य म्हणून तत्संबंधीं व्यक्तींनीं तो सर्व वृत्तांत अत्यंत कसोशीनें जतन करून ठेवलेला होता, व तो शेवटपर्यंत तसाच राहिला. अगदीं निकटवर्ती व जागरूक अशा व्यक्तींसच क्वचित् संभाषणाचे ओघांत त्या वृत्तांतांतील महत्त्वाच्या घटनांचे अस्पष्ट पडसाद ऐकण्यास मिळत व तेसुद्धां गाफिल व्यक्तींकडून.

गौप्यस्फोट न करणें हें स्वातंत्र्याचे, वातावरणांत वावरलेल्या व नागरिक या दृष्टीनें स्वतःच्या जबाबदारीची जाणीव असलेल्या व्यक्तीं-सच शक्य आहे. इतर स्वतंत्र राष्ट्रांचे नागरिक गौप्यरक्षण तर कसोशीनें करतातच, परंतु त्याशिवाय सामान्य संभाषणांत सुद्धां

त्यांचा प्रत्येक शब्द नीट पारखून उच्चारलेला असतो. आपल्या सर्वसामान्य हिंदी लोकांसारखे ते भडभडे किंवा बडबडे नसतात. उगाच चकाट्या पिटीत बसून ते 'वायफळ' कधींच उगाळीत बसत नाहींत. स्वातंत्र्याच्या वातावरणांत सहज मिळणारें शिक्षण' अशा प्रकारचें असतें. कथानकाच्या ओघांत अशा अनेक गोष्टी व त्यांबद्दल नेताजींची स्वतःचीं मतें आपोआप येतीलच. अर्थात् भाविक यात्रिकरूंप्रमाणें केवळ भक्तिभावानें अथवा कुतूहलानें हा वृत्तांत वाचण्याचें ध्येय वाचकांनीं न ठेवतां यांतील योग्य दिसेल तो भाग आत्मसात् करण्याचा प्रयत्न करावा अशी त्यांस नम्र विनंति आहे.

## पहिलें दर्शन

२ जुलै १९४३ ची दुपारची वेळ होती. आम्ही आमच्या लष्करी गणवेषांत सिंगापूरच्या क्लँग विमानतळावर पोंचलों. हिंदी स्वातंत्र्य-सैन्याचे १०-१५ प्रमुख अधिकारी नेताजींचे स्वागतार्थ विमानतळावर हजर होते. याच सैन्यांतील एकवीस शिपायांची एक सशस्त्र तुकडी सुभाषचंद्र यांस, विमानांतून उतरतांक्षणींच, खडी लष्करी सलामी देण्यासाठीं त्या मैदानावरील भव्य इमारतीचे प्रवेशद्वारापाशीं लष्करी शिस्तींत उभी होती. सिंगापुरांतील प्रमुख हिंदी नागरिक व वरिष्ठ जपानी अधिकारी आणि वृत्तसंस्थांचे वार्ताहर आपापले कॅमेरे घेऊन तेथें आलेले होते. सुभाषचंद्र बोस कसे दिसत असतील ? ते येथें येऊन कशा प्रकारचें कार्य करतील? जपान्यांशीं त्यांचे संबंध कशा प्रकारचे राहतील? अशा तऱ्हेचीं विचारचक्रें त्या ठिकाणीं हजर असलेल्या सर्व व्यक्तींच्या डोक्यांत फिरत असावीं. त्या मैदानावर चोहोंबाजूंस सुमारें दोनशें विमानें विखुरलेलीं होतीं. आपलें उड्डाण संपवून जमीनीवर पाय टेकलेल्या गिधाडांचे पंख जसे कांहीं क्षण भूपृष्ठाच्यावर दोहोंबाजूंस प्रसृत दिसतात तद्वत् या विमानांचे पंख दिसत होते. दूरवर एखाद्या विमानाची दुरुस्ती चाललेली दिसून येई. अधूनमधून विमानतळावरील जपानी कार्यकर्त्यांची कांहीं कामानिमित्त इकडेतिकडे ये-जा चाललेली दिसून येई. शहराच्या गजबजाटास

कंटाळून या मैदानावर वागडावयास आलेला वारा स्वैर संचार करीत असलेला दिसून येत होता. वेळ होत आली तशी सर्वांची दृष्टि अफाट आकाशाचें निरीक्षण करूं लागली. थोड्याच वेळांत क्षितिजावर एक विमान दिसूं लागलें. त्या विमानानें मैदानावर दोन प्रदक्षिणा घालून उंचावरून हळूहळू खालीं येण्यास प्रारंभ केला, आणि आम्ही उभे होतों त्या ठिकाणाहून सुमारें तीनशें गजांच्या अंतरावर तें वेगांत जमिनीवर उतरलें व तसेंच भरधांव पुढें पळत गेलें. हळूहळू त्याचा वेग कमी करण्यांत येऊन तें थोडें थबकलें. नंतर तोंड वळवून तें मोठ्या डौलानें भूभूत्कार करीत दुडदुड धांवत आम्ही उभे होतों त्या ठिकाणापासून सुमारें ५० गजांच्या अंतरावर येऊन उभें राहिलें. यंत्रगतीनें त्या विमानाचा तो अक्राळविक्राळ देह थरारत होता.

विमानतळावरील चारपांच कामकरी धांवत पुढें झाले. दोघांनीं विमानाच्या दोन्ही चाकांचे पुढील बाजूस लांकडी अडसर लावले व बाकीचे दोघांनीं विमानाचें दार उघडून त्यापाशीं तीनचार पायऱ्यांची शिडी लावली. सर्व अधिकारी विमानापासून ५-१० गजांचे अंतरावर एका ओळींत उभे राहिले. लेफ्टनंट कर्नल जगन्नाथराव भोसले पुढें झाले. जपानांत बरींच वर्षें वास्तव्य करून राहिलेले वृद्ध देशभक्त रासबिहारी बोस हे विमानांतून प्रथम खालीं उतरले. त्यांचे मागोमाग सुभाषचंद्र बोस हे व त्यांचे पश्चात् कांहीं जपानी अधिकारी आले. श्री. रासबिहारी व सुभाषचंद्र यांस जगन्नाथराव भोसल्यांनीं आणि इतर प्रतिष्ठित नागरिकांनीं एकामागून एक हार घातले. सुभाषचंद्र यांनीं शुभ्र खादीचा कोट, टोपी, पँट व नेकटॉय असा पोषाख परिधान केलेला होता. प्रथम श्री. रासबिहारी यांनीं सुभाषचंद्रांस जगन्नाथराव भोसल्यांचा परिचय करून दिला. दोघांचें हस्तांदोलन झालें. त्यामागून तेथें हजर असलेल्या इतर प्रतिष्ठित नागरिकांची व त्यांची ओळख करून देण्यांत आली. तदनंतर रांगांत उभे असलेल्या स्वातंत्र्य-सैन्याच्या अधिकाऱ्यांशीं हस्तांदोलन करीत त्या सर्वांचीं नांवें एकामागून एक सुभाषचंद्रांस सांगण्यांत आलीं.

शांत आणि निश्चल दृष्टीनें व गंभीर मुद्रेनें सुभाषचंद्र हे या नवपरिचित व्यक्तींचें बारकाईनें निरीक्षण करीत होते. त्यांचे चेहऱ्यावर खुशामती अथवा औपचारिक हास्य कधींही दिसत नसे. नव्या वातावरणांत, नव्या व्यक्तींस भेटतांना त्यांची ही भूमिका नेहमीं कायम असे. निस्सीम कार्यकर्ता हा प्रत्येक व्यक्तीकडे किंवा प्रसंगाकडे पाहतांना स्वीकृत कार्यास ते कितपत उपयोगी पडूं शकतील अशा एकाग्रतेनेंच त्यांचें परीक्षण व निरीक्षण करीत असतो. एखाद्या व्यक्तीच्या चालण्याबोलण्यांतील ऐट, पोषाखांतील रुबाब, भाषेचा लाघवीपणा, हाताखालील लोकांचा लवाजमा, मोटारगाडी वगैरेंचा थाट या गोष्टींची सामान्य माणसाचे मनावर जशी छाप पडते तशी ती सुभाषचंद्र बोस यांचेसारख्या ध्येयनिष्ठ व्यक्तींचे मनावर मुळींच पडत नाहीं. अशा व्यक्तींचे कार्यनिष्ठेबद्दल ते जरा साशंकच असतात. त्यांस साध्या, मोकळ्या आणि निष्पाप मनाच्या व्यक्तिच आवडतात. अनेक देशांच्या, विविध स्वभावांच्या व नाना तऱ्हेच्या लोकांशीं कित्येक चमत्कारिक प्रसंगीं त्यांचा संबंध आल्यामुळें प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावरून आवाजावरून, बोलण्याच्या लकबीवरून, सूक्ष्म हालचाली आणि हास्य इत्यादींवरून त्या त्या व्यक्तीचें स्वतःपुरतें आगाऊ स्वभावविश्लेषण करण्याकरितां त्यांनीं जे स्वतःचे मनाशीं आडाखे बसविलेले होते त्यांस अनुसरून त्यांनीं या प्रत्येक व्यक्तीचें मानसिक तोल केलें. खडी लष्करी सलामी घेतल्यानंतर हिंदी व जपानी वार्ताहरांनीं विचारलेल्या अनेक प्रश्नांस उत्तर देतांना ते म्हणाले, “ मी आतां येवढेंच सांगूं इच्छितों कीं, तुमच्या सर्वांचे सहवासांत आल्यानें मला आनंद झालेला आहे.” यानंतर सर्वजण आपापल्या मोटारींत बसले व सामुदायिक जयजयकारांत त्यांच्या मोटारी निघून गेल्या.

अतिपूर्वेंत सुभाषचंद्र येण्याचे अगोदर तेथील हिंदी जनतेंत व विशेषतः हिंदी युद्धबंद्यांत अशी एक साशंक मतप्रणाली दिसून येत होती कीं येणारी व्यक्ति ही खरोखरच सुभाषचंद्र बोस आहे कीं त्यांचे नांवें जपान-जर्मनीनें उभा केलेला कोणी तोतया आहे ? त्यांतल्या त्यांत सर्व इंग्रजधार्जिणे लोक, या विचारप्रवाहाशीं प्रवाहपतितांप्रमाणें पूर्ण-

पर्ण सहमत होते. परदास्य हें वाईट कां ? तर आपण एका परक्याची नोकरी करतों म्हणून नव्हे; दास्यांत मानवाचा शारीरिक आणि मानसिक ऱ्हास कोणत्या थरापर्यंत पोंचेल याला कांहीं सीमा नसते म्हणून. या न्यायास अनुसरून हिंदी लोकांचीं मनें इतकीं कमकुवत झालेलीं आढळून आलीं कीं, एका हिंदी देशभक्ताकडून इंग्रजांची कोंडी फोडून जगभर स्वैर संचार करण्याचा धाडसी प्रयत्न होऊं शकेल ही कल्पना रामायण-महाभारतांतील अनेक दैवी चमत्कारांप्रमाणेंच त्यांस अशक्य कोटींतील भासूं लागली. प्रत्यक्ष सुभाषचंद्र बोस याना पाहिल्यावर मात्र, ते दिवशीं विमानतळावर हजर असलेल्या लोकांची, हेच ते असावेत अशी नव्याण्णव टक्के खात्री झाली. सिंगापूर पडल्यावर जपान्यांचे मदतीनें व प्रेरणेनें जनरल मोहनसिंग यांनीं जी स्वातंत्र्य-चळवळ सुरू केली, त्यांत अनेक स्वार्थी कारणांकरितां सामील न होऊं इच्छिणारे हिंदी युद्धबंदी जर्मनींतील सुभाषचंद्र, तोतयाच असावा असें समजत होते. "तो खरा असला तर त्यानें येथें येऊन या स्वातंत्र्य-चळवळीचें नेतृत्व पत्करावें म्हणजे आम्हीं त्यांत सहभागी होऊं... मोहनसिंगचा काय नेम सांगावा...किती झालें तरी तो इंग्रजांच्या सैन्यांतील अधिकारी..." अशा प्रकारचा या लोकांचा कांगावा असे. नेताजी सुभाषचंद्र बोस आतिपूर्वेंत आल्यावर कांहीं दिवसांनीं ते तोतये नसून खरोखरीच सुभाषचंद्र आहेत अशी जेव्हां सर्वांची समजूत पटली तेव्हां या इंग्रजधार्जिण्या हिंदी युद्धबंद्यांनीं आपला पवित्रा बदलला. एके दिवशीं, सिंगापुरांतील हिंदी युद्धबंद्यांच्या "क्रांजी" नामक छावणींत कांहीं परिचित महाराष्ट्रीय डॉक्टर मित्रांस भेटण्यास मी गेलों असतांना, त्यांच्या बंगाली सहचरांशीं माझा परिचय करून देण्यांत आला. तेथेंच माध्यान्हीचें भोजन उरकल्यावर गप्पा मारीत असतांना त्यांतील कांहीं लोक रिकाम्या कुतूहलानें व मुद्दाम कुत्सितपणें मला, नेताजी बोस व त्यांचे स्वातंत्र्य-चळवळीबद्दल अनेक खोडकर प्रश्न विचारीत होते. छिद्रें शोधण्याची त्यांच्या प्रश्नांतील काकदृष्टि पाहून मनांतल्या मनांत मी संतापलों; परंतु या लोकांस आपलेकडे वळवून घेण्याचें असल्यास

आपला संताप बाहेर दिसूं देतां उपयोगी नाहीं असा निश्चय करून मी वरपांगीं अत्यंत शांतपणें त्यांच्या कांटेरी प्रश्नांचा कांटा मोडून काढण्याचा प्रयत्न करीत होतों. त्यांतील एक बंगाली डॉक्टर मला म्हणाले, " ...... येथें आलेले सुभाषचंद्र बाह्य रूपानें जरी तीच पूर्वीची व्यक्ति असली तरी हिंदुस्थानांतून निघते वेळीं त्यांनीं पगडी फिरविलेली दिसते ...... हिंदुस्थानांत राहूनच अहिंसावादी प्रयत्न करण्याचें ध्येय सोडून देऊन आतां ते जपान व जर्मनीसारख्या हुकूमशाही राष्ट्रांशीं संगनमत करूं लागलेले आहेत..." परंपरागत भाविक समजुतीचीं कांहीं शेलकीं वाक्यें एखाद्या गांवढळ आणि आडमुठ्या इसमानें उच्चारीत राहावें तशापैकीं अर्धवट इंग्रजी ज्ञानानें प्राप्त केलेलीं व नेभळ्या मनःप्रवृत्तीशीं उत्तम जुळत असलेलीं विधानें हे लोक ठोकून देत व अशा रीतीनें वरपांगी खऱ्या देशभक्तीचा आव आणून त्या आडोशाच्या मागें ते आपलीं भ्याड मनें लपवीत.

सुभाषचंद्र बोस सिंगापूरच्या विमानतळावर उतरले त्या वेळेस त्यांचे प्रकृतीवर जर्मनींतील दीड-दोन वर्षें वास्तव्याचा चांगला परिणाम झालेला दिसून येत होता. त्यांचा वर्ण गौर असून चेहऱ्यावर लाली दिसत असे. डोक्यावर टक्कल आणि त्यांची गंभीर मुद्रा व शांत दृष्टि हीं पाहून आपण एका चिकित्सक विद्वान् व्यक्तीपुढें उभे आहोंत याची प्रत्येकास जाणीव होत असे. सोनेरी चौकटीचा चष्मा त्यांचे गौर चेहऱ्यावर खुलून दिसे. मध्यम उंची व सुदृढ बांधा यामुळें पाहतां-क्षणींच त्यांची कोणावरही चटकन् छाप बसत असे. वास्तविक थोर, स्वार्थत्यागी व सच्छील व्यक्तीचा दर्शनी रुबाब हा महत्त्वाचा भाग नाहीं; कारण तो अनिश्चित अशा अनेक बाह्य उपाधींवर अधिष्ठित असतो. तरीपण या दृष्टीनें सुद्धां सुभाषचंद्र यांच्यांत कोणतेंच न्यून काढण्यास जागा नव्हती. ते चालत तेसुद्धां अगदीं ताठ व छाती पुढें काढून. असो.

## थोडा पूर्ववृत्तांत

यापूर्वीं सुभाषचंद्र बोस यांस मी एकदांच पाहिलें होतें; तें म्हणजे

महालय, अनुक्रम ........ विभाग ...... नों. दि.

हिंदुस्थानांत. पुण्यास इसवी सन १९३९ सालीं काँग्रेसचे अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन ते पुरोगामी गटाचा प्रचार करण्यासाठीं म्हणून पुण्यास आलेले होते. श्रोत्यांच्या अफाट गर्दीत मी त्यांना लांबून पाहिलें. त्या प्रसंगीं त्यांच्यांत व इतर देशभक्तांत फरक कळून येण्याइतका माझा व त्यांचा निकटचा सहवास आलेला नव्हता, व पुढेंही कधीं येईल असें वाटण्यास त्या वेळीं कांहींच कारण नव्हतें. त्यांचे भाषणानें मी भारून मात्र गेलों व आतांच्या आतां त्यांचे पक्षास जाऊन मिळावें असें तरुणपणच्या सहजप्रवृत्तीनें मला त्या वेळेस वाटलें. त्यांचे पक्षाचे मुखपत्रांत तरी आपण काम करावें असें मला वाटूं लागलें. देशभक्तीच्या वासंतिक वातावरणांत विचारवृक्षांना फुटलेले तरुणपणचे पल्लव हे आजूबाजूच्या परिस्थितीच्या शरदृतूंत ताबडतोब झडून जातात, तसेंच तें व्याख्यान ऐकून टिळक स्मारकमंदिराच्या आवाराबाहेर मी पडलों तेव्हां माझें झालें.

हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतां, स्वजन आणि विजन या दोघांचे आडकाठीमुळें कित्येक थोर व्यक्तींस आपल्या विचारानुरूप कार्य करण्यास पुरेसा वाव मिळत नाहीं. प्रत्येक व्यक्तीचें वैशिष्टय व थोरवी कळण्याइतका निकटचा व चिरकाल संबंधही सामान्य जनतेचा, कोणा एका व्यक्तीशीं येत नाहीं. अर्थात् भरीव दर्शनी कार्य आणि निकटचा सहवास यांचे अभावीं जाहिरातबाजीवर व अनुयायांच्या संख्येवरच माणसाची किंमत करण्याची सर्वसामान्य प्रवृत्ति होते. अशा परिस्थितींत हिंदुस्थानांत सुभाषचंद्र बोस हे अनेक देशभक्तांपैकीं एक असे मानले गेले असल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. स्वदेशीचा प्रचार, राजकीय उपवास, निःशस्त्र निदर्शनें, असहकार, कारागृहप्रवेश, इत्यादि अभिनव उपक्रम ज्या महात्म्यानें सुरू केले त्याचीच सर्वांनीं ' री ' ओढली तर या मार्गाच्या आद्यप्रणेत्यापुढें जनतेच्या दृष्टीस इतर सर्व फिक्के वाटावेत हें मनुष्यस्वभावास धरून आहे. याशिवाय महात्मा गांधींनीं अवलंबिलेला हा मार्ग बहुजन समाजास झेपण्यासारखा व पचण्यासारखा असल्यामुळें सुभाषचंद्र यांचें असिधाराव्रत लोक ऐकूनसुद्धां घ्यायला तयार

होईनात, मग त्याचा संकल्प सोडण्याचें तर दूरच राहिलें. वयोवृद्ध व अनुभववृद्ध नेता समोर असतांना लोक इतर धडाडीच्या तरुणांचें कौतुक करतील, परंतु त्यांनीं जर म्हटलें कीं, " आमच्या मागें या " तर ते चिचकून एकदम महात्म्यांच्या व्यासपीठाला मिठी मारतील.

अशी परिस्थिति असतांनासुद्धां सुभाषचंद्र बोस हे निष्क्रिय बनले नाहींत किंवा पुढाऱ्यांस वा जनतेस शिव्याशाप देत बसले नाहींत यांतच त्यांचें व्यक्तिमत्त्व सांठविलेलें आहे. वास्तवतेशीं समरस होऊन जेवढें कार्य शक्य असेल तेवढें करावयाचेंच व शिवाय आपल्याला पाहिजे तशी परिस्थिति निर्माण करून घेण्याकरितां अविश्रांत परिश्रम करावयाचे अशी धमक त्यांच्या अंगांत होती. देशभक्तीचें अस्सल बीज मूलतःच इतकें जोमदार असतें कीं, तें कसल्याही परिस्थितींत टिकाव धरून तर राहतेंच, परंतु शिवाय अनुकूल वातावरणांत तें फोंफावत जाऊन त्याचा भला मोठा स्वातंत्र्यवृक्ष तयार होतो व त्याखालीं संत्रस्त जनता विसांवा घेते.

हिंदी जनतेची अशी कांहीं एक विशिष्ट पापभीरु मनोभूमिका तयार झालेली आहे कीं, इंग्रजांचें राज्य जुलमी आहे व त्यांचे कायदे सुलतानशाही आहेत असें जरी ते म्हणूं लागले असले तरी त्या राजसत्तेचे कायदे जाणूनबुजून उल्लंघन केल्यावरही लोक स्वतः होऊन त्या सरकारचा पाहुणचार आपणावर ओढवून घेतात. हें दिसण्यांत विसंगत दिसतें. त्याची सत्ता मानावयाची असली तर त्यांच्या कायद्यांचें उल्लंघन करूं नये. बरें, सत्ता मानावयाची नसली तर आपण होऊन त्यांचे सरकारी पाहुणे होण्याचा खटाटोप करूं नये. त्यांचे कायदे झुगारणें जर बरोबर, तर कायदे झुगारल्याबरोबर त्यांचेचकडून त्याची शिक्षा मागून घेणें हें बरोबर कसें ठरेल ? या सामान्य प्रवृत्तीस सुभाषचंद्र हे अपवाद होते. इंग्रजांनीं त्यांच्याच घराचा तुरुंग करून त्यांत त्यांस डांबून ठेवलें. दुसरा एखादा पापभीरु इसम इंग्रजांची कृपादृष्टि होण्याची वाट पाहत बसला असता. तो म्हणेल, ' स्वातंत्र्य–तृष्णेनें नेताजी इतके बेभान झालेले होते कीं, हें बंधन आपण पाळलें पाहिजे येवढी साधी गोष्ट कांहीं त्यांच्या लक्षांत राहिली नाहीं. '

त्यांचे घराचे आंवतींभोंवतीं विजातियांचे चाकरींतील ६०-७० एतद्देशीय राजनिष्ठ अशा गुप्तदूतांचा पहारा होता. या दूतांचे दिमतीस दोन मोटारीही होत्या. सुभाषचंद्र हे दुसरे मजल्यावरील एका खोलींत राहत असत. शेजारचे खोलींत त्यांची आई राहत होती तरी मधलें दार बंद केलेलें होतें. त्या विस्तीर्ण गृहाच्या इकडील अर्ध्या भागांत या दोनच खोल्यांत या दोन व्यक्तींचें वास्तव्य असे. मधल्या खोल्या रिकाम्या असून पलीकडील अर्ध्या भागांत त्यांचे बंधु व इतर कुटुंबीय मंडळी राहत असत. प्रवेशद्वारासमोर खोलीचे मधोमध एक पडदा टाकून त्या खोलीचे दोन भाग करण्यांत आलेले होते. पुढचे भागांत प्रवेशद्वाराजवळ एक पलंग होता, व आंतील भागांत पडद्याचे मागें एक पलंग. या आंतील पलंगावरच सुभाषचंद्र झोंपत असत. प्रवेशद्वारासमोर खोलीच्या अर्ध्यावर पडदा असल्यामुळें पलीकडे काय चाललें आहे हें कळत नसे. बोलाविल्याशिवाय त्या बाजूस कोणींही फिरकूं नये, अशी सुभाषचंद्रांनीं ताकीद देऊन ठेविलेली होती. कांहीं हवें असल्यास, अथवा जेवण हवें म्हणून सांगावयाचें असल्यास, ते आंतूनच एक घंटा वाजवीत व एका चिठ्ठीवर जरूर तो मजकूर लिहून बाहेरील पलंगावर लिहून ठेवीत असत. जेवणाचें ताट वा इतर वस्तु बाहेरील बाजूस त्यांचे पुतणे वा इतर कोणी आणून ठेवी. पडदा वर करून त्या, ते आंत घेत. कोणाशीं एक शब्दसुद्धां बोलण्याची त्यांनीं प्रथा ठेवलेली नव्हती. क्वचित् त्याचें अंगमर्दन करून घेण्यास ते त्यांच्या पुतण्यास आंत बोलावून घेत असत. अतिपूर्वेंतील वास्तव्यांतसुद्धां त्यांचें अंगमर्दन करण्यास हिंदी स्वातंत्र्य-सैन्यांतील एक पहिलवान कायमचा नेमून दिलेला होता. इतर कांहीं अडचण नसल्यास त्यांना अशा तऱ्हेनें रोज मालिश करून घेण्यास हवें असे. घरांतून एकाएकीं नाहींसे होण्यापूर्वी पांचसहा दिवस त्यांनीं पूर्ण मौन स्वीकारून उपवासही सुरू केलेला होता, व त्या बाजूस कोणींही फिरकूं नये असें सर्व कुटुंबियांस बजावून सांगितलें होतें. गुप्त होण्याची ही पूर्वतयारी होती. इतर वेळेस माणसाचें अस्तित्व कोणास कळून आलें नाहीं तरी रोज दोन वेळां

भोजनसमयीं सर्वजण पृच्छा करतातच. अर्थात् भोजनसमयींही आपली आठवण कोणीं काढूं नये असें ठरवून नेताजींनीं जेवणही वर्ज्य केलें. अशा रीतीनें सर्वांशीं संबंध तोडल्यावर कोणत्या दिवशीं ते एकाएकीं गुप्त झाले हें कोणालाच माहीत नाहीं व दूर पूर्वेत त्याबद्दल कांहीं लोकांनीं त्यांस प्रश्न केला असतां ते म्हणाले कीं, " हिंदुस्थान स्वतंत्र होईपर्यंत मी त्याबद्दल कोणाजवळही बोलूं इच्छीत नाहीं."

हिंदी लोकांनीं अशा महत्त्वाच्या बाबतींत रिकामी चौकस वृत्ति दाखवूं नये असें सुभाषचंद्रांचें स्पष्ट मत त्यांनीं अनेक वेळां खाजगी रीतीनें पुष्कळशा व्यक्तींजवळ बोलून दाखविलेलें आहे. एखादी गुप्त गोष्ट हिंदी माणसास सांगण्यास ते कचरत असत ; कारण हिंदी माणसाचे पोटांत असली गुप्त गोष्ट चिरकाल टिकत नाहीं, असें स्वतःच्या अनुभवावरून त्यांचें मत बनलेलें होतें. या दृष्टीनें सर्व हिंदी लोकांनीं आपलें मन प्रगल्भ करून जास्त जबाबदारीनें वागावयास शिकलें पाहिजे.

स्वगृहांतील बंदिवासांतून अदृश्य झाल्यावर ते खुष्कीचे मार्गानें जर्मनींत पोंचले असें कांहीं व्यक्तींनीं प्रसिद्ध केलें आहे ; परंतु त्या-बद्दलची प्रत्यक्ष सुभाषचंद्रांचे तोंडची कांहींच हकीगत उपलब्ध नाहीं. उत्तर आफ्रिकेंत इंग्रजांचे तर्फे लढून जर्मनांचे कैदी बनलेले. कांहीं हिंदी सैनिक जर्मनींत आणले गेले होते. सुभाषचंद्रांनीं या पांच हजार सैनिकांची स्वातंत्र्य–सेना उभी केली. झेंप घेत असलेल्या वाघाचें चिन्ह तिरंगी झेंड्यावर अधिष्ठित केलें. युरोप खंडांतील युद्धआघाडींचें त्यांनीं बारकाईनें निरीक्षण करून युरोपमधील हिंदी जनतेस त्यांनीं स्वातंत्र्याची हांक दिली. जर्मन सेना रशियांत कास्पियन समुद्रापर्यंत आली असती तर जर्मनींतील हिंदी स्वातंत्र्य–सैन्य वायव्य सरहद्दींतून हिंदुस्थानांत शिरलें असतें.

हिटलरचे व सुभाषचंद्रांचे परस्पर संबंध फारच चांगले होते, कारण दोघेही पट्टीचे देशभक्त. हिंदी स्वातंत्र्य-सैन्यास उत्तमोत्तम युद्धसामुग्री व तरबेज लष्करी शिक्षक पुरविण्यांत यावेत असा हिटलरचा हुकूम होता.

एका सभेंत जर्मन नागरिकांस सुभाषचंद्र बोस यांचा परिचय करून देतांना हिटलर गौरवानें म्हणाला, "एका परीनें सुभाषचंद्र बोस हे माझेपेक्षांहि श्रेष्ठ आहेत ; कारण मी आठ कोटींचा पुढारी आहें, तर हे गृहस्थ चाळीस कोटींचे अध्वर्यु आहेत." येथील वास्तव्यांत सुभाषचंद्रांनीं जर्मन भाषा कामापुरती शिकून लष्करी शिक्षणांतही बारकाईनें लक्ष घातलें व सहज उचलतां येण्यासारखें होतें तेवढें आत्मसात् केलें. अनेक प्रसंगीं वरिष्ठ जर्मन अधिकाऱ्यांकडून भेट म्हणून दिलीं गेलेलीं अनेक मौल्यवान् व हरतऱ्हेचीं घड्याळें, दुर्बिणी, पिस्तुलें व तत्सम इतर दुर्मिळ परंतु अत्यंत उपयुक्त अशा वस्तु नेताजींचे बरोबर शेवटपर्यंत होत्या.

रशियांत स्टॅलिनग्रॅडच्यापुढें मुसंडी मारणें जर्मन सैन्यास भगीरथ प्रयत्नांतींही शक्य झालें नाहीं. अर्थात् वायव्येच्या बाजूनें हिंदुस्थानांत शिरणें सहजसाध्य नाहीं हें दिसून आलें. अतिपूर्वेंत पंचवीस लक्ष हिंदी लोक स्थायिक झालेले असून ब्रह्मदेश जपान्यांनीं जिंकलेला असल्यामुळें त्या बाजूनें तावडतोब हिंदुस्थानावर हल्ला सुरू करणें शक्य आहे, अशी एक कल्पना निघाली. जर्मनीचे परराष्ट्रमंत्री व्हॉन रिबेन्ट्रॉप, जपानचे जर्मनींतील वकील व सुभाषचंद्र यांच्यांत वाटाघाटी सुरू झाल्या. खुष्कीच्या मार्गानें हें शक्य नसल्यामुळें वायुप्रवास अथवा समुद्रपर्यटन यापैकीं एक कोणतातरी मार्ग अवलंबिणें जरूर होतें. समुद्रांतून सुद्धां साध्या बोटींतून येणें शक्य नव्हतें. कारण इंग्रज, अमेरिकन व त्यांच्या दोस्त राष्ट्रांचीं लढाऊ जहाजें सर्वत्र संचार करीत होतीं. पाणबुडीनेंच ७-८ हजार मैलांचा हा प्रवास शक्य होता. दोन पाणबुड्या या कामगिरीकरितां मुद्दाम निवडण्यांत आल्या. हिंदी स्वातंत्र्यसैन्यांतील बिनतारी संदेश पाठविणारे पांच सैनिक व बरीच वर्षें जर्मनींत वास्तव्य करून शिक्षण घेत असलेले श्री. स्वामी व श्री. हसन यांची सुभाषचंद्र यांनीं निवड केली. कांहीं जर्मन व जपानी अधिकारीही त्यांचेबरोबर होते. ही सर्व मंडळी बर्लिनहून रोमला आली व तेथून दोन महिन्यांच्या जलप्रवासानंतर पाणबुडींतून अतिपूर्वेंत सुमात्राला येऊन उतरली. तेथून विमानानें ते सर्वजण टोकियोस

गेले. तेथें मुख्य मंत्री जनरल टोजो यांच्याशीं वाटाघाटी होऊन त्यांनीं अतिपूर्वेंत हिंदी स्वातंत्र्य-सैन्य उभारून स्वातंत्र्य-लढा सुरू करण्याचें ठरविलें.

## अविरत कार्य

शकुन-अपशकुन यांचेवर विश्वास असणाऱ्यांकरितां येथें एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती ही कीं, मेयर नांवाचा एक ज्यू कोट्याधीश अतिपूर्वेंत युद्ध सुरू होतांच सिंगापूर सोडून पळून गेलेला होता. त्याचा सुंदर बंगला जपान्यांचे ताब्यांत आला. वर्ष–दोन वर्षें बंद असलेला तो बंगला सुभाषचंद्रांचें सिंगापुरांतील वसतिस्थान म्हणून ठरविण्यांत आला. तो ताब्यांत घेऊन स्वच्छ करण्यासाठीं हिंदी स्वातंत्र्य-सैन्याचे कांहीं सैनिक पाठविण्यांत आले. बाहेरील जड लोखंडी फाटक गंजून गच्च बसलेलें होतें. तें उघडण्यासाठीं म्हणून या सैनिकांनीं खटाटोप आरंभला. त्या फाटकाचेवरील नक्षीदार असा एक जड लोखंडी तुकडा गंजानें चिरला गेलेला होताच. तो या धक्काबुक्कीनें खिळखिळा होऊन एका शिपायाचे डोक्यावर पडला. त्या शिपायाचें डोकें फुटून तो तात्काळ मरण पावला. आगामी स्वातंत्र्य-युद्धाकरितां सुभाषचंद्रांचे गृहप्रवेशापूर्वींचें हें सुरवातीचें रक्तसिंचन होतें. रणचंडीचा हा पहिला बळी.

सुभाषचंद्र बोस हे सिंगापुरांत आले त्याचे दुसरेच दिवशीं म्हणजे ३ जुलै १९४३ रोजीं सगळीकडे "नेताजी आले...नेताजी आले" अशी बातमी पसरली. 'नेताजी' हें नामाभिधान रूढ होण्यास बरींच कारणें आहेत. एकतर जर्मनीमधील हिंदी लोक सुभाषचंद्र बोस यांस नेताजी म्हणून संबोधीत असत, हें त्यांचेसह आलेल्या त्यांच्या सात हिंदी साथीदारांच्या बोलण्यावरून स्पष्ट दिसत होतें. दुसरें म्हणजे त्यांच्या तोडीचा दुसरा कोणीच हिंदी नेता हिंदुस्थानाबाहेर नव्हता. त्यांत आणखी हे स्वातंत्र्य–चळवळीचें

नेतृत्व स्वीकारण्यास आलेले होते. शिवाय सुभाषचंद्र बोस हें नांव लांबलचक तर खरेंच, परंतु त्यांत आणखी विशेष गोष्ट अशी कीं, 'श्री.' अथवा तत्सम इतर कोणतें तरी पूर्वपद किंवा बहुमानार्थी "बाबू" सारखें उत्तरपद त्यांस लावणें जरूर होतें. इतकेंही करून शिपाई अथवा तत्सम कनिष्ठ लोकांचे तोंडीं तें अगदीं एकेरी असें वाटावयाचें. एखाद्या निकटवर्तीयाचा जिव्हाळा व शिवाय राष्ट्रपतीचा निदर्शक असा बहुमान अशा दोन्ही गोष्टी एकाच नांवांत साधणें सोपी गोष्ट नव्हती. हे व अशा तऱ्हेचे अनेक उद्देश "नेता" या शब्दाचे "नेताजी" या रूपानें साधले.

अक्षरशः एक मिनिटाचीही उसंत न घेतां नेताजींनीं तावडतोब अविरत कार्यास सुरवात केली. वरिष्ठ जपानी अधिकाऱ्यांच्या भेटी, हिंदी लष्करी अधिकाऱ्यांच्या गांठी, श्री. रासबिहारी व इतर प्रतिष्ठित हिंदी नागरिकांच्या मुलाखती, जर्मन वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं सल्लामसलती असा दिवसांतून पंचवीस तासांसही अपुरा पडणारा त्यांचा कार्यक्रम होता. रात्रभर झोंप न घेण्याची प्रथा त्यांनीं हिंदुस्थानचे बाहेर पडल्यावरच सुरू केली असें नव्हे, तर हिंदुस्थानांतील अनेक कारागृहांत त्यांचेबरोबर कारावास भोगलेले त्यांचे सहकारीही असेंच सांगतात कीं, सुभाषचंद्र हे रात्रीचे लवकर झोंपत नसत. मुद्दाम कोणी त्यांस लवकर झोंपा असा आग्रह करूं लागलें तर ते तेवढ्यापुरते डोळे मिटल्याचें सोंग करून न्नात्य मुलाप्रमाणें फिरून उठून, झोंप येत नसल्याचें निमित्त सांगून वाचन-लेखन करूं लागत. येथें तर त्यांना भरपूर कार्य असल्यामुळे; त्यांची ही संवय त्यांचे पथ्यावरच पडली. सभोंवतालचे लोकांस मात्र हें आश्चर्य वाटावयाचें कीं, रोज जाग्रण करणाऱ्या या गृहस्थास कुपथ्य कसें होत नाहीं! अशा तऱ्हेनें अतिपूर्वेंत असेतोंवर सर्वसाधारण पांच वाजतां झोंपी जाऊन नऊ वाजतां उठण्याचा त्यांचा क्रम असे. क्वचित् प्रसंगीं जे दिवशीं त्यांस सकाळींच वायुप्रवासास निघावयाचें असे ते दिवशीं त्यांस झोंप घेण्यास वेळच उरत नसे. झोंप न घेतां सतत चाळीस–पन्नास तास अविरत काम करण्याचे व तें सुद्धां मेजाशीं बसून नव्हे तर

मोटारीनें दौऱ्यावर जाऊन, ठिकठिकाणीं तीन-तीन तास उभें राहून, एकामागून एक अनेक व्याख्यानें देण्याचे असले प्रसंगही कांहीं थोडेथोडके आले नाहींत. आपले नेहमींचे झोंपेचे वेळीं झोंप घेणें शक्य होणार नाहीं तर आज रात्रींच झोंप काढावी असा विचार त्यांचे मनास कधीं शिवलासुद्धां नाहीं.

३ तारखेस सकाळीं ते श्री. रासबिहारी बोस यांचे बंगल्यावर त्यांच्याशीं वाटाघाटी करण्याकरितां आले. मी व जगन्नाथराव भोसले राहत होतों त्याच्या शेजारींच मालकम रोडवरील नं. १ चा हा बंगला होता. दुसरे दिवशीं कॅथेसभागृहांत मोठी परिषद् बोलाविण्यांत आलेली होती. अतिपूर्वेंतील अनेक देशांच्या हिंदी स्वातंत्र्य-संघांचे प्रतिनिधि या परिषदेस हजर होते. श्री. रासबिहारी यांनीं या संघांच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन, नेताजींच्या गळयांत त्या कार्याची माळ टाकल्याचें जाहीर केलें. नेताजी भाषण करण्यास उठले. अतिपूर्वेंतील हें त्यांचें पहिलेंच जाहीर भाषण होतें. नेत्यास आवश्यक असे सर्व गुण त्यांच्या या भाषणांतून पूर्णपणें प्रतीत झालेले आहेत. वयोवृद्ध रासबिहारींच्या भूतपूर्व नेतृत्वाचा गौरव करून स्वशिरावर पडणाऱ्या कार्याच्या आत्यंतिक जबाबदारीच्या पूर्ण जाणिवेनें तें कार्य अंगावर घेत असल्याचें त्यांनीं सांगितलें. श्री. रासबिहारींनीं व इतर प्रतिनिधींनीं त्यांचा स्वतःचा ज्या शब्दांत गौरव केलेला होता, त्यास पात्र नसल्याचें त्यांचें मन ग्वाही देत असल्याची त्यांनीं कबुली दिली, व शेवटीं स्वातंत्र्य-लढा नेटानें चालविण्याचा निर्धार जाहीर करून त्यांनीं अतिपूर्वेंतील सर्व हिंदी जनतेस ध्येय-पूर्तीकरितां बद्धकटि होण्याचा आदेश दिला.

तेच दिवशीं रात्रीची गोष्ट. आठ वाजण्याचा सुमार होता. स्वातंत्र्य-सैन्याच्या मध्यवर्ती कचेरींतील एका अधिकाऱ्याकडे नेताजींच्या मापाचे चार-पांच खाकी गणवेष तयार करून घेण्याचें काम सोंप-विण्यांत आलेलें होतें. जगन्नाथराव भोसल्यांनीं त्या अधिकाऱ्यास बोलाविणें पाठवून " काम कोठवर आलेलें आहे ? " असें विचारलें. दुसरे दिवशीं हिंदी स्वातंत्र्य-सैन्याची जंगी लष्करी कवायत असून,

नेताजी तिची पाहणी करणार होते. अर्थात् त्या प्रसंगीं घालण्याकरितां फौजी गणवेष जरूर होता. आणखी एक तासभरानें ते कपडे मिळणार होते. जपानी फौजी पुरवठाखात्याकडून नेताजींच्या मापाचे गुडघ्यापर्यंतचे आरी लावलेले चामड्याचे लष्करी बूट आले. हे बूट ब्राऊन रंगाचे असून त्यांच्या आरींना सोनेरी मुलामा चढविलेला होता. शिंप्याच्या खनपटीस बसून, तासभरानें तो अधिकारी नेताजींचा खाकी गणवेष व डोक्यावर घालण्याची गरम खाकी कापडाची घडीची टोपी घेऊन आला. आमच्या बंगल्यावर राहणाऱ्या लष्करी धोब्यानें चटकन् त्या कपड्यांना इस्तरी करून दिली. रात्रीं साडेदहाचे सुमारास ताबडतोब तो गणवेष नेताजींचे निवासस्थानीं पोंचविण्यांत आला.

५ जुलै १९४३ रोजीं सकाळीं सिंगापूर म्युनिसिपल इमारतीचे भव्य दगडी चौथऱ्यावरून नेताजींनीं लष्करी पोषाखांत त्यांच्या स्वातंत्र्य-सेनेची पहिली सलामी घेऊन तिची जंगी कवाईत पाहिली. तेच दिवशीं सायंकाळीं जनरल टोजो आले. तेव्हां दुसरे दिवशीं खास त्यांच्या इच्छेवरून पुन्हां तोच कार्यक्रम उरकण्यांत आला. परिषदेसाठीं आलेले सर्व प्रतिनिधिही हजर होते. सुरवातीचे या जंगी परिषदेसाठीं जाव्हा, सुमात्रा, मलाया, सयाम, बोर्निओ, ब्रह्मदेश, चीन, इंडोचायना, मांचूरिया, फिलीपीन्स, जपान इत्यादि प्रदेशांतून आलेल्या हिंदी प्रतिनिधींना ६ जुलै रोजीं दुपारीं २॥ चे सुमारास नेताजींनीं अल्पोपाहारास आमंत्रण दिलेलें होतें. या प्रसंगीं प्रत्येक देशांतील प्रतिनिधिमंडळाच्या प्रमुखानें आपापल्या देशांतील हिंदी लोकांचे संबंधींची समग्र माहिती लिहून आणून ती त्या प्रसंगीं सर्वांचे समोर नेताजींस वाचून दाखवावी व नंतर त्याची एक प्रत नेताजींस सादर करावी, अशी सर्वांस आगाऊ सूचना देण्यांत आलेली होती. या प्रसंगीं हजर असलेले बरेचसे प्रतिनिधि हे त्यांच्या अंगच्या कांहीं विशेष गुणांमुळें प्रतिनिधि म्हणून निवडले गेले नसून, केवळ श्रीमंतीच्या जोरावर प्रतिनिधि बनून आले होते. त्यांना राजकारण कशाशीं खातात हें सुद्धां ठाऊक नव्हतें व स्वातंत्र्य कशासाठीं हवें असें विचारलें असतां थोडेसें घुटमळल्यावर त्यांनीं उत्तर दिलें असतें— " आणखी

श्रीमंत होतां यावें म्हणून. ” दुर्दैवानें आपले लोकांचे मनावर श्रीमंतीचा व बाह्य डामडौलाचा इतका पगडा बसलेला आहे कीं, गोऱ्या बादशहांचे शुभचिंतनार्थ आपल्याला आपले खास प्रतिनिधि निवडावयाचे असोत किंवा नेताजींसारख्या ज्वलज्जहाल पुढाऱ्याचे-बरोबर स्वातंत्र्यकार्य करण्याकरितां कांहीं खास विश्वस्त नेमावयाचे असोत, या दोन्ही परस्परविरोधी कार्याकरितां थोड्याफार फरकानें आपण जवळजवळ तींच माणसें नियुक्त करतों व तीं म्हणजे आपल्या समाजांतील सुखवस्तु, कार्यशून्य, लांगूलचालन करणारीं, धनाढ्य व वारा वाहील तशी पाठ फिरविणारीं. उपरि-निर्दिष्ट दोन कार्यांपैकीं पहिल्या प्रकारचे कार्यास अशीं माणसें निवडावीं हें सयुक्तिक आहे. परंतु स्वातंत्र्य-कार्यास स्वार्थत्यागी, कार्यप्रवण, विद्वान् व स्वातंत्र्यार्थ इतरांपेक्षां जास्त तळमळणारीं माणसेंच निवडून देणें जास्त इष्ट ठरेल. या व्यक्तींजवळ पैसा नाहीं म्हणून स्वातंत्र्य-संघातर्फे धनाढ्य लोकांनींच स्वतः प्रतिनिधि म्हणून जावयाचें, ही प्रथा कार्याचा विघात करणारी आहे. अशीच कांहींशी या प्रसंगीं परिस्थिति होती. आलेले लोक बहुधा सिंधी, पंजाबी व तामिळी होते. यांत सुशिक्षित, जगाच्या परिस्थितीचें ज्ञान असलेला व स्वातंत्र्य-कार्याची तळमळ असलेला इसम एखाद दुसराच होता. इतर सर्व गुळाचे गणपति. त्या त्या देशांत हिंदी लोकांची वस्ती किती आहे? त्यांचा मुख्य व्यवसाय काय? ते स्वातंत्र्यार्थ सैनिक म्हणून लढण्यास व इतर प्रकारची मदत करण्यास कितपत तयार आहेत? त्यांतील कांहीं इंग्रजधार्जिणे अथवा अन्य प्रकारें स्वातंत्र्य-कार्य-विरोधक आहेत किंवा काय? स्थानिक जपानी अधिकारी हे विघ्नसंतोषी-पणा करतात का मदत करण्यास तत्पर आहेत? अशा प्रकारची माहिती नेताजींस या सर्वांकडून हवी होती. यांत चीनमधील एका प्रतिनिधीनें इंग्रजांचे वेळेस कसें जिकडे तिकडे आबादी आबाद होतें याचें वर्णन करून जपान्यांचेवर तोंडसुख घेण्यास आरंभ केला. आपली अशी एक राष्ट्रीय भाषा अजून तयार झालेली नसल्यामुळें हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचे जवळ जवळ सर्व व्यवहार इंग्रजींतूनच चालवावे

लागत होतें. हा दैवदुर्विलासच होय. प्रत्येकानें आपला अहवाल वाचण्याचे वेळीं अथवा तदनंतर नेताजींची व त्याची कांहीं प्रश्नोत्तरें होत असत. वर उल्लेखिलेला प्रतिनिधि जेव्हां गतकालांतील आबादीचें तोंड भरून वर्णन करूं लागला, तेव्हां इतर सर्व प्रतिनिधि व नेताजी त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनें बघूं लागले. अथपासून इतिपर्यंत त्यांत तेंच रडगाणें होतें. तें संपूर्ण ऐकल्यावर नेताजी आपली शांत दृष्टि त्याच्यावर स्थिर करीत इंग्रजींत म्हणाले, "...परंतु हा कांहीं प्रस्तुतचा मुद्दा नव्हे..." त्यांतील एक-दोघांचे अहवालच सयुक्तिक व माहितीपूर्ण होते. इतरांचे अपूर्ण तरी होते किंवा मुद्दा सोडून होते.

# कार्यास सुरवात

## जनतेची उत्सुकता

सिंगापूर शहरांत मुख्यत्वें हिंदी व चिनी अशा दोन जातींच्या लोकांचीच समप्रमाणांत वस्ती आहे. यामुळें या दोहोंपैकीं कोणत्याही एका वर्गाचा कांहीं समारंभ अथवा उत्सव असल्यास त्यामुळें सबंध शहर गजबजून जातें. इसवी सन १९४३ च्या जुलै महिन्याच्या ९ तारखेस सिंगापुरांत नेताजी सुभाषचंद्र बोस यांचें पहिलें जाहीर व्याख्यान ठरविण्यांत आलें होतें. सिंगापुरांतील सर्व-सामान्य जनतेस त्यांचें दर्शन घडण्याचा हा पहिलाच प्रसंग. त्या दिवशीं प्रत्येक हिंदी माणसाचे चेहऱ्यावर एक प्रकारचा अवर्णनीय आनंद विलसत असून, जो तो एखाद्या मंगलोत्सवाच्या घाईत असल्यासारखा वावरत होता. नेताजींच्या स्वागतार्थ करण्यांत येत असलेल्या तयारीशीं प्रत्यक्ष कोणाचा संबंध असो नसो, आज सायंकाळीं आपण त्यांना प्रत्यक्ष पाहणार, त्यांचें व्याख्यान ऐकणार, अशी जी एक मूक आनंदाची भावना प्रत्येक व्यक्तीचे हृदयांत उचंबळून येत होती त्याच भावनेची उसळी तिच्या बारीकसारीक हालचालींत दृग्गोचर होत होती. अनेक घरांच्या माथ्यांवर व सौधांवर डोकीं वर काढून तिरंगी निशाणें ताठ उभीं होतीं. नेताजींच्या जाहीर व्याख्या-नाची आनंददायक वार्ता जनतेला आधीं कोणीं सांगावी, याबद्दल स्वैरसंचारी वाऱ्याची तिरंगी निशाणांशीं झोंबाझोंबी आणि झटापट

चाललेली दिसत असून त्या दोघांची फडफड पाहून लोकांचा आनंद द्विगुणित होत होता. ज्या निशाणांना घरांच्या माथ्यांवर डोकें काढण्याची सोय नव्हती तीं खिडक्यांतूनच डोकावून बाहेरील उत्साही वातावरणाचें निदर्शन करीत होतीं.

हिंदी लोकांस अननुभूत असा आनंद होण्याचीं अनेक कारणें होतीं. पैकीं एका सुप्रसिद्ध, स्वार्थत्यागी, ध्येयनिष्ठ व सच्छील अशा पुरुषाचें दर्शन आणि त्याचें व्याख्यान ऐकण्याची सुसंधि प्राप्त होणें, हें त्यांतल्या त्यांत अगदीं गौण होतें. इतर कारणांची उपपत्ति लावण्यास त्या वेळच्या अतिपूर्वेतील हिंदी जनतेची सर्वसामान्य मनःस्थिति समजून घेणें अवश्य आहे. एक राजवट बदलून त्या जागीं दुसरी सत्ता प्रस्थापित झाली म्हणजे या नव्या शासनपद्धतींत आपले काय धिंडवडे निघणार आहेत कोण जाणे अशी एक प्रकारची भीतिग्रस्त मनोवृत्ति सर्वत्र दिसून येते. त्यांतून आणखी जपान्यांच्या क्रूरतेचीं भडक वर्णनें करणाऱ्या स्तोत्रांचे अखंड पाठ हिंदी जनतेच्या श्रवणीं पडलेले. एखादी खोटी गोष्टच का होईना पण ती सतत एखाद्याचे कानींकपाळीं ओरडत राहिलें तर ती कांहीं दिवसांनीं खरी वाटूं लागते. इंग्रज व त्यांचीं दोस्त राष्ट्रें यांनीं व्यापलेल्या विस्तीर्ण भूप्रदेशांतील असंख्य लोकांचीं मनें अशा तऱ्हेनें इंग्रजधार्जिण्या वृत्तसंस्थांच्या सततच्या ओरड्यामुळें जपान व जर्मनीविरुद्ध कलुषित झालेलीं असल्यास त्यांत नवल वाटण्यासारखें कांहींच नव्हतें. अशा परिस्थितींत आपला कोणी वाली आहे, अथवा एखादा सुग्रीव आपले मदतीस धावून आलेला असून तो आपलें नेतृत्व पत्करण्यास तयार आहे या विचारानें लोकांचे मनास विरंगुळा वाटून ते त्या त्रात्याचे दर्शनास उत्सुक आणि आतुर होतात. कसें का होईना परंतु अतिपूर्वेतील हिंदी लोकांच्या दैनंदिन व्यवहाराचें सुरळीत चाललेलें जहाज जगांतील खवळलेल्या राजकीय वातावरणाच्या भोंवऱ्यांत सांपडून एकाएकीं युद्धाच्या खडकावर आपटून फुटलें. पारतंत्र्याच्या अंधःकारांत हे लोक अचानकपणें प्रक्षुब्ध परिस्थितीच्या अथांग सागरांत फेंकले गेले. आशेचा एकही किरण कोठें दिसेना. युद्धसागराच्या पोटांतील अनेक धीरगंभीर ध्वनि

व त्यांनीं ध्वनित केलेलीं हजारों संकटें यांनीं हिंदी जनतेला पूर्णपणें भेडसाविलें होतें. अशा वेळेस कोणी वीरपुरुष आपल्या भांबावलेल्या लोकांस धीर देऊन त्यांचें मार्गदर्शन करण्यासाठीं या अफाट परिस्थितींत आपली होडी मोठ्या शर्थीनें लोटून वल्हवीत त्यांचेपाशीं घेऊन आला तर त्याचेबद्दल लोकांस केवढी धन्यता वाटावी! या थोर विभूतीस एकदां डोळे भरून पाहूं या असें सर्वांस वाटणें साहजिक आहे. याशिवाय भारतीय देशभक्तांत सुमारें शें-सव्वाशें वर्षांपासून लुप्त झालेली धडाडीची वृत्तिही नेताजी सुभाषचंद्र यांचे ठायीं वसत असलेली हिंदी लोकांच्या प्रत्ययास येऊन त्यांस सुखद आश्चर्याचा थरारून सोडणारा एक धक्काच बसल्यासारखें झालें. आपल्या अलोट बुद्धिमत्तेच्या जोरावर एका जागरूक सत्तेच्या अभेद्य कोटावर लत्ताप्रहार करून स्वतःची सुटका करून घेण्याची वीरवृत्ति, आत्मविश्वास व धडाडी हीं शिवाजीमहाराजांनंतर कोणींच दाखविलीं नव्हतीं. येवढेंच नव्हे तर आज जर्मनींत, उद्यां जपानमध्यें अशा तऱ्हेनें सर्वस्वीं अपरिचित अशा राष्ट्रांशीं प्रथमतःच मैत्री जोडून, जगभर संचार करणाऱ्या या व्यक्तीची जी मूर्ति सर्व हिंदी लोकांचे हृदयमंदिरांत प्रस्थापित झालेली होती, तिचेभोंवतीं विविध भावनांचीं अद्भुत अशीं अनेक तेजोवलयें एकामागून एक निर्माण होत गेल्यामुळें नेताजी सुभाषचंद्र बोस यांना हिंदी लोकांचे दृष्टीनें एक दैदीप्यमान विभूतिमत्त्व प्राप्त झालेलें होतें.

सायंकाळीं साडेसहा वाजतां नेताजी सभेच्या मैदानापाशीं मोटारींतून उतरले. त्यांचेबरोबर व त्यांचे मागोमाग हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या व संघाच्या अनेक निकटवर्ती कार्यकर्त्यांचा लवाजमाही होता. ते सर्वजण म्युनिसिपल इमारतीच्या विस्तीर्ण पायऱ्या चढून वरील बाजूस तयार केलेल्या भव्य व्यासपीठावर गेले. बँडचें घोगरें संगीत सुरू झालें. मुलींच्या एका तुकडीनें 'वंदे मातरम्' म्हणण्यास सुरवात केली. तिरंगी झेंडा स्तंभावर चढून फडकूं लागला. राष्ट्रगीत झाल्यावर, आपापल्या खुर्च्यांच्या पुढचे बाजूस उभे असलेले व्यासपीठावरील जपानी व इतर अधिकारी स्थानापन्न झाले. खालचे बाजूस उजवीकडे व डावी-

कडे मांडलेल्या खुर्च्यांच्या रांगांवर प्रतिष्ठित स्त्री-पुरुष बसले. समोरील विस्तीर्ण पटांगणावर हिंदी लोकांचा अजस्र जनसमुदाय स्तब्ध आणि निश्चल आतुरतेनें बसलेला होता. या समुदायाचे पलीकडे अनंत सागराची अस्पष्ट कुरबूर ऐकूं येत होती. नेताजींचा पोषाख म्हणजे खादीचें धोतर, लांब कोट व तसलीच पांढरी शुभ्र टोपी असा होता. नेताजींस अनेक व्यक्ति व संस्थांच्यातर्फे हार घालण्यांत आले. मागचे बाजूस भलेमोठे जपानी व तिरंगी झेंडे पडद्यासारखे त्या भव्य इमारतीवर लावले होते. महात्मा गांधी व भारतमाता यांचीं भलीं मोठीं चित्रेंही ठेविलीं असून विजेच्या दिव्यांचा झगझगाट करण्यांत आलेला होता. दूरध्वनिक्षेपकाजवळ जाऊन नेताजींनीं स्वतःच्या दूरपूर्वेतील पहिल्या जाहीर भाषणास सुरवात केली.

## पहिलें भाषण

ते म्हणाले, "मित्रहो, सशस्त्र लढा केल्याशिवाय इंग्रज सुखासुखी हिंदुस्थान सोडण्यास कधींच तयार होणार नाहींत अशी माझी पूर्ण खात्री झाल्यामुळेंच मीं हिंदुस्थानांतून बाहेर पडण्याचें ठरविलें. बाहेर पडून जगाची परिस्थिति प्रत्यक्ष अवलोकन करून इंग्रजांच्या शत्रुराष्ट्रांपासून आपल्याला कितपत मदत होण्यासारखी आहे याची मला अटकळ बांधावयाची होती. या एकमेव उद्देशानें मी निघालों. आश्चर्य हें कीं, स्वतःच्या अभेद्य तटबंदीची व जागरूकतेची टिमकी वाजविणाऱ्या इंग्रजांच्या बंदीवासांतून मी निघून जात असतांना ते मला यत्किंचितही प्रतिकार करूं शकले नाहींत. येवढेंच नव्हे, तर आज मी उघडपणें जगभर स्वैरसंचार करीत आहें. हें दृश्य उघड्या डोळ्यांनीं बघत असतांना त्यांना हतबलतेनें इकडे डोळेझांक करावी लागत आहे. मला कोठेंहि अडविण्याची त्यांची छाती नाहीं. हिंदुस्थानांतून निघाल्यावर मी प्रथम जर्मनींत गेलों. सुमारें दोन वर्षें तेथें वास्तव्य करून नंतर मी जपानमध्यें आलों. इंग्रजांचे शत्रु असहाय्य आणि परतंत्र हिंदी जनतेबद्दल पूर्ण सहानुभूति बाळगतात असेंच मला जेथें तेथें दिसून आलें. परदेशांत वास्तव्य करून असलेले आपले लोकही

पूर्णपणें जागृत झालेले असून, स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ वाटेल तो त्याग करण्यास सिद्ध आहेत हेंही मीं पाहिलें. जर्मनी व जपानसारख्या हुकूमशाही राष्ट्रांशीं संगनमत करून त्यांच्या मदतीची याचना करणें गैर आहे, अशी गतानुगतिक पोपटपंची आपल्याला कांहीं ठिकाणांहून ऐकूं येते. परंतु मी आपल्याला असें ठांसून सांगतों कीं, स्वतःच्या असामान्य बलाढ्यतेचा टेंभा मिरविणाऱ्या इंग्रजांस भिक्षापात्राचा अवलंब करून फ्रान्स, रशिया, अमेरिका इत्यादि राष्ट्रांच्या मदतीची भीक मागण्याची लाज वाटत नाहीं. मग आम्ही तर बोलून चालून साऱ्या मुलखाचे दरिद्री, गुलाम, हतबल, निःशस्त्र झालेले लोक! आम्हांला दुसऱ्याच्या मदतीची याचना अगर अपेक्षा करावी लागणें हें स्वाभाविकच आहे. यांत लाजिरवाणें असें कांहींच नाहीं. जागतिक युद्धाची ही नामी संधि चालून आली असतांना ती वायां दवडणें मूर्खपणाचें होईल. गेल्या महायुद्धाच्या वेळीं इंग्रजांनीं हिंदी लोकांस अनेक भूलथापा देऊन युद्धाचें संकट टळल्यावर त्यांस साफ तोंडघशीं पाडलें. त्यांच्या अंगवळणी पडलेली ही कुटिल नीति या खेपेसही हिंदुस्थानचे गळीं उतरविण्याचा त्यांनीं आटोकाट प्रयत्न चालविला आहे. आजपर्यंतच्या इतिहासांत जेत्यांनीं जित राष्ट्रांस उदारपणें सहजासहजीं स्वातंत्र्य दिल्याचें एकही उदाहरण उपलब्ध नाहीं. इंग्रज या सामान्य नियमास कधींच अपवाद ठरूं शकत नाहींत. सशस्त्र लढा पुकारून त्यांस रणांगणावर पराजित केल्याशिवाय आपलें स्वातंत्र्य परत मिळविणें कधींच शक्य नाहीं. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत सध्यांच्या परिस्थितींत सशस्त्र लढ्याची तयारी व संघटना करणें शक्य नाहीं. इंग्रजांचे विरुद्ध इतर राष्ट्रांनीं युद्ध पुकारलें असतांना, हिंदुस्थानाबाहेर सशस्त्र लढ्याची तयारी व संघटना करण्यास आयता वाव मिळालेला आहे. हिंदुस्थानांतील निःशस्त्र चळवळी, निदर्शनें, प्रतिकार व असहकार हीं एका कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंत उपयोगी ठरतात. परंतु अंतिम उद्देश त्यांनीं कधींच साध्य होणें शक्य नाहीं. शेवटीं शस्त्रच हातीं धरणें भाग आहे. अर्थात् या दृष्टीनें आपण पूर्ण स्वार्थ-त्याग करून, या अखेरच्या यशस्वी स्वातंत्र्ययुद्धाची तयारी केली

पाहिजे. मला आपल्याकडून तीन लाख सैनिक व तीन कोटी रुपये पाहिजे आहेत. हें ध्येय व हा कार्यक्रम तुम्हीं तुमचे डोळ्यांपुढें ठेवला पाहिजे. अशा तऱ्हेनें आपण तयारी केल्यावर, आपला विजय झालाच पाहिजे. माझा असा पूर्ण विश्वास आहे कीं, जे इंग्रज मला हिंदुस्थानांतून बाहेर पडतांना अडवूं शकले नाहींत, ते योग्य वेळीं पुन्हा हिंदुस्थानांत शिरकाव करून घेतांना मला प्रतिकार करूं शकणार नाहींत... जर्मनी व जपान हीं राष्ट्रं आपल्यास मदत करण्यास सिद्ध आहेत..."

अशा अर्थाचें नेताजींचें भाषण प्रथम इंग्रजींतून व मग हिंदुस्थानींतून झालें. नेताजींच्या व्याख्यानास जितका जनसमुदाय जमला होता तेवढा पूर्वीं कोणत्याही हिंदी नेत्याच्या व्याख्यानास एकत्रित झाला नव्हता असें तेथील लोक सांगत होते. श्रोतृवृंदाच्या त्या अफाट गर्दींमधून ठिकठिकाणीं स्वातंत्र्यसैन्याचे लष्करी पोलिस उभे होते. बरेचसे ध्वनिक्षेपक-भोंगे लाकडी चौथऱ्यावर तीन-चार ठिकाणीं लाविले होते. अधूनमधून हिंदी व जपानी वृत्तसंस्थांचे वार्ताहर आपापले कॅमेरे सरसावून कधीं डोळे किलकिले करून तर कधीं कॅमेऱ्याच्या मागील काळ्या पडद्याखालीं डोकें खुपसून नेताजींची व त्या जनसमुदायाचीं अनेक छायाचित्रें घेण्यांत गुंग झाले होते. एकाएकीं धो धो पाऊस सुरू झाला. या समुदायाचे सीमेवर उभ्या उभ्या व्याख्यान ऐकणाऱ्या लोकांत थोडी पांगापांग झाली; परंतु तेवढें वगळल्यास इतर सर्व लोक पावसांत भिजत ओल्या जमिनीवर स्तब्ध बसले होते. व्यासपीठावर कसल्याही प्रकारचें छत नसल्यामुळें त्या पावसानें प्रतिष्ठित लोकांची अप्रतिष्ठा करण्यासही मागेंपुढें पाहिलें नाहीं. नेताजी जसेच्या तसे तेथें उभे होते. क्वचित् मेघांच्या कडकडाटांत किंवा दूरवर उभ्या असलेल्या लोकांच्या धांवपळीच्या कोलाहलामुळें ते बोलावयाचे थांबले असतील तेवढेच. व्यासपीठावरील कोणी एकानें त्यांच्या पाठीशीं उभें राहून स्वतःचा पाणकोट त्यांचेपुढें केला. परंतु त्यांनीं मागें वळून न बघतांच डाव्या हातानें तो बाजूला सारला. "थांबा. या वेळेस माझ्या समाधीचा भंग करूं नका. पावसापाण्याकडे लक्ष देण्याची ही वेळ नव्हे..." असेंच

जणुं काय त्यांनीं या वेळेस आपल्या हातानें तो कोट वारीत असतांना ध्वनित केलें.

नेताजी सुभाषचंद्र यांच्या वक्तव्यांतील एक विशिष्ट गुण म्हणजे त्यांच्या हृदयांतील आत्यंतिक कळकळ. औपचारिक रीत्या कांहीं तरी बोलावयाचें म्हणून भाषण करण्यास ते कधींच उठले नाहींत. आकाशांतून निखळलेल्या ताऱ्याप्रमाणें त्यांचा एक एक शब्द जीव तोडून उच्चारलेला असे व तो श्रोतृवृंदाचीं हृदयें भेदून टाकी. जो वक्ता औपचारिक भाषण करण्यास उठतो, त्याचें स्वतःचेंही त्यांत वेताबाताचेंच लक्ष असल्यामुळें ऐकणाऱ्यांसही तें नीरस वाटतें. परंतु कसल्याही विषयावर कळकळीनें बोलणारा वक्ता हा श्रोतृसमुदायाचीं अंतःकरणें वेधल्याशिवाय राहत नाहीं. हीच गोष्ट नेताजींच्या भाषणाच्या बाबतींत सर्वांच्या प्रत्ययास येत असे. ते भाषण करीत असतांना त्यांच्या मनांत अहंपणाचा मागमूसही नसे. स्वातंत्र्यलालसेच्या प्रखर धगधगीनें त्यांच्या काळजाचा रस होऊन तो जळजळीत वाक्प्रवाहाच्या रूपानें बाहेर पडतांना दिसून येई.

या व्याख्यानानंतर तेथल्या तेथें २२,००१ रु. जमा झाले. अतिपूर्वेंतील नेताजींच्या अद्वितीय कामगिरीस जाहीर रीतीनें अशी याच भाषणापासून सुरवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. आजपर्यंत त्यांचेबद्दल केवळ दुरून दुरून ऐकत असलेल्या जनतेस प्रथमच त्यांचें दर्शन झालें. त्याचप्रमाणें ते कोणत्या उद्देशानें हिंदुस्थानांतून बाहेर पडले व त्यांचें पुढील धोरण कशा प्रकारचें राहील यांचें स्पष्ट विवेचन लोकांना प्रत्यक्ष त्यांचे तोंडूनच ऐकण्यास मिळालें.

## नेताजींचे निंदक

नेताजींशीं सहमत नसलेले हिंदी इसम त्या समुदायांत असले तरी याच वेळीं ते थोडे थोडकेच. अतिपूर्वेंत नेताजींना विरोध करणारा हिंदी लोकांचा एक गट होता, नाहीं असें नाहीं. कारण, कितीही सद्गुणी अथवा थोर व्यक्ति असो, जगाची ठेवणच अशी आहे कीं,

कोणीही अजातशत्रु असणें शक्यच नाहीं. स्वजनांतसुद्धां प्रत्येकाचे कोणीना कोणी निंदक असतातच, मग ते विजातीयांत असतील यांत कांहींच नवल नाहीं. विरोधी गटांत मुख्यतः हिंदी युद्धबंद्यांचाच भरणा होता. इंग्रजांचें "नमक" खाऊन ते इंग्रजांचे मिंधे बनलेले. इंग्रजांचें मीठ खाऊन खाऊन या लोकांचीं अंतःकरणें इतकीं खारट बनलेलीं होतीं कीं, त्यांच्यावर सुभाषचंद्रांच्या स्वातंत्र्य-सुभाषितांचे अमृतबिंदु पडले तरी त्यांची गोडी लुप्त होऊन, समुद्राच्या पाण्याची चूळ भरल्याप्रमाणें या लोकांचीं तोंडें वेडींवांकडीं होत. अफाट समुद्राचें कधींही दर्शन न घेतलेले लोक ज्याप्रमाणें समुद्रकांठीं येतांच त्या विस्तीर्ण जलाशयाला पाहून बिचकतात, तसेच हे लोकही स्वातंत्र्य-सागरांत स्वैर क्रीडा करण्याची वेळ आली असतांना, यांत आपण बुडून जाऊं कीं काय अशा भीतीनें दूरदूरच राहूं लागले. अंतिम जय इंग्रजांचाच होणार व आपण आज त्यांच्याविरुद्ध लढलों तर आपली नोकरी जाईल; आपल्या घरादारांची राखरांगोळी होईल; नानातऱ्हेच्या हालअपेष्टा व छळणूक सोसावी लागून शेवटीं फांशीं जावें लागेल, ह्या व अशा प्रकारच्या विचारपिशाच्चांनीं त्यांस पछाडलें होतें. परंतु हें प्रामाणिकपणें कबूल करणारे लोक किती असतील याची ज्यानें त्यानें कल्पनाच केलेली बरी. एका दुर्गुणाबरोबर दुसरा येतो असें जें म्हणतात त्याचें हें उत्तम उदाहरण आहे. भित्री व स्वार्थी मनोवृत्ति अनृतांच्या प्रावरणानें झांकण्याचा या लोकांनीं प्रयत्न केला, इतकेंच नव्हे, तर या दुर्गुणांचीं फुलें त्यांच्या डोळ्यांत पडून त्यांना सुभाषचंद्रांची प्रत्येक कृति विकृत दिसूं लागली व या थोर विभूतीस ते नांवें ठेवूं लागले.

अशाच वृत्तीच्या हिंदी युद्धबंद्यांतील एका वरिष्ठ अधिकाऱ्यानें नेताजींस अस्सल इंग्रजींत लिहिलेल्या एका पत्राचा अनुवाद येथें देणें अस्थानीं होणार नाहीं. वर वर्णिलेल्या प्रसंगानंतर सुमारें सव्वातीन महिन्यांनीं लिहिलेलें हें पत्र असलें तरी सुरवातीपासूनच प्रत्येक बाबतींत एक प्रकारचा आडमुठेपणा दाखविण्याचें निर्घृण धोरण या लोकांनीं कसें ठेवलें होतें याची कांहींशी कल्पना येण्यास या पत्रानें मदत होईल. तें पत्र असें :—

(गुप्त) नीसून रुग्णालय, A-I ( बंदी ) छावणी,
स्योनान ( सिंगापूर ), ता. १७-१०-१९४३

लेफ्टनंट-कर्नल जी. बी. एस्. ××× आय्. एम्. एस्.,
सर्वोच्च अधिकारी, नीसून रुग्णालय, यांजकडून,

प्रिय श्री. सुभाषचंद्र बोस यांस :—

( आपण किंवा आपल्या चळवळीनें या रुग्णालयांतील कामकरी-वर्गास आकर्षून त्याचा उपसा केल्यामुळें आतां ) मी माझ्या कामकरी-वर्गाच्या खडकाळ तळाशीं येऊन पोंचलों आहे. ( यांतून आपल्या बाजूस ) आणखी कांहीं गेले तर मात्र मला खरोखरच त्यापासून असह्य असा चिमटा बसेल. मी आपली याचना करतों कीं, आपण कृपा करून ( आमच्या कामकरीवर्गापैकीं ) आणखी कोणास नेऊं नये. माझ्या रुग्णसेवकांपैकीं व कारकुनांपैकीं उत्तमोत्तम तर आधींच आपल्याकडे चालते झालेले आहेत.

माझ्याकडे आधींच एक हजार रुग्णाईत असून त्यांपैकीं दोनशें क्षयरोगी आहेत. यांच्याकडे कोणीं तरी लक्ष देणें जरूर आहे. अर्थात् (मला याची पूर्ण कल्पना आहे कीं,) अधिक महत्त्वाच्या कामापुढें या एक हजार परित्यक्त लोकांचें भवितव्य कःपदार्थ आहे. "आपल्या कार्याची निकड जर ( खरोखरच ) जास्त असली" तर मला माझ्या ओठाशीं आलेला पेला आपल्याकडे सरकविणें भाग आहे ( हें मी कबूल करतों ). परंतु ती ( आपली निकड—आपलें कार्य ) खरोखरच तशी ( माझ्याहून जास्त—माझ्या कार्याहून महत्त्वाचें ) आहे काय, याचा निवाडा आपणच करावा. माझ्या इच्छेस "तथास्तु" म्हणणें आपणांस शक्य होईल येवढीच एक आशा मी करतों.

आपला
जी. बी. एस्. ×××

श्री. सुभाषचंद्र बोस,
हिंदी स्वातंत्र्यसैन्याचे सरसेनापति, यांस.

वरील भाषांतर हें शक्य तितकें शब्दशः केलेलें आहे. वरील डॉक्टर-महाशयांस हिंदी लोकांचे भवितव्याबद्दल नेताजी सुभाषचंद्र बोस

यांचेपेक्षां जास्त काळजी आहे असा स्पष्ट सूर वरील पत्रांतून निघतो. वास्तविक जे डॉक्टर लोक, कारकून किंवा इतर रुग्णसेवक युद्धबंद्यांतून निघून हिंदी स्वातंत्र्यसैन्यास येऊन मिळाले, त्यांस नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं कांहीं बळजबरीनें किंवा हुकमानें ओढून नेलें नव्हतें. ते सर्व लोक स्वखुषीनें स्वातंत्र्यचळवळींत सामील झाले होते. त्यांस, " आमच्या चळवळींत येऊं नका—कारण, युद्धबंद्यांतील रुग्णाइतांकडे लक्ष देणें हें तुमचें आद्य कर्तव्य आहे" असें तर नेताजींस म्हणतां येणें शक्यच नव्हतें. शिवाय युद्धबंद्यांतील रुग्णसेवकवर्ग, हा हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत आला, तो कांहीं लष्करच्या भाकरी भाजण्यास, चकाल्या पिटण्यास, माशा मारण्यास किंवा शस्त्र हातांत धरून लढण्यास आलेला नव्हता. या बाजूस येऊनही त्यांना या ना त्या हिंदी रुग्णाइतांचीच शुश्रूषा करावयाची होती. अशी परिस्थिति असतांना " तुम्हीच त्यांना ओढून नेलें—तुम्ही त्यांस येऊं देऊं नका—तुमचें काम माझ्या कार्यापेक्षां अधिक महत्त्वाचें आहे काय याचा आपणच विचार करावा—" हें म्हणणें सुज्ञ सुशिक्षित माणसाला शोभण्यासारखें नाहीं. आपली गाजराची पुंगी नीट वाजत नाहीं—तिचा प्रभाव पडत नाहीं--तिच्याकडे कोणी आकर्षित होत नाहीं म्हणून—" नको वाजवूं श्रीहरि मुरली" असें म्हणण्याइतकेंच हें हास्यास्पद आहे. असो. तेव्हां, निदान आपलें मन नेताजींच्या चळवळींत सामील होण्याइतकें खंबीर नाहीं तर आपण त्या चळवळीचे निष्क्रिय का होईना पण शुभचिंतक तरी बनूं या असें म्हणण्याचें सौजन्य त्यांचेपाशीं नव्हतें.

अशा प्रकारें नेताजींचे स्वजातीय निंदकांत हिंदी युद्धबंद्यांचाच विशेषेंकरून भरणा होता. पण याशिवाय अतिपूर्वेंत जातीय वाद माजविणारे कांहीं तुरळक लोकही त्यांचेविरुद्ध होते. सुभाषचंद्रांनीं हिंदी लोकांचें नेतृत्व स्वीकारल्यापासून आपलें जपान्यांजवळचें वजन नाहींसें झालें, असें समजून जपान्यांचे मिंधे बनलेले म्हणूनच कांहींतरी निमित्तानें नेताजींचे नांवें खडे फोडणारेही कांहीं तुरळक लोक होते. अतिपूर्वेंतील अखिल हिंदी जनतेची संख्या लक्षांत घेतां, या लोकांचें प्रमाण फारच कमी होतें. संतांचेविषयीं अपशब्द काढून त्यांची खंत

... ग्रंथ संग्रहालय, ... अनुक्रमांक

न बाळगणारे कांहीं पंत प्रत्येक कालखंडांत असतात, याची साक्ष इतिहास आपणांस देतो म्हणून तें कांहीं त्या थोर व्यक्तींच्या न्यूनत्वाचें प्रमाण होऊं शकत नाहीं.

## स्त्रीसमाजविषयक नेताजींचे विचार

शुक्रवार ता. २७ एप्रिल १९४५ ची गोष्ट. रंगूनहून दरकूच दर-मजल करीत आम्हीं ब्रह्मदेशांतील सतांग नदीचे कांठीं येऊन तळ दिला होता. तीन दिवसांपूर्वी रंगूनहून निघते वेळीं जरी नेताजीसुद्धां आम्ही चारशें लोक असलों तरी वाटेंतील अनेक अडीअडचणींमुळें आम्ही कित्येक तुकड्यांत विभागले जाऊन कोणी पुढें, कोणी मागें अशा तऱ्हेनें ब्रह्मदेशांतून निघून सयामच्या रोखानें वाट क्रमूं लागलों. वास्तविक जगन्नाथराव भोसल्यांचा चिटणीस व मदतनीस अधिकारी या नात्यानें या प्रवासांत त्यांचे तुकडींतच माझेंही नांव असणें स्वाभाविक होतें. परंतु असेच कांहीं विशेष प्रसंग यावयाचे कीं, ज्या वेळेस नेताजी सुभाषचंद्र बोस, जगन्नाथराव भोसले व इतर वरिष्ठ अधिकारी यांचे नेतृत्वाखालीं सर्व मंडळी अनेक तुकड्यांत विभागली जाऊन प्रत्येक तुकडीस विभक्तपणें मार्गक्रमण करावें लागे, तेव्हां कांहीं तरी तात्कालिक निकडीमुळें नेताजींना साथ देण्याची पाळी माझेवरच येई. नेताजी बोस, मी, झांशी पथकाच्या तीन मुली व स्वातंत्र्यसैन्यांतील इतर तीनचार अधिकारी, अशी एक आमची लहानशी तुकडी होती. दिवसभर चालणाऱ्या भीषण हवाईहल्ल्यामुळें रात्रीच्या काळोखांत प्रवास करून दिवसाउजेडीं जंगलांत तळ देण्याचीच आमची प्रथा होती. यापूर्वी आम्हीं जो मुक्काम केला होता, तेथून रात्रीच्या काळोखांत एक एक तुकडीची रवानगी करीत, आम्हीच आठ-नऊ जण मागें राहिलों होतों. आम्हांला निघतां निघतां पहाट झाली. उरलेल्या थोड्या काळो-खाचा उपयोग करावा म्हणून आम्ही निघालों. वाटेंतील नदीनाल्यांचे बंधारे बॉंबहल्ल्यानें फुटून कमालीची दलदल झालेली होती. आमची लॉरी तेथेंच सोडून आम्ही पायीं निघालों. अनेक भाताचीं शेतें तुडवून

आम्ही सतांग नदीचे रोखानें कूच करीत होतों. सूर्य चांगलाच वर आला होता. सूर्याचें प्रखर ऊन आणि त्यांत झरझर चालण्याचे श्रम यांमुळें आम्ही घामाघूम झालों. यापुढें जास्त वेळ चालणें धोक्याचें होतें. झाडीचें ठिकाण कोठेंच नव्हतें. सतांग नदीचे अलीकडे सुमारें एक मैलावर कांहीं झोपड्या दिसत होत्या. एक खेडेंच होतें तें. आम्हीं तेथें जाऊन तळ दिला. झांशीराणी पथकाच्या तीन मुलींनीं अर्थातच स्वयंपाक करण्यांत प्रामुख्यानें भाग घेऊन दुपारीं दोन प्रहरीं आम्हांला सर्वांना जेवावयास वाढलें. दिवसां झोपण्याच्या नेहमींच्या संवयीप्रमाणें नेताजी दोन-तीन तासांच्या डुलकीनंतर नुकतेच उठले होते. त्या मुली आणि त्यांच्या भोंवतालचा स्वयंपाकाचा तो पसारा पाहून नेताजी हंसून म्हणाले, "अरेच्या...स्त्रियांनीं चुलीपाशीं गुंतून राहूं नये म्हणून मी प्रयत्न करतोंय् तों चूल तुमच्या बोकांडीं बसतेच कीं जेथें तेथें..."

सुभाषचंद्रांचे विचार या बाबतींत बरोबर असोत किंवा नसोत परंतु स्त्रियांनीं स्वयंपाकांतच आपलें आयुष्य घालविणें जरूर नाहीं, इतर क्षेत्रांत त्यांस महत्त्वाची कामगिरी करितां येईल असें नेताजींस वाटत असे. अर्थात् याचा अर्थ स्त्रियांनीं घरचें काम करणें म्हणजे कमीपणाचें अथवा बिनमहत्त्वाचें आहे असें त्यांचें मत नव्हतें. हें सर्व सोडून आजकालच्या कांहीं मुलींचा कल दिसतो त्याप्रमाणें मुलींनीं इंग्रजांची कारकुनी किंवा इतर खर्डेघाशी करावी हें तर त्यांस मुळींच मान्य नव्हतें. त्यांचें म्हणणें येवढेंच कीं, स्त्रियांनीं स्वयंपाकघरांत आयुष्य घालविलें म्हणजे साहजिकच त्यांस राजकारणांतील कांहीं कळत नाहीं; त्यांनीं सार्वजनिक विषयांत उगीच तोंड घालूं नये; त्या उंदरामांजरासही भितात अशी त्यांचेबद्दल सर्वसाधारण समाजाची मतें बनतात व हा न्यूनगंड खुद्द स्त्रियांचे मनांतही पिढ्यान् पिढ्या ठाणें देऊन बसतो. येवढ्याकरितां स्त्रियांनीं विशेषतः देशभक्तीचें, मर्दु-मकीचें व राजकारणाचें शिक्षण पुरुषांचे बरोबरीनें घेऊन मग वाटल्यास गृहक्षेत्रांतील कार्य अंगीकृत करावें. स्त्रियांनीं काय किंवा पुरुषांनीं काय स्वतंत्र राष्ट्राचे आदर्श नागरिक बनण्यासारखें सर्व मूलभूत शिक्षण

घ्यावें व मग सर्वसाधारणपणें आपापलीं विशिष्ट कार्यक्षेत्रें ठरवून घेण्यास हरकत नाहीं. असें झाल्यावर स्त्रिया शूर नसतात, किंवा स्त्रियांची अक्कल चुलीपुरतीच, अशी अवहेलना करण्याचें समाजास पडलेलें वळण नष्ट होईल. कोणींहि कोणाची अवहेलना करण्याचें कारण नाहीं. स्त्री व पुरुष दोघेही समाजाचे समतोल घटक असून परस्परपूरक असेंच दोघांचें या जगांतील कार्य आहे. कोणीं कोणास धोंड समजणें व असले एकांगी आणि निरर्थक विषयही चर्चेस घेणें मूर्खपणाचें आहे असेंच नेताजी सुभाषचंद्र यांचें याविषयीं मत होतें.

अर्थात् आणीबाणीच्या प्रसंगीं स्त्रियांनींसुद्धां इतर सर्व व्यवसाय सोडून प्रथम मातृभूमीच्या स्वातंत्र्याकरितां हातीं शस्त्र धरणें जरूर आहे असें नेताजींचें स्पष्ट आणि ठाम मत असल्यामुळें त्यांनीं प्रथम आपल्या मनोराज्यांत स्त्रियांचीं पथकें उभारून त्यांसही लढाईचें मैदान दाखविण्याचें स्वप्न पाहिलें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. त्यांचीं सर्व मनोराज्यें, त्यांचे सर्व बेत सत्यसृष्टींत उतरविण्याचा प्रसंग आतां चालून आलेला होता. अतिपूर्वेंत त्यांचा हात धरणारा किंवा त्यांचे बेत फिसकटवूं पाहणारा कोणीच समतोल माणूस नव्हता. त्यांनीं स्त्रियांची एक जाहीर सभा भरवून सर्व स्त्रीसमाजापुढें आपलें हृद्गत सांगण्याचें ठरविलें. सोमवार ता. १२ जुलै १९४३ रोजीं सिंगापुरांत वॉटर्लू रस्त्यावरील हिंदी स्वातंत्र्यसंघ कचेरीच्या सभागृहांत ही सभा भरली होती. ही सभा भरविण्यांतील मुख्य हेतु स्वातंत्र्यसंघाच्या प्रमुख कार्यकर्त्यांशीं अनेक वेळां झालेल्या खाजगी चर्चेच्या प्रसंगीं नेताजींनीं विशद करून सांगितला होता. या कार्यकर्त्यांनींही नेताजींचें मानस समजून घेऊन पंचवीस उत्साही तरुण व सुदृढ मुली निवडून त्यांस ते दिवशीं सकाळपासून स्वातंत्र्य-सैन्याच्या कांहीं शिपायांकरवीं बंदूक हातांत धरण्याचें, लष्करी सलामी देण्याचें व कवायतीचें शिक्षण दिलें. सायंकाळीं नेताजी आले ते वेळीं या मुलींच्या पथकानें तिरंगी झेंडा उभारला जात असतांना व ‘वंदेमातरम्’चें गान सुरू होत असतां खडी लष्करी सलामी दिली. डॉक्टर लक्ष्मी स्वामिनाथन् या सर्व कार्यक्रमांत प्रथमपासूनच उत्साहानें पुढाकार घेऊं लागल्या. या मद्रास विश्व-

विद्यालयाच्या एम्. बी., बी. एस्. असून सिंगापुरांत डॉक्टरी करीत असत. त्यांचें नैसर्गिक सौंदर्य व त्यांचा आनंदी स्वभाव यांमुळें त्या साहजिकच सर्वांस प्रिय होत. सार्वजनिक कार्यास लागणारा पुरेसा धीटपणाही त्यांचे अंगीं होता. त्यांनीं नेताजींस मोटारींतून उतरवून घेऊन त्यांचें स्वागत केलें. त्यांचेसह नेताजींनीं लष्करी सलामी देणाऱ्या स्त्रियांच्या पथकाची पाहणी केली. ते आंत जाऊन पुष्पहार घालण्याचा समारंभ झाल्यावर भाषण करावयास उठले. नेताजी म्हणाले, "...स्त्रियांस कोणी भित्र्या म्हणत असतील ते म्हणोत; परंतु मी तरी त्यांस तसें संबोधिण्यास केव्हांही तयार होणार नाहीं. अनादिकाला-पासून हिंदी स्त्रियांची परंपरा उज्ज्वल आहे. राणी दुर्गावती, चांदबिबी, पन्नादाई, जोहार करणाऱ्या रजपूत स्त्रिया, अहिल्याबाई, झांशीची पराक्रमी राणी लक्ष्मीबाई हीं नांवें कर्णोपकर्णीं आहेत. पुरुषांपेक्षां स्त्रियाच जास्त स्वार्थत्याग करूं शकतात असें माझें ठाम मत आहे. शौर्य हा स्वार्थत्यागाचाच एक आनुषंगिक गुण आहे. हिंदुस्थानांत डाक्क्याच्या तुरुंगांत असतांना मला कांहीं एक कल्पना नसतांना मला ठेवलेल्या आवारांत अचानकपणें एक तरुण मुलगी येऊन थडकली. तिचें वय सुमारें पंधरा वर्षांचें असेल. मला कांहीं एक निरोप सांगण्या-करितां म्हणून कोणास पाठवावें अशा विचारांत माझी मित्रमंडळी असतांना या मुलीनें ही कामगिरी स्वतः होऊन अंगीकारली होती. पहाऱ्यावरील लोकांचा डोळा चुकवून व अनेक युक्त्याप्रयुक्त्या योजून ती माझ्यापर्यंत येऊन ठेपली होती. तिला पाहून मी स्तिमितच झालों. त्या वेळेस बंगाल्यांत दहशतवादाचा खूपच प्रसार झालेला होता. अशा वेळेस तिचें हें येणें अत्यंत धोक्याचें होतें. तिनें मला तिचा निरोप सांगितल्यावर मीं तिला विचारलें, तुला येथें एकटें येतांना भीति कशी वाटली नांहीं ? तेव्हां तिनें कंबरेशीं खोवलेली एक कट्यार काढून मला दाखवीत म्हटलें, 'माझ्यावर कसलेंही संकट आलें असतें तर ही कट्यार माझे संरक्षण करण्यास सिद्ध होती.' तेव्हांपासून माझी खात्री झाली कीं, स्त्रिया या धडाडीचीं कामें करूं शकतात... बंगाल्यांतील एका गोऱ्या अत्याचारी मॅजिस्ट्रेटावर गोळया झाडून

त्यास ठार करणाऱ्या दोन तरुण स्त्रियांबद्दल तुम्हीं ऐकलेंच असेल. याशिवाय प्रत्यक्ष रणांगणांत सैन्याचें नेतृत्व स्वीकारून समरांगणांत समोरासमोर इंग्रजांशीं दोन हात करून त्यांचेवर अनेक विजय संपादन करणाऱ्या झांशीच्या राणीचें उज्ज्वल उदाहरण तुमचे डोळ्यांसमोर आहे. इतका भरभक्कम पुरावा असतांना स्त्रिया पुरुषांप्रमाणें लढूं शकत नाहींत असें कोण म्हणूं शकेल ? निदान हिंदी स्त्रियांच्याविरुद्ध तरी मी असला आक्षेप ऐकून घेण्यास कधींच तयार होणार नाहीं. रशिया, इंग्लंड वगैरेसारख्या देशांतही पाहा. सर्वत्र स्त्रिया पुरुषांचे बरोबरीनें युद्धकार्यांत पूर्ण सहाय्य करीत असल्याचें आपणांस दिसून येईल. आज हिंदुस्थानचें स्वातंत्र्य आपणांस परत मिळवावयाचें असतांना हिंदी स्त्रियांनीं मागें राहून चालणार नाहीं. इसवी सन १८५७ सालीं जर एक झांशीची राणी झाली तर आमच्या प्रस्तुतच्या स्वातंत्र्ययुद्धांत निदान एक हजार अशा पराक्रमी स्त्रिया चमकल्या पाहिजेत. 'तुम्हीं सर्वांनीं लष्करी शिक्षण घ्यावें व तुमचें पुरुषांच्या सैन्यासारखेंच हुबेहूब सैन्य तयार व्हावें अशी माझी इच्छा आहे. याला तुमची मान्यता आहे का ?' " असा सरळ प्रश्न नेताजींनीं त्या सर्व स्त्रीसमुदायासमोर टाकला. सर्वांनीं एकमतानें आपली संमति जाहीर केली. दीडशें स्वयंसेविकांनीं लष्करी शिक्षण घेण्यासाठीं तेथल्या तेथें नांवें नोंदविलीं.

## 'झांशीराणी' पथक

ता.२२ ऑक्टोबर १९४३ रोजीं या छावणीचे उद्घाटनप्रसंगीं केलेल्या भाषणांत नेताजी म्हणाले, " लष्करी शिक्षण घेण्याचे बाबतींत येथील स्त्रियांत माझ्या अपेक्षेबाहेर उत्साह दिसून येत आहे. त्यांच्या लष्करी शिक्षणासाठीं हा जो तीन महिन्यांचा काळ लोटला येवढ्यांत या स्त्रिया इतक्या अधीर झाल्या; त्यांना वाटलें कीं, त्यांच्या लष्करी शिक्षणाबाबत आम्हांला खरी कळकळ नसून आम्ही नुसते तोंडदेखलें बोलत आहों. परंतु पुरुषांचे लष्करी शिक्षणास जशी एकदम सुरुवात करतां येते, तशी स्त्रियांचे शिक्षणास करतां येत नाहीं. स्त्रियांचें लष्करी

शिक्षण सुरू करण्याचे अगोदर अनेक दृष्टींनीं विचार करावा लागतो. ही तयारी करण्यांतच तीन महिन्यांचा अवधि गेला."

'झांशीराणी' पथकाचे बाबतींत कसल्याही तऱ्हेची लोकनिंदा, अफवा, दुर्लौकिक इत्यादि प्रसृत होण्यास वाव मिळूं नये असा नेताजींचा कटाक्ष असे. स्वतःच्या व्यक्तिगत चारित्र्याविषयीं सुद्धां लोकांस आक्षेप घेण्यास तिळमात्रही जागा राहूं नये इतकें निर्मळ आणि निष्पाप वर्तन ठेवण्याची ते स्वतः नेहमीं दक्षता घेत. याचें एक उत्तम उदाहरण म्हणजे त्यांचे निवासस्थानीं ते काम करीत असत त्या मेजावर त्यास एक विजेचा स्टँड हवा होता. त्यांनीं आपल्या चिटणिसास एक तसला स्टँड आणविण्याची व्यवस्था करण्यास सांगितलें. सिंगापुरांत उपलब्ध असलेला एक अत्युत्तम स्टँड नेताजींच्याकरितां आणण्यांत आला. त्याच्यावर गुंडाळलेला तांबूस रंगाचा जाड कागद काढून नेताजींचे चिटणीस हसन यांनीं तो स्टँड नेताजींचे टेबलावर नेऊन ठेवला. अत्यंत शोभिवंत असा तो दिवा होता. त्या दिव्याखालीं सुंदर कांचेची एका स्त्रीची नग्न मूर्ति होती. या बारीक गोष्टीकडे कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं. परंतु नेताजींनीं ते दिवशीं रात्रीं मेजाशीं काम करण्यास बसण्याकरितां म्हणून जों त्यांनीं विजेचा दिवा लावला तों त्यांना ही मूर्ति पाहून विजेचा झटका बसल्यासारखेंच झालें. ते तडक खालीं आले व तो स्टँड ताबडतोब तेथून काढून समुद्रांत भिरकावून देण्याची त्यांनीं आज्ञा केली. त्यांचें सिंगापुरांतील निवासस्थान अगदीं समुद्रकांठींच होतें. इतरांचे दृष्टीस क्षुल्लक भासणारी व नजरेंत न भरणारी ती मूर्ति नेताजींस प्रथम-दर्शनींच आक्षेपार्ह वाटली. अर्थात् प्रत्येकाचे चरित्रांत जीं मूलभूत जीवनतत्त्वें असतात त्या त्या तत्त्वांस बाधा आणणाऱ्या वस्तु त्या व्यक्तीचे डोळ्यांत चटकन् भरतात. ज्यांचीं एखाद्या गोष्टीबद्दल ठाम मतें बनलेलीं नसतात त्यांचीं साहजिकच त्याकडे डोळेझांक होते. त्या गोष्टीचें अस्तित्वही त्यांस जाणवत नाहीं, व ती गोष्ट नसली तर चुकल्याचुकल्यासारखेंही वाटत नाहीं.

ज्या व्यक्तीस राष्ट्रकार्य किंवा समाजकार्य करावयाचें आहे त्या व्यक्तीनें आपल्या चारित्र्यास फार जपलें पाहिजे असें नेताजी नेहमीं

सांगत असत. विशेषतः हिंदी लोकांनीं याबाबतींत जास्त दक्षता बाळगली पाहिजे असें ते म्हणत. कारण, केवढेंही थोर कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या चारित्र्यावर एक लहानसा शिंतोडा जरी उडाला तरी त्याच्या कार्यास हिंदी जनता काडीइतकीही किंमत देत नाहीं. त्याच्या सर्व कार्यांवर व स्वार्थत्यागावर या एका गोष्टीमुळें पाणी फिरतें ही गोष्ट पूर्णपणें त्यांचे मनांत ठसल्यामुळें व लहानपणापासूनच संन्यस्त वृत्तीचाच त्यांचे मनावर पगडा असल्यामुळें त्यांच्या चारित्र्याकडे बोट दाखविण्याचीही कोणाची छाती नव्हती. तरी आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकून करणारे कांहीं लोक असतातच. कांहींनीं परकी सत्तेचे हस्तक बनून अथवा केवळ विघ्नसंतोषीपणेंच नेताजींचे विरुद्धही कंड्या प्रसृत करण्यास कमी केलें नाहीं.

'झांशीराणी' पथकाच्या बाबतींतसुद्धां नेताजींनीं या एका गोष्टीबद्दल विशेष दक्षता घेतली. ही गोष्ट ते तेथील प्रौढ स्त्री-अधिकाऱ्यांस वारंवार सांगत असत. कोणास राग आला तरी पत्करला, परंतु दुर्लौकिक नको म्हणून ते या स्त्रीछावणीची शिस्त कडक ठेवण्याबद्दल सर्व अधिकाऱ्यांस वारंवार बजावीत असत व तशी ती आहे कीं नाहीं याबद्दल स्वतः गुप्त चौकशी करीत असत. इकडे लक्ष न देतां त्यांचे स्वतःचे बाबतींत ज्या लोकांनीं जसें निंदा करण्याचें कमी केलें नाहीं तसें ते या छावणीचे बाबतींत तरी कंड्या कां नाहीं पिकविणार? अशा अफवा प्रसृत करणारे एक तर अस्सल कुटुंबवत्सल लोक व दुसरे चळवळीचे भाडोत्री किंवा फुकटचे हितशत्रु व कित्येक सनातनी वृत्तीचे हिंदी लोक या स्त्री-पथकाच्या पूर्णपणें विरुद्ध होते. "बायकांना काय समजतंय्... दिसतंय् काय लढणार आहेत त्या...नसते थेर माजवले आहेत..." असल्या तऱ्हेचे त्यांचे विचार. इतरांच्या कुटुंबांतील स्त्रिया या पथकांत सामील झालेल्या त्यांना पाहवल्या नाहींत. कारण, हे लोक आपल्या स्त्रीवर्गास या पथकापासून अलिप्त ठेवून चळवळीस विरोध करूं चाहत आहेत असें साहजिकच इतर लोक म्हणत. हे बोल या सनातनी लोकांस झोंबून स्वतःच्या अलिप्तपणाचें, 'येनकेन प्रकारेण' मंडन करावयाची पाळी त्यांच्यावर येत असे. यांतून सुटण्याचा सोपा मार्ग

म्हणजे, "या पथकाची नीति चांगली नाहीं" म्हणून 'त्वं पुरा' करावयाचा. इतर कांहीं विघ्नसंतोषी लोकांनींही या ओरड्यांची 'री' ओढली. कांहींशा याच मनोवृत्तीमुळें अतिपूर्वेंतील महाराष्ट्रीय लोकांनीं आपल्या स्त्रीवर्गास या पथकापासून चार हात दूर ठेवलें हें येथें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. या सर्व प्रकारामुळें व विशेषतः अशा अफवा जेव्हां नेताजींचे कानीं पोंचत असत, तेव्हां त्यांचे मनास उगीचच चुटपुट लागून फार खेद होई. अशा थोर व्यक्तीच्या महत्कार्यांत उगीच लहानसान टोचण्या उत्पन्न करणारे बेजबाबदार लोक सत्कार्यास केवढा धोका पोंचवितात, याचा ज्याचा त्यानें विचार करून पाहावा. एखाद्या सत्कार्यास निदान सक्रिय मदत करतां आली नाहीं तरी नेत्यास नसता कपाळशूळ उत्पन्न करून त्याची शांति व एकतानता भंग करण्याचें पाप तरी कोणीं आपल्या शिरावर ओढवून घेऊं नये. "स्त्रियांनीं लष्करी शिक्षण घेऊं नये—बाहेरील अनेक व्यवसायांत पडूं नये, असें आमचें प्रामाणिक मत असल्यामुळें आम्ही कांहीं आमच्या स्त्रिया या पथकांत पाठवूं शकत नाहीं," असें म्हणून मोकळें व्हावें. हा प्रामाणिकपणा सोडून सबंध पथकावर शिंतोडे उडविण्याचा उपद्व्याप कशाला! लष्करी शिक्षणाची कोणावर सक्तीही करण्यांत आली नव्हती किंवा या पथकाशीं सहकार्य न करण्याबद्दलचीं कारणेंही कोणास विचारण्यांत आलेलीं नव्हतीं. स्वतंत्र राष्ट्राचे नागरिक असे ताळतंत्र सोडून कधींही वागत नाहींत. साध्या बोलण्याचेसुद्धां घोर परिणाम होतात ते असे. म्हणून प्रत्येक हिंदी माणसानें आपली जबाबदारी ओळखून आपल्या विचारांस व जिव्हेस योग्य वळण लावणें अगत्याचें आहे. नेताजींनीं अर्थातच या रिकामटेकड्या लोकांचे उपद्व्यापास भीक न घालतां आपलें कार्य चालू ठेवलें.

डॉक्टर लक्ष्मी या ब्रह्मदेशास गेल्यावर त्यांचे जागीं सौ. सत्यवती थेवर या झांशीराणी पथकाच्या प्रमुख अधिकारी बनल्या. स्त्रियांच्या लष्करी शिक्षणांतील पुढचें पाऊल या दृष्टीनें झांशीराणी पथकाच्या छावणीचे बाहेरील बाजूस, सुरवातीसुरवातीस जो हिंदी स्वातंत्र्यसैन्याचा पहारा असे तो काढून घेऊन त्या जागीं स्त्री-सैनिकांचा

पहारा ठेवावा असें सत्यवतीबाईंनीं सिंगापुराहून रंगून मुक्कामीं लिहिलेल्या एका पत्रांत सुचविलें. त्याला नेताजींनीं जें उत्तर लिहिलें त्यांत त्यांनीं लिहिलेलें होतें "...अगदीं तुम्हीं जें सुचविलें तेंच मी तुम्हांला लिहून कळविणार होतों. मलाही असेंच वाटतें कीं, आतां तुमच्या पथकांतील स्त्रीसैनिकांस लष्करी शिक्षण मिळालें असल्यामुळें त्यांनीं दिवसां छावणीवरील पहाऱ्याचें काम स्वतःच केलेलें चांगलें. रात्रीं मात्र हा पहारा त्यांनीं देऊं नये. पहाऱ्याचें काम केल्यानें धीटपणा व स्वतःची जबाबदारी ओळखण्याची पात्रता त्यांच्या अंगीं येईल."

हिंदी स्वातंत्र्यसंघांतील इतर कार्यकर्ते या पथकाच्या उपयुक्ततेबद्दल साशंकच होते. प्रत्यक्ष नेताजींशीं या बाबतींत वाद घेण्याची कोणाचीच तयारी नव्हती. परंतु आपापसांत ते नेहमीं असें म्हणत असत कीं, "नेताजींनीं हें नसतें लोढणें गळयांत अडकवून घेतलें आहे. या पथकाची नसती जबाबदारी आणि विवंचना मागें लावून घेतली आहे...यापलीकडे यांतून निष्पन्न कांहीं नाहीं, वगैरे." नेताजींचे कार्याच्या दृष्टीनें पाहतां हें मत थोड्याफार अंशानें खरें ठरलें. रशिया आणि इंग्लंडमधल्यासारखें किंबहुना त्यांच्याहूनही अधिक युद्धकार्य हिंदी स्त्रियांनीं करावें असें त्यांचें मत असलें व त्यांच्या कल्पना प्रत्यक्षांत उतरविण्याचा त्यांनीं कितीही कसोशीनें प्रयत्न केला असला तरी अतिपूर्वेंतील झांशीराणी पथकाची प्रत्यक्ष स्वातंत्र्ययुद्धास फारच थोडी मदत झाली असें म्हटलें पाहिजे. याचें कारण पूर्ण लष्करी वृत्ति अंगीं बाणण्यास तत्पूर्वीं राष्ट्रीय शिक्षणाचा पाया भरभक्कम असावा लागतो. त्याचा येथील स्त्रियांचे ठिकाणीं पूर्ण अभाव होता. येथें कोणी असें म्हणतील कीं, पुरुषांना तरी राष्ट्रीय शिक्षण कोठें होतें? हें जरी अंशतः खरें असलें तरी पुरुषांच्या नित्य व्यवसायांतच त्यांना बाहेर जें ज्ञान मिळतें व अनुभव येतात ते सुद्धां हिंदी स्त्रियांना नसतात. यामुळें अव्वल दर्जाच्या लष्करी शिक्षणास स्त्रियांच्या पूर्व-शिक्षणाचा चौथरा अपुराच पडतो. पुरुषांचे बाबतींतही हें खरें असल्यामुळेंच आपले लोक इंग्रजांचे गुलाम म्हणून त्यांचेकरितां दिग्विजय गाजवून पृथ्वीचेंही

राज्य कमावून त्यांचे चरणीं अर्पण करूं शकतात. परंतु स्वतःचें स्वातंत्र्य मात्र प्राप्त करून घेऊं शकत नाहींत.

ता. २१ ऑक्टोबर १९४३ रोजीं हिंदी स्वातंत्र्य सरकार स्थापन झाल्यावर नेताजींतर्फे एक आंतरराष्ट्रीय धर्तीचा खाना देण्यांत आला. सिंगापूर स्विमिंग क्लबच्या भल्या मोठ्या सभागृहांत या खान्याची खास व्यवस्था करण्यांत आली होती. जर्मन, जपानी, हिंदी वगैरे राष्ट्रांचे प्रमुख अधिकारी मिळून एकंदर सुमारें ५०० निमंत्रित पाहुणे हजर होते. सिंगापूर स्विमिंग क्लब, पूर्वी फक्त गौरकाय लोकांकरितांच राखून ठेवलेला असे. जपान्यांनीं तो आपले ताब्यांत घेतला. त्यांचे अधिकारी सर्व कारभार पाहूं लागले. परंतु आतां सर्व एशियाटिक लोकांकरितां हा क्लब उघडा ठेवण्यांत आला होता. या खान्याच्या प्रसंगीं हिंदी स्वातंत्र्य सरकारतर्फे नेताजींचें व जपानी सरकारतर्फे त्याच्या अधिकृत प्रतिनिधींचें परस्परांच्या मैत्रीविषयीं व जय मिळेपर्यंत युद्ध चालविण्यासंबंधींचीं भाषणें झालीं. सर्व समारंभ आटोपल्यावर नेताजी खालीं आले. त्या भव्य व शोभिवंत सोपानांच्या पायथ्याशीं टोप्या वगैरे अडकविण्याकरितां मधोमध आरसा असलेलें एक खुंटाळें ठेवलेलें होतें. जपानी पद्धतीप्रमाणें एखादा मोठा आंतरराष्ट्रीय खान्याचा समारंभ संपला म्हणजे सर्व जपानी परिवेषिका मुख्य द्वारापाशीं अर्धवर्तुळाकृति उभ्या राहून सर्व प्रमुख पाहुणेमंडळींस त्यांच्या त्यांच्या टोप्या, काठ्या इत्यादि देऊन त्यांस लवून अभिवादन करतात. त्यांच्या या पद्धतीप्रमाणें या प्रसंगींही नेताजी व त्यांचेसह इतर राष्ट्रांचे वरिष्ठ अधिकारी खालीं येतांच या मुलींनीं नेताजींस लवून अभिवादन केलें. नेताजींनीं त्यांचेकडे लक्षच दिलें नाहीं. नंतर इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा निरोप घेत नेताजी २-४ मिनिटें तेथेंच उभे होते. या वेळांत त्यांचे बाजूला जेव्हां जेव्हां तोंड वळे तेव्हां तेव्हां त्या परिवेषिका त्यांस अभिवादन करीत असत. परंतु नेताजींनीं नुसत्या निर्देशानेंसुद्धां त्यांचें अभिवादन स्वीकारल्याचें दर्शविलें नाहीं. सीझर होऊं पाहणाऱ्याची स्त्रीविषयक दृष्टि शंकेच्याही पैलतीरीं असली पाहिजे, हें ते जाणून होते, असेंच म्हणावें लागतें.

# नेताजी-निवास

सिंगापूर बेटाच्या पूर्व किनाऱ्यावर समुद्रकांठीं अनेक धनिकांचे ऐसपैस बंगले आहेत. या विभागास "कातोंग" म्हणतात. येथील प्रत्येक इमारतीचें आवार विस्तीर्ण असून, त्यांत सुंदर बाग लावलेली आहे. सर्वसाधारणपणें हे बंगले पाश्चिमात्यांच्या अथवा त्यांच्या परस्थ बगलबच्च्यांच्या मालकीचे आहेत. स्थानिक लोकांच्या धनानें व श्रमानें बांधलेल्या या इमारतींत पाश्चात्यांची चैनबाजी चालते. अतिपूर्वेंत युद्धाची वावटळ सुरू होऊन इंग्रजांचें राज्यछत्र उडूं लागल्याबरोबर त्या छत्राखालीं ऐषआराम करणारे यूरोपीय, अमेरिकन; ज्यू, अरब, चिनी इत्यादि अठरापगड जातींचे लोक दाही दिशांस पांगले. त्यांच्या मिळकतीचे तीन-तेरा वाजले. आजपर्यंत जगावर राज्य करण्याचा अधिकार जर कोणास असेल तर तो फक्त इंग्रजांसच, असें मानणारे हे लोक आपली मिळकत सोडून इंग्रजांचे शेपटीस घट्ट धरून त्यांचे मागोमाग जेव्हां निघून गेले, तेव्हां त्यांची मिळकत ही शत्रूचीच मिळकत असें समजून आंतराष्ट्रीय व्यवहारास अनुसरून जपान्यांनीं ती ताब्यांत घेतली. अशाचपैकीं "मेयर"नामक एका 'यःपलाय' केलेल्या ज्यू कोट्याधीशाचा येथें एक पाश्चात्य पद्धतीचा महाल आहे. सिंगापुरांतील खाजगी इमारतींत पाहूं जातां हाच महाल अत्युत्तम

होता. तेथील जपानी कारभाऱ्यांनीं नेताजींचें सिंगापुरांतील निवासस्थान म्हणून ही हवेली हिंदी-स्वातंत्र्यसंघाच्या अधिकाऱ्यांच्या हवालीं केली. या भवनाच्या आवाराचे समोरील बाजूस म्हणजे रस्त्यालगत सीमेंट-मिश्रित गोट्यांचा दोन पुरुष उंचीचा एक निळसर खडबडीत कोट आहे. कोटाचे दोन्हीं टोकांस दोन जाड लोखंडी फाटकें आहेत. पूर्वीं उल्लेखिल्याप्रमाणें प्रवेशद्वार उघडतांच एका स्वातंत्र्यसैनिकाचा येथें बळी पडलेला होता.

दोन्ही फाटकांपाशीं एक एक बंदूकधारी पहारेकरी असे. प्रवेशद्वारानें आंत शिरतांच डावे बाजूस तशाच खडबडीत भिंतींचा सेवकवर्गाकरितां दोन मजली निवास केलेला आहे. त्याचे पलीकडे हिंदी स्वातंत्र्यसैनिकांनीं एक लाकडी झोपडी तयार केली होती. ही पहाऱ्याची चौकी असून येथें आठ सशस्त्र पहारेकरी नेहमीं तयार बसलेले असत. बाहेरील दोन्ही फाटकांतून दोन रस्ते सरळ आंत जाऊन नंतर वळून हवेलीच्या द्वारप्रकोष्ठांत जुळले आहेत. या दोन्ही रस्त्यांच्या मधोमध बाग असून, निर्गमन फाटकांपाशींही दुसरा एक लहानसा सेवक-निवास आहे. प्रशस्त द्वारप्रकोष्ठावर चौकोनी गच्ची आहे. बंगल्याच्या मजबूत सागवानी पिंगलवर्णी प्रवेशद्वारांतून आंत शिरतांच वरील बाजूस जाड कांचेचा एक धुमट आहे. यावर अनेक रंगांची वेलबुट्टी काढलेली असून यांतून मंद प्रकाश आंत येतो. दोन्ही बाजूंनीं दोन वक्राकृति संगमरवरी सोपान प्रवेशद्वाराच्या माथ्यावर युति पावून पुढें एकाच विस्तीर्ण निश्रेणीच्या रूपानें दुसऱ्या मजल्याचे चरणीं लीन होतात. खालचे मजल्यावरील प्रवेशद्वारांतून शिरतांच दोन्ही बाजूंचे जिन्यांच्या अर्धवर्तुलांतून सरळ पुढें गेलें म्हणजे पांच फूट लांब व ६० फूट रुंद पडवी लागते. या पडवीस चकाकणाऱ्या गुळगुळीत दगडांची फरशी बसविलेली आहे. समोरच चौकटींत आरसा बसविलेलें पाश्चात्य पद्धतीचें एक खुंटाळें बसविलेलें असे. येथें नंगी तलवार हातांत धरलेला स्वातंत्र्य-सैन्याचा एक पहारेकरी सतत पहाऱ्यावर उभा राही. या अरुंद पडवींतून पलीकडील पंचवीस फूट रुंदीच्या व साठ फूट लांबीच्या शोभिवंत दालनांत जाण्यास सहा दरवाजे होते. सुंदर

लाकडी चौकटींत बसविलेलीं कांचेचीं तावदानें व प्रत्येक द्वाराचे शिरोभागीं तसल्याच सुंदर कमानी यांमुळें त्या द्वारांस एकप्रकारचा सुंदर नाजुकपणा आलेला होता. तकाकणारा तपकिरी रंगाचा लाकडी भूपृष्ठ, भिंतींस बदामी रंग, छतास पाश्चात्य पद्धतीचीं झुंबरें अशा साध्या साजानें सुद्धां त्या दालनास शोभा आलेली होती. याच दालनास पलीकडील बाजूस सात नाजुक द्वारें होतीं. या दालनाचे पलीकडे असलेल्या निळसर खडबडीत भिंतींच्या परंतु गुळगुळीत फरशीच्या पडवीची सपाटी दालनाच्या भूपृष्ठाहून ९ इंच खाली आहे. ही पडवी २० फूट रुंद व ६० फूट लांब आहे. याचे पलीकडील आवार सुमारें ५० गज अंतरावर अगदीं समुद्रास जाऊन भिडतें. समुद्राच्या कांठास समांतर अशी ५ फूट रुंदीच्या लाल दगडांची लांबलचक फरसबंदी केलेली असून त्यास सीमेंटच्या चपट्या नक्षीदार खांबांचा ३ फूट उंचीचा कठडा आहे. मधोमध तीन लहान पायऱ्या केलेल्या असून त्यायोगें क्षीरसागरांत बुडवून पाय शीतल करतां येतात. समुद्रकांठच्या या लांबलचक फरसबंदीवर एक बंदूकधारी स्वातंत्र्यसैनिक येरझाऱ्या घालीत अफाट सागराचा व अनंत आकाशाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करीत असे. न जाणो या बाजूनें कोणी राहू, केतू आमच्या चंद्रनेत्यास ग्रासण्यासाठीं यावयाचा!

समुद्रकांठच्या या पिछाडीचे आवारांत हिरवळीचें मैदान असून, यांत दोन टेनिस-कोर्टस् होतीं. एकूण सुमारें दोन वर्षांच्या अतिपूर्वेतील वास्तव्यांत नेताजी, या ठिकाणीं आठ-दहा वेळां टेनिस खेळले असतील नसतील. कोठल्याही मैदानी व मर्दानी खेळांविषयीं नेताजींस आवड आहे, परंतु खेळाकडे लक्ष देण्यास त्यांस स्वातंत्र्यकार्यांतून क्वचितच फुरसत मिळत असे. स्वातंत्र्ययुद्ध म्हणजे साधासुधा खेळ नसून तो जिवावरचा खेळ आहे असें ते स्वतः मानीत असत. याच आवारांत एके बाजूस जमिनीखालीं एक वर्तुलाकार भुयार खणून त्यांत लाकडी चौकट बसवून हवाई हल्ल्याचे वेळीं नेताजींस आंत बसतां यावें, म्हणून एक-दोन खुर्च्या ठेवण्यांत आलेल्या होत्या. लाकडी छताच्यावर एक लघुतम टेकडीवजा मातीचा ढीग रचून त्यावर हिरवेंगार गवत

उगविलेलें होतें. भूपृष्ठाच्या व लाकडी छताच्या मधोमध चोहों बाजूंस चार इंची फट, हवा आणि उजेड आंत येण्याकरितां ठेविलेली होती.

दुसरे मजल्यावर सर्वत्र तपकिरी रंगाचे तकतकीत लाकडी तळ होते. जिन्याच्या कठड्यावर पितळी पत्रा चढविलेला असून त्याची तकाकी एकंदर थाटामाटांत भर घाली. जिन्यावरील गालिचा पितळी पट्टयांनीं पक्का बसविण्यांत आलेला होता. वर गेल्यावर समोरच पडवी असून पलीकडील गॅलरींत जाण्यास एक आठ फूट लांबीचा बोळ आहे. बोळाच्या उजवे बाजूस नेताजींचें शयन-गृह व डावे बाजूस खलबतखाना होता. खलबतखान्यास लागून असलेल्या खोलींत नेताजी एकांतांत वाचन, लेखन, अभ्यास, मनन व सरकारी काम करीत बसत. जिन्यासमोरील आठ फुटांच्या बोळांतून चंचल निळ्या सागराचें आणि अनंत आकाशाचें आल्हाददायक दर्शन घडत असे. सृष्टिदेवतेच्या निळसर अंगवस्त्राचे सिंधुजलरूपी सळसळणारे ते घोळ आणि वर आकाशाचा तो पदर यांमुळें आपण एखाद्या मंदिराच्या शांत आणि पवित्र वातावरणांत उभें असल्याचा भास होई. वीस फूट लांबीचा तो बोळ होता. बोळाच्या पलीकडे एक विस्तीर्ण गॅलरी आहे. या गॅलरीस संगमरवरी फरशी बसविलेली आहे. गॅलरीस समुद्राच्या बाजूला रुपेरी मुलामा दिलेल्या पिळदार लोखंडी सळ्यांचा कठडा आहे. वादळाचे वेळीं या बाजूनें वारा आणि जलतुषार आंत शिरूं नयेत म्हणून वरचे बाजूस चिकाच्या पडद्यांच्या गुंडाळ्या टांगलेल्या असत.

समुद्रांत कांठापासून दोन-तीन फर्लांग अंतरावर पाण्यांत खांबांचे आधारावर उभारलेल्या झोपड्या दिसत. झोपड्यांचे अवतींभोंवतीं सिंधुतलांत पक्क्या रोवलेल्या कामट्यांचे शेंडे वर आलेले दिसत. या शेंड्याबुडख्यांचीं अनेक छोटींमोठीं वेडींवांकडीं वलयें कोळ्यांच्या प्रत्येक झोपडीचें भोंवतीं होतीं. अशा सुमारें तीन-चार झोपड्या तेथें एकमेकींजवळ होत्या. दूरवर एखाद दुसरें जहाज नांगरून ठेवलेलें दिसे. नेताजी-निवासांत जसे राजकारणाचे रंग बदलत असत तद्वत् नभांतही कधीं स्वच्छ सूर्यप्रकाशाचा आनंद आणि उत्साह तर कधीं मेघछायेची उदासीनता दृग्गोचर होई.

वरचे मजल्यावर दोहों बाजूंस दोन प्रशस्त खोल्या होत्या. यांत नेताजींचे सन्निध असणाऱ्या स्वातंत्र्यसैन्याच्या अधिकाऱ्यांपैकीं दोघे राहत असत. खालचे बाजूस मधोमध असलेल्या लांब शोभिवंत दालनाच्या दोहों बाजूंस दोनदोन खोल्या होत्या व शिवाय द्वार-प्रकोष्ठाच्या पलीकडे दोहों बाजूस तीस तीस फुटांवर एक एक खोली होती. या खोल्यासुद्धां त्या निवासाशीं निगडितच होत्या. डावे बाजूची खोली हें भोजनगृह होतें. मुख्य दालनाच्या डावे हातास असलेल्या दोन खोल्यांपैकीं एक जी भोजनगृहास लागून होती तींत कोठार होतें. या कोठारगृहास शेपटीवजा एक तिरपा बोळ जोडलेला असून या बोळाचे शेवटीं स्वयंपाकगृह होतें. स्वयंपाकगृह दूर ठेवण्याचें कारण म्हणजे पाकनिष्पत्तीचा वास व धूर यांचेपासून लक्ष्मीपति गृहस्वामीस कपाळशूळ होऊं नये. हें भोजनगृहाचें तळ लाकडी असून त्यावर मधोमध एक सुंदर पातळ गालिचा पसरलेला होता. गालिच्या-वर दोहों बाजूंस चार चार खुर्च्या ठेवलेल्या असून त्यांचे मधोमध एक मेज होतें. मेजाचे अरुंद बाजूंसमीप एक एक खुर्ची ठेवलेली होती. खुर्च्यांचीं आसनें व पाठी गुलाबी मखमलीच्या गादीच्या होत्या. खुर्च्यांवरील कलाकुसर विशेष गुंतागुंतीची नसली तरी त्यांच्या घाटणी-वरून त्या कोठल्या तरी राजप्रासादांतील असाव्यातसें वाटे. भिंतीचे वरचे बाजूस छताजवळ असलेल्या खांचांत मंदप्रकाश प्रसृत करणाऱ्या विजेच्या लांब कांचेच्या नळ्या लावलेल्या आहेत.

मधोमध असलेल्या भोजन-मेजावर प्रत्येक खुर्चीसमोर सुबक नक्षी-दार चांदीचे कांटे-चमचे, सुऱ्या व सोनेरी वेलबुट्ट्या काढलेल्या चिनी-मातीच्या लहानमोठ्या ताटल्या ठेवलेल्या असत. प्रत्येक स्थालीजवळ घडी केलेला एक स्वच्छ रुमाल असे. येथेंच नेताजी नेहमीं भोजनास बसत. प्रवेश-द्वारांतून शिरतांच मेजाचे अरुंद बाजूचे मधोमध जी एकुलती एक खुर्ची असे ती त्यांची.

खालच्या प्रमुख दालनाच्या व द्वारप्रकोष्ठाच्या दोहों बाजूस ज्या खोल्या आहेत त्यांतही नेताजींचे सन्निध असलेलें लष्करी अधिकारी राहात. नेताजींचें शयनगृह सोडलें तर या इतर अवतींभोवतींचे

खोल्यांतून दोन अथवा तीन पलंग, मेज, आरशाचें कपाट अशा तऱ्हेचा शोभिवंत संभार होता. प्रत्येक खोलीचे आंतले बाजूस पाश्चात्य पद्धतीचें एक एक स्वतंत्र स्नानगृह व शौचकूप होते. यांतील पांढरी स्वच्छ फरशी व रुपेरी मुलामा चढविलेल्या चकाकणाऱ्या दांड्या, खुंट्या इत्यादि पाहिलें म्हणजे मन प्रसन्न होई. या सुखसोयी प्रत्येक कक्षेस स्वतंत्र असल्यामुळें कोणाची गैरसोय होत नसे. इतर मुख्य मुख्य खोल्यांतून व दालनांतून शोभिवंत खुर्च्या, कोच, गालिचे, मेजें वगैरे साजेसा साज असे. खालील प्रमुख दालनाच्या डाव्या कोपऱ्यांत एक टेलिफोन असून याचा तारसंबंध वर नेताजींचे खलबतखान्यांतील टेलिफोनशीं असे. समदर्ज्याच्या कोण्या व्यक्तीस खुद्द नेताजींशीं टेलिफोनचे सहाय्यानें भाषण करावयाचें असल्यास, खालचे टेलिफोन-पाशीं बसलेला गृहस्थ वरचे टेलिफोनशीं तेथल्या तेथें तारसंबंध जोडून देई. वर घंटा वाजली म्हणजे नेताजींस तेथूनच बोलणें सोयीचें होई. त्यांस उगीच खालीं हेलपाटा घालावा लागत नसे. असे प्रसंग पण क्वचितच येत. कारण, प्रत्यक्ष त्यांचेशीं टेलिफोनवर संभाषण करण्याच्या तोलाच्या व्यक्ति मोजक्या असत. या व्यक्ति म्हणजे आझाद-हिंद सरकारचे मंत्री, नाहीं तर जपानी राष्ट्राचे प्रतिनिधि, वकील, खास दूत, सरसेनापति वगैरे. या व्यक्तीसुद्धां दूरवर कोठें तरी कांहीं महत्त्वाच्या कामांत गुंतल्या असून त्यांस ताबडतोब तेथल्या तेथें एखाद्या निकडी-च्या मुद्यावर नेताजींचे मत हवें असलें तरच त्यांस तेथून टेलिफोनचे सहाय्यानें नेताजींशीं बोलण्याचा प्रसंग येई. इतर कामें नेताजींच्या चिटणिसांकरवींच होत. प्रत्यक्ष मुलाखत जरी ठरविण्याची झाली तरी यांच्या मध्यस्थीनेंच. अशा रीतीनें नेताजींस प्रत्यक्ष टेलिफोनवर फार वेळां न बोलावें लागणें हें त्यांच्या उच्च हुद्यास, मानास, ध्येयास व कार्यास शोभेसेंच होतें. त्यांचेविषयीं सर्वांचे मनांत वसत असलेल्या अत्यादराचें तें निदर्शक होतें.

## निवासांतील नोकरवर्ग

बर्लिनहून नेताजींचेबरोबर आलेले श्री. स्वामी व हसन हे सुमारें दीड वर्षेपर्यंत नेताजींचे चिटणीस म्हणून काम पाहत. शिवाय स्वातंत्र्य-

सैन्यांतून श्री. रावत हे गढवाली गृहस्थ लष्करी सहाय्यक म्हणून नेताजींचे दिमतीस दिलेले होते. एक शीख गृहस्थ श्री. समशेरसिंग व एक चाळिशी उलटलेले गुरखा सुभेदार, नेताजींचे अंगरक्षकाचें काम करीत. जपानी भाषा अथवा व्यक्ति यांचेशीं संबंध आणणारीं सर्व कामें सुलभतेनें व्हावींत म्हणून एका उच्च सरदार कुलांतील श्री. कोचायाशी हे जपानी तरुण नेताजींचे दिमतीस हजर असत. श्री. भास्करन् हे मलबारी गृहस्थ नेताजींचे लघुलेखक आणि टंकलेखक म्हणून काम पाहत. डॉक्टर राजू हे नेताजींचे वैयक्तिक वैद्यकीय सल्लागार होते. श्री. मोहनसिंग यांच्या सद्दींत ते याच कामावर असल्यामुळें त्याच परंपरेनें ते नेताजींचे डॉक्टर झाले. हे आंध्रप्रांतीय होते. रोज रात्रौ हिंदी स्वातंत्र्यसंघांतील दोघे लघुलेखक नेताजींचे निवासस्थानीं जाऊन लंडन, सॅन्फ्रॅन्सिस्को, दिल्ली इत्यादि शत्रूंचे नभोवाणीकेंद्रावरून घोषित करण्यांत येणारें सर्व वृत्त रेडिओचे सहाय्यानें ऐकून, भराभर लघुलिपींत टिपून मग त्याचें नेहमींच्या लिपींत भाषांतर करून रात्रीं २-३ वाजण्याचे सुमारास नेताजींचे समोर ठेवीत. या बेतास नेताजींचें सार्वजनिक काम बहुधा आटपत असे. पहारेकऱ्यांशिवाय त्यांचे महालांतील इतर सर्व मंडळी झोपीं जाऊन जिकडे तिकडे शांत झालेलें असे. प्रमुख दालनांतून प्रखर दिवे मालविले गेल्यामुळें सौम्य प्रकाश रात्रीचे शांतींत विलीन झाल्याचा भास होई. वरचे गॅलरींत उभें राहणाऱ्यांस समुद्राचे तुषार अंगावर येत असल्याचा अधूनमधून भास होई. वर पाहावें तो नभाच्या वृंदावनांत आकाश-गंगेच्या कांठीं सुवर्णतारका आणि रुपेरी चंद्र यांची रासक्रीडा चालल्याचा भास होई. सर्व जग झोपीं गेलेलें असे तरी अफाट सागराची राक्षसी कुरबूर चालूच राहून तो स्वशय्येवर अस्वस्थपणें या कुशीवरून त्या कुशीवर गडबडतांना दिसून येई. त्याची अस्वस्थता पाहून तारका आपापसांत गालांतल्या गालांत हंसून म्हणत, 'भूलोकींचे कितीक मानव स्वार्थपरायणतेनें मनाची शांति घालवून जन्मभर चिंता-तुर राहून तळमळत राहतात. आमचा सुभाष पहा, जनता-जनार्दनाच्या

सेवेंत लीन होऊन किती शांत चित्तानें दिवसरात्र आपल्या भूलोकींच्या कर्तव्यांत मग्न झाला आहे!'

रिपुप्रचाराचें विश्लेषण करून त्याचें शोषण करण्याच्या उद्देशानें त्याविरुद्ध प्रचारशास्त्राचे अनुरोधानें आपलें कोणतें अमोघ अस्त्र सोडावें याचा मनाशीं विचार करून नेताजी ते मुद्दे टिपून ठेवीत व दुसरे दिवशीं आपल्या सहकाऱ्यांस योग्य त्या सूचना करीत. यानंतर कांहीं महत्त्वाच्या कागदपत्रांचें वाचन; पत्रलेखन; मनन; दैनंदिनी लिहिणें; पुस्तकें वाचणें वगैरे कार्यक्रमांत ते मग्न असतांना पांच अथवा सहाचा ठोका पडे. सार्वजनिक कामांत व्यग्र असेपर्यंत म्हणजे दिवसांतून वीस तास त्यांचा लष्करी जामानिमा त्यांनीं चढविलेला असे. पुस्तकवाचन व मननप्रसंगीं मात्र—म्हणजे पहांटे सुमारें तीन वाजतां—ते तो साज काढून एक सैलसा अंगरखा अथवा कफनी घालीत, ती झोपून उठेपर्यंत. सर्वसाधारणपणें पहांटे पांच वाजेपासून सकाळीं ९ वाजेपर्यंत त्यांची झोपेची वेळ असे. रात्रभर जाग्रण करण्याची जगाविरहित त्यांची ही पद्धत पाहून हिंदुस्थानांत त्यांचे बरोबरीचे कारागृहांतील साथी त्यांस जेव्हां झोंपण्याचा आग्रह करीत त्या वेळेस ते म्हणत, "अहो, मला रात्रीची झोंपच येत नाहीं त्याला मी तरी काय करूं? तशा त्या शांत वातावरणाचा झोंपून दुरुपयोग करूं नये असें मी समजतों. त्या वेळीं अध्ययन, वाचन व मनन करण्याची नामी संधि घालवणें हें मला कसेंसेंच वाटतें." कारागृहांत रात्रीचे वेळीं आपण आपल्या इतर साथींशीं गप्पा माराव्या, विचारविनिमय करावा असें त्यांस वाटे व तसा आग्रहही ते कित्येकांस करीत, परंतु त्यांचे साथी एकामागून एक पेंगून केव्हांच झोंपीं जात तरी हे इतके खंबीर कीं, त्यानंतर पांच-सहा तास स्वदेशचिंतेंत ते मग्न राहत. राजकीय जागृतीच्या बाबतींतही तेच सर्वांत खंबीर ठरले. त्यांचे कांहीं साथी पेंगूं लागले; कांहीं बेसावधपणें झोंपेंत गडबडा लोळत लढाऊ वृत्तीच्या शरशय्येवरून खालीं अहिंसेच्या मृत्तिकेवर पडले. इतर राजकीय वातावरणाच्या गडबडगोंधळानें व डोक्यांतील अनेक विचारांच्या काहुरानें, अस्वस्थपणें सोयीचें वाटेल त्याप्रमाणें या

१६२६



कुशीवरून त्या कुशीवर वळत आपल्या आयुष्यांतील अज्ञान रात्री काढीत राहिले. अहिंसेच्या अंधःकारानें किंवा स्वार्थी विचारांच्या मेघांनीं नेताजींच्या हृदयांतील स्वातंत्र्यप्राप्तीच्या तळमळीचा सूर्य लुप्तप्राय झालेला नव्हता. या सूर्याच्या प्रखर किरणांचा प्रकाश त्यांच्या रोमारोमात पडलेला असे. म्हणून रात्र झाली असें त्यांस कधींच वाटत नसे. प्रत्यक्ष लढाई पुकारल्याशिवाय स्वातंत्र्यप्राप्ति होईल अशा भ्याड विचारांनीं त्यांच्या हृदयांतील सूर्य कधींच डागळला नाहीं.

वर उल्लेखिलेल्या व्यक्तींशिवाय त्यांचे निवासस्थानीं सतत राहणारे इतर लोक म्हणजे एक देवीसिंग नांवाचा गढवाली शिपाई. सैन्यांत वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दिमतीस एक एक शिपाई दिलेला असतो. वरिष्ठाचे कपडे धुणें, धोब्याकडे देणें, जोड्यास पॉलिश करणें, पितळी गुंड्या वगैरे चकचकीत ठेवणें, जामानिमा चढविण्यास मदत करणें, इत्यादि कामें त्याचेकडे असतात. देवीसिंग हा नेताजींची अशाच प्रकारचीं कामें करी. एके दिवशीं जनरल डोईहारा हे अत्यंत कर्तबगार जपानी सेनानायक नेताजींचे निवासस्थानीं खास निमंत्रणावरून दोन प्रहरीं जेवावयास आले होते. याचा उल्लेख पुढें येईलच. परंतु त्या दिवशींचा समारंभ आटोपून जनरल डोईहारा निघून गेल्यावर आम्ही दुसरे मजल्यावर नेताजींचे दिवाणखान्यांत त्या दिवशीं उरकलेल्या या महत्त्वाच्या समारंभासंबंधीं गप्पा मारीत होतों. एखादा लग्न-समारंभ आटोपल्यावर जसा सर्वांस डोईवरचा भार हलका झाल्यासारखा वाटून उरलेला पसारा आतां आपण केव्हांच आवरून टाकूं, मुख्य व जोखमीचा कार्यभाग उरकला अशा सुटकेच्या भावनेनें सर्वजण मोकळेपणें गप्पा मारीत बसतात त्याप्रमाणें आम्हीही वर गप्पा मारीत होतों. आतां आमचे आम्हीच म्हणजे हिंदी स्वातंत्र्यसैन्याचे व संघाचे सात-आठ अधिकारी होतों. डब्यांतील सर्व सिगारेट्स संपल्या. आम्ही बसलेले होतों त्यांपैकीं तीन-चार गृहस्थ सिगारेट्सचे भोक्ते होते. तरी इतक्या लवकर डबा रिकामा झालेला पाहून नेताजींनीं जरा रागावूनच हांका मारल्या, "देवीसिंग...देवीसिंग..." देवीसिंग आला. "यांत सिगारेट्स भरून ठेवलेल्या असाव्यात म्हणून तुला

कित्येक वेळां सांगितलें असेल. तसें नव्हतें हें स्पष्ट आहे. येवढी साधी गोष्ट तुझ्या लक्षांत राहूं नये...” खासगी प्रसंगीं मीं त्यांना रागावलेले पाहिलें असेल तें फक्त त्यांचे बंगल्यावर राहणाऱ्या माणसांनीं बाहेरून येणाऱ्यांच्या आदरातिथ्यांत कांहीं कमी पडूं दिल्याचा अथवा दुर्लक्ष केल्याचा त्यांस संशय आला तरच. कोणाच्याही आदरातिथ्यांत कांहीं कमी पडलेलें त्यांस मुळींच खपत नसे. अतिथि गेल्यावरही त्याचें योग्य तें स्वागत केलें गेलें कीं नाहीं याबद्दलची चौकशी ते त्यांच्या निवासस्थानावरील जबाबदार मंडळींपाशीं खोदून खोदून करीत. आम्ही रंगूनहून माघार घेऊन सयामची राजधानी बँकॉक शहरीं येऊन पोंचलों होतों. कांहीं कामासाठीं म्हणून दोन प्रहरीं मी नेताजींचे निवासस्थानीं गेलों. नेताजींशीं स्वातंत्र्यसंघाचे कोणी अधिकारी वाटाघाटी करीत बसले होते म्हणून मी वाट पाहत बसलों होतों. त्यांचे साहाय्यक अधिकाऱ्यांशीं माझें बोलणें चाललें असतांना आंत नेताजींशीं खलबत करीत असलेले अधिकारी बाहेर आले. आमचे परस्परांत “जयहिंद” झाल्यावर ते त्यांच्या मोटारींत बसून निघून गेले. थोड्याच वेळांत नेताजीही बाहेर आले. मी उठून त्यांस “जयहिंद” चें अभिवादन केल्यावर त्यांनीं हंसून माझ्या अभिवादनाचा स्वीकार करीत मला बसावयास सांगितलें व नंतर समशेरसिंग (नेताजींचे दुय्यम सहकारी) यांचेकडे वळून तें म्हणाले, “आतां जे गृहस्थ आले होते त्यांचे जेवणाबद्दल तुम्हीं कांहीं तपास केला होता कीं नव्हता ?”- समशेरसिंग ताठ उठून उभे होतेच. ते म्हणाले, “मीं त्या गृहस्थांना विचारलें. त्यावर त्या गृहस्थांनीं जेवून आल्याचें सांगितलें.”

“पण मग त्यांना कांहीं चहा वगैरे तरी दिला का ?” नेताजींनीं पुनः पृच्छा केली. या प्रश्नास ‘हो’ असें उत्तर येतांच त्यांचें कांहींसें समाधान झाल्यासारखें दिसलें. त्यानंतर माझें नेताजींशीं जें काम होतें तें उरकल्यावर पुनः बाहेर येऊन समशेरसिंगांशीं बोलण्याचा प्रसंग आला तेव्हां ते म्हणाले “बघितलंत ओकसाहेब. नेताजींचें हें असें आहे. अमक्याला अमकें दिलें कीं नाहीं...तमक्याची नीट

विचारपूस केली किंवा नाहीं वगैरे इतकें बारकाईनें विचारतात कीं बोलण्याची कांहीं सोय नाहीं..."

कांहीं प्रमुख स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांच्या चालचलणुकीबद्दल त्यांचे कानांवर जेव्हां कांहीं निश्चयात्मक बातम्या गेल्या तेव्हां त्यांसही नेताजींनीं चांगलें खडसावल्याचें ऐकिवांत आहे. नेताजी फारच क्वचित् रागावत. त्यांचा स्वभाव उदास किंवा चिडखोर नसून सरळ, शुद्ध, आनंदी, समाधानी आणि कर्तव्यदक्ष असे. वर उल्लेखिल्या-सारख्या प्रसंगीं ते रागावले तरी त्यांचा संताप हा सात्त्विक संताप असे. कार्य न झाल्याबद्दलचा राग त्यांत असे, परंतु व्यक्तीबद्दल तुच्छ आणि यःकश्चित् भावनेचा त्यांत लवलेशही नसे. तेवढ्यापुरतें रागावून ते पुढें सर्व विसरून जात. एखाद्या व्यक्तीबद्दलची कुत्सित भावना अथवा संताप त्या प्रसंगानंतर एक क्षणभरही त्यांचे मनांत राहत नसे.

स्वातंत्र्य-सैन्यांतील एक मराठा मल्ल नेताजींचे अंगमर्दन करण्याच्या कामावर त्यांचे निवासस्थानींच राही. साधल्यास रात्रीं निजतांना व दिवसां स्नानाचे अगोदर असे दोन वेळां नेताजी अंगमर्दन करून घेत. परंतु राष्ट्रकार्यांतून त्यांस अंगमर्दनास कधीं कधीं फुरसत व स्वस्थता मिळत नसे. त्यांचे वैयक्तिक वैद्यकीय सल्लागार डॉक्टर राजू हे दोनचार दिवसांआड नेताजींची प्रकृति तपाशीत. नेताजींस कित्येक वर्षांपासून क्षयाची भावना झाली असल्याचें सर्वश्रुत आहे. क्षयाची भावना झालेल्यांची काय स्थिति होते हें आपण आपले रोजच्या आयु-ष्यांत पाहतों. याचे अगदीं उलट नेताजींची शारीरिक व मानसिक धमक होती. अत्यंत सुदृढ प्रकृतीच्या माणसासही झेपणार नाहींत इतके कष्ट वर्षानुवर्षे नेताजी लीलेनें करीत. क्षय घर करून राहिलेल्या कोणत्या शरिरास हें शक्य आहे? आपल्याला क्षय झाला आहे हें कळल्याबरोबर इतर कोणताही देशभक्त आपल्या पूर्वपुण्याईच्या आणि बडेजावाच्या जोरावर एखाद्या रुग्णालयांत स्वस्थपणें काळ कंठीत राहिला असता. परंतु या बाबतींतही सुभाषचंद्रांचें अद्वितीयत्व सिद्ध होतें. 'क्षयासारख्या रोगांस शारीरिक व मानसिक दौर्बल्याची भीक न घालणाऱ्या विभूति शेंपन्नास असत नाहींत. युगायुगांत अशी एखाद-

दुसरीच आढळावयाची. अतिपूर्वेतील नेताजींच्या पंचवीस महिन्यांच्या वास्तव्यांत आजारीपणामुळें त्यांनीं एक दिवसही सुट्टी घेतल्याचें अगर कामें पुढें ढकलल्याचें माझ्या ऐकिवांत वा पाहण्यांत नाहीं. येवढ्या काळांत ते किंचित् आजारी असल्याचे मला फक्त दोनच प्रसंग माहीत आहेत. रंगूनहून पीछेहाट करून आम्ही बँकॉकला येऊन पोंचल्यावर ते कांहीं दिवस आजारी होते. परंतु ते आजारी आहेत हें फक्त त्यांच्या अत्यंत निकटवर्ती सहकाऱ्यांसच कळत असे; तेंसुद्धां डॉक्टर व स्वयंपाक्याच्यातर्फे. त्या दिवसांत त्यांस रोज ताप येत असून, अंग दुखत असे, परंतु त्यांच्या कार्यव्यग्रतेंत खंड पडल्याचें दिसून येत नसे.

जर्मनीहून नेताजी सिंगापूरला आल्यावर त्यांचे निवासस्थानीं जाण्याचे प्रसंग मला वारंवार येत. त्याप्रमाणें एके दिवशीं सकाळीं कांहीं कामानिमित्त १० वाजण्याचे सुमारास मी गेलों होतों. खालचे दिवाणखान्यांत बसून त्यांचे सहकाऱ्यांजवळ चौकशी करतां कळलें कीं, सिंगापूर शहरांतील एकदोन डॉक्टर व श्री. राजू हे सर्व नेताजींचें रक्त तपासण्यांत गुंतले असून नेताजींची प्रकृति नादुरुस्त होती. ते दिवशीं हिंदी स्वातंत्र्य-संघाचे व सैन्याचे कचेरींत जाण्यास नेताजींस एकच तास काय तो उशीर झाला असेल नसेल. ते आजारी आहेत, असें कळण्यास इतरांस कांहींच मार्ग नसे. कार्याची तळमळ ही जिवाच्या तळमळीला गिळून टाकण्यास समर्थ असते याचें हें प्रत्यक्ष उदाहरण आहे. परंतु हें समर्थांसच शक्य असतें, येरा गबाळाचें काम नोहे. नेताजींची कार्यनिष्ठा देवकोटीची होती हें सिद्ध करण्यास येवढें एकच उदाहरण पुरें आहे. एरवीं शरीरव्याधीपुढें सर्व मानव आपापला ध्येयवाद विसरून जाऊन हात टेकतात.

बरेच वर्षांपासून मलायांतच स्थानिक झालेले श्री. सुरीन बोस हे कुटुंबवत्सल गृहस्थ नेताजींचे सिंगापुरांतील गृहव्यवस्थापक होते. त्यांचें वय त्या वेळीं चाळिशीच्या आंतबाहेर असून ते अतिशय मन-मिळाऊ, गरीब स्वभावाचे व हंसतमुख चेहऱ्याचे होते. त्यांच्या पत्नी व मुलें हीं त्यांच्या भाड्याच्या घरीं राहत. हे स्वतः सकाळीं साडेआठ वाजे-पासून रात्रीं ११-१२ पर्यंत नेताजींचे बंगल्यावर असत. बंगल्यांतील

टेबलक्लॉथ्स्, चादरी, उश्यांच्या खोळी इत्यादि धोब्यास देऊन त्यांचा हिशेब ठेवणें; दूधवाल्याकडून प्रसंगा-प्रसंगानें कमी-जास्त दूध घेणें; भाजीपाला, धान्यें, मसाले वगैरे मालाचा सांठा पुरेसा आहे किंवा नाहीं यावर देखरेख ठेवून जरूर तो स्वयंपाक रोज करवून घेणें; पाहुणे-मंडळी जास्त येणार असल्यास अथवा तत्सम विशेष प्रसंगीं इतर ठिकाणांहून बैठक, कप-बशा, पेले, ताटल्या, कांटे, चमचे, सुऱ्या, कांचेचें सामान वगैरे मागवून काम झाल्यावर तें पोंचवून देणें; नेताजींचे भोजनसमयीं कांहीं कमी-जास्त असल्यास जातीनें पहाणें; आल्यागेल्यांस चहा, कॉफी, दूध, सरबत मिळण्याची व्यवस्था करणें; घरांतील सर्व मंडळी व इतर पाहुणे मंडळी जेवली किंवा नाहीं ? त्यांस काय हवें नको इत्यादि बघण्याचें अत्यंत जोखमीचें व कधींहि न संपणारें असें हें काम होतें. तरी जीव टेकीस आल्याचें ते चुकूनसुद्धां म्हणाले नाहींत, व त्यांचें कामांत नेताजींनीं न्यून काढल्याचें मला तरी माहीत नाहीं.

पाकसिद्धि करण्यास' स्वातंत्र्यसैन्यांतील गोव्याचे दोन लष्करी स्वयंपाकी व मेजावर नेऊन वाढणारे तसलेच दोन वाढपी असे स्वयंपाकगृहांत चार गडी कामावर असत. बंगल्यावर आळी-पाळीनें पहारा देणारे एकवीस सैनिक; त्यांचा प्रमुख अधिकारी; त्या बंगल्यांत राहणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याचे दिमतीस असलेला एक शिपाई; नेताजींच्या मोटारीचा चालक; त्यांचे बंगल्यावर इतर कामासाठीं राहणाऱ्या तीन मोटारींचे चालक व तांतडीचे संदेश मोटार-सायकलीवरून पोंचविणारा एक दूत, इतकी मंडळी नेताजींचे निवासस्थानीं कायमची असत.

# भोजनप्रिय नेताजी

अमुक एका दिवशीं नेताजींस भूक नव्हती अथवा त्यांच्या तोंडास चव नव्हती असें माझ्या ऐकिवांत वा पाहण्यांतही नाहीं. ते दोन्ही वेळेस चांगलें चमचमीत जेवीत असत. विशेषतः मिष्टान्न त्यांस फार आवडे. अस्सल बंगाली पद्धतीचे रसगुल्ले इत्यादि मिठाईचे ते भोक्ते होते. एकटें जेवणें त्यांस कधींच पसंत नसे. ते जेवणास एकटे बसले आहेत असा एकही प्रसंग कधीं आला नाहीं. नेताजी खालीं जेवावयास आले म्हणजे त्यांच्याशीं वाटाघाटी करण्यास अथवा इतर कामाकरितां खालच्या दिवाणखान्यांत अथवा वर त्यांचेपाशीं जितक्या व्यक्ति असतील त्या सर्वांस ते स्वतः अथवा त्यांच्या सहकाऱ्यांकरवीं बोलावून घेत. कोणीं, " मी जेवून आलों आहें " असें म्हटलें तरी नेताजी त्यांस नुसतेंच आंत येऊन मेजापाशीं बसण्यास सांगत व हळूहळू " हें घ्या...हा एक नवीन पदार्थ आहे...अमुक एक पदार्थ फार चांगला झाला आहे हा चाखून पहा...हें आजचें मिष्टान्न आहे याचा मासला घ्या." असें म्हणत म्हणत त्यास पुन्हा अर्धेंअधिक जेवावयास भाग पाडीतच. अर्थात् आपल्याइकडील लग्नामुंजीच्या पंक्तींत होतो तसल्या प्रकारचा आग्रह, म्हणजे " घ्या हो...नको हो " करीत, जेवणाऱ्यास हातानें पान झाकण्याची पाळी येईपर्यंत नेताजी आग्रह करीत

असतील अशी मात्र चुकीची कल्पना करून घेऊं नये. त्यांच्या "सुभाष" या नांवास साजण्यासारख्या एखाद-दुसऱ्याच गोड शब्दांत ते "हें घ्या..." असें म्हणत एखादें भांडें पुढें करीत; अथवा तें दूर असल्यास त्याकडे निर्देश करीत किंवा वाढण्यास तो पदार्थ वाढण्यास सांगत. एवढ्या मोठ्या व्यक्तीनें घ्या म्हटल्यावर पाहुणा तरी काय म्हणतो बिचारा! प्रथम मूग गिळून नंतर हा पदार्थही त्यास गिळावा लागे. अर्थात् जेवण म्हणजे तरी पोट फुगेपर्यंत थोडाच कोणी जेवतो! शिवाय जेवणानंतर नेताजींच्या बंगल्यावर येऊन त्यांची गांठ घेण्यास थोडाफार वेळ थांबल्यामुळें जेवणानंतर कांहीं कालावधि तरी लोटलेला असेच. त्यामुळें थोडेंसें खाण्यास कोणासच कांहीं हरकत नसे. शिवाय नेताजींशीं गप्पा मारीत त्यांच्याबरोबर थोडेंसें मिष्टान्न खात राहिलें म्हणजे चालत असे. सर्वांस कौतुक वाटे तें नेताजींसारख्या थोर व्यक्तीच्या उदार, प्रेमळ व अगत्यपूर्ण अंतःकरणाचें.

त्यांच्या जेवणाची वेळ ठराविक अशी कोणतीच नसे. कार्यव्यग्रतेंत रोज दोन्ही वेळचें जेवणसुद्धां केव्हांतरी आटोपलें पाहिजे एवढें लक्षांत ठेवून ते दिवसांतून दोन वेळां वाटेल तेव्हां जेवण उरकीत. नेताजींचें दुपारचें जेवण लवकरांत लवकर म्हणजे दोनप्रहरीं होई. कधीं कधीं पांचही वाजत. रात्रीचें जेवण ९ च्या सुमारास झालें नाहीं तर १२ वाजेपर्यंतही पुढें ढकललें जाई. नेताजी कायस्थ कुटुंबांतील असल्यामुळें त्यांस मांसाहाराची संवय सुरुवातीपासूनच आहे. त्यांतल्या त्यांतसुद्धां त्यांस मासे जास्त प्रिय असत. ही त्यांची आवडसुद्धां सोपपत्तिकच होती. कारण, भात व मासे हा सर्व बंगाली लोकांचा मुख्य आहार.

नेताजींस गोडधोड खाण्यास हवें असतें असें जेव्हां मलाया, ब्रह्मदेश इत्यादि प्रदेशांतील हिंदी नागरिकांस माहीत झालें तेव्हां नेताजींचें वास्तव्य असेल त्या ठिकाणचे जवळपासचे लोक कांहीं पदार्थ मुद्दाम तयार करून नेताजींच्यासाठीं पाठवून देत, व ते जेवणाच्या वेळीं त्यांस वाढले जात. एके दिवशीं सायंकाळीं ४ वाजण्याच्या सुमारास कांहीं कामानिमित्त सिंगापुरांतील रामकृष्ण मिशनच्या

आश्रमांत मी गेलों असतांना तेथील ब्रह्मचारी कैलासम् मला म्हणाले, "कोलालपूरहून आत्तांच एक गृहस्थ आले असून ते आमच्याकडेच उतरले आहेत. त्यांनीं हे पेढे नेताजींकरितां म्हणून मुद्दाम तयार करून आणले आहेत...हा बघा मासला." असें म्हणत त्यांनीं एक पांढराशुभ्र पेढा माझ्या हातांत टाकला. अगदीं उत्तम खव्याचा पेढा होता तो. तशा वस्तु...खाद्यपदार्थ...मिष्टान्नांचें भोजन हें अतिपूर्वेतील ४-५ वर्षांच्या वास्तव्यांत अगदीं गर्भश्रीमंत लोकांच्याशिवाय कोणाच्या स्वप्नींहि येत नसे. मलायांत जस्ताच्या खाणी व रबराच्या झाडांच्या लागवडी यांनींच सर्व भूमि व्यापल्यामुळें दुसरें कांहींच उत्पादन होत नाहीं. शांततेच्या काळांत रोजच्या जरूरीच्या व चैनीच्या सर्व वस्तु हिंदुस्थान, इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादि देशांतून मलायांत आयात होतात. युद्धकालांत त्यांची आयात थांबल्यामुळें गरीब लोकांची तर उकिरडे खोदून नरकांतील किडे खाण्यापर्यंत मजल गेली. अशा वेळेस त्या पेढ्यांचें किती महत्त्व असेल व ते करणाऱ्यास किती कष्ट पडले असतील याची ज्याची त्यानें कल्पना करावी.

एका प्रसंगीं कांहीं महत्त्वाच्या कागदपत्रांवर नेताजींची सही घेण्यास मी त्यांच्या निवासस्थानीं रात्रीं आठाच्या सुमारास गेलों. खालच्या दिवाणखान्यांत मी जाऊन बसलों. थोड्याच वेळांत नेताजी खालीं येणार असें मला कळल्यामुळें मीं तेथेंच वाट पाहण्याचें ठरविलें. नेताजी सिंगापुरांत आल्याला १०-१५ दिवसच झालेले होते. त्यांची माझी त्या वेळीं नुसती तोंडओळखच होती. नेताजींनीं खादीचा कोट, पॅंट, सदरा, गांधी टोपी इत्यादि पोषाख घातलेला होता. ते जिन्यावरून खालीं उतरले. त्यांचे चिटणीस श्री. हसन, सुरीन बोस इत्यादींशीं मी बोलत होतों. एक पांढरेंशुभ्र मांजर "म्यॉंव म्यॉंव" करीत करीत आमचे पायापाशीं आलें. श्री. हसन यांनीं चटकन् पुढें होऊन तें मांजर दोन्ही हातांनीं उचलून मागच्या बाजूस नेलें. त्या मांजराचें "म्यॉंव म्यॉंव"ही नेताजींस ऐकूं येऊं नये म्हणून त्यांनीं जातां जातां मांजराचें तोंड आपल्या छातीपाशीं घट्ट धरलें. मागील बाजूस

कोण्या नोकराच्या स्वाधीन तें मांजर करून, नेताजी भोजन उरकून वर जाईपर्यंत त्यानें मांजरास घरांत येऊं देऊं नये असें बजावून श्री. हसन परत आले. मी तो प्रकार पाहतच राहिलों, परंतु मला कांहींच बोध होईना. मी श्री. हसन यांस विचारलें, " अहो, हें गौडबंगाल आहे तरी काय ?" त्यावर हसन म्हणाले, " अहो, आमच्यापैकीं कोणीतरी हें मांजर आवडीनें घरांत बाळगलेलें आहे. या मांजराला घालवून देण्याचा प्रयत्न केला तरी पुनः पुनः लोचटपणानें तें येतेंच. नेताजींना कोणतेंही पाळीव जनावर ठेवलेलें आवडत नाहीं. अर्थात् त्यांस राग येऊं नये म्हणून त्यांच्या दृष्टीस हें मांजर आम्ही पडूं देत नाहीं. ते खालीं आले म्हणजे हें मांजर लपविण्याची आम्हांला खबरदारी घ्यावी लागते..." मनुष्यप्राण्यालाच खायला अन्न मिळत नसतांना त्याचें दुःख निवारण करण्याचें सोडून पाळीव जनावरें पाळून त्यांचें कोड-कौतुक पुरविण्यांत काय शहाणपणा आहे याचें नेताजींस नेहमीं आश्चर्य वाटे. आपला वेळ, पैसा, अक्कल, हुषारी, प्रेम हें सर्व आपल्या मानव-बंधूंचें दुःख निवारणापायींच लाविलें पाहिजे असें त्यांचें मत असल्याचें त्यांच्या आचरणावरून स्पष्ट दिसत असे. इतरत्र बघावयास त्यांस कधीं फुरसतच होत नसे. निव्वळ करमणूक अथवा विश्रांतिही त्यांस ठाऊक नव्हती. या दोन्हींतसुद्धां कांहींतरी राष्ट्रकार्य होत असेल तरच ते स्वतःचा वेळ त्या कारणाकरितां खर्चीत.

या प्रसंगीं मांजराकडे त्यांचें लक्ष गेलें असो वा नसो, ते कांहीं एक न बोलतां भोजनगृहाकडे वळले. आंत जाऊन ते मेजापाशीं बसले. त्यांचेबरोबर डॉ. राजू व श्री. रावत हे त्या दिवशीं जेवावयास होते. बाहेरचें कोणीच नव्हतें. सुरीन बोस माझ्याकडे आले व म्हणाले, " नेताजी तुम्हांला बोलावताहेत." मीं त्यांना म्हटलें, " अहो, मी जेवून आलोंय्..." ते आंत जाऊन पुनः परत आले व म्हणाले, "...तरी नेताजी म्हणताहेत कीं, सहज गप्पा मारीत येथेंच बसा." ते दिवशीं कोणी तरी रसगुल्ले करून पाठविले होते; परंतु त्यांचा आकार व रंग किंचित् निराळ्या प्रकारचा होता. ते चपटे पेढ्याच्या आकाराचे केलेले असून त्यांस गुलाबी रंग दिलेला होता. रसगुल्ले वाढण्यास

आल्यावर श्री. सुरीन बोस यांनीं नेताजींस सांगितलें, 'हे अमक्या... अमक्यानें पाठविले आहेत.' प्रत्येकानें दर वाढपागणिक एकएक दोन-दोन घेतल्यावर पुन्हा तें भांडें कांहीं बाहेर आलें नाहीं. नेताजींस तो पदार्थ आवडला होता. एरव्हींसुद्धां तो पदार्थ त्यांचे आवडीचा व या प्रसंगीं तर कोणीं तरी आपुलकीनें तयार करून नेताजींचेकरितां खास पाठविलेला मग त्याची गोडी काय असेल यांची वाचकांनींच कल्पना करावी. नेताजींनीं विचारलें, "रसगुल्ले संपले कीं आहेत आणखी?" वाढपी म्हणाला, "आहेत थोडे...आणूं?" त्यावर नेताजी म्हणाले, "नको...सगळ्यांकरितां असूं द्या..."

## वाद-संवाद

नेताजींस बहुधा हिंदुस्थानींतच बोलावयास आवडे. हिंदुस्थानी न जाणणाऱ्या तामीळ वगैरे स्वदेशी गृहस्थांशीं किंवा विदेशी अधिकाऱ्यांशीं इंग्रजींत बोलण्याशिवाय गत्यंतरच नसल्यामुळें ते इंग्रजींत बोलत, नाहींपेक्षां ते नेहमीं हिंदुस्थानींतच संभाषणास सुरवात करीत. स्वदेशाचें स्वातंत्र्य व तदनुषंगिक जितक्या स्वदेशी गोष्टी म्हणजे आचार-विचार-व्यवहार इत्यादि, यांच्याबद्दल नेताजींच्या मनांत आत्यंतिक आस्था, कळकळ, आदर व प्रेम असल्यामुळें त्यांच्या तोंडून वा हातून विदेशी-छाप कोणतीच गोष्ट अथवा क्रिया घडून येत नसे. हिंदुस्थानांतच पहा आपल्या कल्पनेच्या पलीकडे परदास्य आपल्या रोमरोमांत शिरलेलें आहे. आपल्यांतील सुशिक्षित लोक नेहमीं इंग्रजींत बोलतात, लिहितात, भांडतात, पोषाख अस्सल इंग्रजी पद्धतीचा करतात. देशभक्त म्हणवून खादी परिधान करणारे लोकही त्या खादीस कोट, विजार, कॉलर, नेकटॉय इत्यादींचा आकार देऊन विटाळून टाकतात. अशांनीं जरी बाहेरून स्वदेशीचा आव आणला तरी त्यांचें मन विदेशीच असतें. राष्ट्रकार्यांत उच्च पदवीस पोहोंचलेल्या लोकांची राहाणीही अस्सल इंग्रजी पद्धतीची असते. दिल्लींतील राष्ट्रीय सभेची बैठक व लंडनमधील इंग्रजी मंत्रिमंडळाची बैठक यांच्यांत तात्त्विक फरक कांहींच दिसून येत नाहीं. दोन्ही अस्सल इंग्रजी

वातावरणांतच होतात. नेताजी सुभाषचंद्र बोस व आपले इतर देशभक्त यांच्यांत हाही एक महत्त्वाचा फरक चटकन् नजरेंत भरतो व तो म्हणजे नेताजींची स्वातंत्र्योर्मि अभिजात होती तशी इतरांची नाहीं. स्वातंत्र्यप्रेम हा त्यांचा फावल्या वेळचा उद्योग नव्हता. प्रवाहपतितांप्रमाणें ते नकळत राजकारणाच्या कांठाला लागले नाहींत. अंतिम उद्देश संतकोटीस पोंचण्याचा, परंतु जातां जातां साधल्यास देशकार्यही करावें अशा हेतूनें त्यांनीं राजकारणाकडे आपलीं पावलें वळविलीं नाहींत. अलोट संपत्ति तर आहेच, आतां त्याच्या जोडीस आयता मान मिळवावा, म्हणजे आणखी काय पाहिजे ? अशा तऱ्हेची वृत्तिही त्यांनीं कधीं दाखविली नाहीं. पोटभरू जीवनास राजकारणाचा फायदा करून घेण्यासाठींही त्यांनीं कधींच खांदेपालट केला नव्हता. लहानपणापासून त्यांच्या हृदयांत जे ज्ञानबिंदु ठिबकले ते हालाहलाप्रमाणें त्यांच्या हृदयास झोंबले. कारण, दर थेंबागणिक इंग्रजांनीं भारताचे कसे हालहाल केले आहेत हेंच त्यांस प्रतीत होत गेलें. त्या थेंबांचें स्वातंत्र्यतळमळीच्या अमृतबिंदूंत रूपांतर होऊन नेताजींच्या रोमरोमांत बालपणापासून दर क्षणीं या अमृताची वाढ होत गेली. आपलें शिक्षण पूर्ण झाल्यावर स्वतंत्र जीवन सुरू करण्याच्या वेळीं स्वातंत्र्यतळमळीचें अमृत त्यांच्या हृदयांत कांठोकांठ भरलेलें होतें म्हणूनच इतर् कोणताही पोटभरू व्यवसाय करण्याच्याऐवजीं देशसेवाच करावी असें त्यांच्या मनानें घेतलें. अर्थात् त्यांचे चरित्रांतील प्रत्येक गोष्टीकडे बारकाईनें लक्ष दिलें म्हणजे त्यांची स्वातंत्र्योर्मि अभिजात होती याबद्दल शंका राहत नाहीं. हा आंबा मूलतःच जातिवंत होता, दुसऱ्या झाडावर कलम बांधलेला नव्हता. स्वदेशाबद्दल त्यांच्या अंतःकरणांतील ओलावा हा परिस्थितीच्या रासायनिक मिश्रणानें बनलेला द्रव पदार्थ नव्हता. जान्हवीच्या पवित्र उगमाप्रमाणें तो स्वयंभू होता. असो. तेव्हां भोजनसमयीं व इतर प्रसंगींही आपापसांतील संभाषण शक्यतोंवर हिंदुस्थानींत व अधुनमधून इंग्रजींत होई.

जेवतांना बहुधा इकडच्या तिकडच्या गोष्टी निघत. हॉंगकॉंगला एक कृष्ण XXX नांवाचे गृहस्थ होते. ह्या गृहस्थांचा स्वभाव

कांहींसा तऱ्हेवाईक होता. अतिपूर्वेंतील इतर सर्व हिंदी लोकांप्रमाणें हेही स्वातंत्र्यचळवळींत सामील झाले असून हाँगकाँगच्या हिंदी स्वातंत्र्यसंघाचे ते अध्यक्ष होते. नेताजी अतिपूर्वेंत येऊन त्यांनीं हिंदी स्वातंत्र्यचळवळीचें नेतृत्व स्वतःकडे घेतल्यापासून ह्या गृहस्थांनीं प्रसंगाप्रसंगानें नेताजींस अनेक तऱ्हेवाईक पत्रें पाठविण्याचा सपाटा लावला होता. एका पत्रांत या गृहस्थांनीं नेताजींस लिहिलें : "...श्री. सुभाषचंद्र बोस यांस 'जयहिंद'...तुम्हीं अतिपूर्वेंत येऊन या चळवळीचें नेतृत्व स्वतःकडे घेतलें हें ठीकच झालें, परंतु तुम्हीं स्वतःच्या हिकमतीवरच अवलंबून न राहणें चांगलें. भारतीय युद्धांत धनुर्धारी अर्जुनाला श्रीकृष्णाची मदत व उपदेश घ्यावाच लागला. प्रस्तुतच्या आपल्या स्वातंत्र्ययुद्धांत तुम्ही अर्जुनाच्या जागीं आहांत व मी कृष्ण आहें. मी तुमचें सारथ्य करीन व तुम्हीं नेहमीं माझ्या सल्ल्यानें वागावें. अशी कृष्णार्जुनांची जोडी जमल्यावर शत्रूंवर जय मिळविण्यास काय उशीर! जय हा ठेवलेलाच..." हें पत्र व अशाच तऱ्हेचीं यापुढील पत्रें मिळालीं म्हणजे क्वचित् भोजनसमयीं ह्यासंबंधीं गोष्टी निघून हंशा पिकावयाचा. इसवी सन १९४४ च्या डिसेंबर महिन्यांत नेताजी सिंगापुरास आले असतांना हे गृहस्थही कांहीं कामानिमित्त हाँगकाँगहून सिंगापुरास आले होते. त्यांची व नेताजींची ओळख करून देण्यांत आली. हाँगकाँगहून "कृष्ण XXX" या नांवानें ज्यांच्याकडून मला पत्रें येत ते गृहस्थ हेच तर! असा विचार नेताजींच्या मनांत आला. त्या दिवशीं रात्रीं कर्मधर्मसंयोगानें त्यांच्या निवासस्थानीं भोजनसमयीं मी हजर होतों. सहज बोलतां बोलतां नेताजींनीं श्री. अय्यर यांस प्रश्न केला "का हो अय्यर, हाँगकाँगहून मला तऱ्हेवाईक पत्रें लिहिणारे गृहस्थ ते हेच ना?" श्री. अय्यर यांनीं होकारार्थीं मान हलविली.

इसवी सन १९४५ च्या मार्च महिन्याच्या २७ तारखेस मी रंगून शहरीं पोंचलों. सिंगापूराहून बँकॉकपर्यंत विमानानें जाऊन पुढें तें विमान नादुरुस्त झाल्यामुळें मला सयाम-ब्रह्मदेशास जोडणाऱ्या नव्या लोहमार्गानें प्रवास करावा लागला. घनदाट अरण्यांतून हा नवीन

लोहमार्ग जपान्यांनीं तयार केलेला होता. या मार्गानें फारच थोड्यांस प्रवास करण्याचा प्रसंग येई. कारण, नेताजी, जगन्नाथराव भोसले वगैरे मंडळी विमानानें उड्डाण करून जात तर सैन्याच्या तुकड्या आणि त्यांबरोबर जाणारे अधिकारी पायीं समुद्रकांठानें अथवा अन्य मार्गानें जात. अर्थात् कांहीं विशेष प्रसंगीं माझ्यासारख्या एकट्यादुकट्या अधिकाऱ्यास कांहीं कारणानें या लोहमार्गानें प्रवास करण्याचा प्रसंग येई. यामुळें या प्रवासांतील मुख्य अडचणी कोणत्या याची कोणास विशेष माहिती नव्हती. मला बँकॉक ते रंगून या सुमारें ५०० मैलांचे प्रवासास बारा दिवस लागले. मी पोंचलों ते दिवशीं माझें स्नान व जेवण वगैरे उरकून मी दुपारीं एक वाजण्याचे सुमारास नेताजींचे निवासस्थानीं त्यांस भेटण्याकरितां म्हणून गेलों. नेताजी आपलीं कामें आटोपून बाहेरून आलेले नव्हते. तास दीड:तास थांबल्यावर नेताजी आले. लगेच ते भोजनगृहांत गेले. दिवाणखान्यांत मी थांबलोंय् असें त्यांस कळतांच त्यांनीं मला बोलावून घेतलें. माझें जेवण झालें होतें तरी मला पुन्हा त्यांचे पंक्तीला बसावें लागलेंच. तेच दिवशीं पहांटे रंगून मुक्कामीं येऊन पोंचल्याचें मीं नेताजींस सांगितलें. " कसा काय झाला प्रवास ? " त्यांनीं मला प्रश्न केला. " उत्तम झाला की ! " मीं उत्तर दिलें. नेताजींस हंसू आलें. या प्रवासांत अनेक अडचणी असून हा प्रवास अत्यंत खडतर आहे हें त्यांनीं अगोदरच ऐकलें होतें. परंतु त्यांतील कष्टांचा कांहीं एक मागमूस न लागूं देतां मीं जणुं काय एखाद्या मजेखातर अंगीकारलेल्या प्रवासाबद्दल सांगावें तसें " प्रवास उत्तम झाला " असें सहजगत्या म्हटल्यामुळें नेताजींस हंसू आलें. वास्तविक मी तरी दुसरें काय सांगणार त्या वेळेस ! आमचे प्रवासांत अनेक अडचणी आल्या, आम्हांला कष्टही फार झाले; परंतु ते लढाईचे दिवस होते व आम्ही हिंदुस्थानचें भवितव्य ठरविणारें एक ऐतिहासिक स्वातंत्र्य-युद्ध लढत होतों. चैनीखातर केलेला तो प्रवास नव्हता. दरक्षणीं चोर, दरवडेखोरांकडून किंवा हवाईहल्ल्यांतील गोळीबारानें मृत्यु येण्याचा संभव होता. परंतु त्याला कांहीं उपाय नव्हता. स्वातंत्र्य-युद्ध लढत असतांना प्रवासांत हमाल मिळाला नाहीं, स्वतः सामान

वाहून मैलोगणती चालत जावें लागलें वगैरे हकीगत सांगून आम्हांला फार कष्ट झाले असें आपल्या नेत्यास सांगणें हें अत्यंत नामुष्कीचें लक्षण ठरलें असतें. त्या दृष्टीनें तिकडे पाहणेंही चुकीचें होतें. आयुष्यांतील अत्यंत मौल्यवान् अनुभव आपल्याला या संधीनें अनायासें मिळत आहेत असेंच मी त्या वेळेसही समजत असें व अजूनही समजतों. एरव्हीं स्वदेशाबाहेर जाऊन विमानानें, आगगाडीनें, पाणबुडीनें, आगबोटीनें व रानावनांतून वणवण करीत पायीं हिंडून देशच्या देश पालथे घालण्याचें व त्याबरोबरच अनेक धडाडीचीं, शौर्याचीं, पराक्रमाचीं, संकटपूर्ण जबादारीचीं व देशसेवेचीं कामें करण्याची नामी संधि कोणाला मिळते! प्रत्येक गोष्टींतील वाईट केवढें आहे येवढेंच लक्षांत ठेवून त्यांतील न्यून काढून रडगाणें गात बसण्यापेक्षां त्यांतील चांगलें असेल तेवढें संकलित करून आलेल्या संकटांपासून पुढील आयुष्यांत काय धडा घ्यावा तेवढें स्वतःचे मनाशीं ठरवावें.

असो. नंतर त्या प्रवासासंबंधीं नेताजी एक एक प्रश्न विचारीत गेले व मीं त्या अनुरोधानें आमच्या प्रवासाची सर्व माहिती त्यांस सांगितली. या एकाच लहानशा उदाहरणावरून नेताजी किती धोरणी होते व त्यांची दूरदृष्टि केवढा लांबचा पल्ला गांठीत असे हें सहज समजून येण्यासारखें आहे. मी रंगूनला पोंचलों तेव्हां रंगून शहर अगदीं भयाण झालेलें होतें. मोठमोठ्या इमारती, भले मोठे डांबरी रस्ते, परंतु सगळीकडे शुकशुकाट. खाकी वेषधारी सैनिकांशिवाय रस्त्यांतून नागरिक जातां-येतांना क्वचितच दिसत. भुताटकीच्या भीतीनें सर्व नागरिकांनीं शहर सोडल्यावर भयाण उदासीनता प्रतीत व्हावी तशी त्या शहराची स्थिति झालेली होती. दिवसासुद्धां रस्त्यांतून हिंडणें धोक्याचें वाटत असे. सूर्यास्तापासून तों सूर्योदयापर्यंत तर प्रत्येक जण मन घट्ट करूनच बाहेर पडत असे. कोणी मरून पडला तरी त्याची विचारपूस करणार कोण! हवाई हल्ल्यांनीं शहराची बरीच नासधूस झालेली होती. शत्रूचे विमान-हल्ल्यांचा जोर रोज वाढतच होता. त्यामुळें दिवसां बाहेर पडण्यास कोणी धजत नसे. खायला-प्यायला तर कांहीं नव्हतेंच. कारण, शेतकरी, मजूर सर्व लागलेले युद्धकार्यांत. आगगाड्यांची नास-

धूस झाल्यामुळें वाहनांचाही अभावच होता सगळीकडे. थोडेसें धान्य असलें कोठें तर तें वाहून नेणार कसें? चालचलाऊ तुटक्या-मोडक्या ज्या आगगाड्या चालत त्या लष्करी वाहतुकीसच पुरत नसत. जपान्यांचा पाडाव होणार असें वाटूं लागलें होतें. सैनिक व युद्धसामुग्री यांच्या तुटवड्यामुळें जपान्यांनीं उत्तर ब्रह्मदेशाचे आघाडीवरून लष्कर व युद्ध-साहित्य काढून सयाम, इंडोचायना, मलाया, फिलिपाइन्स इत्यादि प्रदेशांत पाठविण्यास सुरवात केली. हिंदुस्थानांत भरमसाट लष्कर-भरती करून इंग्रजांनीं लाखोंगणती सैनिक व अवाढव्य सामान ब्रह्म-देशाच्या आघाडीवर पाठविण्यास सुरवात केली. जपान्यांच्या अतुल पराक्रमामुळें इंग्रजांचे हृदयांत धडकी भरलेली होती. येवढ्या जंगी तयारीनंतरही पुढें सरकण्याची त्यांची छाती होईना. दहावीस जपानी-सुद्धां केवढा संहार करून इंग्रजांची धूळधाण करूं शकतात हें त्यांच्या प्रत्ययीं येऊन त्यांस चांगलीच अद्दल घडून दहशत बसल्यामुळें जपानी सैन्य आघाडीवरून मागच्या मागें निघून गेलें असतांनासुद्धां इंग्रज तेथल्या तेथेंच राहिले. पुढें त्यांनीं हळूहळू चांचपडण्यास सुरवात केली तों काय मुख्य जपानी सेना तर केव्हांच मागें निघून गेली होती. हें गुपित कळल्यावर इंग्रज व त्यांचे साथी फुशारकी मारीत पुढें सरकूं लागले. तरी मनांतून त्यांना भीति वाटत होतीच कीं, न जाणो अगदीं ऐटींत पुढें चाल करावी व मुद्दाम तयार केलेल्या सांपळ्यांत आपण आयतेच सांपडायचे. परंतु जपानी त्या परिस्थितींत नव्हते. रंगूनमध्यें पोंचतांच मला एकंदर वातावरणावरून या सर्व गोष्टी आकलन झाल्या होत्या. आपणांस पुढें-मागें रंगून सोडून जावें लागलें तर या लोहमार्गाच्या प्रवासाची कल्पना असावी अशा धोरणानें नेताजी मला एक एक प्रश्न विचारीत होते हें मीं ताडलें व पुढें

५

महिन्या दीड महिन्याच्या आंतच आम्हांला त्या लोहमार्गाचा उपयोग करावा लागला.

## सैनिकांविषयीं आस्था

नेताजी व आम्ही सुमारें चारशें लोक होतों. या प्रवासाचा उल्लेख पुढेंही येईलच. परंतु येथें सांगावयाचें येवढेंच कीं, पीछेहार्टींत आम्हांला सर्वांना स्वतःचें सामान डोईवर घेऊन दरमजल दरकूच करीत चालण्याचे अनेक प्रसंग आले, त्यांत दर मुक्कामास सर्व सैनिकांनीं काय काय खाल्लें या गोष्टीकडे नेताजी बारकाईनें लक्ष देत असत. हवाईहल्यामुळें दिवसां जंगलांत तळ द्यावयाचा व रात्रीं वाट क्रमावयाची असा आमचा क्रम होता. वाटेंत एके ठिकाणीं सकाळीं सात वाजण्याच्या सुमाराला पांचचार झोपड्यांच्या समीप झाडींत आम्हीं सर्वांनीं मुक्काम केला. एका आंब्याच्या झाडाखालीं नेताजीं-करितां एक चटई टाकण्यांत आली. इतरांनीं आपापले सोईप्रमाणें आजूबाजूस मुक्काम ठोकला. नेताजींची आतां झोपण्याची वेळ होती. प्रवासांत त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्याचें, चिटणिसाचें वगैरे काम करण्याचे प्रसंग माझ्यावरच अनेकवार आले. कारण, तीं तीं कामें करणारे त्यांचे नेहमींचे सहाय्यक अधिकारी इतर तुकड्यांबरोबर विभागले जाऊन कोणी पुढें तर कोणी मागें असत. नेताजींनीं मला बोलावून आमचेबरोबर असलेल्या सर्व तुकड्यांतील एकूण एक सैनिकांस त्या मुक्कामापुरता सकाळचा चहा, दुपारीं ११ वाजतां एक जेवण व सायंकाळीं पुढें कूच करण्यास निघण्याचे अगोदर ५ वाजण्याचे सुमारास एक जेवण येवढें तरी मिळावेंच असें सांगून या कामावर देखरेख करण्यास व त्याबाबत योग्य ती व्यवस्था करण्यास मला सांगितलें. दर जेवणांत फोडणीचें वरण असल्यास एक भाजी नाहीं तर दोन भाज्या व भात येवढें तरी असावेंच असें ते म्हणाले. येवढें सांगून ते झोपीं गेले. सर्व तुकड्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांना त्या-बाबत योग्य त्या सूचना देऊन डाळ, भाजी, तांदूळ इत्यादि काय काय पदार्थ आसपास मिळतात तें तपास करण्यास सैनिक पाठविले.

थोड्याच वेळांत भाजीकरितां कच्चे फणस, नारळ, गूळ, दूध वगैरे माल तेथें आला. मी पैसे देऊन तो माल विकत घेतला व सर्व तुकड्यांस वांटून दिला. सैनिकांना अमक्याच वेळीं जेवावयास मिळालें पाहिजे व परिस्थित्यनुरूप त्यांत इतके पदार्थ असावेच याची नेहमीं नेताजी फार दक्षता बाळगीत असत हें वरील गोष्टीवरून सहज निदर्शनास येण्यासारखें आहे.

हा प्रवास संपवून आम्ही बँकॉक शहरीं येऊन पोंचलों तों सर्व सैनिक, रात्रीचीं जागरणें, प्रवासाचा शीण, अनियमित राहणी, घाणेरडें हवापाणी, पौष्टिक अन्नाचा अभाव, औषधांचा तुटवडा यांमुळें अशक्त होऊन फिक्के पडलेले होते. बँकॉक ही सयामची राजधानी असून सयाम युद्धाच्या वावटळींतून सुरक्षित राहिल्यामुळें सयामला त्या मानानें अन्नधान्य, दूधदुभतें इत्यादींची रेलचेल होती. मलायांत व विशेषतः ब्रह्मदेशांत यांतलें कांहींच उपलब्ध नसे. बँकॉकला आल्याबरोबर नेताजींनीं हुकूम सोडला कीं, ब्रह्मदेशांतून आलेल्या प्रत्येक सैनिकास रोज पाऊण शेर दूध मिळावें. सयाममध्यें दुधाचा व्यापार आपल्या युक्तप्रांतीय गवळ्यांच्या ताब्यांतच असलेमुळें त्यांचेकडील सर्व दूध स्वातंत्र्य-सैनिकांचेकरितां घेण्यास कांहींच त्रास पडला नाहीं. रोज प्रत्येक सैनिक पाऊण शेर निर्भेळ दूध पिऊं लागला. अवघ्या दीड महिन्यांत सर्व सैनिकांची प्रकृति सुधारली. भारतीयांची शारीरिक अवनति होत असेल तर ती निर्भेळ दूध पुरेसें न पिण्यामुळें, नियमित व्यायाम न घेतल्यामुळें व चहा, कॉफी, तंबाखू आदि अपायकारक पदार्थांचे सेवनामुळें. वरीलपैकीं दोन अथवा तीन कारणें एकत्रित झालीं म्हणजे केवढे घोर परिणाम ओढवत असतील याची ज्याची त्यानें कल्पना केलेली बरी. आम्हांला काय झालें आहे किंवा होतें आहे ? असा प्रश्न सगळेच जण करतात. कारण मरेपर्यंत सगळेच जगतात. खेळांतल्या "मेलेल्या मढ्याप्रमाणें प्रत्यक्ष जीवनांत जर प्रत्येक माणसास मरणानंतरसुद्धां दाखवून देतां आलें असतें कीं, 'पहा तूं असा असा मूर्खपणानें वागलास म्हणून लवकर मेलास' तर गोष्ट निराळी. तरीसुद्धां

त्यावर हें उत्तर आलें असतें कीं, "बरं मी मेलों पण पुढें काय ? —मेलेलें माणूस कांहीं परत आणतां येत नाहीं —!" खेळांत एक डाव फसल्यावर दुसऱ्या डावाचे वेळीं जसे. मेलेले सर्व गडी पूर्वस्मृति शाबूत राखून पुनर्जन्म पावून नव्या डावांत भाग घेऊं शकतात तसा कांहीं नेहमींच्या जीवनांत मेलेल्या माणसाचा पुनर्जन्म झालेला दिसत नाहीं. तसें असतें तर जीवन हा एक खेळच झाला असता व अमुक एक माणूस मेला असें म्हणण्यांत कांहीं अर्थ राहिला नसता. एवंच जीवनाला खेळ समजून प्रत्येक व्यक्तीनें आपले प्रकृतीचा डाव वाटेल तसा उधळून लावण्यांत कांहीं हंशील नाहीं. व्यक्तीचें जीवन हें त्या व्यक्तीचे अधीन नसून समाजाच्या मालकीचें आहे. व्यक्तीच्या जन्मापासूनचा इतिहास पाहा. कोणत्याही व्यक्तीचा जन्म, शिक्षण, पालन-पोषण हें त्या त्या व्यक्तीच्या हातीं नसून समाज, मारून मुटकून या गोष्टी ती व्यक्ति वयांत येईपर्यंत तिच्याकडून सक्तीनें करवून घेतो. अर्थात् मोठेपणीं समाजाचें हें कर्ज प्रत्येक व्यक्तीनें समाजसेवेच्या रूपानें फेडावयाचें असतें. ही समाजसेवा म्हणजे वयांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीनें स्वतःची शारीरिक व मानसिक उन्नति न थांबवितां इतरांस तशी मदत करणें—हें होय. या दृष्टीनें दूध न पिणें, व्यायाम न करणें, व्यसनांचे पायीं स्वतःचा नाश करून घेणें व त्याबरोबरच आम्हांला काय झालें आहे ?... आम्ही ठणठणीत बरे आहों हें म्हणणें, बेजबाबदार वृत्ति तर प्रकट करतेंच पण त्याहून भयंकर गोष्ट म्हणजे हे सर्व लोक देशाचे व राष्ट्राचे गुन्हेगार समजले गेले पाहिजेत. एका विशिष्ट व्यक्तीच्या आयुष्यांत महिन्या-दोन महिन्यांच्या हयगयीमुळें जर व्यक्तीची मरणोन्मुख स्थिति होते तर वर्षानुवर्षें व पिढ्यान् पिढ्या केलेल्या चुकां-मुळें एकंदर राष्ट्राचा केवढा नाश होत असेल, पुढील प्रत्येक पिढी किती निस्तेज, निःसत्त्व, शक्तिहीन, बुद्धिहीन व रोगजर्जर होत असेल याचा ज्याचा त्यानें विचार करावा. अशा भयंकर अपराधाला केवढी जबरदस्त शिक्षा ठेवावयास हवी ? म्हणून प्रत्येक भारतीयानें पुढचीमागची सर्व जबाबदारी ओळखून स्वतःचे जीवनास योग्य ती कलाटणी द्यावयास हवी.

आपल्या सैनिकांनीं पराक्रम गाजवावा अशी इच्छा असली तर त्यांचे खाण्यापिण्याकडे कसोशीनें लक्ष द्यावयास हवें असें फ्रान्स देशाचा पराक्रमी सम्राट नेपोलियन यानें म्हटलेलें आहे. नेताजीही हिंदी स्वातंत्र्य-सैनिकांचे आहाराबाबत फार दक्षता बाळगीत. अधून-मधून, ते जेव्हां आघाडीवरील अथवा पिछाडीवरील लष्करी छावण्यांची पहाणी करण्यास जात तेव्हां इतर गोष्टींबरोबर मुख्यतः सैनिकांस जेवण कशा प्रकारचें मिळतें याबद्दल ते विशेष कसोशीनें चौकशी करीत. ते स्वतः सैनिकांचें अन्न चाखून पाहत व अनेक वेळां त्यांचेबरोबर भोजनास बसत. त्यांचे निवासस्थानीं मात्र आंतरराष्ट्रीय व हिंदी पाहुणे बहुधा नेहमीं जेवणास हजर असल्यामुळें भात, दोनतीन भाज्या, फोडणीचें वरण, अंड्यांचें सांबारें, तळलेले मासे अथवा मासे घातलेली आमटी, कोंबडीच्या किंवा बकऱ्याच्या मांसाची आमटी, अंड्यांचा खरवस किंवा रसगुल्ले वगैरेसारखा एखादा गोड पदार्थ ह्यांचा रोजचे भोजनांत अंतर्भाव होत असे. नेताजींचे निवासस्थानीं रोजचीं जेवणारीं माणसें व एखादा आला-गेला मिळून पन्नाससाठ माणसें तर रोज सहजच जेवून जात. येवढ्या लोकांना पुरावें म्हणूनही पुष्कळसे पदार्थ असणें जरूर होतें. आठवड्यांतून एक दिवस म्हणजे दर बुधवारीं मात्र, नेताजी दुपारचे वेळीं एकच संमिश्रित असा पदार्थ खात असत. रणांगणावर किंवा आघाडीवर कूच करीत असतांना भांडीं व इतर वस्तु शक्य तितक्या कमी असाव्यात याबद्दल दक्षता बाळगावी लागते. कमी भांडीं, वेळेचें महत्त्व वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन तीन धोंड्यांच्या चुलीवर एकच भांडें ठेवून त्यांत तांदूळ असले तर तांदूळ, डाळ असली तर डाळ, भाजी, तिखट, मीठ, गूळ इत्यादि ज्या कांहीं खाद्य वस्तु मिळतील त्या एकांत शिजवून तें अटवल खावें लागतें. प्रत्येक वस्तु निराळी शिजविण्यास वेळही नाहीं आणि भांडींही नाहींत; बरें भात तर भातच किंवा फार तर खिचडी शिजवून खाल्ली तर, शरीरपोषणास व कार्यक्षम राहण्यास आवश्यक अशीं भाजीपाल्यांतील जीवनसत्त्वें शरिरास मिळणार नाहींत. आज मिळत असलेली भाजी, शिजविण्याचें सोडून खाल्ली नाहीं तर उद्यां ती तरी मिळेल कीं नाहीं याचा नेम

नसतो म्हणून आघाडीवर अथवा कूच करतांना, गूळ, साखर, पाले-भाजी, फळभाजी असे जेवढे पदार्थ मिळतील तेवढे शिजवून खाणें जरूर असतें. अशा आहाराचीही संवय असावी म्हणून नेताजींनीं बुधवारीं सर्व पदार्थ एकत्र शिजवून खाण्याची प्रथा ठेविलेली होती.

ज्या दिवशीं बाहेरील पाहुणे-मंडळी नसत त्या दिवशीं आपले बंगल्यांतील शक्य तितक्या अधिकाऱ्यांस स्वतःचे बरोबर भोजनास ते बोलावीत. एऱ्हवीं सातआठ माणसांपेक्षां अधिक माणसें एकाच वेळीं त्या मेजाशीं भोजनास बसत. अधिकारी वर्गांतील माणसें नेताजींचे बरोबर त्यांचे मेजाशीं भोजनास बसत. परंतु पहाऱ्यावरील शिपाई व इतर नोकर-चाकर यांचेशीं आपला संबंध तुटूं नये, आपण कोणी शिष्ट आहों असा स्वतःचा व इतरांचाही भ्रम होऊं नये म्हणून ते दोन-चार महिन्यांनीं एखादे दिवशीं आपले बंगल्यांतील सर्व मंडळींस बरोबर घेऊन खालीं सतरंज्या आंथरून त्यावर सर्वांशीं मोकळेपणीं गप्पा मारीत भोजनास बसत. त्या दिवशीं भजीं, शिरा असे. कांहीं पदार्थ मुद्दाम केले जात.

विशेष अडीअडचणीच्या प्रसंगीं, जिवावरील व राष्ट्रावरील संकटाचे वेळीं माणसानें खाण्यापिण्याबाबतचीं सनातनी बंधनें खुशाल सैल करावींत, येवढेंच नव्हे तर अशीं बंधनें झुगारून देणें हें त्याचें कर्तव्य ठरेल असें नेताजींचें मत असे. सिंगापुरांत आझाद हिंद सरकार स्थापन झाल्याचे दुसरे दिवशीं म्हणजे इ. स. १९४३ चे ऑक्टोबर महिन्याच्या २२ तारखेस हिंदी स्वातंत्र्य-सरकारतर्फे आंतरराष्ट्रीय अधिकाऱ्यांस व प्रतिष्ठित स्थानिक लोकांस सिंगापूर क्रिकेट क्लबचे इमारतींत मध्यान्हीस एक थाटाचा खाना देण्यांत आला. या प्रसंगीं हिंदी स्वातंत्र्य-सरकारचे प्रचारमंत्री श्री. अय्यर ह्यांची खुर्ची कर्मधर्म-संयोगानें नेताजींचे समोरच होती. अय्यर हे मद्रासकडील कट्टर ब्राह्मण असल्यामुळें त्यांस जन्मतःच मांसाहार वर्ज्य होता. या आहाराची संवय नसणाऱ्यांस त्याची अत्यंत किळस येते हें सर्वांस विदित आहेच. वर उल्लेखिलेल्या भोजनप्रसंगीं पाश्चात्य पद्धतीप्रमाणें प्रत्येक पदार्थ वेगवेगळा वाढला जात असे. एक पदार्थ संपल्याशिवाय दुसरा पुढें

येत नसे. तळलेल्या माशांचें ताट प्रत्येकापुढें ठेवण्यांत आलें. त्या वेळपर्यंत भात वगैरे चापून खाणारे अय्यर आतां घुटमळत असून कात्या-चमच्यांनीं मासे हाताळावयाचें सोडून शेजारीं ठेवलेल्या पावावर व कोशिंबिरीवरच तोंड हलवीत वेळ मारून नेत असल्याचें नेताजींच्या तीक्ष्ण दृष्टींतून सुटलें नाहीं. ते म्हणाले, “ अहो अय्यर, मासे खायला सुरवात केलीत तरी कांहीं बिघडणार नाहीं, हे संक्रमणाचे दिवस आहेत.” हे शब्द श्री. अय्यर यांच्या कानीं पडल्याबरोबर त्यांच्या मनाची काय स्थिति झाली असेल हे तेच जाणोत, परंतु एकाएकीं हातांतील सुरी-कात्यांच्या सहाय्यानें त्यांनीं त्या तळलेल्या माशाचा एक तुकडा घाईघाईनें कापून तो चटकन् तोंडांत टाकला व आवंढ्या-सरशीं तो गिळून टाकला. ही क्रिया इतकी द्रुतगतीनें त्यांचे हातून पार पडली कीं, त्या वेळीं मनांत येवढें बळ कसें एकवटलें कोण जाणें याचें त्यांचें त्यांनाच आश्चर्य वाटत असल्यास नवल नाहीं. तदनंतर मासे खाण्याची त्यांस संवय झाली.

मांसाहार अवश्य आहेच असें नेताजी समजत नाहींत. मानसिक व शारीरिक उन्नतीस शाकाहारच उत्तम असें नेताजींचे मत आहे. कारण सन्यस्त वृत्तीबरोबरचीं इतर सर्व मतें व विचार काय असतात याची आपण सहज कल्पना करूं शकतो. मात्र पौष्टिक शाकाहार मिळत नसला तर त्यांचेऐवजीं वेळेला मांसाशनही करून कार्यक्षमता कायम ठेवून आपलें जीवनकर्तव्य पार पाडावें. समाजकार्याकरितां शक्ति व आयुष्य राखण्याचा प्रश्न उपस्थित झाला तर वैयक्तिक आचरणाच्या नियमांस तात्पुरता फांटा देण्यास कांहीं हरकत नाहीं असें नेताजींचे मत आहे.

रंगूनहून बँकॉकला परत येते वेळीं सतोंग नदीचे तीरावरील रानांत आम्हीं तळ दिला होता. सहस्रावधि जपानी सैन्य व आमच्या स्वातंत्र्य-सैन्याची पीछेहाट चालली होती. एखाद्या जागीं कित्येक वर्षें एक माणूसही फिरकूं नये व एके दिवशीं एकाएकीं कुंभमेळ्यासाठीं यात्रा जमून सहस्रावधि लोकांची रीघ लागावी तशी लष्करी पीछेहाटींत किंवा आक्रमणाचे वेळीं रानवाटांची स्थिति होते. आम्ही ज्या ठिकाणीं

येऊन पहाटेच्या सुमारास तळ दिला होता त्याच ठिकाणीं त्याच दिवशीं आमच्यामागून ४ तासांनीं हाचिया—आझाद हिंद सरकारचे दरबारीं असलेले जपानचे वकील—हेही येऊन ठेपले. रंगूनमध्यें नेताजींची गृहव्यवस्था पाहणारे लेफ्टनंट डे या पीछेहाटींतील प्रवासांतही याच कामावर होते. नेताजींनीं कोठेंही तळ दिला कीं यानीं आसपासच्या खेड्यांतून मिळण्यासारख्या असतील त्या जिनसा आणवून नेताजींच्या व इतर मंडळींच्या जेवणाखाण्याची व्यवस्था करावी, असें होत असे. श्री. हाचिया येऊन ठेपतांच नेताजींनीं लेफ्टनंट डे यांस बोलावून सांगितलें, "आज श्री. हाचिया यांचा तळही येथेंच असल्यामुळें ते आपलेच पाहुणे आहेत. मी त्यांस भोजनाचें निमंत्रण दिलेलें असल्या-मुळें दुपारच्या जेवणास कांहीं गोडधोड करतां आलें तर पहा." लेफ्टनंट डे यांची धांवपळ सुरू झाली. निदान नेताजी, श्री. हाचिया व त्यांचेबरोबर भोजनास बसणाऱ्या पांच-सहा वरिष्ठ मंडळींस तरी तें पक्वान्न पुरलें पाहिजे. पीछेहाटीच्या गडबडींत अवघ्या २–३ तासांत जरूर त्या जिनसांच्या व भांड्याकुंड्यांच्या अभावीं काय करतां येणार? आम्ही उतरलों होतों त्या ठिकाणीं आमच्या विमानविरोधक तोफ-खान्याची छावणी होती. त्या तुकडीच्या कोठारांतून लेफ्टनंट डे यांनीं त्यांची कशीबशी उरविलेली थोडी साखर घेतली; त्यांच्याचपैकीं एका सैनिकास जवळील खेड्यांत पाठवून कसेंबसें २–४ शेर दूध आणविलें व मग आटीव दुधांत भात आणि साखर घालून त्याची घट्ट खीर करून ती नेताजींच्या पंक्तीस वाढली. नेताजींची पक्वान्नाची आवड, त्यांचा धोरणीपणा, बारीकसारीक गोष्टींतील लक्ष व पाहुणचार करण्याची तत्परता इत्यादि गुण वरील उदाहरणांत स्पष्ट दिसतात.

नेताजींनीं त्यांचे आयुष्यांत एकूण अकरा वेळां कैद भोगली होती. त्यांचेबरोबर कैदेंत असणाऱ्या सहकाऱ्यांस नेताजी कित्येक वेळां निरनिराळे पदार्थ स्वतः तयार करून आग्रहानें खाऊं घालीत. दूध, फळें, खाद्यें, पेयें अथवा भोजन इत्यादींनीं पाहुण्यांचा योग्य पाहुणचार झाला कीं नाहीं याबद्दल नेताजी इतकी काळजी घेत कीं, त्यांच्या या बारीकसारीक गोष्टींच्या विचारपुशीमुळें आल्यागेल्याच्या पाहुणचाराचें

काम ज्यांच्याकडे सोंपविलेलें असेल अशा लोकांस मनांतून कधीं कधीं राग येई. अर्थात् हा राग वर दिसूं देण्याची त्यांची छाती नव्हती. परंतु एरवीं आपापसांतील त्यांचे उद्गारांतून त्याची अस्पष्ट कल्पना येणें कठीण नव्हतें. त्यांचें म्हणणें असें कीं, एकदां हें काम आमचेकडे सोंपविल्यावर नेताजींनीं या लहानसहान गोष्टींबद्दल इतकी बारकाईनें चौकशी कां करावी? अशा चौकशीमुळें आम्ही एक तर कामचुकार किंवा अविश्वासू आहोंत असें कोणासही वाटणें साहजिक आहे. असल्या प्रकारचा असंतोष त्यांचे मनांत फार धुमसत होता, म्हणून तो येथें उद्धृत केला आहे अशांतली गोष्ट नव्हे, परंतु थोर व प्रेमळ व्यक्तीच्या बाबतींतसुद्धां आजूबाजूचे लोकांचे मनांत गुप्त असंतोष उत्पन्न होण्यास सूक्ष्म कारणें पुरतात हें स्पष्ट करण्यासच हें नाजूक मनोविश्लेषण हातीं घेतलें आहे. एरवीं मुलांवर निर्व्याज प्रेम करणाऱ्या आईबापांबद्दलसुद्धां कांहीं लहानसान गोष्टींमुळें मुलांचे मनांत किंतु उत्पन्न होतात. याचा अर्थ दोघांत छत्तिसाचा आंकडा असतो असें नव्हे. प्रेमळ आई-बापांस तर मुलांच्याबद्दल वैमनस्य वाटणें कधींच शक्य नाहीं. मुलांचें मातापितरांवरील प्रेम हें बहुधा स्वार्थी आणि अल्प काल टिकणारें असतें. आईबापांत व मुलांत फारकत झाली तर त्या फारकतीमुळें मुलांचें प्रेम कमी कमी होत जाईल. याचे उलट आई-बापांचें मुलांबद्दलचें प्रेम वर्धित होत जाईल. अर्थात् मुलांचे मनांत वाईट ग्रह उत्पन्न होणें किंवा त्यांचें मातापितरांबद्दलचें प्रेम कमी होणें हें जसें शक्य असतें तद्वतच नेताजींसारख्या थोर विभूतीचे आसपास असणाऱ्या इतर व्यक्तींचे मनांत लहानसान किंतु उत्पन्न होणेंही शक्य असतें, पण याचें कारण, या इतर व्यक्तींचा स्वार्थ हाच मुळाशीं असतो. नेताजी अशा बारीकसारीक गोष्टींबद्दल चौकशी करीत. ती न्यून काढण्याच्या, अथवा अविश्वास दाखविण्याच्या उद्देशानें नव्हे. अशा लहानसान गोष्टींचा भावी कार्यावर केवढा महत्त्वाचा परिणाम होतो याची त्यांना जाणीव असून स्वकर्तव्याच्या आत्यंतिक तळमळीमुळें आपलें कार्य कसल्याही तऱ्हेच्या दुर्लक्षामुळें फसूं नये असें त्यांस मनापासून वाटत असे. क्वचित् ते रागावलेले दिसले तरी याच तळ-

मळीमुळें; मात्र एखाद्या प्रेमळ पित्याप्रमाणें त्यांचा राग कधींही दीर्घ-क्राल टिकत नसे. ते मूळचे रागीट नसून अत्यंत प्रेमळच होते. ज्या लोकांस नेताजींचे बारीक सारीक गोष्टींतील चौकशीबद्दल मनांतून राग येई. त्यांची कर्तव्यतत्परता व स्वार्थत्यागी वृत्ति नेताजींचे कर्तव्यतत्परतेच्या व त्यागी वृत्तीच्या पासंगासही पुरण्यासारखी नव्हती. आपल्याकडे दिलेलें काम कोणतेंही असो, तें खरेंखुरें राष्ट्रकार्य समजून कसोशीनें पार पाडलें म्हणजे आपलें कर्तव्य संपलें, मग त्यांत नेताजी लक्ष घालोत किंवा आणखी कोणी घालोत, त्याबद्दल राग मानण्याचें काय कारण? एका ज्वलज्जहाल देशभक्तानें आपल्याकडे सोंपविलेलें काम आपण केलें यांतच प्रत्येकास शांति व समाधानाचा लाभ झाला पाहिजे. हीच वृत्ति प्रत्येक हिंदी माणसाचे अंगांत बाणावयास हवी. वर्तमानपत्रांतून उदो उदो होणें, तुरुंगांत जाणें अथवा बाँब टाकणें म्हणजेच राष्ट्रकार्य करणें असें समजणें हें अत्यंत कोत्या बुद्धीचें लक्षण आहे. इमारत बांधण्यास, धूळ व वाळू वाहून आणणारे, चिखल तयार करणारे व कळस लावणारे असे सर्व प्रकारचे लोक मदत करतात. कळस चढविणाऱ्याचें व त्या इमारतीचा नकाशा तयार करणारा इंजिनियर याचेंच नांव होतें. इतरांचीं नांवें अज्ञातच राहतात. ही झाली इहलोकीची स्थिति; परंतु ईश्वराचें अस्तित्व मानलें तर ईश्वराच्या घरीं ही इमारत बांधणाऱ्यांच्या नांवाचे यादींत सर्वांचा समावेश होईल. अर्थात् राष्ट्रपुरुष म्हणून नेताजींचें नांव होत असलें तरी त्यांच्या कार्यास हातभार लावणाऱ्या सर्वांचाच त्यांत समावेश होतो. म्हणून इतरांनीं लहानसान गोष्टींत नेत्याबद्दल राग मानूं नये. 'अति-परिचयात् अवज्ञा' हेंच त्याचें कारण असतें. स्वतःची कर्तव्यतत्परता व त्यागवृत्ति उच्च कोटीस न पोंचल्याचें तें लक्षण आहे. आपण भाडोत्री, मतलबी व स्वार्थी आहोंत ही भावना मनांत असेपर्यंतच राग मनांत राहतो व वितुष्ट येतें. आपणही शुद्ध राष्ट्रकार्य करीत आहोंत यांत वैय-क्तिक कांहीं नाहीं व राष्ट्रकार्य उत्तमपणें पार पडावें या एकमेव उद्देशानें अधूनमधून देखरेख करीत राहणें हें नेत्यांचें कर्तव्यच आहे अशी प्रत्येक लहान-मोठ्या कार्यकर्त्यांची मनोभूमिका तयार होणें अवश्य आहे.

## तत्त्वज्ञ नेताजी

बालपणीं नेताजींचे एक सहाध्यायी असलेले श्री. रॉय हे पुढें गवई झाले. सुभाषचंद्रांचें नांव सर्वतोमुखीं होऊन त्यांची कीर्ति दिवसें-दिवस वाढूं लागली. एके प्रसंगीं सुभाषचंद्र हे कैदेंतून आल्यावर त्यांचा फार मोठा जाहीर सत्कार झाला त्या वेळीं श्री. रॉय यांनीं त्यांस पत्र लिहिलें, "...तुम्ही आम्ही बालपणचे स्नेही, परंतु आज तुम्ही कोठें व मी कोठें? मी आज केवळ गवयाची पोटभरू भूमिका स्वीकारून अफाट विश्वाच्या एका अंधाऱ्या कोपऱ्यांत काळ कंठीत आहें, याचे उलट तुम्ही दिगंत कीर्ति संपादन करून स्वतःचें नांव अजरामर केलें आहे..." या पत्रास सुभाषचंद्रांनीं जें उत्तर पाठविलें तें फार लक्षांत घेण्यासारखें आहे. त्यांनीं लिहिलें, "लोकांच्या नजरेंत भरण्यासारखें कांहीं कार्य माझे हातून घडलें—माझें नांव सर्वतोमुखीं झालें—म्हणून मी मोठा व तुमचें नांव कांहीं प्रमाणांत कमी लोकांस ज्ञात आहे म्हणून तुमचा व्यवसाय कोता हें मत मला मुळींच मान्य नाहीं. कार्याची महती व त्याची प्रसिद्धि यांचा परस्परांशीं कांहीं संबंध नाहीं. प्रत्येक व्यक्तीचे स्वभावविशेष व गुणावगुण निरनिराळे असले तरी सर्वजण एकाच ईश्वराचे अंशभूत आहेत. प्रत्येक व्यक्तीचें इहलोकींचें कार्य प्रत्येकाच्या स्वाभावविशेषाप्रमाणें नेमून दिलेलें असतें. तें कार्य कसोशीनें व सचोटीनें करणें यांतच इतिकर्तव्यता आहे. आपल्यांत जें जें कांहीं चांगलें असेल तें तें स्वतःच्या स्वार्थपूर्तीकरितां राखून न ठेवतां त्याचा फायदा आपण आपल्या राष्ट्रबंधूंस करून दिला म्हणजे झालें. गवई म्हणून तुमच्याजवळ जो गाण्याचा गुण आहे त्यानें तुम्ही जनसेवा करितां तशीच माझ्या अल्पशक्तीप्रमाणें माझ्याच्यानें होईल तेवढी देशसेवा मी अन्य मार्गानें करतों. दोन्ही देशसेवा समतोलच आहेत. दिवसरात्र काबाडकष्ट करून स्वतःला कांहीं एक न मागतां व कांहीं राखून न ठेवितां स्वतःच्या तीन मुलांचें जिवापाड पालन-पोषण व जतन करणाऱ्या म्हातारीची जनसेवा व देशसेवा अमोलच ठरेल. आपल्यांतील अत्युच्च देशभक्ताच्या स्वार्थत्यागास व

राष्ट्रसेवेस या म्हातारीच्या देशसेवेची सर येणार नाहीं. ही म्हातारी निःस्वार्थपणें स्वतःचा होम तर करतेच, परंतु त्याबरोबर राष्ट्रकार्यास उपयोगी पडतील असे तीन जीव तयार करते. माझ्या देशकार्यांची किंमत वर उल्लेखिलेल्या उदाहरणाच्या मानानें शून्यच ठरेल. अर्थात् प्रसिद्धि-अप्रसिद्धि अथवा कुप्रसिद्धि यांचें तोल ठेवून चालणार नाहीं. आपल्यांतील अत्युत्तम सर्वस्व जो जितक्या प्रमाणांत राष्ट्रास अर्पण करील त्या प्रमाणांत त्या व्यक्तीची देशभक्ति उच्च कोटींतली समजावी..." दोन लाख रुपये शिल्लक असणाऱ्या धनिकानें एक लाख रुपये देश-कार्यासाठीं दिले व एखाद्या अकिंचनानें स्वतःच्या अवघ्या दोन पैसे शिल्कींतील एक पैसा देशकार्यासाठीं दिला तर या अकिंचन माणसाची देशभक्ति त्या धनिकाच्या देशभक्तीपेक्षां लाख पटींनीं श्रेष्ठ ठरेल. अर्थात् आपला व्यवसाय कोणताही का असेना आपली प्रत्येक कृति आपण राष्ट्राकरितां करीत आहों अशा भावनेनें प्रत्येक हिंदी व्यक्ति दरक्षणीं वागली तर सहजगत्या केवढें मोठें राष्ट्रकार्य होण्यासारखें आहे! उदास न होतां आहां तेथेंच राहून प्रत्येकजण उत्तम देशकार्य करूं शकेल हें नेताजींच्या वर उद्धृत केलेल्या पत्रांतील तत्त्व प्रत्येकानें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

## नेताजींची संन्यस्त वृत्ति

सुभाषचंद्र बोस हे परिस्थितीच्या प्रवाहांतून वाहत वाहत नकळत राजकारणाच्या भोवऱ्यांत सांपडले नाहींत हें त्यांच्या चरित्रावरून स्पष्ट दिसतें. त्यांच्या आंगची संन्यस्त वृत्तिही बालपणापासून त्यांच्या पिंडांत वर्धित झालेली अभिजात संन्यस्त वृत्ति होती. यांत नकलीपणा, भोंदूपणा, बुवाबाजी, दिखाऊपणा यांचा मागमूसही नव्हता. वैतागूनही त्यांनीं संन्यास घेण्याचा निश्चय केला नाहीं. लहानपणापासून लक्ष्मी व सरस्वती दोघीही घरीं पाणी भरीत असतांना व स्वतःही पट्टीचे हुषार असूनसुद्धां त्यांनीं आपल्या सर्व कुटुंबियांचे मनाविरुद्ध केवळ आपलें कर्तव्य करण्याची तळमळ म्हणून त्या सर्वांवर लाथ मारून देशाला स्वतंत्र करण्याचें ध्येय अंगीकारलें. याच स्वार्थत्यागाचें दुसरें अंग

म्हणजे वैवाहिक जीवन कंठण्याबद्दलची उदासीनता. आपला देश परतंत्र असतांना, आपले कोट्यवधि बांधव हालअपेष्टांत जीवन कंठून तडफडून प्राण देत असतांना, आपण आपल्याच भोगविलासांत दंग राहणें, जगांतल्या कोठल्या तरी कोपऱ्यांत इतरांचेबरोबर आपलाही एक लहानसा आडोसा उभा करून आपला लहानसा संसार थाटणें, इतरांचे खिशांतील थोडे थोडे पैसे उपटून त्याला आपली मिळकत म्हणणें इत्यादि सर्व गोष्टींबद्दल सुभाषचंद्रांचे मनांत इतकी शिसारी भरलेली होती कीं, हें सर्व सोडून, "मला मनन व चिंतनांत काळ घालवितां आला तर किती उत्तम होईल!" असें त्यांस राहून राहून वाटे. विश्वांत मानवाच्या पिढ्यान्‌पिढ्या होऊन गेल्या. या अफाट रहाटगाडग्यांत जीवजंतूंप्रमाणें मानवही जन्माला येतात आणि मरतात. कोण कोणाची परवा करतो? आपण आपले या स्वार्थी कोलाहलापासून कोठल्या तरी दूरच्या शांत स्थळीं निघून जावें असले विचार त्यांच्या बालमनांत हलकल्लोळ उडवूं लागले. कथा, कीर्तनें, पुराणें, महाभारत, रामायण, संत, महात्मे, तीर्थक्षेत्रें इत्यादींबद्दलच्या गोष्टी ऐकल्या म्हणजे त्यांचें हृदय थरारून जाई व त्यांची हिमालयांत निघून जाण्याची वृत्ति बळावे.

चवदाव्या वर्षी एकाएकीं एक दंड हातांत घेऊन व भगवीं वस्त्रें परिधान करून सुभाषचंद्र घरांतून अदृश्य झाले. सर्वांनीं शोध केला. सुभाषचंद्र गुरूच्या शोधार्थ निघाले. हिमालयांत त्यांनीं गुरूचा शोध केला, परंतु समाधानकारक गुरु त्यांस कोणीच भेटेना. आतां एक नवीनच विचार त्यांचे मनांत बळावत चालला. त्यांना वाटलें, "तिकडे माझे कोट्यवधि बांधव पारतंत्र्यांत खितपत पडले असतांना, शारीरिक व्याधींच्या वेदनांनीं, भुकेच्या तळमळीनें व असह्य जुलमानें विव्हल होऊन त्यांनीं फोडलेले टाहो रात्रंदिवस मला ऐकूं येत असतांना मी स्वतःचे शांतीकरितां एखाद्या भ्याड माणसाप्रमाणें जीवनसमरांतून पाय काढावा व पळत पळत येथें यावें—छीः! असल्या जीवनांत काय अर्थ आहे? यापेक्षां मरण बरें. जन्मतःच मी मेलों असतों तर बरें! मला गीतेबद्दल अभिमान आहे ना? वृथा

अभिमानाचा उपयोग काय? गीतेची शिकवण अमलांत आणावयाची नसली तर गीतेचें ज्ञान, गीतेबद्दल अभिमान असला काय अन् नसला काय सारखाच...आतां तुला गुरु कशाला पाहिजे? तो तुला याहून जास्त तें काय सांगणार आहे? व भगवान् श्रीकृष्णानें सांगितलें याहून कांहीं निराळें सांगणारा गुरु काय कामाचा? कर्तृत्वाच्या अभावीं असल्या गुरूचा अधिकार तरी काय असणार? आत्मचिंतन करीत राहणारे लोक तरी कांहीं कांहीं कारणांनीं माझ्याचप्रमाणें शांतीच्या शोधार्थ येथें येऊन स्थायिक झाले ना? ईश्वरानें जन्माला घातलेले सर्वच लोक जर आपलें इहलोकींचें कर्तव्य सोडून रानांत पळून जाऊं लागले तर हें विश्व चालणार कसें? इतरांनीं जगांत हालअपेष्टा सोशीत राहावें व माझ्यासारख्या लोकांनीं शांति मिळविण्याकरितां पळून जावें...छे...तें कांहीं नाहीं. मला जगांत पुनः परत गेलें पाहिजे. परंतु तेथें तरी मी काय करणार? माझा मार्गदर्शक कोण राहील? जगांतही मुळुमुळू रडणारे लोकच जास्त. रोजच्या पुरतें अन्नवस्त्र मिळविण्याकरितां माणुसकी गहाण ठेवणारे व मरण ओढवेपर्यंत कसेतरी तग धरणारे ते लोक. श्रीमंत असो, गरीब असो, सर्वांची एकच तऱ्हा. छे...मी तसा राहणार नाहीं. सर्व संकटांसमोर...सर्व शत्रूंसमोर छाती ठोकून उभा राहणारा...आपल्या बांधवांकरितां परकीयांस हडसून खडसून जाब विचारणारा कोणी तरी पाहिजेच कीं नको? मग कोणी तरी येण्याची वाट पाहण्यापेक्षां मी स्वतःच कां नाहीं तें हातीं घेऊं? सगळ्या मानवांत एकाच ईश्वराचा अंश आहे...मी खुद्द ईश्वर आहें. ईश्वरच मला प्रेरणा देईल. बस् आतां गुरु काय करावयाचा? कर्म करणारा शिष्य मीच व माझ्याकडून योग्य कर्में घडवून आणण्याकरितां सारासार विचार करून जरूर तें मार्गदर्शन करणारा ईश्वर मीच...गुरुही मीच...शिष्यही मीच...जा, आतां जगांत जाऊन आपल्या कर्माला सुरवात कर...एक क्षणही गमावूं नकोस...निराश होऊं नकोस...आप्तेष्टांच्या मोहजालांत सांपडूं नकोस...सुखदुःख, यशापयश यांचा विचार करूं नकोस... तूं आचरत असलेला मार्ग योग्य आहे कीं नाहीं याचा मात्र दक्षणीं विचार करून त्यांत योग्य

तो फेरबदल करीत जा...हेंच मीं गीतेंत सांगितलें आहे. या उपदेशाची मनांतील आठवण ताजी राहण्यास वाटल्यास गीता वाचीत जा..." अशा तऱ्हेची मनःशुद्धि झाल्यावर सुभाषचंद्र स्वगृहीं परतले. पूर्वीची द्विधावृत्ति नष्ट होऊन त्यांनीं नेटानें कामास सुरवात केली.

स्वामी रामकृष्ण परमहंस यांचे नांवें स्वामी विवेकानंद यांनीं स्थापलेल्या कलकत्त्याजवळील बेलूर येथील मठांत सुभाषचंद्र नेहमीं जात-येत. तेथील वातावरणांत ते स्वतःस विसरून जात. तेथील धर्मग्रंथांचें परिशीलन व संन्यस्तवृत्तीचे बांधवांशीं विचारविनिमय, यामुळें त्यांची बुद्धि अधिकाधिक स्थिरावत व दृढावत गेली. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हेंच आपलें एकमेव ध्येय असें त्यांनीं ठरवून टाकलें. त्या ध्येयाची पूर्ति होईपर्यंत तो एकच ध्यास ठेवावयाचा. तत्पूर्तीस्तव जें हातीं घ्यावें लागेल तें बेधडक अंगीकारावयाचें व इतर सर्व गोष्टी त्याज्य मानावयाच्या. मॅट्रिकचे वर्गांत असतांनाच त्यांनीं समविचाराच्या कांहीं इतर साथ्यांचेबरोबर, स्वतःचे रक्तानें आजन्म पाळण्याचे कांहीं ठळक नियम लिहून ठेवले. यांत स्वदेश स्वतंत्र करणें व आजन्म ब्रह्मचर्य पाळणें इत्यादींचा समावेश होता. शेवटपर्यंत ते या मार्गापासून रतिभरही ढळले नाहींत हें सर्वांस विदित आहेच. मात्र या तळमळीपेक्षांही कांकणभर जास्त बलवत्तर अशी एक ओढ त्यांचे मनास लागली होती. व ती म्हणजे जगापासून दूर कोठेंतरी जाऊन शेवटीं ईश्वर चिंतनांत उरलेलें आयुष्य घालविण्याची.

इसवी सन १९४३ च्या ऑक्टोबर महिन्यांत विजयादशमीचे दिवशीं सिंगापुरांतील तामीळ जनतेनें सुब्रह्मण्यम्‌च्या मंदिरांत नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा सत्कार केला. त्या प्रसंगीं बोलतांना सुभाषचंद्र बोस म्हणाले, "मला संन्यास घेण्याची खरी तळमळ लागलेली आहे; परंतु तत्पूर्वी स्वदेशाचें स्वातंत्र्य परत मिळविल्याशिवाय माझें इहलोकींचें कर्तव्य मीं पूर्ण केल्याचें समाधान मला लाभणार नाहीं. संन्यास घेण्यास कर्तव्यपूर्तीची शांतता व समाधान प्राप्त करून घेणें जरूर आहे. कारण संन्यास म्हणजे केवळ भगवीं वस्त्रें परिधान करणें

नव्हे. वैराग्य अंगीं बाणणें जरूर आहे. जीवन-संग्रामांत माझ्या बांधवांस सोडून मी जर परमार्थसाधनासाठीं दूर पळून गेलों अथवा येथल्या येथेंच राहून त्यांच्या हालअपेष्टांकडे दुर्लक्ष केलें तर असा परमार्थ स्वार्थाहून त्याज्य व हीन ठरेल. म्हणून भारताचें स्वातंत्र्य हें माझें पहिलें ध्येय. तदनंतर मात्र मी संन्यास घेणार..."

हिंदी स्वातंत्र्य-सैन्याचा जय होऊन हिंदुस्थान स्वतंत्र झाला असता तर पुढचें काम इतर देशभक्तांचे हातीं सोंपवून सुभाषचंद्रांनीं हिमालयाकडे धांव घेण्याचा निश्चय केला होता हें वर उल्लेखिलेल्या त्यांच्याच उद्गारांवरून स्पष्ट आहे. सिंगापुरांतील रामकृष्ण मिशननें चालविलेल्या हिंदी राष्ट्रीय शाळेच्या बक्षीससमारंभासाठीं आले असतांना तो सर्व समारंभ संपल्यावर त्या मिशनचे चालक ब्रह्मचारी कैलास यांचेशीं बोलतांना नेताजी म्हणाले, "तुमच्या या आश्रमांत येऊन रामकृष्णांच्या तसबिरीसमोर समाधि लावून बसावें असें माझे मनांत अनेक वेळां येतें; परंतु माझ्या कार्यांतून मला फुरसतच मिळत नाहीं...मी तरी काय करूं!..." ब्रह्मचारी कैलास व स्वामी भास्वरानंद हे त्यांचे निवासस्थानीं भेटीगांठींस जात तेव्हांही हेच उद्गार त्यांचे तोंडून अनेक वेळां निघत. निरलस, निष्पाप व संन्यस्त वृत्तीच्या लोकांची संगत नेताजींस फार प्रिय असे. एके दिवशीं दोन प्रहरीं संधि साधून, जरा सवड सांपडल्यामुळें कोणासही न कळवितां नेताजी अचानक रामकृष्ण मिशनमध्यें येऊन ठेपले. तास दीड तास ते समाधिस्त राहिले व नंतर वेळ होतांच निघून गेले.

## निष्काम कर्मयोग

रोजचे व्यवहारांत व घरादारांत वावरतांना सूक्ष्मपणें पाहणाऱ्यांस नेताजींचे वृत्तींत एक प्रकारचा अलिप्तपणा स्पष्ट दिसून येई. त्यांचे अवतींभवतींचा थाटमाट व व्याप जरी मोठा असला तरी त्यांत गुरफटल्यासारखे ते दिसत नसत. "इहलोकींचें कर्तव्य म्हणून या परिवारांत मी वावरत आहें; नाहीं तर माझ्या आवडीनुरूप वातावरण व माझें मूलस्थान अन्य ठिकाणीं आहे." असा ध्वनि त्यांचे हाल-

चाळींतून निघे. आंतरराष्ट्रीय गांठीभेटींकरितां सूटबूट घालून विमानांतून परदेशीं जात असतांना, चांदीच्या कांट्याचमच्यांनीं मेजाशीं बसून पाश्चात्य पद्धतीची मेजवानी झोडीत असतांना, आंतरराष्ट्रीय शिष्टाचारास अनुसरून परस्परांचे यशचिंतनाचे वेळीं दारूचे घोट घेत असतांना अलिप्तपणाची त्यांची वृत्ति केव्हांही भंग पावली नाहीं. “ माझें ध्येय ठरलेलें आहे ... या ध्येयपूर्तीस्तव जें जें म्हणून करावें लागेल तें सर्व मी छातीठोकपणें करीन, परंतु त्यानें माझा आत्मा कदापि मलिन होणार नाहीं ... त्यांत तो कधींच गुरफटणार नाहीं.” अशा प्रकारची त्यांची विचारसरणी होती.

जर्मनींत व अतिपूर्वेंत नेताजी सिगारेटही ओढीत असत, पण हेंसुद्धां लालसेनें नव्हे. सिगारेट असल्याशिवाय काम सुचत नाहीं, झोंप येत नाहीं अशी त्यांची स्थिति कधींच झाली नाहीं व पुढेंही कधीं झाली नसती. जातीच्या सुंदराला सर्वच शोभतें अशा अर्थाची आपल्यांत एक म्हण आहे तद्वत् ज्यांची बुद्धि स्थिर झाली आहे अशा नेताजींच्या कोटींतील कर्मयोग्यांस वाटेल तें शोभून दिसतें. एखाद्या उडाणटप्पू मुलास सिगारेट ओढतांना पाहून आपले मनांत त्याचेबद्दल जो तुच्छभाव उत्पन्न होईल तो नेताजींना सिगारेट ओढतांना पाहून मुळींच वाटत नसे. देशासाठीं आपले पंचप्राण ओवाळणाऱ्या या थोर पुरुषानें सिगारेट्स ओढल्या तरी त्यांत काय विशेष आहे !—ती कांहीं लक्षांत घेण्यासारखी गोष्ट नव्हे असेंच चटकन् कोणासही वाटणें साहजिक आहे. अर्थात् व्यसन या सदरांत मोडण्यासारखी त्यांस सिगारेट्सची संवय होती. परंतु इतर सिगारेट-भक्तांच्या अगदीं उलट. ते फक्त औपचारिक भेटीचे प्रसंगीं, मोटारींतून जातांयेतांना व अशाच इतर बिनमहत्त्वाच्या वेळीं धूम्रपान करीत असत. ज्या वेळेस वाचन, मनन किंवा इतर महत्त्वाच्या गोष्टींकडे पूर्ण लक्ष देण्याची जरूर असे तेव्हां त्यांस धूम्रपानाचें व्यवधानसुद्धां मानवत नसे.

राजकारणांत शिरल्यानें सनदी नोकरींतल्यापेक्षां जास्त मानमरातब व वडेजाव होईल म्हणून ते राजकारणाच्या क्षेत्रांत शिरले नाहींत.

एखाद्या अवतारी पुरुषाप्रमाणें लहानपणापासुन त्यांना त्यांच्या जन्म-कार्याबद्दल तळमळ लागलेली होती. आत्म्याची उत्क्रांति व चिरंतन शांति हा त्यांचा अंतिम उद्देश; परंतु तीं मिळविण्यास प्रत्येकानें या जड जगांतील इतिकर्तव्य पूर्ण केलें पाहिजे अशी त्यांची खात्री झालेली होती. हें कर्तव्य पार पाडण्यास केवढ्याही हालअपेष्टा, मानापमान, कष्ट, दारिद्र्य सोसावें लागो, वणवण करावी लागो, ही सर्व ईश्वरी माया समजून त्यांतून पार पडण्याचा त्यांनीं निश्चय केलेला होता. इहलोकींच्या खडतर कर्तव्यांच्या अग्निदिव्यांतून पार पडेल तोच स्वर्ग-सुखास पात्र होईल हें तत्त्व त्यांस उमगलें होतें, येवढेंच नव्हे तर तें त्यांच्या आंगवळणीं पडलेलें होतें. निष्काम कर्म करणारी सुभाषचंद्र बोस यांचेसारखी विभूति हिंदुस्थानच्या राजकारणांत उदय पावली असतांना त्यांचे नेतृत्वाचा योग्य तो लाभ भारतास मिळूं नये हें हिंदी जनतेचें दुर्दैवच म्हटलें पाहिजे. कृष्णार्जुनांचा गोड संगम आपणांला सुभाषचंद्र बोस यांच्यांत आढळूत येतो. हिंदुस्थानांत वीर अनेक निपजले असतील, परंतु संन्यस्त वृत्तीनें राहणारा व निष्काम कर्म करणारा नेताजी सुभाषचंद्र बोस यांचेसारखा क्वचितच दिसतो. हिंदी राष्ट्रसभेच्या इतिहासांत व १८५७ नंतर आजपर्यंतच्या इति-हासांत सुभाषचंद्र बोस यांस दुसरी तोड नाहीं. सुभाषचंद्र बोस यांचें उज्ज्वल कार्य व त्यांचे गुण यामुळें जगाच्या इतिहासांत आजपर्यंत झालेल्या थोर व्यक्तींत त्यांची गणना प्रामुख्यानें केली पाहिजे.

# नेताजींचें मार्दव

नेताजी सुभाषचंद्र बोस हे मूलतःच शांत वृत्तीचे असल्यामुळें एखाद्या रागीट, चिडखोर किंवा आढ्यतेखोर माणसाप्रमाणें त्यांस उठल्यासुटल्या राग येत नसे. वरिष्ठकनिष्ठ, उच्चनीच, या सर्वांशीं ते सारख्याच विनयानें, ममताळूपणें व आदरानें वागत. भारत व भारतीयांच्या आत्यंतिक प्रेमामुळें एखाद्या उच्च परकी अधिकाऱ्या‧पेक्षां त्यांस आपल्या हीनदीन झालेल्या हिंदी बांधवांबद्दलच जास्त प्रेम वाटे. सामान्यजन हे दिखाऊपणा व श्रीमंती यानें भारून जाऊन परस्थ अथवा स्वदेशबांधव यांतील भेद विसरून परस्थांस प्राधान्य देतात. नेताजींचे निर्मल, निष्पाप मनांत भूतदयेचा अखंड झरा वाहत असल्यानें त्यांनीं एखाद्या परकी प्रधानास प्राधान्य देण्यापेक्षां स्वदेश-बांधवास जास्त प्रिय मानण्यांतच धन्यता मानली. त्यांचे भेटीला कोणी हिंदी मनुष्य गेला व नेताजींनीं त्याची भेट घेण्याचें नाकारलें असें कधींही होत नसे. "ते कामांत आहेत...त्यांस वेळ नाहीं... त्यांना विश्रांति घेणें जरूर आहे..." असें म्हणून त्यांच्या भोंवतालचे लोक नेताजींची गांठ घेण्यास इतरांस प्रतिकार करीत असतील तें निराळें, पण स्वतः नेताजींनीं कधीं नकार दर्शविला नाहीं.

नेताजी जर्मनीहून सिंगापुरांत येऊन दाखल झाल्याला सुमारें एक

महिन्याचा काळ लोटला होता. नेताजींबद्दल अतिपूर्वेतील सर्व हिंदी लोकांचे मनांत आत्यंतिक आदर व प्रेम हीं वसत होतींच, परंतु त्यांतल्या त्यांत आपल्या युक्तप्रांताचे अतिपूर्वेत वसलेले गवळी लोक यांचें तर नेताजींवर इतकें निस्सीम प्रेम व भक्ति असे कीं, नेताजींस कोठें ठेवूं आणि कोठें नको ठेवूं असें त्यांस होऊन जाई. मथुरा, गोकुळ–वृंदावन या भागांत कृष्णलीला घडली म्हणून त्याचा आनुवंशिक परिणाम असो अगर दूधदुभत्याचा पिढीजात धंदा केलेला म्हणून असो, परंतु युक्त प्रांताच्या गवळी लोकांचें वात्सल्य, त्यांची निस्सीम भक्ति, त्यांचें अलोट प्रेम व त्यांची भावनावशता हीं इतर हिंदी लोकांत इतक्या उत्कटतेनें वसत असलेलीं दिसून येत नाहींत. एके दिवशीं दुपारीं २॥ वाजण्याचे सुमारास सिंगापुरांतील सगळे गवळी लोक ढोलकीं बडवीत, नेताजींचा जयजयकार करीत व हार, मिठाई आणि पैसे इत्यादि घेऊन मिरवीत मिरवीत नेताजींचे निवासस्थानीं येऊन पोंचले. तत्पूर्वी नेताजींची सिंगापूर शहरांत एकदोन जाहीर व्याख्यानें झालीं होतीं, परंतु तेवढ्यानें या गवळी लोकांची तृप्ति होण्यासारखी नव्हती. खास आपले समाजास नेताजींचे दर्शनाचा लाभ घडावा, आपल्या समाजास त्यांचें वेगळें स्वागत करण्याची संधि मिळावी ही त्यांची उत्कट इच्छा. या इच्छेस अनुसरुन त्यांनीं आपापसांतच एक दिवस निश्चित करुन वर वर्णन केल्याप्रमाणें त्या दिवशीं ते मिरवीत मिरवीत नेताजींचे बंगल्याशीं आले. त्या वेळीं हिंदी स्वातंत्र्यसेनेचे अधिकारी व जपानी लष्करी अधिकारी यांच्या एका खास बैठकींत नेताजी गुंतले होते. त्यांचे बंगल्याच्या आवाराबाहेर या मिरवणुकीचा गोंधळ त्यांस बराच वेळ ऐकूं येऊं लागल्यावर त्यांनीं साहजिकच, "काय गडबड आहे" म्हणून पृच्छा केली. पहाऱ्यावरील माणसानें त्या लोकांस परत जाण्यास सांगितलें तरी ते ऐकेनात. बंगल्याचे खालचे दालनांत नेताजींचे चिटणीस, अंगरक्षक व इतर कांहीं कामानिमित्त आलेले अधिकारी बसलेले होते. पहाऱ्यावरील एक माणूस धांवत येऊन त्यांस सांगूं लागला कीं, "सर्व गवळी लोक नेताजींची भेट घेण्यास आलेले आहेत व नेताजींची भेट

घेतल्याशिवाय ते परत जाण्यास तयार नाहींत." या अधिकाऱ्यांनीं फाटकापाशीं जाऊन गवळी-लोकांच्या म्होरक्यांस सांगितलें, "नेताजी कांहीं महत्त्वाच्या कामांत गुंतलेले आहेत. या वेळेस तुम्ही कांहीं गडबड करूं नका...शांतपणें आपापल्या घरीं जा...पुढें केव्हां तरी नेताजींचे भेटीचा योग तुम्हांस येईल...त्याबद्दल व्यवस्था करूं..." परोपरीनें असें सांगूनसुद्धां ते लोक ऐकेनात. त्यांचें आपलें एकच पालुपद "आम्ही नेताजींची भेट घेण्यासाठीं आलों आहोंत...त्यांची भेट घेतल्याशिवाय आम्ही कांहीं परत जाणार नाहीं. कितीही महत्त्वाचें काम असूं द्या आम्ही नेताजींचें थोडा वेळ दर्शन घेऊन त्यांस हे हार व मिठाई वगैरे अर्पण करूं चाहतों. थोडा वेळ दर्शन घेतल्यानें तृप्त होऊं. मग कांहींही गडबड न करतां आम्ही निघून जाऊं...परंतु 'तसेच जा' म्हणाल तर आम्ही तसे कांहीं जाणार नाहीं. अनुयायांचें मन मोडणारा नेता कसला! ते आमचे नेते आहेत व आम्ही त्यांची भेट हक्कानें मागूं शकतों..." असें म्हणत नेताजींचा मोठमोठ्यानें जयजयकार करीत ते तेथेंच बसले. हा प्रकार नेताजींस समजल्यावर ते अर्धवट स्वतःशींच व अर्धवट आपल्या सहकाऱ्यांस उद्देशून म्हणाले, "मग आतां काय करावयाचें बुवा... गेलेंच पाहिजे. त्याशिवाय काम भागणार नाहीं. मी जरा जाऊन येतों हं...!" असें म्हणून ते उठले. त्या लहानशा परिषदेचें काम थोडा वेळ थांबवावें लागलें. नेताजी खालीं उतरून गेले. नेताजी या लोकांची भेट घेण्यास खालीं येत असल्यानें या लोकांस फाटक उघडून आंत द्वारप्रकोष्ठापर्यंत येऊं द्यावें अशी द्वारपालकास आज्ञा होतांच त्यानें त्या लोकांस आंत जाऊं दिलें. त्यांचे दोनतीन म्होरके पुढचे बाजूस व इतर सर्व जमाव त्यांचे मागें अशा रीतीनें ते सर्वजण त्या द्वारप्रकोष्ठांत गर्दी करून उभे राहिले. जिना उतरून नेताजी खालीं आले व प्रवेशद्वाराशीं गेले. या लहानशा जमावांतील पुढचे बाजूस असलेल्या लोकांनीं अनन्यभावानें लांब गुडघ्यापर्यंत बूट चढविलेल्या नेताजींचे पायांस स्पर्श करून त्यांचे चरणांवर डोकें ठेवून त्यांस वंदन केलें. त्यांचेपासून जरा दूर उभ्या असलेल्या लोकांनीं

त्यांस लवून अभिवादन केलें. म्होरक्यांनीं नेताजींस हार घातले. कित्येकांचे डोळ्यांत नेताजींचा अलोट स्वार्थत्याग व त्यांचे कर्तृत्वाबद्दल सद्‌गदित कृतज्ञतेचे अश्रु उभे राहिले. त्या लोकांनीं बरोबर आणलेले पेढे व इतर मिठाई नेताजींस सादर करून ते लोक म्हणाले, "बस्, आपल्याला पाहून आमच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. आतां आपला अधिक वेळ आम्ही घेऊं इच्छीत नाहीं." अखेरचा एक प्रणाम करून त्या लोकांनीं नेताजींचा निरोप घेतला.

कोठल्याही जाहीर सभेंत नेताजींचें भाषण संपल्यावर प्रथम त्यांचे गळ्यांतील हाराचा लिलांव होत असे व त्यानंतर वैयक्तिक देणग्या देणाऱ्यांची रीघ लागत असे. यांतील कित्येक लोक आपलें लहानसें मूल कडेवर घेऊन येत व त्या बालकाच्या हस्तें ती देणगी नेताजींस अर्पण करीत. लहानसें मूल पाहिलें कीं नेताजी त्यास झटकन् आपल्या कडेवर घेऊन त्याचें थोडा वेळ कौतुक करीत. नेताजींस लहान मुलें फार आवडत. एकदां त्यांचे निवासस्थानीं स्वातंत्र्यचळवळींतील सर्व कार्यकर्त्यांच्या लहानग्या मुलांचें एक संमेलन भरविलें होतें. दुपारीं तीन वाजतां हीं मुलें त्यांच्या बंगल्यावर जमलीं. सायंकाळीं ७ वाजतां हा कार्यक्रम संपला. नेताजींचे बंगल्याच्या आवारांतील बागेंत हीं मुलें आनंदानें नाचत-बागडत होतीं. नेताजीही आनंदानें त्यांच्या बाललीलांचें कौतुक करीत : एकाशीं थोडा वेळ बोलावयाचें, खेळावयाचें, मग त्याला ठेवून दुसऱ्याला उचलावयाचें अशा रीतीनें त्या निष्पाप आनंदसागरांत मनसोक्त क्रीडा करीत होते. जमलेल्या सर्व बालकांचेकरितां अनेक मिष्टान्नें व इतर पदार्थ असलेला सामुदायिक फराळाचा कार्यक्रमही ठेवण्यांत आलेला होता. रंगीबेरंगी फुगे, पताका, लहान लहान विमानें, खेळणीं, पांगुळगाडे, बंदुकी, रणगाडे, शिपाई असें एक लहानसें स्वतंत्र विश्वच तयार करण्यांत आल्यामुळें त्या मुलांस फारच गंमत वाटली. मुलांशीं खेळतांना व त्यांच्या बालक्रीडेकडे पाहत असतांना नेताजींचे मनांत भारताच्या भवितव्याबद्दलचेच विचार चालत असत. भारताच्या या बालपिढीच्या बाललीलांकडे पाहून ते मनांत म्हणत असत, " आज आपला देश स्वतंत्र असता तर हींच

मुलें आहेत याहून किती बाळसेदार, आनंदी व सशक्त निपजलीं असतीं. आज यांना जिकडेतिकडे आनंदी आनंद भासत आहे, परंतु पुढें यांचे भवितव्यांत काय लिहिलें आहे कोण जाणे! अभागी देशांत जन्मलेलीं हीं अभागीं मुलें! आजच्यासारखे आनंदाचे प्रसंग यांचे आयुष्यांत कितीसे असणार! चांगलें खायला, प्यायला, ल्यायला यांना रोज कुठलें मिळणार! बिचाऱ्यांचे आईबाप किती कष्ट सोसून, स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन यांचें पालनपोषण करीत असतील; हिंदुस्थान परतंत्र आहे म्हणून।आज ही यांची दैना! तें कांहीं नाहीं. या निष्पाप बालकांचें पुढील जीवन सुखांत जावें म्हणून तरी आटोकाट प्रयत्न करून भारताचें स्वातंत्र्य परत मिळविलेंच पाहिजे ... ”

सामान्यजन व महापुरुष यांच्यांत हाच एक मोठा फरक असतो कीं, जगांतलीं दुःखें, अनेक अडचणी व इतर नानाविध प्रसंग पाहून सामान्यजनांचा धीर खचतो, ते निराश होतात, वैतागतात, चडफडतात व शेवटीं नुसत्या शिव्याशाप देत किंवा आंबट तोंड करून निष्क्रिय बनतात. याचे उलट थोर पुरुषांचा निश्चय व त्यांची कार्यतत्परताही प्रत्येक प्रसंगाबरोबर वाढत असते. हा प्रत्यय स्वतःचे बाबतींत ज्याला येत असेल त्याचे हातून जगांत मोठी कामगिरी व्हावयाची आहे हें त्यानें हमखास समजावें. एकाच गोष्टीचा परिणाम सर्वसामान्य मनावर व थोर व्यक्तींचे मनावर निरनिराळा येवढेंच नव्हे, तर परस्परविरोधी अशा प्रकारचा होत असतो व यांतच महापुरुषांची थोरवी सांठविलेली असते.

हिंदु-मुस्लिम तेढीचे कांहीं प्रसंग अतिपूर्वेंतही आले. कारण कित्येक शतकांपासून बनलेली क्षुद्र मनोवृत्ति क्षणार्धांत जाईल म्हटल्यानें थोडीच जाते. जातीय वाद माजविणारे धर्मवेडे लोक हे हिंदुस्थानांतल्याप्रमाणें तेथेंही होते. कोणत्याही राष्ट्रीय दिनाचे दिवशीं इतरांनीं तिरंगी झेंडे लावावे व कांहीं उपद्यापी मुसलमानांनीं हिरवे झेंडे उभारावे; हिंदु, ख्रिश्चन, शीख व इतर लोकांचे धार्मिक सणावारांचे दिवशीं हे तिरंगी झेंडेच उभारीत तर बहुसंख्य मुसलमान त्या दिवशीं तर हिरवे झेंडे लावल्याविना राहत नसत. स्वातंत्र्य-सैन्यांतही

बढतीची लालूच दाखवून धर्मांतर करविण्याचे कांहीं तुरळक अश्लाघ्य प्रकार झाले. सयाममधील चोलबुरी शहरीं हिंदी स्वातंत्र्यचळवळीचें जें लष्करी शिक्षणकेंद्र होतें त्यांतील ८००-९०० शिक्षण घेणारे रिक्रूट यांत बहुधा एकसुद्धां मुसलमान नसे. शिक्षण देणारा अधिकारीवर्ग हा मात्र सिंगापुरांत जपान्यांस शरण गेलेल्या हिंदी युद्धबंद्यांचा असल्यामुळें त्यांत इंग्रजांचे धोरणामुळें पंजाबी व त्यांतल्या त्यांत मुसलमानांचा भरणा शक्य तेवढा जास्त असे. यांतील लोक अनेक लष्करी शिक्षणकेंद्रांवर पाठविले गेल्यामुळें प्रत्येक लष्करी शिक्षणकेंद्रावर अर्धेअधिक लोक मुसलमान असत. सयाममधील लष्करी शिक्षणकेंद्रावर एकाची कोठारी म्हणून व दुसऱ्याची कारकून म्हणून अशा दोन मुसलमानांची नेमणूक झाली. हे अर्धशिक्षित आणि धर्मवेडे असल्यामुळें यांच्यांत खेडवळ लोकांचा साधेपणा व शेजाऱ्याशीं मिळूनमिसळून वागण्याची माणुसकीही नव्हती व वेडगळ धर्मवेड्या समजुतींना कःपदार्थ मानणारी सुशिक्षित व प्रगल्भ मनोवृत्तिही नव्हती. तेथें गेल्याबरोबर या दोघांनीं "हलाल-झटक्या"चा वाद माजविण्यास सुरुवात केली. या लष्करी शिक्षणकेंद्रास खाद्य म्हणून कधींमधीं जे बकरे किंवा कोंबड्या पुरविल्या जात त्या खटाखट एका 'झटक्या'सरशीं कापून हाताबाहेर करावयाच्या ही सर्वंध जगाची रीत; तर याचे उलट त्या प्राण्याची मान हळूहळू कापीत अर्ध्यावर आली म्हणजे ती मुरगळून तींतील चरेंचरें रक्त निथळूं द्यावयाचें व नंतर त्या तडफडणाऱ्या जनावरास लांब फेकून द्यावयाचें ही मुसलमानी "हलाल म्हणजे हाल हाल" करण्याची रीत. मानेवरून खसखस खसखस अशी हळूहळू सुरी फिरवितांना, नंतर अर्धवट कापलेली मान मुरगळून तींतील रक्त निथळत असतांना व शेवटीं प्राण जाण्याकरितां म्हणून लांब फेंकून दिलेल्या अशा या कितीक प्राण्यांचा रोज तडफडाट होत असेल याची ज्यानें त्यानें कल्पना करावी. वर उल्लेखिलेल्या दोघां मुसलमान अधिकाऱ्यांनीं वरील लष्करी केंद्रांत आल्याबरोबर झटक्यानें कापलेलें मास खाण्याचें नाकारलें. वास्तविक आपण गट्ट करीत असलेलीं जनावरें कापतांना

तडफडत मरण पावलीं कीं एका झटक्यासरशीं मरण पावलीं हा प्रश्नच उद्भवायला नको. सरकारी कत्तलखान्यांतून आलेलें मांस यांत्रिक विळीनें झपाझप कापलें जातें तें वर्ज्य मानणारे मुसलमान किती ? बरें, घरांत तुम्ही कसेही वागा, परंतु इतरांचेबरोबर राहतांना बहुजन-समाजास मान्य असेल तेंच ग्राह्य समजलें पाहिजे, किंवा फार तर नको असल्यास गप्प राहून तें खाऊं नये. शिवाय येथें स्वतःपुरतें वेगळें शिजविण्याचा प्रश्न नसून मुळांत जनावर कापावयाचें कसें हाच प्रश्न होता. अर्थात् दोन माणसांच्या विशिष्ट तत्त्वांकरितां ८००-९०० माणसांच्या तत्त्वावर गदा आली. त्यांनीं रुसणें, फुगणें इत्यादि सुरू केलें. नेताजींस ही गोष्ट कळतांच त्यांनीं अर्धीं जनावरें एका रीतीनें व अर्धीं दुसऱ्या रीतीनें कापावीं व सर्व मांस एके ठिकाणीं शिजवून सर्वांस वाढावें; वाटेल त्यानें खावें, नाहीं तर खाऊं नये, अशी त्यांनीं आज्ञा दिली. हें सर्व एके ठिकाणीं शिजवूनसुद्धां या दोघांचें समाधान होण्याचें बाजूलाच राहून बहुजनसमाजाचा केवळ या दोघांचेसाठीं विरस झाला तो निराळाच. या लष्करी शिक्षणकेंद्राच्या शिक्षकवर्गांत बदल्या होऊन येथें आणखी दोन-चार मुसलमानांच्या नेमणुकी झाल्यावर तर हें प्रकरण वाढीस लागलें. शेवटीं हा प्रश्न मुळांतच मिटविण्याच्या हेतूनें बकरीं व कोंबड्या घेण्याचें अजीबात बंद करण्याचें ठरलें. मासे व अंडीं हीं तेवढीं मिळालीं म्हणजे घेण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण त्यांच्यांत कापाकापीचा कांहीं प्रश्न येत नाहीं. हिंदु-मुस्लिम तेढीचे असले क्षुद्र प्रश्न कानीं आले म्हणजे नेताजींस राग येण्याचे-ऐवजीं अतोनात वाईट वाटे. आपल्या भांडखोर मुलांचीं भांडणें पाहून त्या मुलांबद्दल पित्यास जशी कींव येते, पण राग येत नाहीं, तद्वतच नेताजींचेंही होई व साहजिकच उपद्व्यापी धर्मवेड्या बांधवांचे विरुद्ध दंडयोजना करण्याचेऐवजीं ते त्यांच्या मृदु अंतःकरणाच्या सहजसुलभ भावनांस अनुसरून " जाऊ द्या वेडे आहेत झालें ! यांच्या कोत्या समजुती आणि भ्रामक कल्पना हीं ह्यांच्या अप्रगल्भ मनोवृत्तीचीं द्योतक आहेत. तिकडे काय लक्ष द्यायचें. सुधारतील आपोआप

केव्हांतरी ... " असें म्हणून तिकडे दुर्लक्ष करीत. या त्यांच्या वृत्तीमुळें उपद्व्यापी धर्मवेड्या लोकांस जरब बसविण्याचेऐवजीं त्यांस अधिकाधिक सूट देऊन त्यांचे लाड पुरविण्याकडेच नेताजींचा कल असे. अशा तऱ्हेनें " वंदे मातरम् " हें गीत मुसलमानांस नको म्हणून तें टाकून देऊन त्या जागीं दुसरें अधिष्ठित करण्यांत आलें. " हलाल-झटक्या " चा प्रश्नही त्यांस रुचेल अशा तऱ्हेनेंच निकालांत काढण्यांत येई.

पेनांग शहरीं असलेल्या उत्पातादि गुप्त लष्करी कामगिरीच्या शाळेंत एक पठाणांची तुकडी शिकून तयार झाली. यांना निवडून शिक्षण देणारेही स्वातंत्र्यसेनेंतील दोन पठाण अधिकारी होते. पाणबुडीच्या साहाय्यानें हिंदुस्थानांत गुप्त कार्य करण्याकरितां म्हणून ही तुकडी बलुचिस्तानच्या किनाऱ्यावर सोडण्यांत आली. हिंदुस्थान-च्या किनाऱ्यावर पाऊल ठेवतांच हे सर्वच्या सर्व लोक इंग्रजांस फितूर झाले. त्यांना शिकवून तयार करणाऱ्या दोघां पठाण अधिकाऱ्यांनींच त्या तुकडीस फितुरी करण्याबद्दल सांगितलें असेल याबद्दल पुरावा पुढें आला. जपान्यांतर्फे या शाळेवर देखरेख करण्याकरितां कॅप्टन यामानूची हा अधिकारी नेमण्यांत आला होता. " हे लोक फितुरी करतील हें तुला कसें कळूं नये ? तूं काय झोंप घेत होतास ? " असा प्रश्न आपले वरिष्ठ अधिकारी आपणांस विचारतील आणि मग आप-ल्याला शरमेनें मान खालीं घालावी लागेल. आपण आपलें कर्तव्य बजावण्यांत अक्षम्य अपराध केलेला आहे. या अपराधास देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरें शासन नाहीं, असा स्वतःचे मनाशीं निर्णय करून घेऊन कॅप्टन यामानूचीनें आत्महत्या करून घेतली. आमचे लोक फितूर झाले म्हणून एका परकी माणसानें आत्महत्या करून घ्यावी, परंतु आमच्या या दोन अधिकाऱ्यांनीं उजळ माथ्यानें फिरत रहावें व पुन्हा जबाबदार अधिकारी म्हणून मिरवावें ही किती नामुष्कीची गोष्ट होती. त्या दोघां अधिकाऱ्यांपैकीं एक सिंगापुरांत राहत असे व दुसरा पेनांग शहरीं. पेनांग शहरीं वास्तव्य करणाऱ्या या अधिकाऱ्याविरुद्ध सबळ पुरावा होता. युद्धकालांत फितुरीच्या गुन्ह्याला

देहांत प्रायश्चित्त ही शिक्षासुद्धां वास्तविक कमीच असते. कारण साध्या खुनी इसमालासुद्धां जर फांशीची शिक्षा ठोठावणें योग्य, तर सबंध राष्ट्राचा खून करणाऱ्या इसमाला किती भयंकर शिक्षा करावयास हवी! सिंगापुरांत राहणाऱ्या पठाण अधिकाऱ्यास तर नेताजींनीं कांहींच केलें नाहीं. तो शेवटपर्यंत अधिकारपदावरच राहिला. पेनागमधील पठाण अधिकाऱ्यास मात्र कैद करण्याची आज्ञा देऊन त्याच्यावर लष्करी अभियोग करण्यांत आला. तो मेजरच्या हुद्याचा अधिकारी असल्यामुळें नेताजीच न्यायाधीश होते. सिंगापुरांतील हिंदी स्वातंत्र्यसेनेच्या लष्करी बंदिखान्यांत मेजर ××× यास ठेवलें होतें. त्याच्या हातापायांत बेड्याही घातलेल्या नव्हत्या. त्याला ठेवलेल्या लहानशा लांकडी खोलीच्याभोंवतीं सशस्त्र लष्करी पहारा होता. याच बंदिखान्याचे लष्करी कचेरींत रात्रीं सुमारें १० वाजतां हा खटला चालविण्यास नेताजी येत असत. बंदिस्त अधिकाऱ्यानें गुन्हा कबूल करूं नये, सिंगापुरांत राहणाऱ्या वरिष्ठ पठाण अधिकाऱ्यावरच सर्व दोष टाकावा व नेताजींची गयावया करावी, असें चाले. यानें गुन्हा केला आहे हें पुराव्यानें सिद्ध झालें असतांही नेताजींनीं त्यास गोळी घालून ठार मारण्याची शिक्षा ठोठावली नाहीं. यानें असेंच बंदिस्त रहावें असा त्यांनीं निकाल दिला. गेलें जागतिक युद्ध संपून इंग्रज पुन्हा विजयी होऊन त्या अधिकाऱ्याची सोडवणूक करीपर्यंत तो अधिकारी बंदिस्तच होता. या अधिकाऱ्यास गोळी घालून ठार करावें असा सल्ला नेताजींस त्यांच्या कांहीं सहकाऱ्यांनीं दिला; परंतु नेताजींनीं या अधिकाऱ्यास जीवदान दिलें. याच्याबद्दल हा विमोचित अधिकारी नेताजींच्या दयाळूपणाची तारीफ करीत असतो. "कसेंही असलें तरी हा हिंदी गृहस्थ आहे...याच्याच भल्याकरितां तर मी माझें आयुष्य वेंचीत आहें...याला मारणें योग्य नव्हें." असें नेताजींनीं आपल्या सहकाऱ्यांस सांगितलें.

स्वातंत्र्यसेनेंतील एका पठाण अधिकाऱ्यानें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून स्वातंत्र्यचळवळींतील एका हिंदी कार्यकर्त्याच्या चीनी स्त्रीवर बलात्कार केला. तें प्रकरणही निकालास्तव नेताजींपुढें

आलें. कांहीं दिवस त्या अधिकाऱ्यास पदच्युत करून कैदेंत ठेवण्यांत आलें होतें. हा अधिकारी पक्का बिलंदर असल्यामुळें नेताजींसमोर चौकशी सुरू झाली म्हणजे या अधिकाऱ्यानें डोळ्यांत पाणी आणावें, गळ्यांत बांधून आणलेलें कुराण समोर ठेवून कुराणाची शपथ घ्यावी, नेताजींचे पायांस हस्तस्पर्श करून वंदन करावें व स्वतः निर्दोष असल्याचें सांगावें किंवा दयेची याचना करावी असें चालत असे. इंग्रजांसारख्या शत्रुराष्ट्राच्या भुलथापांवर विश्वास ठेवूं नका असें आपल्या साथ्यांस कंठरवानें सांगणारे नेताजी अट्टल बदमाष लोकांच्या नाटकी पश्चात्तापानें द्रवत असत हा एक त्यांच्या स्वभावांतील दोष म्हटला पाहिजे. " कितीही झालें तरी हे आपले लोक आहेत. यांचे अपराध आपणच पोटांत घातले पाहिजेत." ही त्यांच्या मनांतील नाजुक भावना इतकी दृढमूल झालेली होती कीं, कधींकधीं त्यामुळें भयंकर गुन्हेगार लोकांचें चांगलेंच फावून डोक्यावर छाया करण्याच्या निमित्तानें फणा उभारून दंश करणारे हे लोक स्वातंत्र्यचळवळींत मोठमोठ्या अधिकारपदांवर बेछूटपणें वावरत असत. वर उल्लेखिलेल्या अधिकाऱ्याची नेताजींनीं सिंगापुरांतून बँकॉकला बदली केली येवढेंच. या दिवट्या अधिकाऱ्यानें तेथेंही दिवे पाजळले म्हणून त्यास पुढें रंगूनला नेलें. तेथेंही हीच तऱ्हा. शेवटपर्यंत हा अधिकारी 'अधिकार' गाजवीत राहिला.

हिंदुस्थान–ब्रह्मदेश आघाडीवर कांहीं हिंदी अधिकारी सहेतुक अथवा निर्हेतुकपणें इंग्रजांचेकडून हिंदी स्वातंत्र्यसेनेकडे पळून आले. या बाजुला आल्यावर ते इंग्रजांचे हेर असून त्यांचेशीं संधान बांधण्याचा प्रयत्न करीत असल्याचें उघडकीला आलें, परंतु शेवटपर्यंत त्यांस साध्या कैदेंत ठेवण्यापलीकडे नेताजींनीं कांहीं शिक्षा केली नाहीं. अटळ शांति व दयाळू स्वभाव हे खाजगी व वैयक्तिकदृष्ट्या गुण ठरत असले तरी राजकीय क्षेत्रांत या गुणांचा अतिरेक झाला म्हणजे त्यांस कमकुवतपणाचें स्वरूप येऊन कुऱ्हाडीचे दांडे गोतास काळ या न्यायानें विघातक होतात. स्वातंत्र्यचळवळीशीं सहमत नसलेल्या व त्या चळवळीपासून सर्वस्वीं अलिप्त राहणाऱ्या ४० हजार इंग्रजधार्जिण्या

हिंदी युद्धचंद्यांस नेताजींनीं बजावलें होतें खरें कीं, "तुम्ही जर आमच्याशीं सहकार्य करण्यास तयार नसलांत तर तुम्हांला देशद्रोही समजून स्वतंत्र हिंदुस्थानांत आम्ही कदापि प्रवेश करूं देणार नाहीं. अगदीं दयाळूपणें आम्हीं तुमच्याबद्दल विचार केला तरी आम्ही तुम्हांला प्रत्येकीं इंग्लंडचें थर्डक्लासचें एक एक तिकिट फुकट काढून देऊं, यापलीकडे आम्ही कांहीं करूं शकणार नाहीं. अमके लोक देशद्रोही आहेत हें समजूनउमजूनसुद्धां आमच्या पूर्वजांनीं त्यांचा कांटा न काढतां त्यांस सुखानें आपल्यांत राहूं दिलें याचेंच दृश्य फल म्हणजे आजचें परदास्य. इतिहासापासून धडा शिकून पूर्वींच्या चुका सुधारल्या नाहींत तर इतिहासवाचनाचा उपयोग काय? आमच्या पूर्वजांनीं केलेली चूक आम्ही पुन्हा कदापि करणार नाहीं..." तरी प्रत्यक्ष स्वतंत्र हिंदुस्थानचे सर्वाधिकारी झाल्यावर आपल्या बांधवांस हिंदुस्थानांत प्रवेश नाकारण्याचें कार्य त्यांच्या हातून झालें नसतें. हिंदी माणूस म्हटला कीं त्याचेबद्दल त्यांस दया येई—मग तो माणूस कसाही असो.

रिक्रूटांस लष्करी शिक्षण देऊन त्यांस शिपाई बनविण्याचीं जीं अनेक केंद्रें असत त्यांपैकीं सेलेतार हेंही एक शिक्षणकेंद्र होतें. यांत लष्करी शिक्षण घेणाऱ्या एका तुकडीचें शिक्षण पूर्ण झालें म्हणजे तिच्या शिक्षणपूर्तीचा समारंभ मोठ्या थाटानें साजरा केला जात असे. नेताजी जर त्या गांवीं असले तर अशा प्रकारचे समारंभ त्यांचेच अध्यक्षतेखालीं होत. सेलेतार शिक्षणकेंद्र सिंगापुरांतच आहे. वर उल्लेखिलेल्या प्रसंगीं नेताजी सिंगापुरांतच होते. या शिक्षणकेंद्रांत शिकून तयार झालेल्या सर्व विद्यार्थ्यांस उद्देशून नेताजींचें भाषण झालें. नेहमींप्रमाणें त्यांचें भाषण फारच स्फूर्तिदायक, चित्तवृत्ति थरारून सोडणारें व वीरश्रीपूर्ण असें झालें. श्रोतृवृंदांतील प्रत्येक व्यक्तीस नेताजींच्या अंगांत सळसळणारा बाणेदारपणा, स्वदेशाभिमान, वीरश्री व स्वार्थत्याग पाहून धन्य धन्य वाटे. भावनावश व्यक्तींस तर अशा वेळेस हृदयांतील भावनातिरेकाचें वादळ आंतल्या आंत कोंडणें अशक्य होऊन, ओघळलेल्या मौक्तिकमालिकेप्रमाणें त्यांचे अश्रु

ओघळून टपटप खालीं पडत. सिंगापुरांत वसलेले हिंदुस्थानांतील युक्तप्रांतीय गवळी लोक हे त्यांतल्या त्यांत जास्त भावनाप्रधान व त्यांची नेताजींवर निस्सीम भक्ति असे हें पूर्वीं म्हटलेंच आहे. यांतील कांहीं जे तरुण व मागें विशेष प्रपंच नसलेले गवळी रिक्रूट म्हणून भरती झालेले होते तेही या श्रोतृवृंदांत होतेच. नेताजींचें भाषण संपून त्यांचा जयजयकार झाला. ते व्यासपीठावरून निघाले ते तडक मोटारीकडे. दुसऱ्या कांहीं महत्त्वाच्या कामाकरितां त्यांस येथून तडक दुसऱ्या ठिकाणीं जावयाचें होतें. त्यांच्या व त्यांचेबरोबर असलेल्या इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांभोंवतीं, मोकळ्या जागेचें एक लहानसें वलय सोडून अवतींभोंवतीं, लष्करी शिक्षण पूर्ण केलेले रिक्रूट नेताजींबद्दलच्या आत्यंतिक आदरभावानें गोळा झालेले होते. मोटारींत बसण्याचे अगोदर त्यांच्याकडे वळून 'जय हिंद' म्हणावें व सर्वांचा निरोप घ्यावा अशा उद्देशानें नेताजींनीं तोंड फिरविलें इतक्यांत एक तरुण गवळी रिक्रूट पुढें झाला. त्यानें कण्हेरीचीं, तेरड्याचीं व इतर मिळतील तीं ओंजळभर फुलें घेऊन तीं नेताजींच्या डोक्यावर ठेवलीं. नेताजींच्या डोकीवरील लष्करी टोपी सपाट नसल्यामुळें त्यावरील फुलें गळूं लागलीं. दोन्ही बाजूंला पडणारीं फुलें शक्य तितकीं पुन्हा हातानें सावरून त्यानें तीं सर्व त्यांच्या डोक्यावर रचून ठेवण्याचा प्रयत्न केला व मग खालीं वांकून आरी लावलेल्या उंच तांबड्या लष्करी बुटांचेभोंवतीं आपल्या बाहूंचें वेष्टन करून त्यानें नेताजींचे चरणांस घट्ट मिठी मारली व त्यांवर डोकें ठेवलें. अनन्यभावानें सद्गदित होऊन तो स्फुंदून स्फुंदून रडूं लागला. त्याचे हुंदके व अश्रु अनावर झाले. नेताजी सुभाषचंद्र बोस हे प्रत्यक्ष ईश्वरावतार असून ईश्वरप्रातीच्या भावनेनें त्यानें नेताजींच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांस मिठी मारली. "हा प्रत्यक्ष ईश्वरच आपणांस भेटला. यांचे चरण आतां आपणांस दुरावूं नयेत. जन्मभर असेंच यांचे सन्निध रहावें. यांचेपासून आपण दुरावलों तर ? ...आणि दुरावणारच. कारण सदोदित यांचेबरोबर राहण्याची इच्छा असली तरी आपणांस कोण राहूं देतो...अर्थात् हे आपणांस सोडून गेले म्हणजे आपली काय दशा होईल." अशा प्रकारचे विचारकाहूर

त्याच्या हृदयांत उठल्यामुळें त्यास शोक अनावर झाला होता. नेताजींस उशीर होत असल्यामुळें नेताजींनीं खालीं वांकून व आजूबाजूच्या इतर अधिकाऱ्यांनीं पुढें होऊन त्याला वर उचलून बाजूला ओढण्याचा प्रयत्न केला. तो गृहस्थ आपली मिठी सोडून हुंदके देत देत अर्धवट उठला इतक्यांत त्याला काय वाटलें कोण जाणे तो पुन्हा जास्तच रडत नेताजींचे पायां पडला व त्यानें पुन्हा त्यांच्या पायांस घट्ट मिठी मारली. "अरे हें काय...अरे हें काय" असें म्हणत नेताजी मागें सरकण्याचा प्रयत्न करीत होते इतक्यांत या गृहस्थाची पुन्हा त्यांचे पायांभोंवतीं मिठी पडली. नेताजींचा चेहरा या हृदयस्पर्शी प्रसंगानें लालबुंद झाला. या माणसाची त्यांचेवरील निस्सीम भक्ति व त्याचें विकल झालेलें हृदय हीं पाहून नेताजींच्या डोळ्यांतही अश्रु चमकूं लागले. हा प्रसंग आणखी दीर्घ काल लांबला असता तर त्यांचे अश्रु आवरणें त्यांसही कठिण झालें असतें, इतका त्या प्रसंगाचा त्यांचे मनावर परिणाम झालेला होता. शेवटीं पायांवर पडलेल्या त्या इसमास इतर अधिकाऱ्यांचे सहाय्यानें वर उठवीत सद्गदित झालेल्या कंठानें ते त्यास म्हणाले, " अरे हें काय...हें काय ...असें रडणें बरें नव्हे...तूं शिपाई आहेस...जा...जा." असें म्हणत प्रेमानें त्याच्या पाठीवर थोपटीत, या किंवा अशा प्रसंगाची आतां पुनरावृत्ति नको म्हणून नेताजी चटकन् पाठमोरे वळून मोटारींत जाऊन बसले. असा कोणताही हृदयस्पर्शी प्रसंग व विशेषतः स्वजनांचें दुःख, कष्ट, अश्रु इ. पाहून किंवा ऐकून नेताजींचें अंतःकरण व्यथित झाल्याचीं स्पष्ट चिन्हें त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांची आत्यंतिक देशभक्ति व स्वजनांचे कष्ट पाहून कष्टी होणारें त्यांचें अंतःकरण यांचें दृश्य स्वरूप अतिपूर्वेतील दोन अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगीं जाहीर रीतीनें प्रगट झालें. या प्रसंगीं अतिपूर्वेतील अनेक देशांचे हिंदी प्रतिनिधि व वरिष्ठ आंतरराष्ट्रीय अधिकारी हजर होते. पहिला प्रसंग म्हणजे हिंदी स्वातंत्र्य सरकारस्थापनेचा. पुढील बेत मनांत अगोदरपासून ठरवून ठेवणें व त्यावर सतत विचार करणें ह्याला सामान्यजनांचे बाबतींत मनोराज्य असें नांव आहे.

कारण ते बेत प्रत्यक्षांत उतरविण्याची धडाडी, प्रयत्न व निश्चय त्यांचे हातून शक्य नसतो. परंतु इतर जनांचे बाबतींत जें मनोराज्य ठरतें तें महापुरुषाचे बाबतींत त्याचें ध्येय असून या ध्येयासच महात्म्यांचें जीवनसर्वस्व वाहिलेलें असतें. तें साध्य करून घेण्यास्तव थोर विभूति मनांत अनेक बेतं रचतात व मार्ग आंखतात. हे प्रत्यक्षांत उतरविण्याचा प्रयत्न ते दरक्षणीं करीत असतात. त्यांस अडीअडचणींची किंवा कष्ट सहन करण्याची पर्वा नसते. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य अगोदर प्राप्त करून घ्यावयाचें व नंतर आत्मोन्नति व चिरंतन शांति लाभण्याकरितां संन्यास घ्यावयाचा हें नेताजींचें ध्येय असल्याचें आपण पाहिलेंच आहे. स्वातंत्र्यप्राप्तीस्तव सशस्त्र सैन्य व स्वतंत्र सरकार या दोन गोष्टींची आवश्यकता असते अशी त्यांची खात्री झालेली होती. ध्येयप्राप्तीच्या तळमळीमुळें त्यांनीं शेवटीं ही मजल गांठलीच. अर्थात् स्वातंत्र्य सरकारस्थापनेचा प्रसंग हा त्यांच्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाचा प्रसंग होता. त्यांच्या जीवनकमानीचा हा अत्युच्च बिंदु होता. आपलें मंत्रिमंडळ घोषित करून नंतर स्वातंत्र्य सरकारचे राष्ट्रपति या नात्यानें अधिकारग्रहणापूर्वीची स्वतःची शपथ घेण्यास त्यांनीं सुरवात केली. शपथेच्या मसुद्याचा कागद त्यांचे हातांत होता. त्यांनीं शपथ वाचण्यास प्रारंभ केला. "मी ईश्वरास साक्ष ठेवून अशी शपथ घेतों कीं, माझ्या ३८ कोटी हिंदी बांधवांचा मी आजन्म सेवक राहीन. त्यांचें स्वातंत्र्य त्यांस परत मिळवून देण्याच्या प्रयत्नांत मी यत्किंचितही कसूर करणार नाहीं व या ध्येयपूर्तीस्तव प्राणार्पण करण्यासही मी मागेंपुढें पाहणार नाहीं..." ही शपथ घेतांना "माझे ३८ कोटी बांधव" हे शब्द उच्चारतांच त्यांचे डोळ्यांत अश्रु उभे राहिले, कंठ सद्गतित होऊन स्वर गद्गद् झाला. हिंदी जनतेच्या करुणाजनक परिस्थितीचें दारुण चित्र त्यांचे डोळ्यांसमोर उभें राहिलें. हजारों लोक भिकेस लागले; लाखों भुकेनें तडफडून मेले; कोट्यवधि रोज अपमान, छळ, व जुलूम सहन करीत कसें तरी जीवन कंठीत असतात हें चित्र नेताजींच्या डोळ्यांसमोर उभें राहिलें. या कांटेरी विचारकाहुरानें त्यांचें अंतःकरण रक्तबंबाळ झालें व अश्रुरूपानें तें

रक्त बाहेर आलें. शपथेंतील सुरवातीचीं एक-दोन वाक्यें उच्चारल्या-वर डोळ्यांत उभे राहिलेले अश्रु व भरून आलेला कंठ यामुळें पुढील शब्द दिसणें अथवा वाचणें अशक्य झालें. शपथ घेतां घेतां मध्येंच पंधरा-वीस क्षणांचा अवधि गेला. हृदयांत थरारणाऱ्या भावनांमुळें त्यांचा स्वर व शपथेचा कागद असलेला डावा हात ह्या दोन्हींस तेवढ्या वेळेपुरता कंप सुटलेला होता. त्या वेळीं तेथें हजर असलेले सर्व लोक तटस्थ व निश्चल बसले होते. जिकडे तिकडे पूर्ण स्तब्धता व शांतता होती. नेताजींचें कष्टी व व्यथित झालेलें हृदय पाहून इतर पुष्कळांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. त्या वेळीं नेताजींकडे पाहण्याचा कोणास धीर होईना. तो क्षण युगाप्रमाणें भासूं लागला. हा कष्टमय कालखंड जितका लवकर संपेल तितका बरा असेंच सर्वांस वाटूं लागलें. नेताजींचेशेजारीं जपानी राष्ट्राचे प्रतिनिधि जनरल थामामॉटो बसलेले होते. निस्सीम देशभक्तीच्या गंगोत्रींतून अगदीं अनपेक्षितपणें प्रगट झालेली ही अश्रुरूप स्वातंत्र्यगंगा पाहून त्यांसही आश्चर्याचा धक्का बसला असल्यास नवल नाहीं. उत्कट देशभक्तीचें दृश्यस्वरूप पाहण्याचें भाग्य सर्वांस लाभत नसतें. भावनांच्या वादळानें सुटलेला मनाचा तोल नेताजींनीं दहा-पंधरा क्षणांनीं कसा-बसा सांवरला. कांहीं काल हरपलेलें देहभान पुन्हा देशकाल-परिस्थितीच्या स्मरणानें जागृत झाल्यावर, त्यांनीं महत्प्रयासानें हृदयां-तील भावनांचा कल्लोळ आंतल्या आंत दडपला. या प्रयत्नांत दोन-चार हुंदके त्यांस आलेच. उजव्या हातानें ब्रीचेसच्या खिशांतील रुमाल काढून, नेताजींनीं ओघळलेले अश्रु पुसले व तेवढ्या वेळांत आपल्या भावनांवर ताबा मिळवून त्यांनीं शपथ पूर्ण केली.

अशाच एका दुसऱ्या महत्त्वाच्या प्रसंगीं नेताजींस भावनांचा उद्वेग थोपवून धरणें कठिण झालें. सिंगापूर शहरीं हिंदी स्वातंत्र्य सरकार स्थापन झाल्यावर, नेताजी सुभाषचंद्र बोस इतर चार सहकाऱ्यांसह टोकियो येथें भरणाऱ्या अतिपूर्वेंतील सार्वराष्ट्रीय परिषदेकरितां गेले. या परिषदेंत ब्रह्मदेशाचे अधिपति डॉक्टर बा मॉ यांनीं " अतिपूर्वेंतील

सर्व राष्ट्रांनीं नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे नेतृत्वाखालीं सुरू असलेल्या हिंदी स्वातंत्र्ययुद्धास तनमनधनानें मदत करावी" असा ठराव मांडला. हा ठराव सर्वानुमतें संमत झाल्यावर, नेताजी आभारप्रदर्शक भाषण करण्यासाठीं म्हणून उठले. ते म्हणाले, "हिंदी जनतेची व भारताची करुणाजनक परिस्थिति लक्षांत घेऊन आपण या अभागी देशास जी अमोल मदत करण्याचें अभिवचन दिलेलें आहे त्याबद्दल आम्ही सर्वजण आपले अत्यंत आभारी आहों. वास्तविक ४० कोटी जनतेच्या, एके काळीं संस्कृतीच्या अत्युच्च शिखरावर पोंचलेल्या या अवाढव्य देशावर सर्वांचे मदतीची याचना करण्याचा हा दीनवाणा प्रसंग यावयास नको होता, परंतु तो आला आहे हें खरें. त्याला कांहीं इलाज नाहीं..." या प्रसंगींही निर्बल, निःशस्त्र, निष्कांचन, अज्ञानी, अस्थिपंजर झालेल्या व सर्वस्वीं पिळून नागवलेल्या आपल्या असंख्य बांधवांचें जीवनचित्र तेथें जमलेल्या सर्व आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींसमोर रेखाटतांना नेताजींचे डोळे पाण्यानें भरून आले. "येवढें सांगितलें हें तर कांहींच नाहीं; याहून आमच्या लोकांची परिस्थिति शतपटीनें बिकट आहे असेंच जणुं काय त्यांचा गद्गद स्वर त्या प्रतिनिधींस सांगत होता. श्रोतृवृंदांतील सर्व लोकांस तो प्रसंग अपूर्व असाच होता. नेताजींच्या हृदयांतील आत्यंतिक राष्ट्रीय कळकळीचें उदात्त स्वरूप त्यांच्या अश्रूंत पूर्णपणें प्रतिबिंबित झालेलें होतें. जपानमधील सर्व वृत्तपत्रांनीं या प्रसंगाचा गौरवपूर्ण उल्लेख करून नेताजींच्या निस्सीम देशभक्तीची मुक्तकंठानें प्रशंसा केली.

अतिपूर्वेंतच काय परंतु अखिल विश्वांतील राजकारणांत प्रसिद्ध असलेल्या अनेक व्यक्तींची नेताजींशीं तुलना केली, तर नेताजींच्या तोलाची, त्यांच्या समकालीन अशी एकही व्यक्ति सांपडणें शक्य नाहीं. बडेजाव, मानमरातब, रिकामपणाचा उद्योग, संतपणा, परंपरेनें चालत आलेला मान व अधिकार, अधिकारपदास चिकटलेली राजकीय जबाबदारी, जीवनप्रवाहाबरोबर वाहत वाहत राजकारणाच्या कांठास लागलेले व अशा अनेक कारणांमुळें राजकीय क्षेत्रांत शिरलेले लोकच बहुधा आपणांस आजकालच्या राजकारणांत दिसतील. लहान-

पणापासून स्वातंत्र्याची सुसंगत तळमळ लागलेला सुभाषचंद्र बोसां-सारखा त्यांचा समकालीन दुसरा कोण आहे ? त्यांचा निश्चय, त्यांची सचोटी, त्यांची संन्यासवृत्ति, दिवसरात्र काम करण्याची शक्ति, त्यांचें कर्मयोगित्व हे गुण किती राजकारणी व्यक्तींत एकसमयाव-च्छेदेंकरून दिसतात ? त्यांचें अंतःकरण किती कोमल, किती मृदु होतें हें आपण पाहिलेंच आहे. परंतु हीच कोमलता, हेंच मार्दव त्यांच्या अनुपम शक्तीचें उगमस्थान होतें. स्वदेश व स्वबांधवांचेकरितां तिळ-तिळ तुटणारें नेताजींचें अंतःकरण हेंच शत्रूशीं दोन हात करीत असतांना व निर्घृण परिस्थितीचे दारुण घाव हृदयावर झेलतांना दगडाप्रमाणें कणखर राहत असे. स्वदेशाकरितां विकल होणारें सुभाष-चंद्रांचें कोमल हृदय शत्रूशीं टक्कर देतांना टणक व कठोर होत असेल हें म्हणणें कदाचित् परस्परविरोधी अशा प्रकारचें वाटेल, परंतु वस्तु-स्थितीशीं ताडून पहातां तें तसें नाहीं. एखाद्या गोष्टीबद्दल आत्यंतिक प्रेम व जिव्हाळा असेल तरच कोणीही त्याकरितां अतुल स्वार्थत्याग करण्यास प्रवृत्त होईल. एरवीं गाय कितीही गरीब दिसो अगर भासो, तिच्या पाडसाला कोणीं त्रास दिला तर त्यास ती गाय शिंग मारण्यास कमी करणार नाहीं. अर्थात् पाडसाबद्दलचें वात्सल्य हेंच तिला तें दिव्य करण्यास शक्ति देतें. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं आपल्या स्वतःच्या संसाराची, आपल्या मातापितरांची, राजकीय क्षेत्रांतील ज्ञानवृद्ध व्यक्तींची, स्वतःच्या रुग्ण शरिराची, त्यांस अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावयास लावणाऱ्या त्यांच्या बांधवांची, इंग्रजांच्या राजकीय बंधनांची व तत्सम अनेक पर्वतप्राय अडचणींची तमा बाळ-गली नाहीं. हें सर्व राष्ट्राकरितां पाझरणाऱ्या त्यांच्या मृदु, कोमल व आत्यंतिक प्रेमानें आर्द्र झालेल्या हृदयाच्या जोरावरच नव्हे काय ?

ग्रंथालय
अनुक्र
दि
क्र
नों दि

# नेताजींची वीरवृत्ति

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा ईश्वरावर पूर्ण विश्वास होता. मानवानें प्रयत्न केव्हांही सोडूं नये, परंतु ईश्वरेच्छेपुढें मानवाचा कांहीं इलाज चालत नाहीं. परमेश्वरी योजनेप्रमाणेंच सर्व घटना घडत असतात, परमेश्वराची लीला अगाध व अतर्क्य आहे अशी नेताजींच्या मनाची पूर्ण खात्री झालेली होती. वरीलप्रमाणें निष्ठा असणाऱ्या ईश्वरभक्तांचेही त्यांच्या त्यांच्या स्वभावाप्रमाणें दोन वर्ग पडतात. कोणी "असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी" अशा विश्वासानें निवृत्तिमार्ग स्वीकारून "जें जें होईल तें तें पहावें" अशा मताचे होतात. याचे उलट इतर निष्ठावंत ईश्वरानुयायी—श्रीमद्‌जगद्‌गुरु आद्य शंकराचार्य, समर्थ रामदास व नेताजी सुभाषचंद्र बोस यांचेसारखे—"सामर्थ्य आहे चळवळीचें" अशा निश्चयानें आटोकाट प्रयत्न करण्याचा प्रवृत्तिमार्ग पत्करतात. यांतील दुसरा मार्ग हाच जास्त सयुक्तिक व तर्कशुद्ध आहे; कारण इतर बाबतींत निवृत्तिमार्गाचें समर्थन करणाऱ्यांसही स्वतःच्या शारीरधर्मांची काळजी वहावीच लागते. तेथें ईश्वरावर हवाला ठेवून चालत नाहीं. यशापयशाबद्दल सुखदुःख न मानतां "देह जावो अथवा राहो" अशा निश्चयानें सर्व प्रकारचीं कर्तव्यें अडीअडचणींची पर्वा न करतां निर्विकार मनानें पार पाडणें

व कुडींत प्राण असेपर्यंत सदसद्विवेकबुद्धीनें दाखवून दिलेल्या मार्गानें अविरत कर्म करीत राहणें हें नेताजींच्या जीवनाचें मूलतत्त्व होतें. हेंच त्यांच्या वीरवृत्तीचें उगमस्थान होतें. ईश्वराचे मनांत असेल तोंपर्यंत आपण जिवंत राहूं. मृत्यु यावयाचाच असला तर त्याचा प्रतिकार करणें मानवास केव्हांही शक्य नाहीं. अर्थात् त्याबद्दल विवंचना अथवा भीति बाळगण्याचें काय कारण? "देव तारी त्याला कोण मारी" अशी खात्री झाल्यामुळें सामान्य लोकांचे मनांत धडकी भरविणाऱ्या प्रसंगांस तोंड देतांना नेताजींची शांत व निर्विकार वृत्ति ढळत नसे. केवढेंही महत्त्वाचें व जबाबदारीचें कार्य अंगावर घेतांना ते डगमगत नसत; कारण इतरांप्रमाणें आपल्यांतही ईश्वरी अंश आहे, सारासार विचारबुद्धि आहे, ईश्वराची कृपादृष्टि सर्व प्राणीमात्रावर असते तशी ती आपल्यावरही आहे, आपण जें योग्य तेंच करीत आहोंत अशी साक्ष आपल्या अंतःकरणास पटत असतांना मग भिण्याचें कारण काय? असा दांडगा आत्मविश्वास त्यांचे ठायीं वसत होता.

ज्या ज्या व्यक्तीस स्वतःबद्दल अशा रीतीचा आत्मविश्वास वाटत असतो तिची इतरांच्या कर्तृत्वशक्तीबद्दलही यःकश्चित् भावना नसते. इंग्रजांच्या तुरुंगवासाबद्दल नेताजींनीं यत्किंचितही पर्वा केली नाहीं. बहुसंख्य हिंदी जनता व वयोवृद्ध आणि अनुभवी नेते आपल्या मताचे नाहींत हे निश्चितपणें ठाऊक असतांही त्यांनीं याही गोष्टीची पर्वा केली नाहीं. स्वतःचे मनास पटणारा स्वतंत्र मार्ग त्यांनीं स्वीकारला. हें दिव्य करण्यास केवढा आत्मविश्वास व केवढी धडाडी लागते याची ज्यानें त्यानें कल्पना करावी. मुळांत येवढा आत्मविश्वास असल्यानें पुढें ओघानें येणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या स्वशिरावर घेण्यास नेताजींनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. वास्तविक जपान व जर्मनीसारख्या सर्वस्वीं अपरिचित अशा कारस्थानी राष्ट्रांशीं संधान बांधून आपलें एक स्वतंत्र हिंदी सरकार स्थापन करणें हें केवळ्या जबाबदारीचें कार्य होतें? गेल्या शेंसव्वाशें वर्षांच्या पारतंत्र्यकालांतील इतिहासांत हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वाची धुरा कोणींही हिंदी माणसानें आपल्या हातांत घेतली नव्हती. या अचाट कल्पनेनेंच कोणाचीहि छाती दडपून

गेली असतो. पिढ्यान्‌पिढ्या परकी सत्तेच्या अगदीं हीन प्रकारच्या नोकरींत गेल्यावर सार्वभौमपदाची ही कल्पना एक तर कोणाच्या मनास स्वप्नातही शिवली नसती व शिवली असती तरी ती मानवली नसती. परंतु नेताजींचे श्रेष्ठत्वास कारणीभूत होणाऱ्या अनेक गुणांत त्यांची अप्रतिम धडाडी व आत्मविश्वास यांचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. ही कामगिरी अंगावर घेतांना, हें कार्य आपल्यानें निभावलें जाईल किंवा नाहीं अशा प्रकारच्या साशंकतेचा मागमूसही त्यांचे मनोवृत्तींत नव्हता. स्वतःबद्दल इतका आत्मविश्वास असल्यामुळें आपले सर्व हिंदी बांधवही धडाडीचीं व जबाबदारीचीं कामें अंगावर घेऊं शकतात — न घ्यावयाला काय झालें! असेंच नेताजींचें मत असे. हिंदी स्वातंत्र्य सरकार स्थापन झाल्यावर अतिपूर्वेतील हिंदी लोकांस अनेक जबाबदारीचीं कामें अंगावर घ्यावीं लागलीं. परदरबारीं वकील, आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी व राजकारण या क्षेत्रांतील अनेक कामें, स्वातंत्र्य-सैन्य, संघ व सरकार यांतील मोठमोठ्या हुद्याच्या जागा असे अनेक महत्त्वाचे अधिकार व तज्जन्य महत्त्वाच्या कामगिऱ्या हिंदी लोकांस स्वशिरावर घ्याव्या लागल्या. असलीं कामें आपणांस पुढेंमागें करावीं लागतील किंवा तीं आपणांस झेंपतील ही कल्पना अतिपूर्वेतील हिंदी लोकांचे ध्यानींमनींही नव्हती. हे लोक सर्वस्वीं अननुभवी, यांस हीं कामें आपण कशी सांगावीं असें नेताजींचे मनांतसुद्धां आलें नाहीं. जात्यावर बसविलें म्हणजे ओवी आठवते तसेंच एखाद्याच्या शिरावर जबाबदारीचें काम टाकलें म्हणजे आपोआपच ही जबाबदारी आपले हातून कशी पार पडेल या दृष्टीनें तो माणूस विचार करूं लागतो व त्याला अनेक मार्ग सुचतात. अगदीं रानटी अवस्थेंतून मानवाची प्रगति झाली ती अशीच. सर्व गोष्टींचें आकलन करण्यासारखी बुद्धि ईश्वरानें सर्वांस दिलेली असतांना मग काळजी कसली करावयाची! इंग्लंड व अमेरिकेमध्यें जन्मास येणारीं माणसेंच मोठमोठीं कामें हातीं घेऊं शकतात व हिंदी लोकांस तें शक्य नाहीं हा न्यूनगंड गुलामी मनोवृत्तीच्या लोकांतच दिसून येतो. एखाद्याच्या अंगावर जबाबदारी टाकणें व त्या जबाबदारीची त्यास

जाणीव करून देणें ही पहिली पायरी. यानंतर त्या माणसाकडून होणाऱ्या चुकांबद्दल त्यास उगाच अद्वातद्वा न बोलतां त्याच्या चुकांवर पांघरूण घालावयाचा प्रयत्न करणें, झालेल्या थोड्या-बहुत दुष्परिणामांवर सारवासारव करणें, प्रेमानें त्यास मार्ग दर्शविणें, उत्तेजन देणें व त्यानें दाखविलेल्या कर्तृत्वापुरता त्याचा गौरव करणें अशा मार्गानें कोणत्याही माणसास जबाबदारीची व धडाडीचीं कार्यें अंगावर घेण्यास अगदीं थोड्या अवधींत प्रवीण करतां येतें. मुळांतच एखाद्याच्या कर्तृत्वशक्तीबद्दल तुच्छभाव दाखविणाऱ्या किंवा सदान्कदा उलटासुलटा मानभंग करणाऱ्या वरिष्ठाचे हाता-खालील लोकांची प्रगति कायमची खुंटते. " आपल्याला कांहींच येत नाहीं ... आपण षंढच आहों " असाच त्या बोलणीं खाणाऱ्या माणसाचा ग्रह होऊं लागतो व आपण कोणतीही जबाबदारी अंगावर घेण्यास सर्वस्वीं नालायक आहोंत असा न्यूनगंड त्याचे मनांत कायमचें ठाणें देऊन बसतो. एखाद्यानें जरा डोकें वर काढण्याचा प्रयत्न करावा तोंच दुसऱ्यानें त्याच्या मस्तकावर जोरानें प्रहार करावा, पुन्हा एखा-द्यानें जरा डोकें वर काढावें तों पुन्हा कोणीतरी एक तडाखा द्यावा असें जर एकसारखें होऊं लागलें तर या सततच्या तडाख्यांनीं त्या माणसाचा मेंदूच सुन्न व्हावयाचा. अशीच कांहींशी हिंदी लोकांची स्थिति झालेली आहे. जगांतील महत्त्वाच्या व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रांत हिंदी लोकांस नाउमेद करण्यांत येऊन खालीं दडपल्यामुळें आपण कारकुनी, खर्डेघाशी, मोलमजुरी व चपराश्याचें कार्य याशिवाय कांहीं करूं शकत नाहीं अशीच सर्वसामान्य हिंदी लोकांची मनोवृत्ति झाली असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. मग इतर देशांतील लोकांची श्रीमंती, त्यांचा थाट, ऐट, दणकट प्रकृति, विद्वत्ता, कार्यप्रवीणता, धडाडी, आत्मविश्वास व महत्त्वाचीं कार्यें हातीं घेऊन तीं पार पाड-ण्याची हातोटी हीं पाहून आमच्या अज्ञ जनतेचे नेत्र विस्फारित होतील यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. एखाद्याला शेवटपर्यंत पाणक्या ठेवायचा एखाद्यानें पणच केला तर पाणक्याचा " रामशास्त्री " कधींही होणार नाहीं. याचे उलट थोर पदवीस पोंचलेल्या एखाद्या माणसासही

सर्वांनीं जाणूनबुजून खालीं दडपावयाचें व त्यास हीन कामेंच करावयास लावण्याचें ठरविलें तर तेंही अशक्य नाहीं. एवंच उत्तेजन व योग्य मार्गदर्शन, वाव व मोकळीक इत्यादि गोष्टींवर बऱ्हंशीं व्यक्तीचें कर्तृत्व अवलंबून असतें.

हिंदी लोकांस वाव न देणें, त्यांस मूर्ख ठरविणें, त्यांचें हंसें करणें, त्यांस खालीं दडपून हीन कर्मे करावयास लावणें याहून इंग्रजांसारख्या परकी लोकांकडून आपण काय अपेक्षा करावी! परंतु हिंदी सनदी नोकरांनींही त्यांचीच 'री' ओढावी याबद्दल वाईट वाटतें. इंग्रजांचे नोकरींत असलेले हिंदी लोक स्वतःच्या कर्तृत्वशक्तीबद्दल साशंक होऊन आपल्या इतर हिंदी बांधवांचे कर्तृत्वशक्तीबद्दलही तुच्छताभावच दर्शवितात. त्यांच्या लहानशा कार्यक्षेत्रांतील महत्त्वाच्या कामगिऱ्यांवरही त्यांचे आप्तेष्ट, नेहमींच्या सरावांतल्या व्यक्ति, ओळखीपाळखीचे किंवा स्वप्रांतीय जन इत्यादींची नेमणूक करण्यास ते कचरतात. "ह्याला काय येणार? याला तर मी लहान असतांना शेंबडा अथवा नागवा बघितलेला आहे." अशा तऱ्हेची तर्क-विचारपद्धति परस्थांच्या नोकरींत अधिकारपदावर चढलेल्या लोकांची असते. ते स्वतः खुशामत किंवा बलवत्तर दैव यांच्याच जोरावर उंच चढल्यामुळें त्यांस आपले द्रव्यहीन शेजारीपाजारी व आप्तेष्ट व रोजच्या परिचयांतील इतर मंडळी कर्तृत्वहीन वाटूं लागतात. पारतंत्र्यांत मालमत्ता हीच कर्तृत्वाची कसोटी समजली जाते. बरें, श्रीमंत होणें फारच थोड्यांस साधतें व इतर कोणतीही महत्त्वाची कामगिरी करून दाखविण्यास वावच नसतो यामुळें धनसंपदेच्या उंटावर बसलेल्या शहाण्यांनीं मेंढपाळास व गुराख्यास हीन लेखणें क्रमप्राप्तच ठरतें. लहानपणीं सर्वच शेंबडे व नागवे असतात. मग तो राजपुत्रही का असे ना? परंतु दृष्टिआड सृष्टि या न्यायानें विचारशून्य सनदी नोकरांस स्वतःस सर्वस्वीं अपरिचित असे अन्य प्रांतीय वा इतर दूरचे डोंगरच जास्त साजरे वाटतात. एखादें महत्त्वाचें काम आपल्या आप्तेष्टांकडून, परिचित लोकांकडून, आपल्या जातीच्या गृहस्थांकडून किंवा आपल्या प्रांतांतील इसमांकडून

होणें शक्य नाहीं, त्याला शक्य तितका दूरचाच माणूस असावा अशी एक घातुक प्रवृत्ति सनदी नोकराची होते. अशा तऱ्हेनें परस्थ राजकर्त्यांकडून आपल्या लोकांच्या कर्तृत्वाची पायमल्ली तर केली जातेच, परंतु त्यांच्या तालमींत आपले लोकही तेच करतात. असें जर अव्याहत होऊं लागलें तर देशाचा उद्धार व्हावयाचा कसा व आमच्या लोकांस महत्त्वाचीं कामें हातीं घेणें केव्हां शक्य व्हावें ? अर्थात् या प्रवृत्तीचा त्याग शक्य तितक्या लवकर केलेला बरा. जितका परका तितका तो जास्त शहाणा असें समजणें अत्यंत मूर्खपणाचें आहे. प्रत्येक माणसांत कांहीं अंशीं ज्ञान व कांहीं अंशीं अज्ञान असतेंच. योग्य मार्गदर्शन व उत्तेजन देण्यानें आपणांस परिचित असलेल्या माणसास तयार करणेंच जास्त सोपें व कार्यसफलतेच्या दृष्टीनें महत्त्वाचें. हिंदी लोकांची अवहेलना करणें, "त्यांस कांहीं येत नाहीं, ते मूर्ख आहेत, आळशी आहेत, कुचकामाचे आहेत", असें म्हणणें हें आपल्या परकी राजकर्त्यांच्या फायद्याचें आहे व म्हणूनच सबंध जगाची ते तशी समजूत करून देऊं चाहतात. नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणत असत, "सर्व बाजूंनीं इतकी मुस्कटदाबी, गुणांची व कर्तृत्वाची पायमल्ली आणि अवहेलना होत असतांना देखील जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत हिंदी लोकांनीं उत्तम प्रकारची कामगिरी बजावलेली आहे. असें असतां हिंदी लोक कुचकामाचे असतात हें म्हणणे चुकीचें ठरेल. मी तरी कदापि असें म्हणणार नाहीं. उत्तेजन व सहाय्य मिळाल्यावर हिंदी माणसेंच सर्व प्रकारचीं कार्यें इतर कोणाहीपेक्षां अधिक उत्तम तऱ्हेनें बजावूं शकतील अशी माझी खात्री आहे." अशी तर्कशुद्ध समजूत व कमालीचा आत्मविश्वास असल्यामुळेंच मिळतील त्या हिंदी लोकांस हाताशीं धरून नेताजींस सशस्त्र संघटनेचें, स्वतंत्र राज्याच्या स्थापनेचें व हिंदुस्थानचें दुसरें स्वातंत्र्ययुद्ध लढविण्याचें वीरकार्य हातीं घेतां आलें.

भवितव्यतेवर नेताजींचा इतका अढळ विश्वास होता कीं, आपण आपलें कार्य शेवटपर्यंत एकाग्रतेनें करीत रहावें, मग जें प्राक्तनांत लिहिलेलें असेल तें होईल, त्याला भिण्याचें कारण नाहीं अशी ठाम

समजूत त्यांच्या हाडींमासीं खिळलेली होती. इतरेजनांनीं एरवीं कितीही पांडित्य सांगितलें तरी प्राणसंकटाचे वेळीं मात्र त्यांचें भान हरपतें व मनाची शांति भंग पावते. नेताजींचे बाबतींत तसें नव्हतें. सिंगापूर व रंगूनमधील त्यांच्या निवासस्थानीं हवाई हल्ल्यांपासून संरक्षण व्हावें म्हणून बागेंतील आवारांत तळघरें करण्यांत आलेलीं होतीं. रंगून शहरावर दिवसभर बॉंबहल्ले चालत असल्यामुळें रंगून-मधील नेताजींचे निवासस्थानीं केलेलें भुयार अत्यंत काळजीपूर्वक, बरेच कष्ट घेऊन तयार केलेलें होतें. विमानांतून टाकलेला बॉंब हा सहसा चाळीस फुटांपेक्षां अधिक खोल जमिनींत शिरत नाहीं. त्यां-तूनही या चाळीस फुटांचे भूपृष्ठांत आठ फूट जाडीचा खडकाचा थर व आठ फूट जाडीचा मातीचा थर असे जर आलटून पालटून एकावर एक ते रचलेले असले तर त्या खालच्या भुयारांतील माणसें सुरक्षित राहतात. नेताजींकरितां रंगून शहरीं तयार केलेलें भुयार अशाच प्रकारचें होतें. जमिनींत वीस फूट खणून भूसपाटीचेवर या खणले-ल्या मातीचा व दगडांचा वीस फुटांचा थर रचलेला होता. खालीं उतरण्यास लांकडी जिना असून आंतले बाजूस विजेचे दिवे, तेल-बत्त्या व मेणबत्त्या इत्यादींची सोय करण्यांत आलेली होती. भीषण प्रकारचा हवाई हल्ला दिवसभर चालू राहून बाहेर येणें सुरक्षित न झाल्यास आंतल्या आंत एकदोन दिवस सहज काढतां यावेत म्हणून आंत चिनी मातीच्या ताटल्या, टिकाऊ खाद्यपदार्थ व जरूरीचे कपडे वगैरे सामान पेट्यांत घालून ठेवण्यांत आलें होतें. सिंगापुरांत वर्षां-तून एखाद दोन वेळां हवाई हल्ला होई व तोसुद्धां तास-दीड तासा-पुरता, म्हणून तेथें जमिनींत पांचसहा फूट खोलीचा एक गोल खळगा खणून, त्याला लांकडी तळ करून त्यांत तीनचार खुर्च्या ठेवण्यांत आलेल्या होत्या. वरचे बाजूस लांकडी छतावर पांचसहा फूट उंचीचा मातीचा थर होता. बॉंब पडला म्हणजे कारंजाच्या फवाऱ्याप्रमाणें त्याच्या शिशाच्या कवचाचे जे तीक्ष्ण तुकडे इतस्ततः उडतात ते लागून त्यामुळें प्राणहानि होऊं नये व विमानांतून

मारलेल्या मशीनगनच्या गोळया लागूं नयेत येवढ्याचकरितां अशा उथळ खंदकाचा विशेषतः उपयोग होतो.

परंतु नेताजी मात्र क्वचित् एकदोन प्रसंग सोडून या खंदकांत कधींही जाऊन बसले नाहींत. या एकदोन प्रसंगींसुद्धां त्यांच्याशीं वाटाघाटी करणाऱ्या इतर अधिकाऱ्यांनीं त्यांस अत्याग्रह केल्यामुळेंच नाइलाजानें ते खंदकांत जाऊन बसले. हवाई हल्लयापासून संरक्षण व्हावें या उद्देशानें स्वतः होऊन एकदांसुद्धां ते कधीं भुयारांत जाऊन बसले नाहींत. हवाई हल्ला चालू असतांना ते शांतपणें असतील तेथेंच आपलें काम करीत राहत. मात्र इतरांस सुरक्षित स्थळीं जाण्याचा ते आग्रह करीत व इतरांस ती आज्ञा समजून तिचें पालन करणें भाग पडे.

इ. स. १९४५ सालच्या एप्रिल महिन्याच्या २४ तारखेची गोष्ट. त्या दिवशीं नेताजींसह आम्ही चारशें जण रंगून शहर सोडून रानांतून दरकूच दरमजल करीत सयाम देशांत पीछेहाट करण्यास निघणार होतों. सायंकाळ झाली; अंधार पडला; जाणारे व त्यांस निरोप देणारे असे बरेच लोक नेताजी-निवासाच्या विस्तीर्ण आवारांत एकत्रित झाले. हवाई हल्लयांच्या भीतीमुळें दिवे लावण्याची सोयच नव्हती. बंगल्यांतील दोन्ही मजल्यांवर अंधार गुडुप होता. आंत बसून एकमेकांचीं तोंडेंसुद्धां दिसणार नाहींत म्हणून नेताजी आपल्या इतर कार्यकर्त्यांबरोबर विचारविनिमय करीत द्वारप्रकोष्ठावरील चौकोनी सौधावर खुर्च्या टाकून बसले होते. फितूर हिंदी लोकांच्या व स्वयंस्फूर्त अथवा अल्पसंतुष्ट हेरांच्या सहाय्यानें इंग्रजांस रंगूनमधील नेताजींचा बंगला कोठें आहे याचा पत्ता लागला होता. लष्करी नकाशावर त्यांनीं तें स्थान नोंदून वैमानिकांस इतर ठिकाणांप्रमाणें नेताजींचा बंगलाही उडवून लावण्याची आज्ञा केली होती. इंग्रज व अमेरिकन वैमानिकांनीं अनेकदां प्रयत्न करूनही त्या बंगल्यास केसभरही धक्का लागला नाहीं हें त्यांतल्या त्यांत नवल. अर्थात् इंग्रज व अमेरिकन वैमानिकांची नेमबाजी काय वर्णावी! ते ज्याच्यावर नेम धरीत त्याच्या आजूबाजूचा सर्व प्रदेश उध्वस्त व्हावयाचा तरी मुख्य लक्ष्य आपलें जसेंच्या तसें सुरक्षित उभें असलेलें दिसून येई. एक लष्करी शिक्षक रिक्रूटांस

बंदुकीनें नेम घेण्यास शिकवितांना त्यांस, दूरच्या चौकोनी फळयाच्या मधोमध असलेल्या वर्तुळाच्या मध्यबिंदूवर नेम धरण्यास सांगून ते बंदुकीचा घोडा ओढण्यास अगदीं तयार असल्याचें उत्तर त्यांचेकडून येतांच स्वतः त्या फळयासमोर जाऊन उभा राही. रिक्रूट त्या फळयावर नेम धरून गोळीबार करीत तरी हा शिक्षक आपला सुरक्षित. त्याचें हें भयंकर दिव्य पाहून, क्वचित् गोळीबार पहावयास त्याचेबरोबर येणाऱ्या त्याच्या मित्रांस आश्चर्य वाटे. ते म्हणत, " अरे बाबा हें आहे तरी काय ? रिक्रूटांस फळयावर नेम धरण्यास सांगून तूं त्या फळयाच्या बरोबर मध्यें म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेंत जाऊन उभा राहतोस म्हणजे तुला म्हणावें तरी काय ! " त्यावर तो लष्करी शिक्षक म्हणे कीं, " अहो तुम्हांस माहीत नाहीं. रिक्रूट एकदां गोळीबार करूं लागले म्हणजे त्यांनीं नेम धरला असेल तेंच नेमकें ठिकाण सुरक्षित समजावें. तें तेवढें स्थान सोडून त्यांच्या गोळया दाही दिशांस कोठें कोठें जातील त्याचा नेम नसतो. " स्वतःस तरबेज म्हणविणाऱ्या इंग्रज व अमेरिकन वैमानिकांची अगदीं हुबेहूब हीच तऱ्हा. सयाम देशाची राजधानी बँकॉक येथील पोस्ट ऑफिस व रेल्वे स्टेशन यांच्या भव्य इमारती उध्वस्त करण्याचा इंग्रज व अमेरिकन वैमानिकांनीं सतत चार वर्षें प्रयत्न केला. नेहमींच्या या हवाई हल्ल्यांनीं या दोन इमारतींचे भोंवतालचा सर्व प्रदेश उध्वस्त झाला तरी या दोन इमारती जशाच्या तशा उभ्या आहेत. नेताजींचा बंगलाही असाच शेवटपर्यंत बचावला होता. वर उल्लेखिलेल्या प्रसंगीं रात्रीं दहा वाजण्याचे सुमारास एक शत्रु-विमान नेताजी बसले होते त्या गच्चीचे वरचे बाजूस अगदीं जवळून घोंगावत गेलें व जातांना गच्चीवर बसलेल्या इसमांस घायाळ करण्याकरितां त्या विमानानें मशीनगन्सच्या गोळयांचा चौफेर मारा केला. विमानाच्या वेगामुळें नेहमींप्रमाणेंच नेम चुकला व मोठमोठ्या ठिणग्या एकामागून एक निघाव्यात अशा रीतीनें रात्रीचे अंधःकारांत चमचमणाऱ्या त्या गोळया पुढें जाऊन पडल्या; परंतु नेताजी व त्यांचे-बरोबर विचारविनिमय करणाऱ्या किंवा त्या प्रशस्त आवारांत जम-लेल्या कोणाही मंडळींस कांहीं इजा झाली नाहीं. येवढा मोठा जिवा-

वरचा प्रसंग. विमानाचा व मशीनगनचा तो भयंकर आवाज. डोक्यावरून चुकून थोड्या पुढें पडलेल्या गोळ्या. तरी येवढ्यानेंही नेताजींचे वृत्तींत कांहीं चलबिचल झाली नाहीं. त्यांच्या वाणींत खंड पडला नाहीं किंवा त्यांनीं यत्किंचितही हालचाल केली नाहीं. जणुं कांहींच झालें नाहीं अशा रीतीनें त्यांनीं विचारविनिमय पूर्ववत् चालू ठेवला.

शनिवार तारीख २८ एप्रिल १९४५ ची गोष्ट. नेताजी, मी व इतर ३०-३२ जण असे आम्ही पहांटे पांच वाजतां सतांग नदीपार करून सतांग नदीच्या दक्षिण तीरावर आलों. फटफटीत उजाडल्यापासून तों पुन्हा अंधार पडेपर्यंत त्या दिवसांत हवाई हल्ले होत म्हणून उजाडल्याबरोबर आम्हांला कडेच्या रानांत तळ देणें भाग होतें. लाल मातीच्या लहान लहान टेकाड्यांच्या माथ्यावरील रम्य वनश्रींत आम्ही तळ दिला. दुपारीं दीड वाजतां एकाएकीं आम्ही होतों त्या स्थळीं भयानक हवाई हल्ल्यास सुरवात झाली. हस्तगोल, बॉंब व मशीनगनच्या गोळ्यांचा भडिमार करण्याचा सपाटा त्या विमानांनीं चालविला. त्या त्या स्थानावर चौफेर आवारांत असलेल्या लहान इमारती व झोंपड्या हादरूं लागल्या. टेकड्यांत तिरपे खंदक खोदलेले होते व प्रत्येक खंदकाचे आंतले बाजूस दहावीस माणसें बसूं शकतील येवढी जागा करण्यांत आली होती. नेताजी बसले होते ती झोंपडी या खंदकाचे जवळच होती, तरी पण, नेताजी त्या झोपडींतच आपलें काम शांतपणें करीत बसले. तेथून ते कांहीं खंदकांत उतरले नाहींत. या हवाई हल्ल्यांत आमच्या त्या ३०-३४ जणांचे लहान तुकडींतील माझ्या शेजारीं पहुडलेल्या एका माणसास मशीनगनची एक गोळी लागली. त्याच्या मांडींतून ती आरपार निघून गेली. हवाई हल्ला थांबल्यावर त्या जखमी झालेल्या तरुण अधिकाऱ्यास तो होता त्या झोपडींतून बाहेर आणण्यांत आलें. नेताजींनीं ताबडतोब अत्यंत ममताळूपणें त्याची विचारपूस केली. आमच्या तुकडीबरोबर असणारे डॉक्टर त्यांच्या खंदकांतून बाहेर आले. उपलब्ध असलेल्या सामुग्रीनें त्यांनीं कशी तरी मलमपट्टी केली. पुढें पीछेहाटीचे हाल, दगदग, खाण्यापिण्यांतील अनियमितपणा, पौष्टिक अन्नाचा व औषधें,

उपकरणीं इत्यादींचा अभाव यामुळें रक्त दूषित होऊन त्या अधिकाऱ्याचा सबंध पाय कापावा लागला. पुढें दूषित रक्त वरचे बाजूस शरिराच्या इतर भागांतही शिरल्यामुळें त्या अधिकाऱ्याचा अंत झाला. बँकॉक शहरीं नेताजींस त्या अधिकाऱ्याच्या मृत्यूची वार्ता मिळाली. या अधिकाऱ्याचा मृत्यु मोलमीनच्या रुग्णालयांत झाला. त्याला तेथवर आणून, त्याची गंभीर परिस्थिति लक्षांत घेतां पुढील औषधोपचाराकरितां आम्ही त्याला तेथेंच ठेवला होता; त्याच्या मृत्यूची वार्ता ऐकून ते जरा चिडून व रागावूनच आमच्याबरोबर असलेल्या डॉक्टरास म्हणाले, " पाहिलंस डॉक्टर ×× मला त्याच दिवशीं तुझा तो औषधोपचार आणि ती मलमपट्टी पाहून कसेंसेंच वाटलें. माझें मुळींच समाधान झालें नव्हतें त्या वेळेस. तूं कांहीं तरी थातुरमातुर केलेंस असेंच माझें त्या वेळीं मत झालें. मी त्याच वेळेस म्हणणार होतों तुला, पण म्हटलें तुम्ही डॉक्टर लोक, आपण कशाला बोला उगीच. आतां पाहिलेंस काय झालें तें. वीर पुरुषांस आपल्या जन्मजात आप्तेष्टांपेक्षा रणांगणांत जिवास जीव देणाऱ्या साथ्यांबद्दलच जास्त प्रेम, जिव्हाळा व हळहळ वाटते. या भावना खोट्या किंवा दिखाऊ नसून अगदीं आंतड्यांना पीळ पडून उत्स्फूर्त झालेल्या असतात. याचें कारण म्हणजे वीरवृत्तीचें मोल, वीरवृत्तीची किंमत काय याची वीरांसच चांगली पारख होऊं शकते. हिरकणीचें मोल रत्नपारख्याकडूनच होतें. एखादा रानटी माणूस त्याची काय किंमत करणार? तद्वत् त्यांच्याबरोबर स्वातंत्र्य-चळवळींत भाग घेऊन त्यांचेबरोबर पीछेहाट करणारा हा तरुण अधिकारी जेव्हां ह्या हवाई हल्ल्यांत जखमी झाला तेव्हां नेताजींस फारच वाईट वाटलें. विशेषतः या खडतर प्रवासांत आपण त्याची योग्य ती काळजीही घेऊं शकणार नाहीं ही गोष्ट त्यांस अत्यंत जाणवली. त्याच्या मृत्यूची वार्ता ऐकून तर ते फारच हळहळले व डॉक्टरांस त्वेषानें ते वरील शब्द बोलले.

वर उल्लेखिलेल्या दिवशीं सतत दीड तासाचे माऱ्यानंतर दुपारीं ३॥ चे सुमारास हल्ला करणारीं तीं विमानें निघून गेलीं. त्या हल्ल्याची भीषणता लक्षांत घेतां आमचा एकच इसम जखमी झाला होता

अनुक्रम २८८५

ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होती. हस्तगोळे, बॉम्ब व मशीनगनच्या गोळ्या ! एकाएकीं कडाडून वळवाच्या पावसाप्रमाणें जोराची वृष्टि झालेली होती. कदाचित् पुन्हा विमानांची दुसरी टोळी यावयाची म्हणून नेताजींनीं सर्वांस बोलावून तेथून सुमारें दोन फर्लांग अंतरावर असलेल्या कांहीं खोल भुयारांत जाण्यास सांगितलें. सूर्यास्त होऊन अंधार पडण्यास अजून तीन तासांचा अवधि होता. येवढ्यांत पुन्हा हवाई हल्ला होण्याची शक्यता होती. पलीकडील उंच उंच टेकड्यांच्या पायथ्यांशीं ३०-४० माणसें बसूं शकतील अशीं प्रशस्त भुयारें केलेलीं होतीं. या भुयारांच्या माथ्यांवर जरी बॉंब पडला असता तरी ही टेकडी ३०-४० फूट उंच असल्यामुळें तितकीशी भीति नव्हती. मशीनगनच्या गोळ्यांपासून तर संपूर्ण संरक्षण होण्यासारखे होतें यांत कांहींच शंका नव्हती. आम्ही येथें जाऊन बसतों न् बसतों तोंच एक दूत मला बोलाविण्यास आला. कांहीं खास कामगिरीकरितां नेताजी माझी वाट पाहत असल्याचें त्यानें मला सांगितलें. मला आश्चर्यच वाटलें; कारण सुमारें अर्ध्या एक तासापूर्वीं माझी इच्छा नसतांनासुद्धां नेताजींनीं आग्रहानें मला इकडे पाठविलें होतें. काय काम असावें याचा मनाशीं विचार करीत मी त्या दूताचे मागोमाग पुन्हा पूर्वस्थळीं आलों. तों मला तेथें एक भयंकर दृश्य दिसलें. नेताजी त्यांच्या झोपडी-लगतच एका झाडाखालीं उभे होते आणि त्यांचेसमोर स्ट्रेचरवर एक रक्तबंबाळ देह होता. हा जखमी झालेला इसम जपानी असून याचे अंगावर तरवारीनें खचाखच खचाखच वाटेल तेथें मारीत सुटावें अशा प्रकारचे अनेक घाव घातले गेल्याचें स्पष्ट दिसत होतें. त्याच्या हातांचीं बोटें तर अगदीं ठेंचल्यासारखीं चेंदामेंदा झालेलीं होतीं. छाती व पोटावरील घावांत अंगावरील रक्तानें माखलेले कपडे खोल शिरलेले होते. या माणसास उपचार करावयाचा तरी कसा व कोण-कोणत्या ठिकाणीं. एखाद्या निष्णात डॉक्टरासमुद्धां भांबावून सोडण्या-इतक्या असंख्य आणि तीव्र अशा या जखमा होत्या. अशा स्थितींत उपचार करण्याकरितां या इसमाचे कपडे काढावयाचे तरी कसे हा प्रश्न होता. जर कोणीं कपडे काढण्याचा प्रयत्न केला तर त्या जखमी

जपान्यास किती तीव्र वेदना होत असतील याची कल्पना केली म्हणजे अजूनही अंगावर शहारे येतात. तो इसम शांतपणें पडल्या पडल्या नेताजींकडे वर पाहत त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देत होता. नेताजी उभ्या उभ्या त्याच्याकडे खालीं वांकून पाहत, त्याच्याशीं अधुनमधून कांहीं बोलत होते. दुसऱ्या बाजूस डॉक्टर व एक दोघे त्याचा कोट काढण्याकरितां त्याचा हात उचलून धरण्याचा प्रयत्न करूं लागले तेव्हां तो जपानी गृहस्थ शांतपणें व इंग्रजींत म्हणाला, " नका ...नका, मला फार वेदना होत आहेत. मला कांहीं करूं नका. मला फक्त विषारी इंजेक्शन देऊन या वेदनांतून मृत्यु लवकर सोडवून नेईल असें कांहींतरी करा. मलमपट्टीचा कांहीं उपयोग होणार नाहीं. विनाकारण तुम्हांला त्रास अन् मला त्रास. " डॉक्टर व डॉक्टरांच्या इतर सहकाऱ्यांस असें सांगत असतांच इकडे तो नेताजींनीं विचारलेल्या प्रश्नांचींही उत्तरें देत होता. रक्तस्रावामुळें क्षीण झालेला आवाज व वेदनांमुळें कपाळावर दिसणाऱ्या कांहीं आठ्या यापलीकडे त्याच्या हावभावांत व स्वरांत कांहीं फरक झालेला नव्हता. प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेंतून बोलतांना व तीव्र वेदना होत असतांनाही त्यानें जो सोशिकपणा व मनाची जी शांति दाखविली ती खरोखर वाखाणण्यासारखी होती. मनाची अशा प्रकारची तयारी लहानपणापासूनच व्हावी लागते. खरी राष्ट्रीय वृत्ति व वीरता ज्यांचे अंगीं बाळपणापासूनच वाढीस लागते त्यांसच हें शक्य आहे. या वृत्तीची लागवड, जोपासना व वाढ आपल्या मुलांबाळांत करणें हें सर्व आईबापांचें, पालकांचें व थोरामोठ्यांचें कर्तव्य आहे. रामायण, महाभारत किंवा आधुनिक इतिहास यांच्यांतील स्फूर्तिदायक कथा सांगण्याचें सोडून मुलांस उगाच कावळ्या-चिमण्यांच्या व वाघ-शेळ्यांच्या गोष्टी सांगणाऱ्या सुशिक्षितांस म्हणावें तरी काय ? त्यांस ' सुशिक्षित ' म्हणण्याचा अट्टाहास धरलाच तर ' सु ' आणि ' शिक्षित ' या दोन्ही शब्दांचा अर्थ बदलावा लागेल. पंचतंत्र अथवा हितोपदेश यांतील गोष्टी सांगून मुलांस योग्य वळण आणि शिस्त लावणें, त्यांचे स्वभावांत सत्यप्रियता व न्यायाची आवड उत्पन्न करणें, नाना उपाय योजून

त्यांस धीट बनविणें, ते पराक्रमी वीर होतील अशा तऱ्हेचा प्रयत्न करणें, हें प्रत्येक राष्ट्राच्या वडील पिढीचें कर्तव्य आहे. एक पिढी आपलें कर्तव्य करण्यास चुकली तर पुढील पिढी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अत्यंत हीन व निकस अशी निपजते. आपल्या प्रत्येक हालचालींत, कृतींत व बोलण्यांत आपली कांहीं एक विशिष्ट राष्ट्रीय जबाबदारी असते हें ज्याला दक्षणीं जाणवतें तोच राष्ट्राचा खरा नागरिक म्हटला जातो. कितीशा हिंदी लोकांना अशी जाणीव असते हें ज्यानें त्यानें स्वतःवरून पडताळून पहावें.

पहांटेच्या सुमारास सतांग नदी पार करून आम्हीं त्या नदीच्या दक्षिण तीरावरील जंगलांत तळ दिला हें वर आलेंच आहे. आमच्या मागोमाग स्वातंत्र्य सरकारचे दरबारीं असलेले जपानी वकील श्री. हाचिया हेही आम्हाला येऊन मिळाले. त्यांच्या स्वागतार्थ तशा त्या परिस्थितींतही नेताजींनीं भाताची खीर करविली होती हें पूर्वीं एकदां आलेलेंच आहे, व तेच दिवशीं दुपारीं वर वर्णन केलेला भीषण हवाई हल्ला झाला. हवाई हल्ला संपल्यावर एक देखणा जपानी तरुण, शर्ट व पँट घातलेला असा, नदी पार करून त्या जंगलांतून नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा शोध करीत आमच्या छावणीचा पत्ता लावण्याचा प्रयत्न करीत येत होता. तो श्री. हाचिया यांच्या वकिलातींतील एक कार्यकर्ता होता. पीछेहाटीच्या गडबड-गोंधळांत व वाटेंतील अनेक प्रकारच्या अडीअडचणी व कामें यामुळें इतरांपासून त्याची फारकत होऊन तो मागें राहिलेला होता. प्रसंग सांपडतांच तो नदी पार करून आला व त्याला श्री. हाचिया यांचा शोध लावून त्यांचे तुकडींत पुन्हा सामील व्हावयाचें होतें. त्यांनी सांगितलेल्या कामाबद्दलही त्याला त्यांचेशीं बोलावयाचें होतें. श्री. हाचिया हे नेताजींच्या छावणींतच असावेत असा त्यानें तर्क केला. त्या जंगलांत हिंदी स्वातंत्र्य सैन्याच्या विमानविरोधक तोफखान्याचा तळ पूर्वींपासून असल्यामुळें या तुकडीचे लोक त्यास त्या जंगलांत अधूनमधून भेटले म्हणजे तो जपानी त्यांस ‘ नेताजी कोठें आहेत ?’ असें इंग्रजीत विचारी. आमच्या या

अशिक्षित शिपायांस इंग्रजी भाषेचीं दोनचार वाक्येंच येत होतीं. या जपान्यास तर हिंदुस्थानी भाषा अजीबात येत नव्हती. जपान्यांस ज्याप्रमाणें पाश्चात्यांचा गोरा रंग व हिंदी माणसाचा गोरा रंग यांतील फरक कळत नसे तद्वतच आमच्या या अशिक्षित हिंदी शिपायांस इंग्रजी बोलणाऱ्या गोऱ्यागोमट्या शर्टपँट घातलेल्या जपान्यांत व पाश्चात्यांत सहजासहजीं भेदाभेद करतां येत नसे. ब्रह्मदेशांत ते वेळीं हेरांचा अतोनात सुळसुळाट झालेला होता त्यामुळें प्रत्येकाची वृत्ति संशयित झालेली. नेताजींचा तपास करणारा हा कोण गोरा भामटा, असें दोन स्वातंत्र्यसैनिकांस वाटलें. परस्परांना एकमेकांच्या भाषा अवगत नसल्यामुळें उभयपक्षीं स्पष्ट विवरण शक्य नव्हतें. त्या जपान्याचा इंग्रजींत तोच प्रश्न पुनः पुनः ऐकून त्या हिंदी सैनिकांचा संशय बळावत चालला. त्यांनीं त्या जपान्यास पकडण्याचा प्रयत्न केला. मुकाट्यानें कोणाचेही कैदी बनणें हें जपानी क्षात्रवृत्तीस लांछनास्पद असल्याचें प्रत्येक जपान्याच्या पूर्णपणें गळीं उतरविलें गेल्यामुळें तो जपानी त्यांचेपासून लांब पळून जाऊं लागला. त्या दोघांनीं त्याला कैद करून नेताजींच्या अथवा श्री. हाचिया यांच्यासमोर न्यावें ही कल्पनाच त्या जपान्यास कशीशी वाटली. " तूं सहजासहजीं यांचा कैदी होण्यास हातांत काय बांगड्या भरल्या होत्यास ? " अशीच सर्व कनिष्ठ-वरिष्ठ जपान्यांनीं त्याची हेटाळणी केली असती म्हणून तो दूरदूर पळूं लागला. यामुळें त्या हिंदी सैनिकांचा संशय अधिकच बळावला. हा आपले हातून पळून निसटून जाणार असें जेव्हां त्या दोघां सैनिकांनीं पाहिलें तेव्हां एकानें आपल्या कमरेला लटकाविलेली संगीन म्यान्यांतून काढून त्या जपान्याचे मागोमाग पळत त्याचेवर एकामागून एक पडतील तसे घाव घालण्यास सुरवात केली. शेवटीं तो पळण्यास असमर्थ झाल्यावर त्यास शत्रूचा हेर म्हणून त्या दोघां स्वातंत्र्य-सैनिकांनी उचलून नेताजींच्या समोर आणला. चौकशीअंतीं तो हेर नसून श्री. हाचिया यांचा एक सहकारी असल्याचें कळलें.

समजुतीच्या घोटाळ्यामुळें उगाच एक जपानी घायाळ झाला होता. तो जिवंत राहण्याचीही आशा नव्हती. त्याची ती दशा पाहून नेताजींचें हृदय व्यथित झालें. सर्व हकीगत कळाल्यानंतर त्यांनीं त्या

दोघां हिंदी सैनिकांस अधिक चौकशी होऊन त्या प्रकरणाचा काय तो निकाल लागेपर्यंत नजरबंद करण्याची आज्ञा दिली. पुढें कांहीं दिवसांनीं त्या प्रकरणाची पूर्ण चौकशी झाल्यावर त्या दोघां हिंदी सैनिकांस निर्दोष म्हणून सोडून देण्यांत आलें. परंतु तेवढ्यापुरती तरी नेताजींची परिस्थिति फार बिकट झाली होती. हवाई हल्ल्यानें त्यांच्या तुकडींतील एक तरुण अधिकारी दोन तासांपूर्वींच जायबंदी झाला होता व आतां तर या जपान्यास हिंदी शिपायांनी घायाळ केलें होतें. या दुसऱ्या प्रकरणाचे घोर आंतरराष्ट्रीय परिणाम होण्याची पुष्कळ शक्यता होती. नेताजी अशा वेळीं यत्किंचितही डगमगले नाहींत. जखमी इसमाबद्दल पूर्ण सहानुभूति दाखवून त्यांनीं आक्रमक हिंदी सैनिकांस पुढील चौकशीसाठीं अटकेंत ठेवलें. जपान्यांचेंही यामुळें समाधान झालें. याहून आणखी कांहींच करणें शक्य नव्हतें. नेताजींच्या हृदयांतील दुःखाची छायामात्र त्यांचे चेहेऱ्यावर स्पष्टपणें दृग्गोचर होत होती. मात्र कपाळाला हात लावून खिन्न अथवा किंकर्तव्यमूढ होऊन बसण्याची त्यांस संवय नव्हती. जखमी इसमास अखेर प्रेमाचे व धीराचे चार शब्द बोलून त्यांनीं त्यास डॉक्टरांच्या स्वाधीन केलें व लगेच पुढील कार्याला ते लागले.

नेताजींनीं मला बोलाविणें पाठविल्याचें वर सांगितलेंच आहे. मी येथें येऊन पोहोंचल्याचें त्यांनीं पाहिलें व सुमारें अर्धापाऊण तासानंतर हें प्रकरण मिटल्यावर ते माझ्याशीं बोलूं लागले. तेच दिवशीं रात्रीं दोन वाजण्याचे सुमाराला झांशीराणी पथकाच्या पंचेचाळीस स्त्री-सैनिकांची एक तुकडी नदी पार करून येणार होती. पुढील वाहनांची वगैरे व्यवस्था न लागल्यामुळें सतांग नदीच्याच दक्षिण तीरावर दोनतीन दिवस रहावें लागण्याचा संभव होता. आम्ही ज्या ठिकाणीं तळ दिला होता तें ठिकाण सुरक्षित नव्हतें हें त्या दिवशींच्या भयानक हवाई हल्ल्यावरून सिद्ध झालेंच होतें. अर्थात् येणाऱ्या झांशीराणी पथकाच्या स्त्री-सैनिकांची कोठेंतरी जवळपास राहण्याची व जेवणाची व्यवस्था करणें भाग होतें. तेथून सुमारें चार मैलांवर असलेल्या एका खेडेगांवीं हिंदी स्वातंत्र्य-संघाचें काम बघणारे एक बंगाली गृहस्थ नेताजींस

भेटण्याकरितां तेथें आलेले होते. झांशीराणी पथकाच्या छावणीकरितां शेजारच्या खेड्यापाड्यांत एखादी सुरक्षित जागा शोधून तेथें रात्री दोन वाजण्याचे आंत पंचेचाळीस स्त्री-सैनिकांस राहण्याजोगी छावणी तयार करण्याचें काम त्यांनीं माझ्यावर सोंपविलें. रंगूनहून निघाल्या-पासून मलेरियाचा आजार, सामान पाठीवर घेऊन रातोरात चालण्याचे श्रम, औषध नाहीं, पौष्टिक आहार नाहीं, विश्रांति नाहीं व त्या दिवशींच्या हवाई हल्ल्यानंतर झालेली धांवपळ यांमुळें मला इतका थकवा आलेला होता कीं, रात्र पडून आपल्याला विश्रांति केव्हां मिळेल याच विवंचनेंत मी होतों. अशा परिस्थितींत अंगावर आलेलें हें काम बिकटच होतें. आधीं आपलें सर्व सामान डोक्यावर घेऊन या नवपरि-चित गृहस्थाबरोबर चार मैलांवरच्या त्या खेड्यांत जावयाचें, तेथें सर्व प्रदेशाची पहाणी करून छावणीस योग्य आणि सुरक्षित ठिकाण कोणतें हें ठरवायचें, त्यानंतर कुदळी, फावडीं, चटया, लांकडें, फळ्या, खिळे इत्यादि सामान जमवून माणसें गोळा करून रात्रीं दोन वाजण्याचे आंत छावणी उभारण्याचें काम म्हणजे एक अरिष्टच होतें. परंतु एखाद्या पराक्रमी व निःस्वार्थी नेत्यानें आपणाकडे सोंपाविलेल्या कामगिरीस नाहीं म्हणणें कोणाही सहृदय माणसास शक्यच नसतें. उलट अशा नेत्यानें आपणावर काम सोंपविल्याबद्दल व त्याच्या विश्वासास आपण पात्र असल्याबद्दल तशा परिस्थितींतही आनंदच वाटतो. येवढे इतर अधिकारी उपलब्ध असतांना आपल्यालाच या कामाकरितां निवडलें अशाबद्दल अभिमान वाटतो. शारीरिक सहनशीलतेची परिसीमा झाली असतांना देखील वर वर्णिल्याप्रमाणें माझ्या भावना असल्यामुळें मी निघालों, अंगीकृत कार्यांतील अडचणी डोळ्यांपुढें काजव्याप्रमाणें चमकत होत्या तरी केवळ नेताजींवरील निष्ठेनें मी निघालों व रात्रीं दोन वाजेपर्यंत खरोखरच सर्व कार्य पूर्ण झालें.

वर उल्लेखिलेला दुपारचा भीषण हवाई हल्ला चालू असतांना इतर सर्व लोक खंदकांत गेले किंवा नाहीं याचें नेताजींनीं निरीक्षण चाल-विलें. डॉक्टर × × × यांनीं नेताजींसही खंदकांत चलण्याचा आग्रह केला तेव्हां ते म्हणाले, “ मला मारूं शकणाऱ्या विमानाचा अजून

इंग्रज किंवा अमेरिकनास शोध लागलेला नाहीं म्हणून मी खंदकांत गेलों नाहीं तरी चालण्यासारखें आहे.” येवढा दांडगा आत्मविश्वास व धैर्य त्यांचे अंगीं होतें.

कसल्याही परिस्थितींत यत्किंचितही न डगमगतां त्यांतून आपलें ध्येय गांठण्याचा मार्ग शोधून काढणें अथवा त्या प्रयत्नांत मृत्यु आल्यास तोही आनंदानें पत्करणें हें वीरवृत्तीचें एक महत्त्वाचें अंग आहे. जगांतील कोणत्याही वीरपुरुषास ही कसोटी लावून पहावी. अडचणींचा डोंगर दुर्लंघ्य समजून ध्येयप्राप्तीबद्दल निराश होईल तो वीर नाहींच. औरंगजेबाच्या कैदेंत सांपडलेल्या शिवछत्रपतींचें किंवा वन्य पशूंप्रमाणें रानोमाळ फिराव्या लागणाऱ्या महाराणा प्रतापचें उज्ज्वल उदाहरण पहा. सर्वस्वाचा होम झाल्यावरही ध्येयप्राप्तीकरितां त्यांचे प्रयत्न चालूच राहिले. इंग्रजांस हैराण करून सोडणाऱ्या फ्रेंच सम्राट नेपोलियनमध्येंही आपल्याला हेंच स्वभाववैशिष्ट्य प्रामुख्यानें दिसतें. अद्वितीय पराक्रम गाजविणारी झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्यां-तही वीरवृत्तीचें हें अंग आपणांस स्पष्टपणें दिसून येतें. नेताजी सुभाष-चंद्र बोस यांच्या वीरवृत्तीसही आपण ही कसोटी लावून पाहूं. ब्रह्मदेश सोडून इ. स. १९४५ सालच्या मे महिन्याच्या १५ तारखेस नेताजी इतर चारशें कार्यकर्त्यांसह सयामची राजधानी बँकॉक येथें येऊन पोंचले. त्याच महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत जर्मनीचा चुराडा झाल्याचें वर्तमान त्यांस समजलें. रानांतून पीछेहाट करतांना कोणत्याही आधु-निक साधनांच्या अभावीं त्यांस त्या अवधींतील महत्त्वाच्या घडामोडी समजल्या नव्हत्या. जपानचा सर्वनाश लवकरच होणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं होतीं. हिंदी स्वातंत्र्यसेनेच्या दोन डिव्हिजन्स ब्रह्मदेशांत अडकून पडलेल्या. उरलेली एक डिव्हिजन मलाया द्वीप-कल्पांतच ठेवण्याचा जपान्यांशीं करार झालेला होता. कोणीकडूनही आशेचा एकसुद्धां किरण येण्यासारखा नव्हता. अशा परिस्थितींत नेताजी झाले म्हणून ते तरी काय करणार आहेत असेंच सर्वांस वाटलें. परंतु अशा वेळींही नेताजींनीं जी वृत्ति दाखविली तिनें अति-पूर्वेंतील सर्व हिंदी लोक स्तंभितच झाले.

अतिपूर्वेत प्रत्येक महिन्याच्या २१ तारखेस स्वातंत्र्य सरकार-स्थापनेचा दिवस साजरा केला जात असे. ता. २१ मे १९४५ रोजीं नेताजी बँकॉक शहरीं असल्यामुळें तेथील स्वातंत्र्य-दिनाचे सभेत त्यांचें भाषण होतें. आतां काय शेवटल्या सारवासारवीशिवाय नेताजी आणखी काय सांगणार असाच सर्वांनीं तर्क केला. अर्थात् त्या दृष्टीनें तरी ते काय म्हणतात तें ऐकून घ्यावें अशा विचारानेंच बहुधा सर्व हिंदी लोक या सभेस हजर होते. नेताजींशिवाय स्वातंत्र्य-चळवळींतील इतर सर्व लोक पूर्णपणें निराश झाले होते. चार वर्षांचा आत्यंतिक शारीरिक व मानासिक ताण आतां सर्वांस असह्य झाला होता. कसेंही का होईना युद्ध लवकर संपणार ना; बस, गंगेंत घोडे न्हाले अशा प्रकारचा मूक आनंद सर्वांस होत होता. परंतु नेताजींनीं या प्रसंगीं जी गर्जना केली त्यामुळें घोड्यावरचें खोगीर उतरवून पारतंत्र्याच्या घोंगडीवर कांहीं काळ सुखनिद्रा घेण्याच्या विचारांत असलेल्या हिंदी लोकांस आश्चर्याचा एक धक्काच बसला. “ तुम्हांला काय वेड लागलें आहे कीं काय ? वर सारलेल्या बाह्या सैल सोडून युद्ध संपल्याचा सुस्कारा सोडण्याच्या तयारींत तुम्ही दिसतां...तुम्हांला जनाची नाहीं तर निदान मनाची तरी कांहीं ×× आहे कीं नाहीं ? तें कांहीं नाहीं, चला, फिरून कंबर बांधा. आपलें ध्येय साध्य झाल्याशिवाय आपलें युद्ध संपलें असें तुम्ही कसें समजूं शकतां ? इतर राष्ट्रांशीं तुम्हांला काय करावयाचें आहे ? त्यांच्याशीं तुमचा काय संबंध ? त्यांच्या लढण्यावर किंवा स्वस्थ बसण्यावर तुम्ही तुमचें स्वातंत्र्य अवलंबून ठेवणार कीं काय ? तसें जर असलें तर हिंदुस्थान केव्हांही स्वतंत्र होणार नाहीं. ‘ जो दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला ’ हें लक्षांत ठेवा. तुमची वीरवृत्ति जागृत ठेवा. गुलामीचें लांछनास्पद जीवन जगण्यांत काय अर्थ आहे ? मरण तर कोणालाच चुकत नाहीं, मग पराक्रम करून तरी मरा. तुम्ही तुमच्या कर्तव्याला जागलांत याबद्दल इतिहास तुम्हांला धन्यवाद देईल.... ” अशाच प्रकारचा सर्वस्वीं अनपेक्षित असा दिव्य स्फूर्तिसंदेश नेताजींनीं हिंदी लोकांस दिला म्हणून हें त्यांचें भाषण जगांतील सर्व परतंत्र लोकांस नेहमींकरितां

मार्गदर्शक होईल यांत शंका नाहीं. नेताजींच्या वीरवृत्तीचें एक उत्तम द्योतक या नात्यानें हें भाषण चिरस्मरणीय आहे. प्रत्येक हिंदी माणसानें या भाषणाचे पडसाद स्वहृदयांत घुमत ठेवले तर त्या व्यक्तीचे देशभक्तीस कधींन् कधीं तोंड फुटल्याशिवाय राहणार नाहीं. तें भाषण येणेंप्रमाणें :—" मित्रहो ! जर्मनीचा चुराडा झालेला आहे. जपानचाही कदाचित् कांहीं दिवसांनीं पाडाव होईल. आम्हांला ब्रह्मदेश सोडावा लागला. ब्रह्मदेशांत आमचें दोन-तृतीयांश सैन्य अडकलें आहे हें सर्व खरें आहे. इंग्रजधार्जिणे लोक आतां तुम्हांला असें सांगतील कीं, अशा परिस्थितींत आम्हींही शस्त्र खालीं ठेवून कपाळाला हात लावून बसावें. जयाची आशा नसतांना लढण्यांत काय अर्थ आहे? असें म्हणून ते तुमचा उपहास करतील, तुम्हाला हंसतील, वेड्यांत काढतील; परंतु अशा लोकांच्या बोलण्यानें तुम्हीं भारावून किंवा भांबावून जाण्याचें कांहीं कारण नाहीं. एखाद्या गोष्टीचें ज्यांस वेड लागलेलें असतें अशाच माणसांच्या हातून जगांतील भरीव कामगिरी होत असते. उगीच वाटेल त्याला ती साधत नाहीं. जर्मनीची मदत खुंटली, जाऊं द्या. उद्यां जपानही हरलें तरी तुमचें चित्त व्यग्र होऊं देऊं नका. निर्बल आणि असहाय बनून निराश होण्याचें मुळींच कारण नाहीं. हिंदुस्थानावर इंग्रजांचें स्वामित्व प्रस्थापित होऊन सुमारें सव्वाशें वर्षें झालीं. या अवधींत हिंदी देशभक्तांनीं स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न अखंड चालू ठेवलेले आहेत. त्या वेळेस त्यांनीं कधीं इतर राष्ट्रांच्या मदतीची अपेक्षा केली नाहीं किंवा ते हताश होऊन बसले नाहींत. उलट मी तर असें म्हणेन कीं, जपान व जर्मनीसारख्या बलाढ्य राष्ट्रांची मदत असतांना आपले प्रयत्न शिथिल झाले असते तर तें क्षम्य होतें; परंतु आतां तर आपणांस कोणीच त्राता उरला नाहीं. आपल्याला इंग्रजांसारख्या बलवान् शत्रूशीं एकटेंच लढावयाचें आहे हें ओळखून निष्क्रिय बनण्याचें तर दूरच राहिलें, आपण आतां जास्त निकरानें लढावयाचा निश्चय केला पाहिजे. कदाचित् आपल्या हयातींत हें कार्य पूर्ण होणार नाहीं, परंतु जगांतील पुष्कळशीं कार्यें अशीं असतात कीं, आपण आपल्याकडून आटोकाट प्रयत्न केल्याचें समाधान आपल्यास

लाभलें म्हणजे झालें. आपण केलेल्या कार्याच्या जोरावर पुढील पिढीस स्वातंत्र्य प्राप्त करून घेणें सोपें जाईल; पण निराश होऊन प्रयत्न करण्याचेंच सोडून दिलें तर मग कार्याची सुरवातही होणार नाहीं आणि त्याची पूर्ति तर कधींच होणार नाहीं.

"आपण हरलों असें जर कोणी तुम्हांला सांगितलें, तर तें खरें नाहीं. शत्रूचें अजस्र मनुष्यबळ व युद्धसामुग्री यामुळें रणांगणावर अनेकदां पिछेहाट करावी लागली किंवा आपण त्याखालीं चिरडले गेलों तर त्याला पराजय म्हणतां येणार नाहीं. जें शारीरिकदृष्टया अशक्य होतें त्याला पराजय म्हणतां येत नाहीं. परंतु जो निराश झाला, ज्यानें प्रयत्न करण्याचें सोडून शत्रूला शरण जावयाचें ठरविलें त्यालाच यथार्थानें 'पराजित' असे म्हणतां येईल. इ. स. १९१४ ते १९१८ पर्यंतच्या महायुद्धांत दोस्त राष्ट्रांच्या संयुक्त सेनेचे सेनापति जनरल फॉक यांनीं युद्धशास्त्रासंबंधींच्या त्यांच्या पुस्तकांत असा निर्वाळा दिलेला आहे कीं, एखाद्या सेनेला रणांगणावर कितीही वेळां माघार घ्यावयास लावली तरी ती सेना हरल्याचें गृहीत धरतां येणार नाहीं. "आपला आतां जय होणें शक्य नाहीं ... लढण्यांत काय अर्थ आहे? ... घरीं जाऊन आराम करावा ..." अशी ज्या सेनेची मनोवृत्ति होईल तीच हरली असें समजावें ...' वाघाला कितीही जखमा झाल्या तरी दांतीं तृण धरून तो कधींही शरण येणार नाहीं. जिवांत जीव असेपर्यंत तो केव्हांही अंगावर झडप घालण्यासच सिद्ध राहील; कारण त्याची मनोवृत्तिच तशी. प्रत्येकाची देशभक्तिही अशा प्रकारची हवी. आपण स्वदेशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीकरितां लढत असतांना धीर सोडण्याचें कांहीं कारण नाहीं. आपण एका उदात्त ध्येयाकरितां लढत आहोंत. जें आपलें आहे, तेंच आपणांस परत घ्यावयाचें आहे; दुसऱ्याचें कांहींच हिरावून घ्यावयाचें नाहीं. अर्थात् तुमचा धीर जोंपर्यंत खचणार नाहीं व तुमची वृत्ति जोंपर्यंत जागृत राहील तोंपर्यंत तुम्ही 'पराजित' नाहीं, हें निश्चित समजा.

"एकंदर परिस्थितीचें अवलोकन करतां जयाची कांहीं आशा नाहीं असें जर कोणी म्हणेल तर तेंही खरें नव्हे. वास्तविक आपला मार्ग

योग्य कीं अयोग्य, न्याय्य कीं अन्याय्य येवढेंच आपण पहावें. अमुक एक मार्ग योग्य व न्याय्य असें म्हटल्यावर त्या मार्गानें यशाचें शिखर गाठण्यांत आपण कितपत यशस्वी होऊं हा प्रश्न खऱ्या ध्येयनिष्ठ माणसाचे मनांत उद्‌भवतां कामा नये. तरी पण त्याही दृष्टीनें विचार केल्यास आपल्याला हमखास जय मिळेल असें मी ठांसून सांगू शकतों; मात्र आपल्या प्रयत्नांत हयगय होतां कामा नये. इ. स. १९१६ सालीं इंग्रज व जर्मन लोकांचें तुंबळ युद्ध जुंपलें होतें. सर्व बळ पणाला लावूनही इंग्रजांचें नाक प्रत्येक अघाडीवर ठेंचलें जात होतें. जर्मनी-ची दर ठिकाणीं सरशी झालेलीच ऐकूं येई. ही संधि साधून इंग्लंड-पासून एका हांकेवर असणाऱ्या आयर्लंड या चिमुकल्या राष्ट्रानें स्वातंत्र्याची घोषणा केली व इंग्रजांविरुद्ध जोराची मोहीम सुरू केली. त्यांनीं स्वतःचें स्वातंत्र्य सरकार स्थापलें. इतरत्र इंग्रजांस 'दे माय धरणी ठाय' होत असतांनादेखील इंग्रजांनीं अवघ्या महिन्यादीड महिन्यांत आयर्लंडच्या स्वातंत्र्यचळवळीस ठेंचून टाकलें. तें आज 'ईस्टर रिबेलियन' म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. याचे उलट इ. स. १९२२ सालीं, जेव्हां इंग्रजांना दुसरें कांहींच व्यवधान नव्हतें, इंग्लंडनें चार वर्षांपूर्वीच जर्मनीवर विजय संपादन केलेला होता, जगांत सर्वत्र शांतता नांदत होती, व इंग्लंडला आपली सर्व शक्ति आयर्लंडविरुद्ध एकवटणें शक्य होतें, अशा वेळेस आयर्लंडनें पुन्हा स्वातंत्र्ययुद्धाची घोषणा केली आणि आश्चर्य हें कीं, आयर्लंडसारख्या लहान राष्ट्रापुढें इंग्लंडनें हात टेंकून आयर्लंडचें स्वातंत्र्य कबूल केलें. म्हणूनच, 'आतां काय जागतिक युद्ध लवकरच संपणार, मग इंग्लंडला हिंदुस्थानची काय पर्वा! केव्हांच आमच्या स्वातंत्र्यचळवळीस ते चेंचून टाकतील' असें म्हणणाऱ्या लोकांची विचारसरणी तुम्ही मान्य करूं नका. आयर्लंडचें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवा...दुसरें एक उत्कृष्ट उदाहरण द्यावयाचें म्हणजे ग्रीस व तुर्कस्तान यांच्या लढाईचें. ग्रीक लोकांनीं तुर्कांवर हल्ला चढवून सबंध तुर्कस्तान पादाक्रांत करीत थेट तुर्कस्तानच्या राजधानीपर्यंत तुर्कांस मागें रेटलें. आतां फक्त एकाच अखेरच्या हल्ल्याची गरज होती. तुर्कस्तान ग्रीक

लोकांच्या घशांत पडणार अशी सर्वांची खात्री झाली. गोष्टी या थराला येऊन ठेपल्यावर तुर्की लोक गेलेला सर्व प्रांत पुन्हा मिळवूं शकतील असें कोणास स्वप्नांतही वाटणें शक्य नव्हतें. तरी पण चमत्कार व्हायचा तो झालाच. मुस्ताफा केमालपाशानें तुर्की लोकांस धीर दिला. तशा स्थितींतही निराश होण्याचें कांहीं कारण नसल्याचें त्यानें सर्व जनतेस सांगितलें. त्यांनीं तशा आणीबाणीच्या प्रसंगीं ग्रीक सेनेवर एक जोरदार हल्ला चढविला आणि आश्चर्य हें कीं, विजयी ग्रीक सेनेला ते वेळीं प्रथमच माघार घ्यावी लागली. त्यानंतर एकामागून एक अनेक निश्चयी हल्ले चढवून तुर्की सेनेनें ग्रीक फौजेस मागें रेटीत रेटीत तुर्कस्तानच्या सरहद्दीपार पळवून लावलें. गेलेला सर्व प्रांत त्यांनीं परत मिळविला. या उदाहरणावरूनही तुम्हांस हेंच दिसेल कीं, वरपांगीं जी परिस्थिति निराशाजनक वाटते ती निश्चयाच्या बळानें व वीरवृत्तीनें आपणांस अनुकूल करून घेतां येते. आशेचा एकही किरण सर्वसामान्य जनतेस कोठें दिसत नसतांना नेटानें प्रयत्न करीत राहिल्यास कांहीं काळ हाताबाहेर गेल्यासारखें वाटणारें प्रकरण पुन्हा आवांक्यांत येतें, येवढेंच नव्हे तर तें पूर्णपणें यशस्वी करून दाखवितां येतें...प्रत्येक महायुद्ध संपल्यावरसुद्धां परतंत्र राष्ट्रांस स्वतःचें स्वातंत्र्य परत मिळविण्याची एक नामी संधि येत असते. महायुद्ध संपल्यावर केव्हां एकदां घरीं जाऊन पडतों असेंच सर्व सैनिकांस वाटूं लागतें. युद्धकालांत लोकशाही राष्ट्रेंसुद्धां सुलतानशाही गाजवून स्वतःचे सैनिकांस व नागरिकांस मारून मुटकून युद्धासाठीं कंबर बांधण्यास लावतात. स्वतःचीं घरेंदारें सोडून परप्रांतीं हालअपेष्टांत व प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेंत जीवन कंठणारे शिपाई युद्ध संपतांच स्वगृहीं परतण्यास अधीर होतात. सैनिकांस घरच्या माणसांबद्दलची ओढ लागलेली असते, तर उलट घरची मंडळी लढाईवर गेलेल्या आप्तेष्टांची चिंता करीत असतात. लढाईच्या कालांत मुद्दाम दडपून ठेवलेल्या असंख्य प्राणहानीच्या याद्या प्रसिद्ध होतात. प्राणहानि व वित्तहानीचें भीषण दृश्य सर्वांस भेडसावून सोडतें. दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे उत्पादनाकडे युद्धकालांत दुर्लक्ष झाल्यामुळें व युद्धकालांतील

नासधुशीमुळें बऱ्याच वस्तु दुर्मिळ होतात व उरलेल्या वस्तूंच्या किंमती सर्वसामान्य जनतेच्या आवांक्याबाहेर वर चढतात. जीवन नकोसें होतें. लष्करी जीवनाचा तर सर्वांस अगदीं वीट आलेला असतो. लष्करांतून काढल्या जाणाऱ्या सैनिकांस नोकऱ्या न मिळाल्यामुळें दंगेधोपे, चोऱ्या, दरवडे, संप इत्यादींची विजयी राष्ट्रांत वावटळ उठून, विजयश्री फार महाग पडल्याचें त्यांच्या निदर्शनास येतें. अशा वेळेस या राष्ट्रांचेविरुद्ध उठून स्वातंत्र्यघोषणा करणाऱ्या परतंत्र राष्ट्रांस स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याची उत्कृष्ठ संधि येते. हें युद्ध आतां लवकर संपणार असें जरी तुम्हांला वाटत असलें तरी स्वातंत्र्यप्राप्तीची वेळ निघून गेली असें मात्र समजूं नका. युद्धोत्तर नव्या संधीचा योग्य उपयोग करून घेण्याची तयारी करा...कसल्याही परिस्थितींत जिवांत जीव असेतोंवर आपण लढत राहूं, शरण जाणार नाहीं किंवा हताशही होणार नाहीं हें लक्षांत ठेवा ..." असें नेताजींनीं सर्व हिंदी लोकांस बजाविलें. सामान्य जनांस अत्यंत निराशाजनक वाटणाऱ्या परिस्थितींत नेताजी सुभाषचंद्र बोस यांचें तें वीरश्रीपूर्ण भाषण ऐकून सर्व श्रोतृवृंद आश्चर्यानें थक्क झाला. एखादा पहाड खालून कोणीं पोखरावा व आतां अंगावर ढांसळणारच अशा भावनेनें भोंवतालच्या लोकांनीं त्याकडे पाहत रहावें; येवढ्यांत कोणीं त्याला आपल्या करांगुलीच्या आधारानें थोपवून धरावें, इतका आश्चर्यकारक आधार नेताजींच्या वीरवृत्तीनें सर्व लोकांस मिळाला. तानाजीच्या मृत्यूनें धीर सोडून सैरावैरा पळूं लागलेले मराठे ज्याप्रमाणें सूर्याजीच्या निर्वाणीच्या उद्गारांनीं भानावर येऊन चेवानें लढण्यास पुढें सरसावले, त्याचप्रमाणें आपला पराजय झाला असें समजून रणांगणांतून पळूं पाहणाऱ्या हिंदी लोकांस नेताजींच्या शब्दांनीं पुन्हा परत फिरविलें. "तुमचा पराजय झालेला नाहीं. कोण म्हणतो तुम्ही पराजित आहां म्हणून ?" असा सरळ सवाल नेताजींनीं सर्व हिंदी लोकांचे समोर टाकल्याबरोबर या सर्व लोकांनीं सर्व परिस्थितीचें या नव्या दृष्टीनें परीक्षण करण्याचें ठरविलें. नेताजींच्या धीरोदात्त संदेशानें त्या सर्वांस दिव्य दृष्टि प्राप्त करून दिलेली होती. या दिशेनें जों जों विचार करावा

तों तों खरोखरच प्रत्येकास असें वाटूं लागलें, " अरेच्या...खरेंच कीं ! आपला पराजय झाला असें आपण समजत होतों, पण कोणीं आपल्याला पराजित केलें ? आणि कधीं केलें पराजित ? छे ... आपल्याला कांहीं भ्रम झाला असावा किंवा स्वप्न पडलें असावें. बरें झालें नेताजींनीं आपल्याला वेळींच जागें केलें म्हणून, नाहीं तर आपण खुळचटासारखे स्वातंत्र्यरण सोडून, पाठ फिरवून अगदीं पळ काढण्याच्या विचारांत होतों." " चला, परत फिरूं या..." असाच सर्व हिंदी लोकांनीं तेथल्या तेथें निग्रह केला.

हिंदी स्वातंत्र्ययुद्धाची प्रत्यक्ष घोषणा व त्या दिशेनें जय्यत तयारी जरी ऑक्टोबर २३, १९४३ रोजीं झाली असली तरी स्वातंत्र्य-सेनेनें प्रत्यक्ष हल्ल्यास इ. स. १९४४ च्या फेब्रुवारी महिन्याच्या ४ तारखेस सुरवात केली. पहिला हल्ला सुभाष तुकडीनें केला. ह्या तुकडीनें हल्ला सुरू करण्याचे अगोदर अघाडीवर जाऊन नेताजींनीं त्यांचेसमोर एक भाषण केलें. भारत-ब्रह्मदेश अघाडीवरील पर्वतवेष्टित अशा एका रानांत मधोमध तिरंगी ध्वज उभारला होता. त्या ध्वजाचे एका बाजूस व्यासपीठावर नेताजी उभे होते. त्यांचेसमोर ध्वजाचे पलीकडे सुभाष तुकडीचे लोक शिस्तींत उभे होते. नेताजी म्हणाले, " वीरांनो, उद्यां पहांटे तुम्ही आपल्या रक्तसिंचनानें स्वातंत्र्ययुद्धाची मुहूर्तमेढ रोंवणार आहांत. त्या झाडीच्यापलीकडे त्या पर्वतशिखरांच्या आड तुमची पवित्र मातृभूमि आहे. त्या दिशेला आपल्या मातृभूमीकडे जरा नजर टाका. तिच्याच मृत्तिकेचे आपले पिंड बनलेले आहेत. आपल्या मातृभूमीची करुणावस्था, परक्यांच्या छळणुकीनें तिनें फोडलेला टाहो तुम्हांला ऐकूं येत आहे ना ! ज्या भारतमातेनें आपल्याला इतके दिवस येवढ्या वात्सल्यानें पाळलें आणि पोसलें तिच्याकरितां... तिच्या मुक्ततेकरितां आपले प्राण पणाला लावणें हें आपलें कर्तव्य आहे... यांत कुचराई करूं नका, घाबरूं नका, धीर सोडूं नका. आपल्या मातृभूमीच्या मुक्ततेची ती पवित्र घटि दरक्षणीं जवळ येत आहे. या पवित्र कार्याची ही मुहूर्तमेढ व्हावयाची आहे हें तुमचें महद्भाग्य आहे. मारूं किंवा मरूं अशा निश्चयानें या रण-

कुंडांत उडी घ्या. तुमच्या मातृभूमीचा व परमेश्वराचा तुम्हांला आशीर्वाद आहे." वीरश्रीपूर्ण अशा या भाषणानें तेथें जमलेल्या सर्व स्वातंत्र्यवीरांचे बाहु स्फुरण पावूं लागले. नेताजींचा हा निर्वाणीचा संदेश सर्वांचे कानांत घुमत राहिला व तुंबळ रणसंग्रामाच्या रूपांत त्याचे ध्वनि दुसरे दिवसापासून त्या पर्वतमय वनराजींत निनादित होत राहिले.

स्वातंत्र्ययुद्धास सुरवात करण्यापूर्वी १९४३ सालअखेर स्वातंत्र्य-सेनेच्या तुकड्या अघाडीकडे कूच करूं लागल्या त्या वेळीं सिंगापुरांत झालेल्या जाहीर सभेंत नेताजींनीं सर्व हिंदी जनतेस सांगितलें, " माझे शिपाई रणांगणावर लढत असतांना माझें स्थान त्यांचेजवळ राहील, येथें नव्हे. ते अघाडीवर लढत असतांना मला येथें मागें बसून चालणार नाहीं, तरी मी येथून अघाडीवर गेल्यावर मला मागच्या कारभाराची काळजी राहणार नाहीं इतक्या चोख रीतीनें तुम्हीं तो संभाळला पाहिजे."

नेताजी सुभाषचंद्र बोस हे इतर सर्व वीरपुरुषांप्रमाणें खरे मातृ-भक्त होते तरी अंध मातृप्रेमानें त्यांस कर्तव्यच्युत कधींच केलें नाहीं. मातेबद्दल आत्यंतिक जिव्हाळा व खरें प्रेम त्यांच्या हृदयांत वसत होतें. स्वगृहाच्याभोंवतीं इंग्रजांचा कडेकोट बंदोबस्त असतांना नेताजी सुभाषचंद्र हे युक्तीनें त्यांतून पसार झाले त्या वेळीं त्यांचे शेजारचे कक्षेत त्यांची माता राहत असे. तरी त्यांनीं आपलें गुपित स्वतःच्या मातेसही सांगितलें नाहीं. कर्तव्य हें निष्ठुर असतें. प्रेमाचें पाणी त्यांत झिरपूं दिलें तर सर्वच डोलारा कोलमडून पडावयाचा. इतर सर्व मुलांचें जीवन सुरळीतपणें चाललेलें असतांना या एका शूर, धाडसी, उपद्व्यापी व संन्यस्त वृत्तीच्या मुलाबद्दल त्यांच्या मातेचे मनास जास्त काळजी वाटणें साहजिकच आहे. सुभाषचंद्रांची राज-कारणांतील धडाडी व स्वदेशाकरितां ते घेत असलेले शारीरिक कष्ट यामुळें त्यांचेबद्दल त्यांचे मातेस काय वाटत असेल याची ज्याची त्यानेंच कल्पना करावी. आपली माता वारल्याचें दुःखद वर्तमान सुभाषचंद्रांस इ. स. १९४५ सालच्या मे महिन्यांत बँकॉक शहरीं

कळलें. मातेच्या मृत्यूनें त्यांस फारच हळहळ वाटली. ते म्हणाले, "मी हिंदुस्थानांतून बाहेर पडलों तेव्हां माझ्या मातेकरतांच माझा जीव राहून राहून तुटत होता. मृत्यूसमयीं मीं मातेजवळ असावें, तिच्या म्हातारपणीं माझ्या वियोगाचें दुःख तिला सहन करावें लागूं नये येवढी एकच माझी इच्छा होती. तिचें अंतिम दर्शन...तिची माझी शेवटली भेटही होऊं शकली नाहीं, याचेंच मला वाईट वाटतें. माझ्या मनांत भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची वैयक्तिक अशी एकमेव कोणती भावना असेल तर ती हीच. दुर्दैवानें तीही सफल होऊं शकली नाहीं. असो. परमेश्वराची इच्छा!" इतकें वाईट वाटून-सुद्धां त्यांनीं शोक करण्यांत स्वातंत्र्यकार्याचा एकसुद्धां क्षण फुकट जाऊं दिला नाहीं. ते तडक पुढच्या कामाला लागले.

इ. स. १८५७ नंतर हिंदी स्वातंत्र्य-चळवळीस एक विशिष्ट वळण लागलें. मारामारीनें अथवा कापाकापीनें स्वातंत्र्य मिळविणें हें अत्यंत अश्लाघ्य ठरलें. पुरातन हिंदी संस्कृतीबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला. नवें तें सगळें चांगलें भासूं लागलें. इंग्रजांची सनदी नोकरी, त्यांच्या पदव्या, त्यांनीं बहाल केलेलीं पदकें अथवा केवळ त्यांचा कृपाकटाक्ष मिळविण्यांत लोक धन्यता मानूं लागले. अल्प लोकांचा स्वल्पसा स्वार्थ साधत असला तरी देशाचा आर्थिक पाया खचत असल्याचें व हळूहळू भारतीय लोक भिकेस लागत चालल्याचें निदर्श-नास येऊं लागलें. सभा, ठराव आणि नम्र मागण्या सुरू झाल्या. यानें काम भागत नाहीं असें पाहिल्यावर जरा धिटाईच्या मागण्या सुरू झाल्या. कारागृहवास हें महत्पाप समजलें जात असतांनाही कांहींनीं कारागृहवासाचें लांछन पत्करण्याचें दिव्य अंगीकारलें. पुढें केवळ धिटाईच्या मागण्यांनींही काम भागणार नाहीं असें पाहिल्यावर कांहीं तरी सामुदायिक चळवळीची कल्पना निघाली. सशस्त्र सामुदायिक चळवळ म्हणजेच युद्ध. परंतु त्याकरितां कोणाजवळ शस्त्रेंही नव्हतीं व तीं हातीं घेण्यास अंगीं धैर्यही नव्हतें. सर्व जनता निरुत्साही, अज्ञानी, हतबल व निष्क्रिय झालेली होती. अशा स्थितींत मिळमिळीत निःशस्त्र चळवळी, निदर्शनें, असहकार, बहिष्कार इत्यादींचे प्रकार

निघाले. या प्रकारांनीं निदान कारागृहवासाची भीति लोकांचे मनांतून पार निघून गेली व कैद भोगणें हें देशभक्तीचें पारितोषिक समजण्यांत येऊं लागलें. देशभक्तीस असें अगदीं वेगळ्या तऱ्हेचें वळण लागलें असतांना नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं स्वातंत्र्यप्राप्तीचा लुप्त झालेला मंत्र पुन्हा हिंदी लोकांस ऐकविला. ते म्हणाले, " कांहीं एका मर्यादेपर्यंत निःशस्त्र निदर्शनें वगैरे ठीक आहेत, परंतु शेवटीं सशस्त्र युद्धाशिवाय दुसरें गत्यंतर नाहीं. प्रत्येक वस्तूला एक विशिष्ट मोल असतें. रक्त हें स्वातंत्र्याचें मोल आहे. रक्त सांडल्याशिवाय स्वातंत्र्य कधींही मिळणार नाहीं. तुम्ही रक्त सांडण्याची तयारी करा, मी तुम्हांला स्वातंत्र्य मिळवून देण्याची हमी देतों." स्वातंत्र्यप्राप्तीचा हा शिलालेख हिंदुस्थानच्या इतिहासांत अनेक वेळां लुप्त झाला. हतबल मनोवृत्तीच्या ढिगाखालीं दडलेला हा शिलालेख विक्रमादित्य, चंद्रगुप्त, अशोक, राणा प्रताप, शिवाजी, झांशीची राणी लक्ष्मीबाई आदि अनेक वीरांनीं वेळोवेळीं उकरून काढून तो लोकांचे नजरेस आणला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं प्रचलित युगांत हेंच कार्य केलें. वीरपुरुषाचीं सर्व लक्षणें त्यांच्या स्वभावांत व कृतींत स्पष्टपणें दिसतात. " आणा भाका करून किंवा भीक मागून अथवा मरणाला भिऊन कोठें स्वराज्य मिळतें काय ! तें कांहीं नाहीं, चला माझ्या-बरोबर समरांगणांत." असा युगप्रवर्तक संदेश त्यांनीं सर्वांस दिला. कोट्यवधि बांधव अहिंसेच्या आडमार्गानें निःशस्त्र निदर्शनांच्या रानांत वाट चुकले असतांना त्या सर्वांचे विरुद्ध आपणांस पटलेलें तत्त्व सर्वांचे गळीं उतरविण्याचा प्रयत्न एकट्यानें करणें व तरीसुद्धां स्वजनांचा पाठिंबा मिळत नाहीं असें दिसल्यावर, देशोधडीला लागून, आपल्याला लाथाडणाऱ्या जनतेच्याच स्वातंत्र्याकरितां तिचे डोळे दिपविणाऱ्या स्वातंत्र्ययुद्धाचा चमचमाट तीस दाखविणें हें केवढें वीरकार्य नेताजींनीं केलें ! व म्हणूनच जगप्रसिद्ध स्वयंस्फूर्त वीर पुरु-षांच्या मालिकेंत त्यांचें स्थान अढळ आहे.

# नेताजींचा सात्त्विक संताप

हिंदी स्वातंत्र्ययुद्धाची सुरवात होण्याचे अगोदर स्वातंत्र्य-सेनेच्या तुकडया जेव्हां अघाडीचे रोखानें पाठविण्याचें ठरलें तेव्हां नेताजींनीं सर्व सैनिकांस वारंवार अनेक भाषणांतून बजावलें कीं, " तुमच्यापैकीं कोणी मरणाला अथवा अघाडीवरील हालअपेष्टांस भीत असेल तर त्यानें तसें स्पष्ट सांगावें. मरणाची भीति वाटते हें कबूल करण्यांत लाज वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. प्रत्येक प्राणिमात्रास मरणाचें भय स्वभावतःच वाटतें. त्यामुळें तुमच्यांतील कमीपणा लोकांचे निदर्शनास येईल असेंही वाटूं देऊं नका. उलट मी तर असें म्हणेन कीं, हालअपेष्टांत व मरणाच्या खाईत जाण्यास तुम्हांला धीर होत नाहीं हें कबूल करण्याइतकी सचोटी तरी तुमच्यांत आहे. स्वातंत्र्य-युद्धाच्या दृष्टीनें यांत आम्हांला असा फायदा होणार आहे कीं, मरणास भिणारे लोक अघाडीवर पाठवून कामचुकारपणा अथवा फितुरी होण्याचें संकट टळेल. उलट तुमच्याजोगतेंही इकडे पिछाडीस पुष्कळसें काम आहे. हें काम करण्यास कोणी तरी लोक लागतातच. म्हणून तुमच्यांत वीरश्री नसली तरी त्याबद्दल वाईट वाटून घेऊं नका. स्वदेशाकरितां कांहीं तरी कार्य आपलें हातून व्हावें ही तळमळ व कार्यतत्परता अंगीं असणें हे तरी कांहीं कमी प्रतीचे गुण नाहींत. तुम्हांला

मागें ठेवून येथील कार्य तुमच्याकडे सोपविण्यांतही आमचें कांहींच नुकसान नाहीं. प्रत्येकास रुचेल, पचेल व झेपेल असें भरपूर काम आमच्येकडे असल्यामुळें प्रत्येकाचे वृत्तीस मानवणारें काम ज्यानें त्यानें घेतल्यामुळें एकंदर कार्य उत्कृष्ट रीतीनें पार पडेल. परंतु कांहीं कारणानें आपली भ्याड वृत्ति अथवा आपले दोष तुम्हीं आतां लपवून ठेवून, वेळेला कामचुकारपणा करून, भेदरून अथवा फितूर होऊन जर स्वातंत्र्यकार्याचा घात केलात, तर तें मात्र मला कधींही खपणार नाहीं हें ध्यानांत ठेवा. येवढ्याकरतांच मी ही संधि तुम्हांला देत आहे.

मनुष्यस्वभावांतील स्वाभाविक गुणदोषांची उत्तम पारख असल्यामुळें नेताजींनीं दूरदृष्टीनें व उदारपणें सर्व स्वातंत्र्यसैनिकांस वर उल्लेखिल्याप्रमाणें आगाऊच सूचना दिलेली होती. तरीसुद्धां फितुरीचे कांहीं निंद्य प्रकार अघाडीवर घडलेच. गेल्या शें-सव्वाशें वर्षांतील हिंदी लोकांची बनलेली गुलामी वृत्ति व या स्वातंत्र्ययुद्धाचें सर्वांगीण परीक्षण या दोन्ही दृष्टींनीं घडलेले फितुरीचे प्रकार हे अगदीं तुरळक व क्षुल्लक होते. अतिपूर्वेंत रिक्रूट झालेल्यांपैकीं तर एकही सैनिक इंग्रजांस फितूर झाला नाहीं. कारण ते देशसेवेच्या एकाच भावनेनें स्वातंत्र्यसेनेंत शिरलेले होते. इंग्रजांबद्दल त्यांस विशेष प्रेम वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें. परंतु सिंगापूरच्या पाडावानंतर युद्धबंद्यांपैकीं जे वीस हजार सैनिक स्वातंत्र्यसेनेंत सामील झाले होते त्यांपैकीं वेळोवेळीं प्रसंग साधून एकूण कांहींतरी ५०-६० लोक इंग्रजांस फितूर झाले. हे पूर्वी इंग्रजांचे लष्करी नोकरींत असल्यामुळें इंग्रजांचे विरुद्ध लढल्याबद्दल इंग्रजांचा जय झाल्यावर ते आपणांस फांशी देतील असाच या लोकांचा समज झाला. शिवाय मनांतूनही त्यांस इंग्रजांबद्दल जिव्हाळा वाटत असे. फितूर झालेल्या लोकांत अधिकारी लोकांचाच जास्त भरणा होता. शिपाई बिचारा अज्ञानी असल्यामुळें साध्या आणि सरळ स्वभावाचा असतो. छक्केपंजे शिकण्यास व त्या दृष्टीनें विचार करण्यास त्यास परिस्थितीचें यथार्थ ज्ञान

नसे. अधिकारी लोक आपल्या ज्ञानाचा स्वार्थी वृत्तीनें उपयोग करीत व स्वार्थ साधेल त्या बाजूस झुकण्याची त्यांची प्रवृत्ति असे. फितु-रीच्या या प्रकारांपैकीं एका विशिष्ट प्रकारानें तर नेताजींस फारच धक्का बसला. इ. स. १९४५ च्या मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेस हिंदी स्वातंत्र्यसेनेची 'दुसऱ्या नंबरची जी डिव्हिजन' होती त्या डिव्हिजनच्या प्रमुख मध्यवर्ती कचेरीचे चार प्रमुख अधिकारी पहा-णीच्या मिषानें प्रत्यक्ष गोळीबार चालत होता त्या ठिकाणीं गेले. त्यांच्याबरोबर त्यांचे पांचसहा हस्तकही होते. या हस्तकांत एक-दोन कनिष्ठ अधिकारी असून इतर खालच्या दर्जाचे सैनिक होते. वर उल्लेखिलेले चारी प्रमुख अधिकारी 'मेजर'च्या हुद्याचे अधिकारी होते. एकाएकीं हे लोक इकडे कां आले? असा प्रश्न अघाडीवर लढणाऱ्या कांहीं स्वातंत्र्यसैनिकांच्या मनांत उभा राहिला. तरी पण ते अधिकारपदावर असल्यामुळें इतर सैनिकांस उघडपणें तो प्रश्न त्यांस करतां येईना. 'साहेब' पहाणीसाठीं आले आहेत असें बोललें जाऊं लागलें. परंतु पहाणीसाठीं म्हणावें तर कनिष्ठतम सैनिकापासून तो या उच्चतम अधिकाऱ्यापर्यंतच्या श्रेणीचे मधले कांहीं अधिकारी त्यांचेबरोबर असावयाला पाहिजे होते ते नव्हते. बरें 'पहाणी-' करितां हे आले असें मानावें तर त्यांच्या एकंदर हालचालीवरून व रंगढंगावरून यांची 'पहाणी' साऱ्या मुलखा-वेगळीच भासूं लागली. कांहीं एका मर्यादेपर्यंत यांनीं इतर थोडया शिपायांस व अधिकाऱ्यांस आपल्याबरोबर येऊं दिलें. नंतर या चार प्रमुख अधिकाऱ्यांच्या फितुरीच्या कटांत जे लोक सामील नव्हते त्यांस तेथेंच थांबावयास सांगून हे आठदहा लोकच आणखी थोडे रानांत गेले व तेथें आपल्या खिशांतील पांढरे रुमाल काढून डोक्यावर गरगर 'गरगर फिरवीत त्यांनीं इंग्रजी साम्राज्यसेनेच्या रोखानें 'सुबाल्या' केला. इतर स्वातंत्र्यसैनिक या प्रकाराकडे विस्फारित नेत्रांनीं पाहतच राहिले.

हां हां म्हणतां ही बातमी नेताजींचे कानांवर गेली. रागानें त्यांचा थरकांप झाला. त्या वेळीं ते रंगूनमध्यें होते. फितूर होणाऱ्या इसमांचीं

नांवें देऊन त्यांचा कडक शब्दांत निषेध करणारें एक पत्रक त्यांनीं काढलें. तें पत्रक त्यांनीं स्वातंत्र्यसैन्याच्या व संघाच्या सर्व कचेऱ्यांत व लष्करी शिक्षणकेंद्रांत पाठविलें. या फितुरीच्या प्रकाराविरुद्ध तीव्र निषेध प्रदर्शित करणारे परिणामकारक कार्यक्रम आंखून ते पार पाडण्याबद्दल सर्वांस आज्ञा देण्यांत आली. फितूर झालेल्या लोकांच्या विकृत आकृति गाढवांवर अधिष्ठित करून त्यांच्या मिरवणुकी काढणें, त्या आकृतींची जाहीर होळी करणें, निषेधपर कडक व्याख्यानें व सर्वांस त्यापासून बोध घ्यावयास सांगणें वगैरे कार्यक्रम जाहीर रीतीनें सर्व ठिकाणीं झाले. सर्व केंद्रांच्या व कचेऱ्यांच्या या प्रसंगींच्या कार्यक्रमांचे खुलासेवार अहवाल नेताजींकडे त्वरेनें पाठविण्यांत यावे अशी सर्वांस आज्ञा दिली गेली होती. या प्रसंगावर निंदाव्यंजक काव्यें व नाट्यें झालीं. तीव्रतम निषेधप्रदर्शक कार्यक्रमास बक्षीस ठेवण्यांत आलें. फितुरांच्या आकृति लष्करी छावण्यांच्या मध्यभागीं उभ्या करून त्यांस सर्व सैनिकांनीं लाथा व थपडा मारण्याचेही प्रकार झाले. रंगून शहरीं नेताजींचें या प्रसंगीं जाहीर व्याख्यान झालें. अतिपूर्वेंतील कांहीं शेलक्या प्रक्षोभकारक प्रसंगांपैकीं नेताजींस हालवून सोडणारा असा हाच सर्वांत महत्त्वाचा प्रसंग होता. या घटनेवर जों जों विचार करावा तों तों त्यांच्या अंगाचा नुसता दाह होत होता. जणुं काय रंगून शहरीं त्या दिवशीं जाहीर सभेंत भाषण करण्यास व्यासपीठावर उभे राहिलेले नेताजी एखाद्या खवळलेल्या सागराप्रमाणेंच भासमान होत होते. अस्तमानच्या सूर्याप्रमाणें त्यांचा चेहरा लालभडक परंतु उदासीन होता. अनावर संतापाच्या धगीनें त्यांचा चेहरा तापून लाल झाल्यासारखा दिसत होता. डोळ्यांत तर संतापाच्या ज्वाला भडकतांना दिसत होत्या. संताप अनावर झाल्यामुळें त्यांच्या सर्वांगाचा थरकांप व्याख्यान संपल्यावरही कांहीं काळ थांबला नाहीं. कोणत्या शब्दांत या देशबुडव्या लोकांचा निषेध केला म्हणजे माझ्या भावनांचें तीव्र स्वरूप या लोकांचे लक्षांत येईल अशा विचारानेंच जणुं काय त्यांनीं अनेक तीव्रतर शब्द योजून पाहिले. ते म्हणाले, "आपल्या देशाच्या दुर्दैवी परिस्थितीकडे डोळेझांक करून इतक्या नीचपणें फितूर होतांना

या लोकांना लाज कशी वाटत नाहीं ? तरी मी आधीं सांगत होतों कीं, आघाडीवर जाण्याची छाती नसेल तर पिछाडीचें काम घ्या. स्वातंत्र्यसेनेंत राहणें अंतिम स्वार्थाचे दृष्टीनें धोक्याचें वाटत असेल तर स्वातंत्र्यचळवळींतून अंग काढून घेऊन युद्धबंद्यांत जाऊन बसा. शूरवीर होणें सर्वांनाच साधत नाहीं, परंतु शब्दाला जागण्याची माणुसकी तर माणसाच्या अंगांत पाहिजेच. स्वातंत्र्यचळवळींत स्वखुषीनें आल्यावर मग वेळेला अवसानघात करण्याचा हीनपणा पशूंचे हातूनसुद्धां होत नाहीं. अशा फितूर देशबुडव्या लोकांचेपेक्षां पशु बरे. सापासारखे ऐन वेळेला उलटून चावा घेणारे हे लोक तावडतोब शोधून नाहींसे केले पाहिजेत. या कामीं मदत करणें व असे लोक आमच्या निदर्शनास आणणें हें प्रत्येक स्वातंत्र्यसैनिकाचें कर्तव्य आहे. यापुढें अघाडीवरील सर्व सैनिकांस माझी अशी आज्ञा आहे कीं, आपल्याकडील कोणीही शत्रूस फितूर होत आहे असें दिसतांच त्यास तावडतोब तेथल्या तेथें गोळी घालून ठार करण्यांत यावें. दयेचा किंवा इतर कोणतेही विचार आड येऊन अनमान करण्याचें कारण नाहीं. बेदरटपणाची सीमा झाल्यावर आम्हांलाही कडक उपाय योजायलाच हवेत, त्याशिवाय काम भागणार नाहीं......"

वरील प्रसंगीं दिसले इतके क्रुद्ध नेताजी अतिपूर्वेंत कधींच दिसले नाहींत ; कारण त्यांच्या निष्पाप व एकवचनी बाणा असलेल्या मनास भ्याडपणापेक्षांसुद्धां वरपांगी मित्रत्वाच्या पोटांत भ्याडपणाची कट्यार खुपसून एकाएकीं त्या मित्रत्वाचा मुडदा पाडण्याचें दुःख जास्त होत असे. तरीपण आणखी एकदोन जाहीर प्रसंगींही त्यांच्या हृदयाचा प्रक्षोभ अतिपूर्वेंतील हिंदी जनतेच्या निदर्शनास आलेला होता. इ. स. १९४३ च्या ऑगस्ट महिन्याची १५ तारीख होती. अतिपूर्वेंतील बऱ्याचशा देशांचा दौरा संपवून नेताजी चार दिवसांपूर्वींच सिंगापुरास परतले होते. अतिपूर्वेंतील अनेक देशांत वसणाऱ्या हिंदी लोकांची व नेताजींची ही पहिलीच भेट असल्यामुळें व सिंगापूर हें हिंदी स्वातंत्र्यचळवळीचें सुरवातीचें मध्यवर्ती केंद्र असल्यामुळें नेताजींनीं अतिपूर्वेंतील आपल्या पहिल्या दौऱ्याचा अनुभव व त्यावरून पुढील

कार्याची मनांत आंखलेली रूपरेषा सिंगापुरांतील हिंदी जनतेस सांगणें आवश्यक होतें. याच उद्देशानें वर उल्लेखिलेल्या तारखेस सिंगापुरांतील फॅरर पार्क मैदानांत सायंकाळीं सहा वाजतां नेताजींचें जाहीर व्याख्यान होतें. अलोट जनसमुदाय लोटलेला होता. बरोबर सहा वाजतां नेताजी आले. त्यांस लष्करी सलामी देण्यांत आली. झेंडावंदन व राष्ट्रगीत झाल्यावर ते व्यासपीठावर गेले. टोकियोस जपानचे पंतप्रधान जनरल टोजो यांचे भेटीस गेलेले ब्रह्मदेशाचे प्रसिद्ध देशभक्त डॉक्टर बा मॉ हे रंगूनच्या वाटेवर सिंगापुरास त्याच दिवशीं येऊन उतरले होते. साहजिकच ते नेताजींचे बंगल्यावर नेताजींची भेट घेण्यास गेले. ब्रह्मदेशांतील युद्धपूर्व व युद्धोत्तर हिंदी लोकांच्या परिस्थितीबद्दल त्यांचें बोलणें झालें. तदनंतर डॉक्टर बा मॉ हे नेताजींसह फॅरर पार्कवरील नेताजींच्या जाहीर व्याख्यानास आले. डॉक्टर बा मॉ यांच्याकडून कळलेल्या बातमीनें नेताजींची मनोवृत्ति प्रक्षुब्ध झाली होती. आपल्या भाषणांत ते म्हणाले, "येथें माझ्याशेजारीं बसलेले डॉक्टर बा मॉ यांनीं जें वृत्त मला सांगितलें ते कोणाही स्वाभिमानी माणसास संतापजनक असेंच वाटेल. इ. स. १९४२ सालच्या मार्च महिन्याचे सुमारास इंग्रजांनीं ब्रह्मदेशांतून खुष्कीच्या मार्गानें हिंदुस्थानांत पीछेहाट केली. यांत्रिक वाहनांच्या साह्यानें त्यांनीं त्यांचें लष्कर काढून नेलें. ते पळतातसें पाहून आमचे लाखों हिंदी बांधवही खुळचटासारखे आपलें चंबुगवाळें आटोपून इंग्रजांच्या मागोमाग निघाले. इंग्रजांशीं काय यांचें लग्न लावलें आहे कीं इंग्रज जेथें जातील तिकडे यांनींही पोबारा करावा! यांना कांहीं लाज, कांहीं स्वाभिमान होता कीं नव्हता कोण जाणे! इंग्रज हे जपान्यांस घाबरत असत, म्हणून जपान येत आहे असें पाहून त्यांना पळ काढण्याशिवाय दुसरा कांहीं मार्ग नव्हता. परंतु आम्ही बिचारे गरीब हिंदी लोक, शें-सवाशें वर्षांपासून दासानुदास झालेले. आम्ही कोणाच्या ना देण्यांत ना घेण्यांत. आम्हांला इंग्रज गेले काय आणि जपानी आले काय दोन्ही सारखेंच. आम्हांला कोणाची तरी नोकरी करून पोट भरावयाचें हें आमचें ध्येय. इंग्रज आमचे कांहीं मित्र नाहींत आणि जपानी आमचे

कांहीं शत्रु नाहींत. आम्ही जपान्यांचें काय घोडें मारलें आहे म्हणून त्यांस येतांना पाहून पळावें? परंतु अशा प्रकारचा कांहींएक सारासार विचार न करतां इंग्रजांनीं आम्हांला भेवडावतांच इकडे तिकडे न बघतां धूम ठोकण्याची आमची अत्यंत हीन आणि भेकड मनोवृत्ति झालेली आहे. खाटकालाच आपला पालनकर्ता समजून त्याच्यामागें पळणाऱ्या शेळींत व आमच्यांत काय फरक उरलेला आहे? आमची बुद्धि दर वेळेस कोणाकडे तरी गहाण ठेवून त्याच्या सल्ल्यानें वागण्याची आम्हांला अत्यंत वाईट खोड जडलेली आहे. या मानसिक अवनतीहूनही मला जास्त संताप चढण्याचें कारण म्हणजे इंग्रजांच्या मागोमाग ज्या चार लाख हिंदी लोकांनीं पळ काढला त्यांपैकीं तीन लाख हिंदी लोक असहाय परिस्थितींत अगदीं कुत्र्यासारखे रानांतील वाटेंतच मेले. कोणी तहानेनें व भुकेनें गतप्राण झाले; कांहीं श्रम आणि थकवा यांस बळी पडले; कांहीं हिंस्र पशूंनीं खाल्ले व इतर नाना प्रकारच्या रोगराईनीं आणि साथींनीं मेले. त्यांच्या बरोबरचें सोनें, चांदी, नोटा, पैसे हे रस्त्यांत अस्ताव्यस्त पडले होते. त्याला कुत्राही शिवेना. काय हें मरण! तेंसुद्धां थोड्याथोडक्यांचें नसून तीन लाख लोकांचें. कनवाळू इंग्रजांनीं या लोकांची कोठें कांहीं सोय लावली नाहीं ती? आणि हे लोक हिंदुस्थानांत तरी कोणत्या आशेवर जात होते? हिंदुस्थानांत यांच्याकरितां काय पंचपक्वान्नांचीं ताटें वाढून ठेविलीं होतीं? पण एवढा विचार करतो कोण! इंग्रज पळाले त्यांच्यामागोमाग एक भेकड पळाला...दुसरा पळाला, झाली सुरवात. कां, तर म्हणे जपानी आले म्हणून. वा रे वा! एवढे तीन लाख लोक जर स्वातंत्र्यकार्यार्थ खर्ची पडले असते, तर आज हिंदुस्थान परतंत्र राहिला असता का?" हें भाषण होत असतांना या वार्तेनें नेताजींचा तळतळाट झालेला होता हें स्पष्ट दिसत होतें. ते रागानें लाल झाले असून गर्जून बोलत होते. खऱ्या वीराचा आपल्या बांधवांचा भेकडपणा पाहून संताप अनावर झाला तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. हिंदी लोक रोज लाखोंनीं मरत आहेत व पर्यायानें बऱ्हंशीं ब्रिटिश लोकच त्यास कारण आहेत. असें असतांना रोज फुकट मरणारे हे हिंदी लोक जर

एकवटून लढावयास सिद्ध होतील तर स्वातंत्र्यप्राप्तीस कांहींच वेळ लागणार नाहीं, हा विचार त्यांस राहून राहून बेचैन करून सोडी.

तिसऱ्याही एका जाहीर प्रसंगीं नेताजींच्या चित्तवृत्तीचा असाच प्रक्षोभ झालेला दिसला. अतिपूर्वेतील एकंदर परिस्थितीचें अवलोकन करून, त्या प्रदेशांत स्वातंत्र्ययुद्धाची उत्तम प्रकारें तयारी करतां येईल असें जेव्हां नेताजींस दिसून आलें तेव्हां त्यांना अत्यानंद झाला व त्यांनीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त करण्याचें ठरविलें. इतकी उत्तम संधि हातीं आलेली वायां जाऊं देऊं नये असें त्यांनीं अतिपूर्वेतील हिंदी लोकांस परोपरीनें वारंवार बजावलें. सर्व हिंदी लोकांनींही भारताच्या भवितव्यतेच्या दृष्टीनें आतां आपल्या संसाराची, घरादारांची व व्यापारव्यवसायाची पर्वा न करतां स्वतःचें जीवितसर्वस्व पणास लावावें असें नेताजींस राहून राहून वाटे. कांहीं धनिकांच्या नेहमींच्या मनोवृत्तीप्रमाणें " आम्ही जास्तींत जास्त १०, किंवा १५ टक्के मिळकतच देशकार्यास्तव देऊं...अमक्यानें इतकेंच दिलें असतांना आम्हीं कां जास्त द्यावें ?" अशी कुरकूर ते करीत असल्याची कुणकूण नेताजींच्या कानीं आली. स्वातंत्र्य सरकार स्थापन झाल्यावर चार दिवसांनीं म्हणजे २५ ऑक्टोबर १९४३ रोजीं धनिकांच्या एका जाहीर सभेंत नेताजी म्हणाले, " इतके टक्के देऊं आणि तितके टक्के देऊं असें टक्क्यांच्या हिशेबानें बोलण्याची ही वेळ नव्हे. रणांगणावर जाणारा सैनिक 'मी अमुक इतके टक्केच प्राण देईन' असें म्हणतो का ? हिंदुस्थानच्या चाळीस कोटि लोकसंख्येला बंधमुक्त करण्याकरितां अतिपूर्वेतील तीस लाखच्या तीस लाख हिंदी लोकांच्या घरादारांची राखरांगोळी व प्राणांची होळी झाली तरी हिंदुस्थानचें स्वातंत्र्य स्वस्तांतच पडलें असें मी समजेन. आपलें वित्त व प्राणसर्वस्व पणाला लावण्याची तुम्ही तयारी करा..." नेताजी अगदीं जीव तोडून व सात्त्विक संतापानें बोलत होते. असंख्य हिंदी लोकांचा पिढ्यान् पिढ्यांचा प्रश्न कायमचा सुटणार असतांना या लोकांस आपापल्या चिमुकल्या संसारांत व स्वार्थी व्यवसायांत घुटमळत राहण्यांत काय शहाणपणा वाटतो कोण जाणे, असेंच नेताजींस वाटे.

# इतर विविध स्मृति

नेताजी अतिपूर्वेत आल्यापासून स्वातंत्र्यचळवळीस रंग चढला होता. पेनांग शहरीं असलेल्या गुप्त शिक्षणाच्या शाळेत जरूरीप्रमाणें निरनिराळ्या प्रांतांच्या हिंदी मुलांच्या तुकड्यांस गुप्त कामगिरीचें शिक्षण देऊन त्यांस पुढील कार्याकरितां हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर सोडण्यांत येई. पश्चिम किनाऱ्यावर मलबारी, कोंकणी, गुजराती, काठेवाडी व बलुची लोकांचीच वस्ती असल्यामुळें साधारण त्या त्या भाषा अवगत असणाऱ्यांच्याच वेगवेगळ्या तुकड्या करून त्यांस शिक्षण दिलें जात असे व नंतर त्या त्या विशिष्ट किनाऱ्यानजीक त्यांस सोडण्यांत येई. बलुची पठाणांच्या तुकडीचें शिक्षण संपल्यावर गुजराथी व काठेवाडी भाषा अवगत असणाऱ्यांची एक तुकडी तयार करावयाची होती. माझ्या माहितींतील एखादा विश्वासू गुजराती मुलगा असला तर मीं त्याचें नांव सुचवावें असें नेताजींनीं मला सांगितलें. प्रत्यक्ष माझ्या परिचयाचा असा कोणीच गुजराती तरुण नव्हता म्हणून मीं एके दिवशीं माझ्या अनेक मित्रांस सांगून त्यांचेकरवीं कसून शोध केला. बराच तपास व चौकशी करून नेताजींस हवा होता तसा एका तरुणाचा शोध लागला. दुसरे दिवशीं नेताजी सिंगापुरांतील स्वातंत्र्यसेनेच्या मुख्य मध्यवर्ती कचेरींतून दुपारीं

दोनचे सुमारास घरीं परततांना मला म्हणाले, "काय, कांहीं शोध लागला का?" मीं 'होय' म्हटलें व त्यांच्या सोयीची वेळ विचारून घेऊन तेच दिवशीं दुपारीं चार वाजतां त्या तरुणास नेताजींच्या भेटीस पाठविलें. तदनंतर एके दिवशीं माझी व नेताजींची भेट झाली असतांना ते मला म्हणाले, "अगदीं योग्य माणसाची निवड केली तुम्हीं. माझें अन् त्या तरुणाचें जें बोलणें झालें त्यांत त्याचे विचार वगैरे फार चांगले वाटले मला. तो लागलाय् आतां आपल्या कामाला." येवढेंच मोघम सांगून शेवटीं ते दुसऱ्या विषयाकडे वळले.

नेताजींस इंग्रजांनीं एकूण अकरा वेळां तुरुंगवासास पाठविलें होतें. यांपैकीं एकदां त्यांस उत्तर ब्रह्मदेशांतील मंडाले शहरीं कैद केलें होतें. मंडाले शहराच्या मध्यमागीं एक जुना भरभक्कम असा भुईकोट किल्ला आहे. या किल्ल्याचेभोंवतीं पाण्यानें सदैव तुडुंब भरलेला असा एक रुंद खंदक आहे. याच किल्ल्याचे एका कोपऱ्यांत कै. लोकमान्य टिळक व नेताजी सुभाषचंद्र बोस यांस वेळोवेळीं स्थानबद्ध केलें होतें. नेताजी हिंदी स्वातंत्र्य सरकारचे राष्ट्रपति होऊन हिंदुस्थान-ब्रह्मदेश अघाडीवर स्वातंत्र्ययुद्ध सुरू करण्याकरितां म्हणून जेव्हां मंडालेस येऊन पोंचले तेव्हां साहाजिकच आपण पूर्वीं ज्या जागीं बंदिस्त होतों तें स्थान पहावें अशी त्यांस इच्छा झाली. त्या किल्ल्यावर आतां जपान्यांचा ताबा प्रस्थापित झालेला असून तेथें त्यांचें महत्त्वाचें लष्करी ठाणें होतें. किल्ल्यांतील तें स्थान बघण्याची इच्छा त्यांनीं वरिष्ठ जपानी अधिकाऱ्याजवळ प्रगट करतांच जपानी अधिकाऱ्यानें त्यांस सांगितलें, "आपण होतां त्या कैदखान्यांत आतां एकही हिंदी किंवा आशियाई इसम नसून तेथें बहुतेक सर्व गोरे इंग्रज लोकच भरले आहेत."

रंगूनहून २४ एप्रिल १९४५ रोजीं रात्रीं आम्ही नेताजींसह चारशें जण निघालों. इंग्रजांच्या साम्राज्यसेना रंगूनजवळ येऊन पोंचल्या होत्या. रंगून-पेगू रस्त्यावर पेगूच्या दिशेनें जाणाऱ्या लॉऱ्या, मोटारी, बैलगाड्या व पायदळ तुकड्या यांची रीघ लागली होती. शुक्लपक्षाची रात्र असल्यामुळें शीतल व मंद चंद्रप्रकाशांत चाललेल्या या लष्करी

हालचाली पाहून क्षणभर आपण एखाद्या स्वप्नसृष्टींत आहोंत किंवा काय असा भास होई. एखाद्या यात्रेप्रमाणें सर्व सैनिकांची अनेक विविध वाहनांतून व पायीं एकाच दिशेनें रीघ लागली होती. मागून वेगानें येऊन पुढें जाऊं इच्छिणाऱ्या बऱ्याचशा मोटारी व लॉऱ्या कर्णे वाजवीत मागोमाग येत. कधीं डाव्या बाजूनें तर कधीं उजव्या बाजूनें पुढें निघण्याचा प्रयत्न करीत आणि शेवटीं संधि साधून रस्त्याच्या कडेकडेनें झुकत झुकत भरकन् पुढें निघून जात. आठ लॉऱ्या व तीन मोटारगाड्या येवढयांत आम्ही चारशें लोक होतों. नेताजींची स्वतःची मोटारगाडी आमच्या आठ गाड्यांत सर्वांत शेवटून येत होती. सर्वांत शेवटून येण्यांत, आमचेपैकीं कोणीं मागें राहूं नये हा त्यांचा उद्देश होता. एरवीं कोणाची मोटार बिघडून, वाट न मिळाल्यामुळें, कांहीं दगाफटका होऊन किंवा कोणीं अधिकाऱ्यानें हटकल्यामुळें कांहीं जणांवर मार्गेच राहण्याची पाळी येणें संभवनीय होतें. नेताजींचें सर्व जपान्यांवर विलक्षण वजन असल्यामुळें ते मागें असेपर्यंत आमच्यापैकीं कोणास कांहींही अडचण आली तरी वाटसरू जपानी अधिकारी व आमचेबरोबर असणारे जपानी अधिकारी यांचेकडून सर्व प्रकारें मदत होणें शक्य होतें. एकदां ते पुढें गेल्यावर कोण कोणाची पर्वा करतो! एखादे वेळेस रस्यांतील कांहीं अडीअडचणींमुळें सर्व मोटारी चालतां चालतां एकदम थांबत व अखेरपर्यंत मोटारींची एक अखंड रांग एकदम थांबलेली दिसे. नेताजींची मोटार सर्वांत शेवटीं असल्यामुळें पुढें काय विघ्न आलें आहे हें कळण्यास त्यांना मार्ग नसे म्हणून ते मोटारींतून उतरून पायींच पुढें येत असत. ते उतरले म्हणजे साहजिकच त्यांचे मागोमाग त्यांचे मोटारींत बसलेल्या इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांस उतरून त्यांचेबरोबर यावें लागत असे. आमच्याच आठ गाडयांपैकीं कोणाचें कांहीं बिघडून मागील सर्व गाडयांस थांबावें लागत आहे अथवा आमच्यापुढें असलेल्या अनेक जपानी लॉऱ्यांपैकीं कोणासमोर कांहीं अनपेक्षित विघ्न उभें राहिलें आहे याचा ते जातीनें तपास करीत. धुळीचा एकच लोळ उठत होता, परंतु रात्रीचा समय असल्यामुळें धुळीचा त्रास इतका

जाणवत नव्हता. आमच्याच एखाद्या मोटार-वाहकाचा हलगर्जीपणा दिसला अथवा मोटारी पुढें काढून नेण्यास वाव असतांनाहि तो उगाच रांगेंत थांबला तर नेताजी त्यास हडसून खडसून मोटार पुढें काढण्यास सांगत अथवा त्याच्या हलगर्जीपणाबद्दल त्यास रागें भरत व पुन्हा एकदां सर्व गाडें सुरळीत चालू झालें कीं मग आपल्या स्वतःच्या मोटारींत जाऊन बसत. रंगून सोडावें लागल्यानें नेताजी मनातून जरा चिडले होते व रंगून ते बँकॉक या तीन आठवड्यांचे प्रवासांत, पहिले एकदोन दिवस, प्रवासांतील व्यत्ययांनी त्यांच्या मनांतील ही चीड प्रगट होई.

रंगून शहर इंग्रजांच्या हातीं पडणार तेव्हां नेताजींनीं अखेरपर्यंत रंगूनमध्यें राहण्याचा अट्टाहास धरूं नये असा त्यांच्या वरिष्ठ सहकाऱ्यांनीं नेताजींस सल्ला दिला. नेताजी रंगूनमध्यें इंग्रजांच्या हातांत सांपडले तर अतिपूर्वेंतील हिंदी स्वातंत्र्यचळवळ एकदम स्थगित होईल व ब्रह्मदेश हातचा गेला तरी ते स्वतः असेतोंवर अतिपूर्वेंतील इतर प्रदेशांच्या हिंदी लोकांस उत्तेजित व उत्साहित करून स्वातंत्र्ययुद्ध चालू ठेवतां येईल हें म्हणणें त्यांस पटलें व अखेर इंग्रजी साम्राज्यसेना रंगून शहराचा ताबा घेण्याच्या आंतच तेथून कूच करण्याचें त्यांनीं ठरविलें. इ. स. १९४५ च्या एप्रिल महिन्याच्या २२ तारखेस त्यांचा हा निश्चय झाला. ते दिवशीं रात्रीं दहा वाजतां रंगूनमधील, मी व जगन्नाथराव भोसले राहत असलेल्या न्यूलिन रोडवरील बंगल्यांत ते जेवावयास आले होते. त्यांचा चेहरा उदास व गंभीर दिसत होता. एक शब्दही न बोलतां त्यांचें जेवण आटोपलें. इतके उदास व गंभीर ते पूर्वीं कधींच दिसले नव्हते व जेवतांना कांहीं बोलल्याविना ते बहुधा राहत नसत. परंतु त्यांच्या ध्येयनिष्ठ आयुष्यांत आटोकाट प्रयत्नांतीही दुर्दैव त्यांस मागें ओढूं पाहत होतें. ही गोष्ट त्यांचे मनाला फार लागली होती. “ जें कांहीं करावयाचें तें सर्व मीं केलें आहे. माझ्याकडून जें जें कांहीं शक्य होतें तें तें करण्यांत मीं यत्किंचितही हयगय केलेली नाहीं ... मग हें अपयश कां ! आम्हांला ही माघार कां घ्यावी लागत आहे, आणखी काय केलें

म्हणजे आम्ही यशस्वी होऊं, तें तरी एकदां सांगून टाक म्हणजे आम्ही तेंही करूं." असाच सवाल ते जणुं काय भवितव्यतेस करीत होते.

१९४५ च्या मार्च महिन्यांतील गोष्ट. रंगूनहून नेताजी अघाडी-वरील स्वातंत्र्यसेनेच्या चौक्या-पहाऱ्यांचें निरिक्षण करण्यास गेले होते. इंग्रजी साम्राज्यसेनेनें उत्तरब्रह्मदेश काबीज केला होता. ब्रह्म-देशांतून बरीच जपानी सेना इतर प्रदेशांत लढण्यासाठीं म्हणून काढून नेण्यांत आल्यामुळें ब्रह्मदेश जवळजवळ उघडा पडला होता. ब्रह्मदेशाचा बचाव करण्याइतके मजबूत चौक्या-पहारे कोठेंच नव्हते. ब्रह्मदेश काबीज करण्यास इंग्रजांस वस्तुतः जितका अवधि लागला त्यापेक्षां बऱ्याच कमी अवधींत त्यांस ब्रह्मदेश अगदीं लीलेनें जिंकतां आला असता; कारण त्यांची अजस्र यंत्रसामुग्री, अवाढव्य फौज व अलोट शस्त्रास्त्रपुरवठा यांच्याशीं टक्कर देण्याइतकें जपान्यांजवळ कांहींच नव्हतें; परंतु जपान्यांच्या अप्रतिम शौर्यानें इंग्रजांच्या मनांत इतकी दहशत बसलेली होती कीं, मोकळें मैदान असतांनाही येवढ्या जामानिम्यानिशीं पुढें सरकण्याचा त्यांना धीर होत नसे. "प्रत्यक्ष युद्धअघाडीच्या फार जवळ जाऊं नये!" असें हिंदी स्वातंत्र्यसेनेचे अधिकारी नेताजींस परोपरीनें विनवीत होते; कारण साम्राज्यसेना बिन-विरोध पुढें सरकत सरकत रोज नवीन ठिकाणें पादाक्रांत करीत होती. परंतु नेताजी अघाडीवर आले म्हणजे अघाडीवरील सर्व तुकड्यांस भेट दिल्याविना शक्यतोंवर जात नसत. उत्तर ब्रह्मदेशांत, रंगून ते मंडाले या दक्षिणोत्तर राजमार्गापासून पश्चिमेस सोळा मैलांचे अंतरावर मेकटीला नांवाचें एक गांव आहे. येथें स्वातंत्र्यसेनेच्या कांहीं तुकड्या होत्या. त्यांसही भेट द्यावयाचें नेताजींनीं ठरविलें. मेकटीलाहून दोन-चार दिवस रणरंगासंबंधीं कांहींच बातमी आलेली नव्हती. इंग्रजी सेना जवळ येऊन ठेपली असल्याची बातमी मात्र आलेली होती. अर्थात् मेकटीला केव्हां इंग्रजांचे हातीं पडेल अथवा वेढलें जाईल याचा नेम नव्हता. वरिष्ठ हिंदी व जपानी अधिकारी 'नको...नको' म्हणत असतांना नेताजी मेकटीला गांवीं गेले व नेमकें व्हावयाचें

तेंच झालें. 'मेकटीला'स वळसा घेऊन इंग्रजी फौज रंगून-मंडाले राजमार्गावर येऊन थडकली. या राजमार्गावरून ज्या ठिकाणीं सोळा मैल लांबीचा फांटा 'मेकटीला' गांवाकडे जाई तें ठिकाण इंग्रजांच्या ताब्यांत आलें. नेताजी वेढ्यांत अडकले. यांतून कसें पार पडायचें हा प्रश्न पुढें आला. शेवटीं दोनतीन विश्वासू साथ्यांसह डोक्याला पटका गुंडाळून नेताजी शेतकऱ्याच्या वेषांत बैलगाडींतून निघाले. कोरड्या पडलेल्या भाताच्या शेतांतून बैलगाडीनें वाट काढली व नेताजी पार झाले.

इ. स. १९४४ च्या नोव्हेंबर महिन्यांत टोकिओ शहरीं जपानचा व नेताजींचा जो तह झाला त्याअन्वयें असें ठरलें कीं, स्वातंत्र्य-सेनेची नंबर तीनची डिव्हिजन मलाया द्वीपकल्पांतच रहावी व पुढें-मागें मलायावर जर इंग्रजांनीं आक्रमण केलें तर जपानी फौज व हिंदी सेना या दोघांनीं मलायाचें संरक्षण करावें. या करारान्वयें मलायांतील हिंदी सैन्य जपानी सरसेनापतींच्या आधिपत्याखालीं देणें जरूर होतें. नेताजी सिंगापुरांत परत येण्यापूर्वीच तारेनें, त्यांच्या आज्ञेनुरूप, जगन्नाथराव भोसल्यांनीं हा औपचारिक समारंभ पार पाडला होता. नेताजी सिंगापुरांत आल्यावर त्यांनीं स्वतःचे निवासस्थानीं दक्षिण विभागाचे जपानी सरसेनापति जनरल डोईहारा यांस थाटाचा खाना दिला. जनरल डोईहारा यांचें जपानच्या राजकीय क्षेत्रांत चांगलें वजन होतें. जपानमधील एक उत्तम मुत्सद्दी असा नांवलौकिक त्यांनीं मिळविला होता. मांचूरियांत जपानचें वजन त्यांनींच प्रस्थापित केलें. त्यांचें यथोचित स्वागत करून ते दिवशींचा कार्यक्रम संपल्यावर त्यांना निरोप देण्यास नेताजी खालीं आले. जनरल डोईहारा मोटारींत बसून परत गेल्यावर नेताजी पुन्हा वर जाण्याकरितां म्हणून जिन्यापाशीं परत आले. मी समोरच खालच्या दिवाणखान्यांत बसलों होतों. त्या दिवशींचा समारंभ उत्तम तऱ्हेनें पार पडल्यावर सर्वांस एक प्रकारें भार हलका झाल्यासारखें वाटत होतें. थोडें मोकळेपणीं बोलण्यास नेताजींस वेळ होता. पिछाडीस दिसणाऱ्या समुद्राच्या अखंड लीलांकडे मी पाहत कांहीं तरी विचार करण्यांत गुंग झालों होतों. मला पाहून नेताजी

म्हणाले, "या हो ओक, वर या." ते वर जाण्यास वळले. त्यांनीं परिवेषकास चहा वर घेऊन येण्यास सांगितलें. नेताजींचें बोलणें ऐकून मी वर जाण्याकरितां पाठ वळविली, तरी पण नेताजी अगोदरच पायऱ्या चढूं लागल्यामुळें मीं त्यांचें बोलणें ऐकलें किंवा नाहीं ही शंका त्यांच्या मनांत आली व आपल्या चिटणिसांस त्यांनीं सांगितलें, "ओकसाहेबांना वर बोलावा हो!" मी वर जाण्यास निघालोंच होतों. त्या दिवशींच्या समारंभास हजर असलेले इतर तीनचार अधिकारीही आमच्याबरोबर वर जाण्यासाठीं जिना चढूं लागले. नुकत्याच उरकलेल्या समारंभासंबंधींच आमचें मुख्यतः बोलणें चाललें होतें. त्या दिवशीं माझेंही नेताजींशीं थोडेंसें काम होतें. मी जें "झांशीची राणी" नाटक लिहिलें होतें तें नेताजींना अर्पण केलें होतें; परंतु तें लिहिलें त्या वेळेस नेताजी ब्रह्मदेशांतच होते. या खेपेस ते सिंगापुरास १४ डिसेंबर १९४४ रोजीं विमानांतून सायंकाळीं सहा वाजतां उतरले व ते दिवशींच ७॥ वाजतां म्हणजे अवघ्या दीड तासानंतर "झांशीची राणी" नाटकाचा शेवटचा प्रयोग होता. मी ते दिवशीं नेताजींना घ्यावयास विमानतळावर आलों तेव्हांच त्यांना नाटकाबद्दलची एकंदर हकीकत सांगून, त्यांस प्रयोगास उपस्थित राहण्याचें निमंत्रण दिलें होतें. सहा वाजतां विमानांतून उतरल्याबरोबर त्यांस इतर बरींच महत्त्वाचीं कामें होतीं. तीं सर्व कामें उरकून ते आठ वाजतां नाट्यगृहांत आले. ते आल्याबरोबर प्रयोगास सुरवात झाली. तें नाटक त्यांस फार आवडलें. त्या प्रयोगानंतर थोड्याच दिवसांत जनरल डोईहारांस दिलेला भोजनसमारंभ झाला. भोजनसमारंभानंतर नेताजींस थोडा मोकळा वेळ सांपडेल तेवढ्यांत, मी लिहून त्यांस अर्पण केलेल्या नाटकाच्या प्रती त्यांना सादर कराव्या असें मीं माझ्या मनाशीं ठरविलें होतें व त्याच तयारीनें मी ते दिवशीं त्यांचे निवासस्थानीं गेलों होतों. वर उल्लेखिल्याप्रमाणें उरकलेल्या भोजनसमारंभासंबंधींच्या गोष्टी जेव्हां ओसरूं लागल्या तेव्हां मीं पुढें होऊन "झांशीची राणी" नाटकाच्या इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेंतील प्रत्येकीं एक एक प्रत अशा तीन प्रती नेताजींस सादर केल्या.

नेताजी माझ्या समोरच्याच कोचावर बसले होते. त्यांनीं नाटकाची प्रत पूर्वी प्रयोगाच्या दिवशीं पाहिलेलीच होती. या प्रसंगीं मीं तीन प्रती देतांच त्यांनीं इंग्रजी व हिंदी प्रती चाळून पाहिल्यानंतर त्या प्रती शेजारच्या तिपाईवर ठेवून त्यांनीं सिगारेटचा एक झुरका ओढीत मला विचारलें, " किती उत्पन्न झालें या नाटकाचें ! " मीं म्हटलें, " झालें सत्तर हजार डॉलर्स ( सव्वा लाख रुपये ). " आणि लगेच त्या रकमेची थैली मीं त्यांचे हातांत ठेवली. नेताजींच्या स्वातंत्र्ययुद्धफंडास हें उत्पन्न देत असल्याचें मीं त्यांस सांगितलें. नंतर अधूनमधून त्या नाटकासंबंधीं त्यांनीं मला कांहीं प्रश्न विचारले.

पुष्कळशी मंडळी अवतींभवतीं असतांना नेताजी प्रत्येकाशीं थोड्या थोड्या वेळानें एक एक वाक्य बोलत असत. एका विशिष्ट व्यक्तीशींच एका विषयावर एकसारखें बोलत राहून तिच्या विषयाचा निकाल लावावयाचा अशी नेताजींची संवय नसे. त्यामुळें त्यांनीं कोणाला तरी एखादा प्रश्न विचारावा, थोडा वेळ शांत रहावें, मग लगेच दुसऱ्या कोणत्या तरी विषयावर दुसऱ्याला कांहीं प्रश्न विचारावा, पुन्हा इतर पुष्कळशा विषयांवर इतरांशीं कांहीं प्रश्नोत्तरें झाल्यावर त्यांनीं पहिल्या व्यक्तीस पूर्वीच्या विषयावर पुन्हा एखादा प्रश्न विचारावा असें चाले. यामुळें त्यांच्याशीं गप्पा मारणाऱ्या चारपांच मंडळींची मोठीच पंचाईत होत असे. मागील प्रश्नाच्या अनुरोधानें नेताजी आमच्या एका विषयावर विचार करीत असावेत असें समजावें तोंच अगदीं निराळ्या विषयावर त्यांनीं एकदम एखादा प्रश्न विचारावा असें होई. यामुळें उत्तर देणाऱ्याचा त्या अनपेक्षित प्रश्नानें थोडा गोंधळ उडत असे; कारण एखादा प्रश्न विचारून विषय बदलल्यावर साहजिकच जो तो समजे कीं, आतां या विषयावर पुन्हा कांहीं बोलणें निघणार नाहीं; हा विषय संपला.

सिंगापुरांतील हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या सर्वोच्च मध्यवर्ती कचेरींत नेताजी रोज सकाळीं सुमारें १० वाजल्यापासून दुपारीं १॥ वाजेपर्यंत बसत असत. टोकियोच्या लष्करी अधिकारी तयार करण्याच्या शाळेंत पंचेचाळीस हिंदी तरुण शिक्षित करण्याचें जपानी लष्करी

कचेरीनें अंगीकारलें होतें. हे तरुण अतिपूर्वेतील हिंदी जनतेंतून निवडतां यावे म्हणून अनेक वर्तमानपत्रांतून तशा जाहिराती देण्यांत आल्या होत्या. सोळा वर्षांपासून ते तेवीस वर्षांपर्यंतच्या मुलांचे अर्ज मागविण्यांत आले होते. शिक्षण व वय वगैरे गोष्टी पाहून त्यांतील ६० – ७० मुलांस सिंगापुरास बोलाविण्यांत आलें. ठरलेल्या दिवशीं सकाळीं १० वाजतां हीं सर्व मुलें स्वातंत्र्यसंघाच्या कचेरींत आलीं. बागेंतील मोकळ्या जागेंत तीं मुलें रांगेनें उभीं होतीं. नेताजी १०॥ वाजतां बाहेर आले. सर्व मुलांनीं ताठ उभें राहून "जय हिंद" असें म्हणून नेताजींचें स्वागत केलें. स्मित वदनानें नेताजींनीं त्यांचे अभिवादनाचा स्वीकार केला. लहान मुलें व तरुण यांचे सांनिध्यांत नेताजींस विशेष आनंद होत असे. हीं मुलें पाहिल्यावरही साहजिकच त्यांचें हृदय आनंदानें उचंबळून आलें. इतर स्वतंत्र राष्ट्रांची तरुण पिढी व हिंदी तरुण यांच्यांतील फरक कोणाच्याही नजरेस एकदम जाणवतो. उच्चतम लष्करी शिक्षण घेण्याच्या उद्देशानें तेथें जमलेले आमचे निवडक तरुण ठेंगणे, खुजे, निस्तेज, अशक्त व चष्मा लावणारे असे होते. त्यांच्या आकारावरून व चेहऱ्यावरून त्यांचें अचूक वय सांगणें कोणालाच शक्य नव्हतें. शरीर सुदृढ व तेजःपुंज कसें राखावें याचेबद्दल त्यांचे आईबापांनाही कांहीं कळत नव्हतें, तर या बिचाऱ्यांस त्याची कल्पना कोठून असणार? हिंदी लोकांस स्वतःच्या राष्ट्रीय जबाबदारीची मुळींच जाणीव नाहीं याचें हें आणखी एक उदाहरण आहे. अमेरिका वगैरे स्वतंत्र राष्ट्रें तरुण पिढीस पहिल्या प्रतीची राष्ट्रीय संपत्ति समजतात. याच्या उलट हिंदुस्थानांत आम्ही स्वतः व आमचे परकी राज्यकर्ते दोघेही सजीव शरिरास मातीमोल समजतों. मुलें वयांत येईपर्यंत त्यांच्या शरिरास व स्वभावास योग्य वळण लावणें हें त्यांच्या आईबापांचें व पालकांचें आद्य कर्तव्य आहे. हें जर ते करीत नसतील तर ते भारत राष्ट्राचे गुन्हेगार आहेत. सुदृढ शरीरयष्टीचे दृष्टीनेंही उच्च लष्करी शिक्षणास पाठवितां येण्यासारखा वरील मुलांपैकीं एकसुद्धां इसम नव्हता. तरी पण हिंदी लोकांची सर्वसामान्य शारीरिक अवनति लक्षांत घेऊन व जपानी लोक सर्वसाधा-

रणपणें ठेंगणे असल्यामुळें आमच्या हिंदी तरुणांच्या कमकुवत शरीर-यष्टीकडे डोळेझांक करणें जरूर होतें. इंग्लंड वगैरे पाश्चात्य साम्राज्य-शाही राष्ट्रे केवळ बाह्य दिखाऊ रुबाबावर भर देऊन आजपावेतों गरीब आशियाई जनतेवर राज्य करीत आलीं. त्यांच्या या दिखाऊ सत्तेचा डोलारा अगदीं पोकळ असतो. बाह्य रुबाबावर भर असल्या-मुळें पाश्चात्य राष्ट्रें नगररक्षक व सैनिक म्हणून ज्यांची निवड करीत ते दिसावयास भरभक्कम व रुबाबदार असावेत असा त्यांचा कटाक्ष असे. त्या माणसाची मानसिक तयारी किती आहे, तो धीट व धडाडीचा मनुष्य आहे किंवा नाहीं, याची ते पर्वा करीत नसत. अर्थात् ठेंगण्या किंवा दिसण्यांत सुरूप नसलेल्या इसमास ते अगदीं कुचकामाचा ठरवीत. परंतु परकीय गुलामांवर ज्यांस अमल गाजवावयाचा नसतो अशीं गरीब व स्वतंत्र राष्ट्रें दिखाऊपणावर व माणसाच्या बाह्य डामडौलावर विशेष भर देत नाहींत. राष्ट्राकरितां प्राणार्पण करण्याची व परस्थांस कःपदार्थ समजण्याची व सर्वांगीण राष्ट्रीयत्वाची भावना ज्याच्या अंगीं पूर्णपणें बाणली असेल त्यासच अशीं राष्ट्रें महत्त्व देतात.

रांगेंत उभ्या असलेल्या मुलांजवळ नेताजी गेले. या मुलांपैकीं कोणासच निवडूं नये अशी जी भावना सर्वसाधारण माणसाच्या मनांत उद्भवते तशी ती नेताजींच्या मनांत उद्भवली नाहीं. प्रत्येक बाबतीं-तील नेताजींचें हें स्वभाववैशिष्ट्य ध्यानांत घेण्यासारखें होतें. दुर्दैवानें आपला सर्वच बाबतींत अधःपात झालेला आहे, तेव्हां सर्व दृष्टीनें आम्ही इतरांपेक्षां हीनच ठरणार ; पण म्हणून आम्ही जर आमच्याच लोकांना तुच्छ लेखूं लागलों तर आमच्या देशाचा उद्धार होणार कधीं ? आपलें जें असेल त्याच्याचबद्दल स्वाभिमान बाळगून त्यानेंच काम भागविलें पाहिजे. टोकियोंतील उच्च लष्करी शिक्षण घेण्यास जीं मुलें पुढें आलीं त्यांतीलच जीं बरीं दिसतील तींच पाठवावयाचीं असें नेताजींनीं ठरविणें क्रमप्राप्तच होतें. एखाद्या इंग्रजी अमदानींत तयार झालेल्या हिंदी सनदी नोकरानें सर्वांसच साफ नकार दिला असता.

ओळीचे एका टोंकापासून एकेका मुलाशीं बोलण्यास नेताजींनी सुरवात केली. आपला रुबाब दाखवून त्या मुलास घाबरून सोडावयाचें ही इतरांप्रमाणें नेताजींची वृत्ति नव्हतीच. त्यांनीं हंसून प्रत्येक मुलाच्या खांद्यावर प्रेमानें हात ठेवावा अथवा पाठीवर शाबासकी दिल्याप्रमाणें करावें व मग त्यास त्याचें नांव, गांव इत्यादि माहिती विचारावी असें चाले. त्यांत बंगाली मुलेंही बरींच होतीं. त्यांचेशीं नेताजी बंगालीमध्यें बोलत असत. तामीळ मुलांशीं बहुधा त्यांस इंग्रजींतच बोलावें लागे. स्वतःस हिंदी म्हणवून स्वतःची राष्ट्रभाषा बोलतां न येणें व इंग्रजी बोलण्यांतच फुशारकी मारणें हें आमचें आणखी एक लांछन आहे. बहुतेक बंगाली मुलांचे पालक प्रसंगाप्रसंगानें नेताजी अतिपूर्वेत आल्यापासून त्यांच्या माहितीचे झाले होते. यावरून नेताजींस स्वप्रांतीय लोक जास्त आवडत असें अनुमान कोणीं बसवूं नये. केवढाही मोठा आणि निःस्वार्थी पुढारी झाला म्हणून त्याच्या स्मरणशक्तीस व मेंदूस कांहीं मर्यादा असतात. प्रत्येकाचे स्मरणांत राहणाऱ्या गोष्टी या ज्यांच्या त्याच्या विशिष्ट आडाख्यामुळें त्याच्या स्मृतींत राहतात. स्वप्रांतीय व आपली मातृभाषा बोलणारे लोक किती आहेत व कोठें कोठें आहेत, ही परप्रांतांत कोणाच्याही चटकन् लक्षांत येण्यासारखी गोष्ट असते. बालपणापासून आपल्या मातृभाषेचे व आपल्या विशिष्ट वातावरणाचे जे संस्कार मनावर झालेले असतात ते फार बलवत्तर असल्यामुळें समान संस्कारांचे स्नेहीसोबती स्पष्ट उठून दिसतात.

आलेल्या या सर्व मुलांपैकीं पंचेचाळीसच टोकिओस पाठवावयाचे असल्यामुळें नेताजींनीं तेवढ्यांची निवड केली. इतरांचा विरस झाला. बरींचशीं मुलें नेताजींबद्दलच्या वैयक्तिक प्रेमामुळेंच पालकांनीं या शिक्षणाकरितां पाठविलेलीं होतीं. प्रत्यक्ष जपानला जाण्यास सुमारें १॥–२ महिन्यांचा अवधि या मुलांस पुढें लागला. तोंवर बोटीची सोयच नव्हती. या अवधींत सिंगापुरांतच एका बंगल्यांत या सर्व मुलांची सोय लावण्यांत आली व टोकिओंतील उच्च लष्करी शिक्षणाची पूर्वतयारी म्हणून त्यांस जपानी भाषेचें ज्ञान व प्राथमिक लष्करी

शिक्षण देण्याची व्यवस्था झाली. एखाद्या लष्करी शिक्षणकेंद्रांतील कार्यक्रमाप्रमाणें या मुलांचा दिवसभराचा कार्यक्रम सुरू झाला. अधूनमधून नेताजी इतर लष्करी शिक्षणकेंद्रांप्रमाणें या केंद्रासही भेट देत. एका विशिष्ट कामगिरीवर आपण या मुलांस पाठवीत आहोंत म्हणून नेताजींस या मुलांचेबद्दल विशेष जिव्हाळा व जबाबदारी वाटे. एके दिवशीं सकाळीं ११ वाजतां नेताजी या शाळेची पहाणी करण्याकरितां आले. मी होतोंच त्यांचेबरोबर. या मुलांचा जपानी भाषेचा वर्ग चालला होता. मुलांच्या खाण्यापिण्याची, खेळण्याची व राहण्याची व्यवस्था नेताजींनीं पाहिली व नंतर ते वर्गांत आले. सर्व मुलें उभीं राहिलीं व त्यांनीं खडखडीत "जय हिंद"नें नेताजींचें स्वागत केलें. आपल्या मुलांची प्रगति कशी काय चालली आहे हें जाणण्याची नेताजींची इच्छा होती; परंतु त्या जपानी भाषाशिक्षकास इंग्रजी किंवा हिंदुस्थानी येत नव्हतें व नेताजींस जपानी भाषा अवगत नव्हती. मला मोडकें तोडकें जपानी येत असल्यामुळें मलाच या प्रसंगीं दुभाष्याचें काम करावें लागलें. परक्यांनीं आपल्या हिंदी तरुणांच्याबद्दल प्रशंसोद्गार काढावेत असें मनुष्यस्वभावाप्रमाणें नेताजींसही वाटे. हिंदी स्वातंत्र्ययुद्ध सुरू होण्याचे अगोदर वरिष्ठ जपानी अधिकारी हे नेताजींस पुन्हा पुन्हा विचारीत कीं, "स्वातंत्र्यसेना प्राण पणास लावून अघाडीवर लढेल...फितूर करणार नाहीं...अशी आपली खात्री आहे ना? हा प्रश्न विचारण्याचें कारण म्हणजे जपान्यांच्या राष्ट्रीय शिक्षणाचा पाया हा पहिल्यापासून भरभक्कम असल्यामुळें आमचे सैनिक वीरश्रीनें लढतात, परंतु आपल्या हिंदी लोकांचे बाबतींत तसें नसल्यामुळें त्यांचे आयुष्यांत हा एक नवीन प्रयोग आहे व ते या कसोटीस पूर्णपणें उतरतील कीं नाहीं याबद्दल शंका वाटते." जपान्यांच्या या प्रश्नावर नेताजी रोखठोक उत्तर देत असत कीं, "आमचे लोकसुद्धां आतां तयार झाले आहेत व आमची स्वातंत्र्यसेना तुमच्या सेनेहून वीरश्रींत रतिभरही कमी ठरणार नाहीं." परक्यांसमोर आपल्या लोकांचे अवगुण उघडे पाडावयाचे नाहींत हें नेताजींचें नेहमींचें धोरण असे. आपापसांतील बैठक अथवा सभा असली म्हणजे मग मात्र ते स्व-

जनांच्या चुकांबद्दल त्यांची कानउघाडणी करण्याचें सोडीत नसत. जपान्यांच्यासमोर स्वातंत्र्यसेनेबद्दल छातीठोकपणें सांगणारे नेताजी जपान्यांच्या अपरोक्ष हिंदी सैनिकांसमोर केलेल्या व्याख्यानांत स्वातंत्र्य-सैनिकांस वारंवार बजावीत, "पहा बरें, जपानी अधिकारी तुमच्या वीरश्रीबद्दल व देशभक्तीबद्दल साशंक आहेत. मी माझ्याकडून त्यांस ठासून सांगतों कीं, आमचे सैनिक जपानी सैनिकांच्याइतका कडवेपणा तरी खास दाखवितील. तेव्हां तुम्हीं सर्वांनीं प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे. माझें वचन खोटें पाडूं नका व तुम्हांला आणि भारताला लांछनास्पद होईल असें कांहीं कृत्य करूं नका." स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाल्यावर स्वातंत्र्यसैनिकांच्या वीरश्रीचीं रोज अनेक उदाहरणें कानांवर येऊं लागलीं तेव्हां वरिष्ठ जपानी अधिकारीही नेताजींजवळ स्वातंत्र्य-सैनिकांविषयीं प्रशंसोद्गार काढूं लागले. कित्येक ठिकाणीं स्वातंत्र्य-सैनिकांनीं जपानी सैनिकांहूनही कांकणभर जास्त पराक्रम गाजविला. जे जपानी पूर्वीं साशंक होते त्यांचेकडून आपले सैनिकांची वाहवा ऐकल्यामुळें नेताजींस धन्य धन्य वाटलें. या प्रसंगींही हा जपानी शिक्षक आपल्या मुलांबद्दल काय मत देतो हें जाणण्याची नेताजींची इच्छा होती. त्या मुलांचे प्रगतीबद्दल जपानी शिक्षकानें चांगलें मत दिल्यानें नेताजींना बरें वाटलें.

इ. स. १९४४ सालच्या डिसेंबर महिनाअखेरीस नेताजी अंदमान बेटावर गेले. अंदमान-निकोबार बेटें नुकतींच हिंदी स्वातंत्र्य सर-कारचे ताब्यांत आलीं होतीं. "शहीद व स्वराज्य" बेटें असें त्यांचें नवीन नामाभिधान झालें. नेताजी सुभाषचंद्र बोस यांस एकूण अकरा वेळां तुरुंगवास भोगावा लागला असतांनाही त्यांस एकदांही जन्मठेपेची शिक्षा न झाल्यामुळें त्यांना इंग्रजांनीं कधींही अंदमान बेटांत पाठविलें नव्हतें. तेथील टोलेजंग तुरुंगांत उज्ज्वलजहाल हिंदी पुढाऱ्यांस पाठविण्यांत येत असल्यानें हिंदी स्वातंत्र्यचळवळीच्या दृष्टीनें या तुरुंगांस विशेष महत्त्व होतें. आपल्या स्वातंत्र्य सरकारचे ताब्यांत आलेला पहिला भूप्रदेश या दृष्टीनें व हे इतिहासप्रसिद्ध तुरुंग पाहण्याच्या इच्छेनेंही नेताजींस अंदमान बेट पाहण्याची फार इच्छा

होती. डिसेंबर महिन्याच्या २९ तारखेस ते अंदमान बेटावर पोंचले. तेथील टोलेजंग तुरुंग पाहतांना हिंदी देशभक्तांनीं स्वजनांपासून दूर अशा त्या एकांतवासांत किती छळ सोसला असेल व हालअपेष्टांत त्यांस दिवस काढावे लागले असतील त्याचें कल्पनाचित्र त्यांचे मनश्चक्षूंसमोर उभें राहिलें. अनेक मूक संवेदना व दुःखद स्मृतींनीं त्यांचें हृदय थरारलें. अंदमान बेटाची पहाणी करतांना पश्चिम दिशेकडील समुद्र-तीरीं कांहीं काल ते स्तब्ध उभे राहिले. क्षितिजावर त्यांनीं दृष्टि स्थिर केली. त्या क्षितिजापलीकडे आपली पवित्र मातृभूमि आहे हा विचार त्यांच्या मनांत आला. भीत भीत थोडें पुढें येऊन तो समुद्र नेताजींचे पायाखालीं लोळण घेत परकीयांच्याकरवीं भारतीयांवर होत असलेल्या जुलुमामुळें होणारा आपला तळतळाट आपल्या अखंड खळ-खळाटाच्या रूपानें निवेदन करीत होता. वाऱ्याच्या झुळकीनें त्यांच्या कानांभोंवतीं भारतांतील अनेक स्मृतींचें काहूर उठविलें. अशा तऱ्हेनें आपादमस्तक त्यांच्या रोमरोमांत भारताच्या भूत, भविष्य व वर्तमान यांच्याविषयींचे विचारचक्र सुरू झालें. क्षणार्धांत त्या विचारचक्राच्या गतीबरोबर त्यांचे देहभान हरपलें. तेथें उभें असलेलें त्यांचें शरीर अमळ ताठरलें; कारण त्या देहांतील आत्मा केव्हांच समुद्र उल्लंघून भारतांतील आसुरी राज्यांत शोकवनांत बंदिस्त असलेल्या भारतलक्ष्मीच्या दर्शनास निघून गेला होता. एका नारळाच्या झाडा-खालीं त्यांचा तो जड देह उभा होता. त्यांच्याबरोबर असलेले जपानी नाविक अधिकारी व हिंदी स्वातंत्र्यसेनेंतील अधिकारी हे त्यांचे मागच्या बाजूस कांहीं अंतरावर उभ्या उभ्या लागलेली नेता-जींची समाधि पाहून स्तंभित अशा स्थितींत उभे होते. पंधरावीस मिनिटें नेताजी समाधिस्थ होते. तदनंतर ते पुढें निघाले.

सर्व जपान्यांवर नेताजींचें अतोनात वजन होतें. वर्तमान भारताच्या सर्व नेत्यांत सुभाषचंद्र बोस यांसच जपान व जर्मनींत सर्वोच्च अथवा सर्वोत्तम मानीत असत याला कारण त्यांची अविरत व एक-निष्ठ देशसेवा, दैवी निःस्वार्थीपणा आणि सयुक्तिक मतें. इंग्रजांच्या ओंजळीनें पाणी पिऊन ते जपान-जर्मनीसारख्या अपरिचित राष्ट्रांची

विनाकारण " फॅसिस्ट " इत्यादि शब्दांनीं नाळस्ती करीत नसत किंवा अविचारीपणें चीन वगैरे इतर राष्ट्रांना एकतर्फी, सर्वस्वीं निष्क्रिय व केवळ शाब्दिक अशी सहानुभूति दाखवून विनाकारण जपानसारख्या राष्ट्रांचें वैमनस्य ओढवून घेणें त्यांना पटत नसे. हिंदुस्थानलाही कांहीं फायदा नाहीं व चीनला त्याहूनही नाहीं अशा परिस्थितींत हात दाखवून अवलक्षण करून घ्यावयाचें व जपानचीही सहानुभूति गमवावयाची हें कोणीं सांगितलें आहे ? बरें, स्वदेशाच्या स्वातंत्र्या-करितां मी अमुकच करीन व अमुक करणार नाहीं, एका विशिष्ट मार्गा-नेंच स्वातंत्र्य साध्य झालें तर तें मला हवें आहे, नाहीं तर मला त्याची कांहीं जरूरी नाहीं हा हेकाही त्यांनीं कधीं धरला नाहीं. यामुळेंच त्यांस आंतराष्ट्रीय राजकारणांत विशिष्ट मानाचें स्थान असे. याच्या जोडीला जेव्हां त्यांचें विशुद्ध आचरण, त्यांचे मनांतील स्वातंत्र्य-प्राप्तीची आत्यंतिक तळमळ व क्षणाचीही विश्रांति किंवा इतर मनो-रंजन न मानवणारी त्यांची कार्यप्रवणता पाहिली म्हणजे परस्थांसही या व्यक्तीबद्दल नितांत आदर वाटे. सर्व जपानी आबालवृद्ध स्त्री-पुरुषांस ' चंद्रबोस ' हें नांव उत्तम रीतीनें परिचित होतें. क्वचित् ' बोस कक्का ' अशाही नांवानें ते नेताजींचा उल्लेख करीत. ' कक्का ' हा जपानी भाषेंतील शब्द, इंग्रजींतल्या (His Excellency) " हिज् एक्सलन्सी "च्या समानार्थक आहे. मराठींत " महाराज, सम्राट, अथवा सरकार " हे शब्द समानार्थक ठरूं शकतील. जपानी लहान मूल बोलूं लागल्याबरोबर त्यास ' चंद्रबोस ' हें नांव परिचित होत असे येवढा त्या नांवाचा जपानांत प्रभाव व म्हणूनच प्रसार होता. नेताजींसह टोकियोस त्या इतिहासप्रसिद्ध परिषदेकरितां गेलेले हिंदी अधिकारी कांहीं कामानिमित्त टोकियो शहरांत गेले म्हणजे ते ' बोस कक्कां 'चे सहकारी असल्याचें समजतांच त्यांचे समागमांत येणारे सर्व जपानी स्त्री-पुरुष अत्यंत आदरानें उठून, डोकें नमवून त्यांस अभिवादन करीत व कांहीं अंतरावर उभें राहून अत्यंत नम्रतेनें बोलूं लागत. इ. स. १९४५ च्या एप्रिल महिन्यांत ब्रह्मदेशाचा बराचसा भाग इंग्रजांचे हातीं आलेला होता. जागोजाग

लढणारी स्वातंत्र्यसेना साम्राज्यसेनेच्या वेढ्यांत सांपडली होती. डॉक्टर लक्ष्मी स्वातंत्र्यसेनेच्या इस्पितळांत काम करीत होत्या. शत्रु सन्निध आलसें पाहून त्या व त्यांचेबरोबर असलेल्या इतर दोघांतिघास माघार घ्यावी लागली. रानवाटेनें सयाममध्यें निघून येण्याचा त्यांचा विचार होता. बरींचशीं खेडीं निर्जन झालीं होतीं. मूळची जपानी फौज जाऊन, बरींच वर्षें चीन देशांत लढत असलेल्या कांहीं तुकड्या ब्रह्मदेशांत उतरल्या होत्या. इंग्रजांच्या बाजूनें हिंदी लोक लढतात व स्वखुषीनें ते त्यांचे हेरही बनतात म्हणून आणीबाणीच्या प्रसंगीं आतां मागेंपुढें बघावयाचें नाहीं असें ठरवून युद्धक्षेत्रांत दिसतील तितक्या हिंदी व गोऱ्या लोकांस कापून काढण्याची आज्ञा वरिष्ठ जपानी अधिकाऱ्यांनीं त्यांच्या सर्व सैनिकांस दिली होती. युद्धकालांत बरेचसे सैनिक वेषांतर करून शत्रुप्रदेशांत उत्पातादि गुप्त कार्य करण्यास लपत छपत आलेले असतात. भोळेभाबडे असल्याबद्दलचा कांगावा सर्वच करतात. एखादा बिचारा खराच निरपराधी व भोळाभाबडा असला तरी, इतर शेंकडों लबाड लोकांत याच्या म्हणण्यांतील सत्य व तथ्य प्रतीत होणार कसें? शहानिशा करून घेण्यास वेळ व साधनें नसतात. डॉक्टर लक्ष्मी व इतर दोघेतिघे हिंदी अधिकारी अशा एका जपानी तुकडीच्या कचाट्यांत सांपडले. ते लष्करी गणवेषांत असल्यामुळें जपान्यांस त्यांचेबद्दल जास्त संशय आला. हे इंग्रजप्रणीत हिंदी सैन्यांतील असावेत असेंच त्यांस वाटलें. पांचसहा वर्षें चीनच्या कोठल्यातरी आडरानांत लढत राहिल्यामुळें 'हिंदी स्वातंत्र्यसेना' नांवाची कांहीं नवीन चीज निघाली असेल अशाबद्दल या लोकांस कांहींच माहिती नव्हती. या तीनचार हिंदी लोकांनीं अनेक खाणाखुणा, बिल्ले इत्यादि पटविण्याचा प्रयत्न करावा तरी तेंही जपान्यांस पटेना. या सर्वांस मारावयाचा त्यांनीं घाट घातला. भाषेची अडचणही आडवी आली. धड कोणालाच आपलें म्हणणें दुसऱ्यास पटवून देतां येईना. इतक्यांत त्यांपैकीं एका हिंदी गृहस्थास एक कल्पना सुचून त्यानें आपल्या खिशांतील नेताजींचें चित्र असलेला छातीला लावावयाचा एक लहानसा वर्तुलाकार बिल्ला

काढून तो जपान्यांस दाखवून म्हटलें, " वा रे वा ! चंद्रबोस कक्का नो हे ई ताई देसने ! ( आम्ही या चंद्रबोस साहेबांचे शिपाई आहोंत ना ! ) " 'चंद्रबोस' हें नांव कानीं पडतांच जपान्यांचे डोक्यांत लख्ख प्रकाश पडला व हे तिघेचौघे हिंदी सैनिक जपानचे मित्र असल्याबद्दल त्यांचें पूर्ण समाधान झालें. अतिपूर्वेंतील आंतरराष्ट्रीय राजकारणांत सुभाष 'चंद्रा' ची शीतल प्रभा कशी फांकली होती हें वरील उदाहरणावरून सहज लक्षांत येईल.

# आतां पुढें काय ....?

आतांपर्यंतचें विवेचन नेताजी सुभाषचंद्र बोस यांचें दिव्य व्यक्तिमत्त्व व त्यांची अद्वितीय कामगिरी सिद्ध करण्यास पुरेसें आहे. भगवान् श्रीकृष्ण व धनुर्धारी अर्जुन या दोघांचें कार्य आधुनिक स्वरूपांत नेताजींनीं केलें. यापेक्षां त्यांची थोरवी काय वर्णन करावी! भक्तश्रेष्ठ, ज्ञानश्रेष्ठ व कर्तव्यश्रेष्ठ असेंही त्यांस म्हणतां येईल. ईश्वराचे ते परमभक्त असून भारतजन हें त्यांचें उपास्य दैवत व दिल्लीची (वारी नव्हे) स्वारी हें त्यांचें जन्मव्रत होतें. शत्रूला रेटल्यानें ईश्वरी देणें मिळेल (लाटल्यावर रेलल्यानें नव्हे) असें त्यांचें ठाम मत होतें. अशी विभूति क्वचित् जन्माला येते. वर्तमान पिढीचें भाग्य थोर म्हणून नेताजी आपल्या काळांत जन्माला आले. मात्र कृष्णावतारांतील पेंद्या व सुदाम्याप्रमाणें आम्हीही नेताजींच्या महत्कार्यानंतर हीन व दीनच राहिलों तर त्यांचें कर्तृत्व भारताच्या व भारतीय जनतेच्या दुर्भाग्या-मुळें विफल झालें असेंच म्हणावें लागेल. कृष्णावतारानंतर यादवांत यादवी माजून ते नामशेष झाले. तेव्हां भगवान् श्रीकृष्णाला काय वाटलें असेल! आम्हीही तसेंच होऊं देणार कीं काय? नेताजींचे म्हणण्याप्रमाणें इतिहासपठनापासून आम्हीं कांहीं धडा घेतला नाहीं तर इतिहास वाचण्याचा शीण तरी कशाला? आपण जर नेताजींच्या

कार्याचा नुसता गौरव केला, टाळ्या वाजवल्या, व झोंपीं गेलों तर चमत्कृतिजन्य कृति करणाऱ्या सर्कशींतील एखाद्या खेळाडूचें अभिनंदन, उत्तम अभिनय करणाऱ्या एखाद्या नटाची आपण केलेली वाहवा व नेताजींच्या भारतावरील अनंत उपकारांचा गौरव हें सर्व आपण सारख्याच किंमतीचें समजतों असें जर कोणीं म्हटलें तर त्यांत वावगें काय आहे?

दुसऱ्या एका दृष्टीनेंही आपण या बाबतींत विचार केला म्हणजे केवळ गौरव करून थांबणारे लोक हे त्या पूज्य व्यक्तीचे अनुयायी म्हणविण्यास पात्र नसल्याचें आपणांस दिसेल. गौरव केला नाहीं तरी चालेल, परंतु अनुकरण करणें मुख्य व महत्त्वाचें आहे. एखाद्या कार्याचें महत्त्व आपणांस पटतें येवढेंच त्या गौरवानें सिद्ध होतें. निष्क्रिय गौरवानें गौरव करणाऱ्या व्यक्तींचा तोंडदेखलेपणा व पोकळ सहानुभूति यांपलीकडे कांहीं व्यक्त होत नाहीं. ईश्वराचे माथ्यावर आपण फुलें वाहतों, तोंडभरून तासन् तास ईश्वराचीं स्तुतिस्तोत्रेंही गातों व तेवढ्यानेंच ईश्वरभक्त अथवा आस्तिक म्हणून आपण मिरवितों. परंतु स्वप्नांतही ईश्वर सेवन करीत नसेल अशा चहा, सिगारेट, तंबाखू आदि वस्तूंचें आपण सेवन करतों; शिवाय इतर पापकर्मे करतों तीं निराळींच. आपला परमेश्वर म्हशीचें दूध अथवा चहाचा पेला तोंडास लावतांना आपण चित्रांतही पाहत नाहीं, तरी आपण आपल्या दैनंदिन व्यवहारांत रात्रंदिवस या गोष्टी करूं लागलों आहोंत. श्रीराम बिडीकार्यालयें व श्रीकृष्ण चहामंदिरांना आजकाल ऊत आला आहे. एवंच आपल्या ध्येयांत आणि आपल्या वर्तनांत, आपल्या कृतींत आणि आपल्या उक्तींत दिवसेंदिवस महदंतर पडूं लागलें आहे व हें कोणत्या थराला पोंचेल याचा नेम नाहीं. "नैवेद्यानें व पुष्पानें पूजा म्हणजे तोंडपूजाही वाटल्यास गाळा, पण मीं घालून दिलेले नियम आचरणांत आणा." असेंच तो ईश्वर वैतागून म्हणेल. पूजा, गौरव अथवा स्तुति-स्तोत्रें हीं सदाचरणाची विस्मृति होऊं नये येवढ्याकरितां केलेलीं असतात. मूलतःच त्यांचें कांहीं वैशिष्ट्य किंवा प्रयोजन नाहीं. निष्क्रिय तोंडपूजेनें कोणीही रागावेल हें नेहमींचे व्यवहारांतील

अनु. २८८ दि. ११ १० ३९

उदाहरणें घेऊन सुद्धां सिद्ध होण्यासारखें आहे. समजा, आपले दोन मित्र आहेत. त्यांपैकीं एक दिवसभर आपल्याला वंदन करतो, आपलीं स्तुतिस्तोत्रें गातो व आपण म्हणूं त्याला 'हो' म्हणतो. परंतु त्यास कांहीं काम सांगावें तर तो साफ म्हणतो, "छे छे, हें कांहीं माझें काम नव्हे...मी फक्त आपला स्तुतिपाठक...आपली स्तुति वाटेल तितकी करीन...आपण बाहेर जाण्यास दारांत आलांत कीं मी हात जोडून तुमच्यापुढें तयार...आपण बाहेरून परत आलांत कीं मी आपल्या चरणकमलावर डोकें ठेवावयास तयार." असा माणूस जर आपला सुहृद् म्हणून मिरवूं लागला व दिवसभर त्याच्या निष्क्रिय परंतु तोंडभर स्तुतीचा ससेमिरा आपले पाठीस लागला तर कोणीही अत्यंत वैतागून म्हणेल, "ही काय पीडा बुवा!" अशा "विषकुंभं पयोमुखं" सुहृदापेक्षां उघड शत्रु परवडला. कारण, शत्रु काय मागतो? त्याला काय हवें आहे? तो आपल्याला कितपत अनुकूल आहे? त्याचें म्हणणें काय? या गोष्टी तरी आपल्याला कळतात. तोंडपुजा सुहृदाचे बाबतींत तेंही शक्य नसतें. याचे उलट दुसरा मित्र आपली स्तुति करणार नाहीं, डोळा वर करून आपल्याकडे बघणारही नाहीं किंवा कामा-व्यतिरिक्त एक शब्दही तोंडावाटे काढणार नाहीं. परंतु आपलीं बरींचशीं कामें न सांगतां स्वतःच्या बुद्धीनेंच करील व इतर कामें आपण सांगण्याचा अवकाश कीं तींसुद्धां ताबडतोब करील, असा असला तर हा दुसऱ्या प्रकारचा सुहृदच कोणासही आवडेल व पहिल्याबद्दल अत्यंत तिटकारा येईल. परमेश्वरालाही आपल्याबद्दल असाच राग येत नसावा का? नेताजींसही आपल्या पोकळ गौरवाचा राग येणार नाहीं का? अर्थात् परमेश्वराचे किंवा इतर थोर विभूतींचे सर्व गुण समजून घेऊन त्या गुणांचें अनुकरण करण्याचा प्रयत्न करणें व जनसेवेचें इहलोकींचें आपलें कर्तव्य करणें हीच खरी पूजा. तोंडपूजा किंवा पुष्प-पूजा केली काय किंवा न केली काय ती महात्म्यांस किंवा परमा-त्म्यास सारखीच. कारण, ती मुळांत त्यांचेकरतां नसतेच. आपल्याला आपल्या कर्तव्याची विस्मृति होऊं नये म्हणून तें एक स्मृतिसाधन केलेलें आहे येवढेंच. मुळांतील हा भेद विसरून आपण साधनालाच

साध्य समजूं लागलों आहोंत. म्हातार्‍या बायका ज्या वृत्तीनें फुलवाती तयार करीत पुराण ऐकतात, तद्वत् आपणही आपल्या नित्य परदास्य-व्यवसायांत मग्न राहून नेताजींच्या धवल कीर्तीचें श्रवण केलें व अधून-मधून त्यांचे तसबिरीस अथवा काल्पनिक मूर्तीस अनन्यभावानें नमन केलें, तर त्याचा उपयोग काय? ही "पुराण-श्रवण वृत्ति" हिंदी जनतेनें आतां सोडून दिली पाहिजे व यापुढें सक्रिय भक्तिच खरी मानून नेताजींचें कार्य पुढें चालविण्यास कंबरा बांधल्या पाहिजेत.

प्रत्येकानें कांहींतरी देशकार्य—राष्ट्रकार्य—करावें असें आजपर्यंत मोठ्या नेत्यापासून तों कनिष्ठतम माणसापर्यंत सर्व म्हणत आले आहेत. परंतु राष्ट्रकार्य म्हणजे काय व तें कसें करावयाचें याबद्दलची कोणासच कांहीं स्पष्ट कल्पना दिसून येत नाहीं. आपण परदेशगमन करीत नाहीं. इतर स्वतंत्र राष्ट्रांच्या लोकांशीं आपला संबंध येत नाहीं व यामुळें त्या लोकांचे व आपले वागण्यांतील फरक आपणांस कळून येत नाहीं. देशकालपरिस्थितीप्रमाणें देशभक्तीच्या व राष्ट्रकार्याच्या बाह्य कल्पना बदलत असतात. उदाहरणार्थ, खादी परिधान करणें, सूत कांतणें व जेलमध्यें जाणें, याचें नांव 'देशभक्ति' असें कांहीं लोक आजकाल समजतात; परंतु ही कल्पना चुकीची आहे. यामुळेंच आपलें सर्वस्व सोडल्याशिवाय व घरांदारांवर तुळशीपत्र ठेवल्याशिवाय राष्ट्र-कार्य शक्य नाहीं अशीच सर्वसाधारण समजूत आहे. घरांदारांवर तुळशीपत्र ठेवणें सर्वांस जमत नसल्यामुळें देशभक्तिही प्रत्येकास असाध्य आहे अशी सर्वांची अत्यंत कोती समजूत झालेली आहे. सर्वसामान्य जन अशा तर्‍हेनें निराश व निष्क्रिय झाल्यामुळें आपले दहा-पंधरा स्वार्थत्यागी नेतेच आटोकाट प्रयत्न करून कधींकाळीं आपणांस स्वराज्य मिळवून देतील असें त्यांस वाटतें. स्वदेशाचें स्वातंत्र्य परत मिळविणें हें कार्य सर्वसामान्य जनतेच्या मदतीशिवाय केवळ दहा-पंधरा नेत्यांस झेंपण्यासारखें असतें तर आजपर्यंत केव्हांच हिंदुस्थान स्वतंत्र झाला असता. सर्वसाधारण जनता निष्क्रिय व अज्ञानी असतांना मूठभर लोकांच्या प्रयत्नानें स्वराज्य मिळूं शकेल ही अत्यंत चुकीची भावना आहे. ही भावना दृढमूल होण्यास कारणीभूत

झालेली वर उल्लेखिलेली विचारश्रेणीच मुळांत चुकलेली आहे. कोणत्याही देशाच्या यशस्वी स्वातंत्र्यलढ्याकडे बारकाईनें लक्ष दिलें तर आपणांस असें दिसून येईल कीं, ज्या ज्या वेळीं त्या त्या देशांतील सर्वसामान्य जनतेनें एकवटून प्रयत्न केला तेव्हांच तो यशस्वी झाला, एरवीं कोणताही प्रयत्न सफल झाला नाहीं. आयर्लंडचेंच उदाहरण घ्या. आयर्लंडमध्यें हातावर शिर घेऊन लढणारे पांचच हजार स्वातंत्र्य-सैनिक होते हें खरें; तथापि या पांच हजार सैनिकांस आश्रय देणें, त्यांस रसद पुरविणें, त्यांचेबद्दल शत्रूस चुगली न करणें व हूं का चूं कांहीं कळूं न देणें हें साऱ्या आयरिश जनतेनें केलें. आमच्या दुर्दैवी भारतांत आज असे पांच हजार सैनिक मिळणें तर दूरच राहिलें, पण त्याहूनही परक्यांच्या एखाद्या कृपाकटाक्षाकरितां घरचें खाऊन लष्कर-च्या भाकऱ्या भाजणारे लोक विपुल सांपडतात हें नवल नाहीं का? एखादें घर बांधण्यास जसे साध्या मजुरांपासून तों कुशल कारागिरां-पर्यंत सर्व प्रकारचे लोक लागतात, तद्वत् स्वातंत्र्यमंदिर तयार करण्यासही सर्व जनतेचें साहाय्य लागतें. या मंदिरावर सुवर्ण-कळस चढविण्याचें काम आपले कुशल नेते करतील, परंतु तत्पूर्वींचें पाया खोदण्याचें, तो कणखर गोट्यांनीं भरून काढण्याचें, चुना तयार करण्याचें, विटा रचून भिंत बांधण्याचें, वगैरे कामें सर्वसामान्य हिंदी लोकांसच करावीं लागतील. अशा प्रकारचें काम मुबलक आहे. या कामाला अकलहुषारी किंवा कलाकुसर इत्यादि कांहीं लागत नाहीं. फक्त मजूरलोक ज्याप्रमाणें रोज आठदहा तास नेटानें काम करतात त्याप्रमाणें प्रत्येक माणसानें जागरूक व कर्तव्यतत्पर राहून आपापलें कार्य केलें पाहिजे. या कामास आपलें घरदार, व्यवसाय इत्यादि कांहीं सोडावयास नको. प्रत्येक आबालवृद्ध स्त्री–पुरुषास अगदीं घरबसल्या, आपापले नित्य व्यवसाय सांभाळून, कोणताही स्वार्थत्याग न करतां, कसल्याही प्रकारच्या हालअपेष्टा सहन कराव्या न लागतां, इंग्रजांचा यत्किंचितही रोष सहन करण्याची पाळी न येतां, अत्यंत महत्त्वाचें व विपुल असें राष्ट्रकार्य करतां येण्यासारखें आहे. तें कोणतें हेंच बहुतेकांस ठाऊक नाहीं व त्याचाच विचार आपल्याला या शेवटल्या प्रकरणांत

करावयाचा आहे. कांहीं वाचकांस असें वाटण्याचा संभव आहे कीं, असल्या प्रकारचें कार्य असेल तर आपण तें सहज करूं शकूं, परंतु तें दिसतें तितकें सोपें नाहीं. कारण, सर्वसामान्य लोकांतील आळस व मनाचा दुबळेपणा याच त्यांतील मुख्य अडचणी होत. इतर स्वतंत्र राष्ट्रांसारखें किंवा आपलेंच गतकालीन वैभव आपणांस पुन्हा प्राप्त व्हावें अशी इच्छा असल्यास आळस व दुबळेपणा यांचेवर ताबा मिळविला पाहिजे. मग मात्र पुढील मार्ग अगदीं सोपा आहे. घाण्याला जुंपलेला बैल जितका शांतपणें दिलेलें काम रेटीत असतो, तितक्याच नेटानें आपल्यापैकीं प्रत्येकानें स्वतःची राष्ट्रीय जबाबदारी पार पाडली तर आजपर्यंतच्या आपल्या निष्क्रियतेच्या ढिगांतील वालुकाकण रगडले जाऊन त्यांतून स्वातंत्र्याचें तेलही गळेल. अर्थात् हें राष्ट्रकार्य कोणतें व तें कसें करतां येईल त्याचा विचार आपण पुढें करूंच. पण तत्पूर्वी समाजकार्य अथवा राष्ट्रकार्य प्रत्येक व्यक्तीनें केलेंच पाहिजे अशीं कांहीं नैतिक बंधनें अथवा नैतिक जबाबदारी प्रत्येक व्यक्तीवर आहे कीं काय तें आपण पाहूं. कारण, " आम्ही राष्ट्रकार्य अथवा जनसेवा करावी हा तुमचा आग्रह काय म्हणून ? प्रत्येकानें आपल्या पोटापुरतें मिळविलें, कसेंबसें मरेपर्यंत जिवंत राहिलें म्हणजे झालें." असें विधान करणारेही कांहीं हरीचे लाल निघतील. म्हणून वर उल्लेखिलेल्या नैतिक जबाबदारीचा येथें विचार करणें जरूर आहे.

## समाजऋण

प्रत्येक व्यक्तीनें स्वतःच्या आयुष्याचें सिंहावलोकन केलें तर प्रत्येक व्यक्तीस असें दिसून येईल कीं, अहंभावानें " अमुक मीं केलें किंवा अमुक एक गोष्ट माझी आहे " अशी जीं विधानें आपण सारासार विचार केल्याशिवाय करतों तीं पायाशुद्ध नसतात. जन्मापासून स्वतः-च्या जीवनासंबंधीं विचार करा. स्वतःचा जन्मही स्वतःच्या ताब्यांत नसतो. तुमची इच्छा आहे किंवा नाहीं याची विचारपूस न करतां तुम्ही जन्माला घातले जातां. जन्मल्यानंतर वेळेला अन्नपाणी देणें, नाक दाबून औषधें पाजविणें, इतर रीतींनीं पालनपोषण केलें जाणें,

मारून मुटकून शाळेंत पाठविणें, उडाणटप्पूपणा अथवा दुसरा कांहीं अडाणीपणा केला तर कानउघाडणी किंवा शिक्षा करणें, या गोष्टी आपले पालक, शिक्षक, आप्तेष्ट इत्यादि म्हणजे पर्यायानें समाज करतो. अशा तऱ्हेनें प्रत्येक व्यक्तीस समाजानें ज्याच्या त्याच्या पायावर उभें केल्याबरोबर जी ती व्यक्ति त्या पालनपोषणकर्त्या समाजाकडे यत्किंचितही मागें वळून न पाहतां स्वार्थी मार्गानें सरळ पुढें चालूं लागली तर त्या व्यक्तीस काय म्हणावें ? काबाडकष्ट करून आपल्या लहानग्यांस प्रेमानें वाढविणाऱ्या आईबापांस मुलांनीं मोठेपणीं लाथाडलें म्हणजे आपण त्यांस काय म्हणतों ? अगदीं तीच भावना समाजकार्य न करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीबद्दल आपली सर्वांची असावयास पाहिजे. सध्यांचें युग स्वार्थी आहे. जो तो शिकलासवरला, पोटापुरतें मिळवूं लागला आणि विवाह झाला म्हणजे तर शेफारलाच. त्याला स्वतःच्या मातापितरांबद्दलही कांहीं माया वाटत नाहीं तर तो आपल्या आप्तेष्टांचें व समाजाचें ऋण काय फेडणार किंवा त्यांची सेवा ती काय करणार ! ही अत्यंत घातुक प्रवृत्ति आजचे हिंदी समाजांत प्रसृत होऊं पाहत आहे व या प्रवृत्तीस वेळींच आळा घातला नाहीं तर यादवकुलाचा नाश करणाऱ्या मुसळाप्रमाणें ही प्रवृत्ति हिंदी जनतेच्या व राष्ट्राच्या नाशास कारणीभूत होईल. प्रत्येक व्यक्तीचे शिरावर समाजाचे अनंत उपकार व जन्मजन्मांतरींही न फिटण्यासारखें समाजाचें ऋण असतें. खरें म्हटलें तर सागरांतील बिंदूप्रमाणें समाजांतील व्यक्तीस स्वतःचें अस्तित्व व्यक्त करण्याचाही अधिकार नसला पाहिजे. असें करण्याचा जी व्यक्ति प्रयत्न करील तीस समाजसागराच्या प्रक्षोभानें वठणीवर आणलें पाहिजे. मातापितरांचें ऋण न फेडणारीं कुलांगार मुलें आपल्याला चटकन् दिसतात, परंतु जन्मदात्या व पालनकर्त्या समाजास निर्घृणतेनें लाथाडणारे लाखों 'समाजांगार' जीव आपल्या नजरेस पडत नाहींत. समाजाच्या अमूर्त व बदलत्या स्वरूपामुळें समाजाचें कर्ज घेऊन दिवाळखोरी करणारे समाजाचे गुन्हेगार आपल्यास चटकन् समजून येत नाहींत. परंतु त्यामुळें ते निर्दोष आहेत अथवा त्यांचें पाप फार मोठें नाहीं असें मात्र कोणीं समजूं नये.

ज्या नैसर्गिक नियमानुसार समुद्राच्या पाण्याची वाफ होऊन तिचें पाणी वृष्टिरूपानें पृथ्वीवर पडतें आणि पुन्हा नदीनाल्यांतून वाहत वाहत तेंच फिरून समुद्रांत जातें, तितक्याच स्वाभाविकपणें समाजानें व्यक्तींस कार्यक्षम करणें व व्यक्तींनीं पुन्हा समाज जोमदार बनविणें हेंही कार्य अव्याहत होत राहिलें पाहिजे. आत्महत्या करणें गर्ह्य मानलें जातें ते एवढ्याचकरतां कीं, आत्महत्या करणारा समजतो, "हें शरीर माझें आहे आणि याचा अंत करणें न करणें हें माझ्या मर्जीवर अवलंबून आहे." ही समजूत बरोबर नाहीं. ज्या शरिराचा आदि आपल्या हातांत नाहीं त्याचा अंत आपल्या ताब्यांत कां समजावा ? व शिवाय कर्ज फेडल्याशिवाय पळून जाऊं पाहणाऱ्या कर्जदारास कोणीही अटकावच करील. म्हणूनच आत्महत्या करण्याची मोकळीक समाजानें ठेवलेली नाहीं. यावरून अहंभावाला फांटा देणें, स्वतःस निराळें अस्तित्व आहे असें न समजतां आपण समाजाचे एक घटक आहोंत असें मानणें, व रोज पोटार्थीं केलेल्या व्यवसायाबरोबरच समाजकार्यही करणें हें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य ठरतें. आपलें तनमनधन हें समाजानें आपल्याला दिलेलें असून तें सर्व समाजकारणीं लागलें पाहिजे. त्यांतील एक कपर्दिकही स्वतःकरितां खर्च करणें गुन्हा आहे ही प्रत्येकाची भावना व्हावी.

नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणत असत कीं, "रोज अंथरुणावरून उठल्याबरोबर आपलें शरीर सुस्थितींत आहे किंवा नाहीं—म्हणजे अंगांत ताप आहे कीं काय ? पोटदुखी किंवा डोकेदुखीचा कांहीं त्रास आहे किंवा काय—हें पाहण्याची दक्षता जसा प्रत्येक जण घेत असतो, तसेंच सकाळीं उठल्याबरोबर दैनंदिन कार्यक्रम सुरू करण्याच्या आधीं आपल्या मनांत कांहीं भ्याड अथवा कमकुवत विचार आहेत कीं काय ? आपल्या मनास देशद्रोह, परधार्जिणेपणा, चुगलखोरी, देशविघातक स्वार्थ, अराष्ट्रीय विचारांची कीड अशा प्रकारचा कांहीं रोग जडला आहे किंवा काय हेंही अजमावणें प्रत्येकाचें कर्तव्य ठरतें शारीरिक सुस्थिति नसतांना आपण जसे बाहेर जात नाहीं, कांहीं काम करीत नाहीं व पूर्ण विश्रांति घेतों, तद्वत् रुग्ण मनःस्थितींतही

बाहेर जाणें योग्य नाहीं. रोगी मनाचा माणूस बाहेर जाऊन राष्ट्र-विघातक कार्य करील. त्यानें घरांत बसून वाचन, मनन, भजन, वाद-विवाद, सारासार विचार, विचारविनिमय, उपदेशग्रहण इत्यादि अनेक औषधोपचारांनीं मनाला सच्छील, सदाचारी व राष्ट्रकार्यरत करावें आणि मग बाहेर पडावें." सुभाषांचें हें सुभाषितही रोज आठवणीनें आचरणांत आणण्याचें प्रत्येक हिंदी माणसानें ठरविलें पाहिजे.

## नागरिक कसा असावा

आतां, स्वतःस राष्ट्राचा जबाबदार नागरिक म्हणवूं इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची मनोभूमिका सर्वसाधारणपणें कशा प्रकारची असावी व राष्ट्रीय मनोविकासाचीं मूलतत्त्वें कोणतीं तें आपण पाहूं. आपल्या सूक्ष्म हालचाली, शब्द आणि कृति यांचा दृश्य किंवा अदृश्य स्वरूपांत आपल्या राष्ट्राच्या भवितव्यावर दूरगामी परिणाम होत असतो हें प्रत्येकानें नीट समजून घ्यावें. आपल्यांतील प्रत्येक व्यक्तीचा पोषाख, आचार, विचार, चालण्याबोलण्याची पद्धत यावरूनच कोणीही परकी इसम आपल्या राष्ट्राबद्दल कांहीं एक विशिष्ट कल्पना करून घेतो. हें लक्षांत ठेवून दरक्षणीं आपण कोणत्या राष्ट्राचे घटक आहोंत? आपली मूलसंस्कृति कशा प्रकारची होती? आपल्याला आपल्यामध्यें व आपल्या राष्ट्रांत कोणकोणते फरक घडवून आणावयास हवे? राष्ट्र-सेवेच्या रूपानें आपण काय करतों, कितपत करतों, कसें करतों व याहून आणखी किती करतां येणें शक्य आहे? आपण कोणीकडे वाहवत चाललों आहोंत? आपला खरा शत्रु कोण? इत्यादि राष्ट्रीय विचारांची टोंचणी दिवसरात्र प्रत्येकाचे मनांत असावी. कांटेरी झाडा-झुडुपांतून चालल्यावर अनेक कांटे पायांत रुतून सारखे खुपत राहतात व कोणासही बेचैन करून सोडतात; तद्वत् राष्ट्रीय प्रश्नांवर सतत विचार करीत राहिल्यानें या कांटेरी विचारवृक्षांचे अनेक सूक्ष्म कांटे डोकें चालविणाऱ्याच्या मेंदूंत शिरून त्यास बेचैन करून सोडतील यांत शंका नाहीं. पायांत रुतणारे कांटे काढल्याशिवाय जशी स्वस्थता प्राप्त

होत नाहीं तसेंच त्रासदायक विचारांचे कांटे राष्ट्रकार्याच्या सुईनेंच डोक्यांतून निघतात. ही अस्वस्थता स्वतःचे डोक्यांत उत्पन्न करणें हें प्रत्येक व्यक्तीवर अवलंबून आहे. नेटानें राष्ट्रकार्य करून दिगंत कीर्ति प्राप्त करून घेणारे देशभक्तही आत्यंतिक मानसिक तळमळीमुळेंच सर्वस्वावर पाणी सोडून राष्ट्रकार्यास उद्युक्त होतात. अतिपूर्वेंतील एका व्याख्यानांत नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणाले, "इंग्रज व त्यांचे बलाढ्य मित्र यांच्या संयुक्त शक्तीपुढें आमच्या लहानशा हिंदी स्वातंत्र्य-सैन्याचा काय टिकाव लागणार, असें उपहासानें म्हणणारे लोक आमची वेड्यांत गणना करतात; परंतु एखाद्या गोष्टीचें ज्यांस वेड लागलेलें असतें असेच लोक जगांत अद्वितीय कामगिरी करून अजरामर कीर्ति मिळवितात." आपल्या प्रत्येक बारीकसारीक कृतीचा, शब्दाचा व हालचालीचा आपल्या राष्ट्रावर परिणाम होतो हें ज्याच्या मनांत ठसेल तो प्रत्येक गोष्ट जपून करील, प्रत्येक शब्द संभाळून उच्चारील व आपल्या फुरसतीचा प्रत्येक क्षण राष्ट्रकार्यीं उपयोगांत आणील. जर्मनी व जपानसारख्या जोमदार स्वतंत्र राष्ट्रांचे लोक इतके संभाळून बोलत व वागत कीं, राष्ट्रीय जबाबदारीची ज्योत त्यांच्या हृदयांत अखंड तेवत असल्याचा निर्वाळा दरक्षणीं त्यांच्या वागणुकींत मिळे. युद्धकालांत एखाद्या अपरिचित माणसास जपानी अधिकारी आपलें नांवही सांगत नसत. कोणी नवपरिचित माणसानें त्यास नांव विचारलें तर तो स्पष्ट नकार देऊन म्हणे, "तें गुपित आहे, फोडतां येत नाहीं." याच्या उलट आम्ही हिंदी लोक उगाच अघळपघळ बोलतों; राष्ट्रीय महत्त्वाच्या दृष्टीनें ज्या विषयाची चर्चा होऊं नये अथवा जें गुपित लोकांस कळूं नये त्याची आम्ही सपशेल चर्चा करतों किंवा ती गोष्ट इतरांस सांगून मोकळे होतों. "हिंदी लोक फार भाबडे, भडभडे आणि बडबडे बनलेले आहेत. ते अगदीं बेजबाबदार वाचाळपणा करतात. त्यांस कोणतेंही गुपित अथवा महत्त्वाची गोष्ट सांगतां उपयोगी नाहीं." असें नेताजी नेहमीं म्हणत असत. पुष्कळदां गुपित गोष्ट माहीत नसतांनाही आपण वरिष्ठ गोटांतील महत्त्वाच्या गोष्टी जाणतों हे दाखविण्याच्या आविर्भावानें व आपल्या मोठेपणाचा

टेंभा मिरविण्याच्या उद्देशानें कित्येक जण धादांत खोट्या बातम्याच प्रसृत करतात. आगगाडींत अस्ताव्यस्त सामान पसरून ठेवणें, मुद्दाम विघ्नसंतोषीपणें वाटेल तितकी जागा अडवून स्वतःस तिचा उपयोग असो नसो, तीवर दुसऱ्यास बसूं न देणें, शेजारीं बसलेल्या गोऱ्या इसमाशीं प्रेमानें व अदबीनें बोलणें, परंतु परिस्थितीनें नाडलेल्या गरीब, अशिक्षित, अज्ञानी बांधवांस हिडीस-फिडीस करणें, त्यांच्या-समोर इंग्रजी पोषाख, भाषा, आचार-विचार, वर्तमानपत्र-वाचन इत्यादींचें प्रदर्शन करून मनांतल्या मनांत आपण स्वतः म्हणजे कोणी बादशहाच आहों किंवा काय असा भाव आणणें, असली अत्यंत हीन आणि हिडीस प्रकारची वागणूक सध्यांच्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या हिंदी लोकांकडून होत आहे. थोडें काम, जास्त दाम व दिवसरात्र ज्याच्या त्याच्या विशिष्ट आवडीप्रमाणें ब्रिज, बिलियर्ड, फ्लश किंवा रमी खेळणें, क्रिकेटचें नसतें स्तोम माजवून त्यावर तासन् तास घालविणें, गाण्याच्या शोकाबद्दल टेंभा मिरवून वेळेचा व जागरणांनीं प्रकृतीचा अपव्यय करणें, तत्त्वशून्य व कुमार्गीं प्रवृत्त करणारें कादंबरी-वाचन, वायफळ भाषणें, व अघळपघळ आणि रिकाम्या गप्पा हाच सर्वसाधारण-पणें हल्लींच्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या हिंदी लोकांचा कार्यक्रम असतो. देशकालपरिस्थितीचा सारासार विचार करण्याची पात्रता असतांनाही हा वर्ग जर स्वदेशाच्या दुर्दैवी परिस्थितीकडे डोळेझांक करूं लागला तर बिचाऱ्या कोट्यवधि अज्ञ जनतेनें कोणाच्या तोंडाकडे पाहावें? चरकांत पिळले जाणारे हे लोक कावरेबावरे होऊन हा चरक कोणाचा? आपल्याला पिळणारे खरे कोण? वगैरे न समजतां भांबावलेल्या परिस्थितींत पाहतां पाहतां चिरडले जात आहेत. हें असेंच चालू राहिलें तर सध्यां मिळेल तितका रस पिऊन त्यावर ढेकरा देणारे व मिटक्या मारणारे सुशिक्षित लोकही शेवटीं या परि-स्थितीच्या चक्रांत ओढले जाऊन, चरकांत पिळले गेल्याशिवाय राहणार नाहींत. कोट्यवधि बांधवांची असहाय पिळणूक पाहून ज्याच्या हृदयास पीळ पडत नाहीं तो माणूसच नाहीं. मग त्यास सुशिक्षित म्हणणें तर दूरच राहिलें. गप्पा मारणें, दिवसां झोंपा

घेणें, कुचकामाचे परकी खेळ खेळणें, वगैरे प्रकारच्या आळशीपणांत वेळ घालविणारा हिंदुस्थानांत जसा एक भला मोठा वर्ग आहे तसा तो इतरत्र कोठेंही नाहीं. हा वेळ जर या सुशिक्षित व अशिक्षित लोकांनीं राष्ट्रकार्यीं लावला तर केवढें कार्य होण्यासारखें आहे बरें ! परंतु राष्ट्रकार्य म्हणजे काय ? तें कसें करावें ? आपण एखाद्या राष्ट्राचे घटक आहोंत कीं काय ? असल्यास त्या राष्ट्राचे नागरिक या नात्यानें आपल्या कांहीं जबाबदाऱ्या आहेत किंवा काय ? त्या कशा पार पाडाव्या ? याची कांहींच कल्पना नसल्यामुळें येवढा मोठा वर्ग स्वतः बेजबाबदारपणें वागतो, आळसांत व अराष्ट्रीय गोष्टींत काळाचा आणि वेळेचा अपव्यय करतो. येवढेंच नव्हे तर कोट्यवधि अज्ञ जनतेस योग्य वळण लावण्याची जी एक मोठी जबाबदारी प्रत्येक देशाच्या सुशिक्षित वर्गावर असते ती जबाबदारी हिंदुस्थानांतील हा वर्ग पार पाडूं शकत नाहीं. याचें कारण म्हणजे या व्यक्तींना स्वतःलाच ‘कस्त्वं, कुत आयातः का ते जननी कस्ते तातः’ वगैरे माहीत नाहीं. मग ते इतरांचें मार्गदर्शन तें काय करणार ?

आपल्यांतील प्रत्येक जण कसा बेजबाबदार, स्वार्थी व अराष्ट्रीय वृत्ति ठेवतो याचीं आपण आणखी कांहीं शेलकीं उदाहरणें घेऊं म्हणजे स्वदेशास सध्यां ज्या क्षयाची भावना झालेली आहे त्याचें थोडेंसें निदान होईल. स्वतःस “साहित्यिक व वाङ्मयसेवक” म्हणविणारे आजचे अनेक लेखक घ्या. यांचें वाङ्मय व साहित्य देशकाल-परिस्थितीशीं सर्वस्वीं विसंगत असें आहे. गडगंज संपत्ति व साम्राज्य मिळवून ठेवून आतां चैनीनें व फुरसतीनें लघुकथा, कादंबऱ्या, लघु-तम कथा, सत्यकथा, नाच, रंगढंग व प्रणय इत्यादींचें सचित्र विवेचन करणें हें पाश्चात्य राष्ट्रांस शोभत असेल; परंतु नेमक्या त्यांच्या अव-गुणांची “री” ओढणाऱ्या आमच्या “सुशिक्षित” लोकांस हें शोभत नाहीं. औरंगजेब स्वारीवर निघाला म्हणजे त्याच्या डेऱ्यांत सैनिकां-इतक्याच वेश्या व बाजारबुणग्यांचा भरणा असे म्हणून छत्रपति शिवाजीनेंही वेश्या व बाजारबुणगे यांस लष्कराचा एक आवश्यक भाग मानून त्यांचा संग्रह केला कीं काय ? का उलट शत्रूवर विजय

मिळवावयाचा होता म्हणून वरील सर्व प्रकार सक्तीनें त्याज्य ठरविले ? स्वदेश तारसुरांत आक्रंदन करीत असतांना ललिताच्या तारांतून प्रणयाचे कुमार्गी सूर काढणाऱ्या गुळचट, पुळचट आणि खुळचट खोगीरभरतीच्या भारुडास "वाङ्मय" म्हणावें कीं "साहित्य" म्हणावें व अडक्याच्या भवानीपुढें सव्वा लाखाचा गोंधळ घालणाऱ्यांस "भक्त" म्हणावें अथवा स्वराष्ट्रावर बाजी उलटविणारे "बुवा—साहित्यबाजी किंवा वाङ्मयबाजी—" म्हणावें हें ज्याचें त्यानें ठरवावें. धर्माच्या नांवाखालीं भोळ्याभाबड्या जनतेचें द्रव्य हरण करून तिला वाईट मार्गावर नेणें याला जर आपण धार्मिक बुवाबाजी म्हणतों तर "वाङ्मय वा साहित्य" अशा गोड नांवानें सुशिक्षित व अशिक्षित अशा दोन्ही वर्गांस भुलवून त्यांचे पैसे लुबाडणें व त्यांस कुमार्गी प्रवृत्त करणें ही वाङ्मयीन बुवाबाजी नव्हे काय ? स्वदेशास स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याकरितां हातावर शिर घेऊन रणांगणावर लढणारा जर एक "नेताजी" असला तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत आपापल्यापरी हिंदी जनतेची त्या दिशेनें व अंतिम विजय मिळविण्याच्या उद्देशानें तयारी करविणारा एक एक "लहान नेताजी" असणें जरूर आहे. आज या क्षेत्रांतील "नेताजी" म्हणण्याच्या लायकीचा वाङ्मय किंवा साहित्याच्या क्षेत्रांत कोण भारतीय लेखक आहे ? वाङ्मय-क्षेत्रांतील "नेताजी"नें सर्व साहित्य व साहित्यिक यांस एक विशिष्ट वळण लावून त्यांची संघटना करावयास हवी.

आमच्या आजच्या सुशिक्षित तरुण पिढीबद्दल बोलावयाचें म्हणजे चहा, सिगारेट, चित्रपट, लघुकथा, स्त्रैणपणा, क्रिकेटच्या गप्पा व अचकटविचकट बोलणें ह्यांत त्यांचें जीवनसार येतें. नाकावर चष्मा, हातांत कादंबरी, लुकतुकी शरीरयष्टि व ध्येयशून्य, अधोगतिकारक जीवनक्रम हे तिचे गुणविशेष. आमचा व्यापारीवर्ग पाहा. चित्रपट-निर्माते व त्यांत पैसे गुंतविणारे धनिक हे जे चित्रपट निर्माण करतात ते देशकालपरिस्थितीशीं सर्वस्वीं विसंगत असतात. हॅट, कोट, पॅंट, बूट इत्यादि घालून चिरूट फुंकणारा नायक, त्याच्या मागें मागें फिरणाऱ्या मुली, मोटारींची व ऐषआरामाची रेलचेल ही चित्रपटांतील

सृष्टि आमच्या देशाची खरी परिस्थिति दिग्दर्शित करते का? करीत नसली तर असे चित्रपट निर्माण करणारे व पैसे आणि वेळ मोडून ते चित्रपट पाहणारे देशाचे गुन्हेगार नव्हेत का? भारतांतील दूधदुभत्याची स्थिति पाहा. ज्या देशांत क्षीरसागराची कल्पना निघाली त्यांत आज थेंबभर शुद्ध व निर्भेळ दूध किंवा तूप मिळणें अशक्यप्राय झालें आहे. आमच्या लोकांची नीति अगदीं रसातळाला गेल्याचें हें चिन्ह नव्हे का? अशा तऱ्हेनें प्रत्येक वर्ग बेजबाबदारपणें वागत असल्याचें थोड्या विचारांतीं दिसून येईल. राष्ट्रीय जबाबदारीची टोंचणी प्रत्येकाचे मनांत दरक्षणीं असल्याशिवाय ही परिस्थिति सुधारणार नाहीं.

प्रत्येकानें आपल्या नित्य कार्यास राष्ट्रकार्य समजण्यास शिकावें. घराचा केर काढला तरी नागरिक या नात्यानें आपलें घर स्वच्छ व नीटनेटकें दिसावें हा उद्देश असावा. केर फेंकला तरी तो योग्य ठिकाणीं, इतरांस त्याचा उपद्रव पोंचणार नाहीं अशा ठिकाणीं, व्यवस्थित टाकावा. तो केरसुद्धां फुकट जात नसून कोठली तरी जमीन भरून काढण्यास उपयोगी पडत आहे किंवा नाहीं याची दक्षता घ्यावी. चित्रपट पाहणाऱ्यांनीं ज्ञानसंकलन म्हणून चित्रपट पाहावा. शारीरिक वा मानसिक उन्नति होत असेल अशाच कार्यांत भाग घेण्यास शिकून इतर कार्यक्षेत्रें त्याज्य ठरवावींत. आपल्या दैनंदिन कार्यक्रमाकडे राष्ट्रकार्य या दृष्टीनें पाहणें हें प्रत्येक नागरिकाच्या योग्य मनोभूमिकेचें एक विशिष्ट अंग आहे.

खऱ्या राष्ट्रीय वृत्तीचे माणसांत परधार्जिणेपणा अजीबात नसतो. एखाद्या स्वजनाशीं हाडवैर असलें तरी विजनाचा संबंध आला कीं तो केव्हांही स्वजनाचीच बाजू घेतो. सध्यां तरी हिंदी लोकांत या वृत्तीचा अभाव दिसतो. पाश्चात्यांची व पाश्चात्यपणाची छाप आपल्या-वर चटकन् पडते. उलट आपण आपल्या देशी वस्तूंची व माणसांचीच जेथें तेथें अवहेलना करावयाचा एकही प्रसंग वायां जाऊं देत नाहीं. जपान्यांच्या राष्ट्रीय वृत्तीचें एक उदाहरण येथें उद्धृत करावेंसें वाटतें. इंडोचायनांतील सायगांव शहरीं असतांना रोजच्याप्रमाणें आम्ही एके दिवशीं तेथील नभोवाणी-केंद्रावर (प्रचार करण्यासाठीं) जात होतों.

निघण्यास उशीर झाला किंवा काय अशी शंका येऊन आम्हीं आमचे-बरोबर असलेल्या "नगाव" नांवाच्या एका जपानी अधिकाऱ्यास "किती वाजले?" असें विचारलें. हातांतील घड्याळांत पाहून ९॥ वाजण्यास १० मिनिटांचा अवकाश असल्याचें त्यानें सांगितलें. आमच्यापैकीं एकानें त्यास म्हटलें, "अरे, तुझें घड्याळ पांच मिनिटें मागें दिसतंय्!" त्याबरोबर तो उत्तरला, "छे छे, टोकियोंतील घड्याळानुसार यांतील वेळ मीं ठेवलेली आहे व टोकियोचें जें जें म्हणून असेल तें तें कदापि चूक असणेंच शक्य नाहीं!" याला म्हणावें खरी राष्ट्रीयवृत्ति! असो.

## राष्ट्रसेवेचा मूलभूत कार्यक्रम

सर्वसाधारणपणें प्रत्येक नागरिकाच्या मनाची ठेवण कशा प्रकारची असावी हें आपण थोडक्यांत वर पाहिलेंच आहे. आतां प्रत्येकास प्रत्यक्ष कशा कशा प्रकारचें राष्ट्रकार्य अगदीं घरबसल्या, आपापले व्यवसाय सांभाळून, द्रव्यार्जन चालू ठेवून, कसल्याही प्रकारच्या हालअपेष्टा न सोसतां व इंग्रजांचा यत्किंचितही रोष होऊं न देतां करतां येण्यासारखें आहे तें आपण पाहूं. वर एके ठिकाणीं म्हटलेलेंच आहे कीं, घर बांधणें हें केवळ कलाकुसर जाणणाऱ्यांच्या हातून होणें जसें शक्य नाहीं तसेंच स्वातंत्र्य-मंदिर उभारणें हेंही मूठभर असहाय नेत्यांस शक्य नाहीं. राज्य हिसकून घेण्याच्या अटीतटींत किंवा वाटा-घाटींत आपले थोर नेते गुंतले असतांना त्यांच्या प्रयत्नांवर विसंबून आपण निष्क्रिय राहणें हें योग्य नाहीं व तें अंतीं घातकही ठरेल. म्हणून राष्ट्रकार्य म्हणजे जेलमध्येंच जाणें व खादी वापरणें येवढाच अर्थ नव्हे. घरबांधणींत प्रत्येकास रुचेल, पचेल व झेपेल अशा तऱ्हेचें पुष्कळ काम असतें. त्याचप्रमाणें राष्ट्रकार्यही कनिष्ठतमापासून तों वरिष्ठ-तमापर्यंत प्रत्येकास झेंपेल, पचेल व रुचेल अशा तऱ्हेचें आहेच. हा कार्यक्रम इतक्या निर्भेळ व मूलभूत स्वरूपाचा आहे कीं, कोणत्याही व्यक्तीस वा संस्थेस स्वतःच्या राजकीय मतास मुळींच फांटा न देतांही तो अंगीकृत करतां येईल. प्रबल इच्छा व ध्येयनिष्ठा मात्र पाहिजे.

कोणताही देश ऊर्जितावस्थेस आणावयाचा असला तर मुख्यतः त्या देशाच्या जनतेची पूर्ण शारीरिक व मानसिक उन्नति घडवून आणावयास पाहिजे. येथें "उन्नति" हा शब्द अध्यात्मिक अर्थानें योजिला नसून अगदीं पूर्णांशानें त्याचा आधिभौतिक अर्थच येथें अभिप्रेत आहे. सुरवातीस हेंही मनावर ठसविणें जरूर आहे कीं, आज व्यायाम केला म्हणजे लगेच दुसरे दिवशीं भुजा मोठ्या झाल्या किंवा नाहीं हें पाहणें जसें मूर्खपणाचें होय तसेंच एका पिढीनें स्वतःच्या शारीरिक व मानसिक उन्नतीची झपाट्यानें तयारी चालविली तरी लगेच दुसऱ्या पिढींत दशरथ किंवा राम यांच्यासारखे रथीमहारथी अपेक्षिणें वेडेपणाचें होईल. भीष्मपितामहांसारखे इच्छामरणी, हनुमान् अगर भीमतुल्य शक्तिमान् पुरुष, सीता-मंदोदरीसारख्या देवी, अर्जुना-सारखे कर्मयोगी योद्धे व रामकृष्णांसारखे ईश्वरावतार हे कित्येक पिढ्यांच्या उत्कर्षश्रेणीचे शिखरावर प्रगट होत असतात. आपल्याला केवढ्या लांबचा पल्ला गांठावयाचा आहे याची वरील उदाहरणांवरून कल्पना येईल, परंतु त्यामुळें छाती दडपल्यासारखें वाटून निराश होतां उपयोगी नाहीं. आम्रवृक्ष लावणारे सर्वच त्याचीं फळें चाखीत नाहींत. परंतु वर्धित आम्रवृक्षाच्या शीतल छायेखालीं विसांवा घेणारे पथिक व त्याचीं गोड फळें चाखण्याचें भाग्य लाभणाऱ्या पुढील पिढ्या या झाड लावणाऱ्या इसमाच्या दूरदृष्टीची आणि त्याच्या कर्मयोगित्वाची तारीफच करतात. ध्येयाचें शिखर जितकें दूर तितकी चढाईच्या प्रारंभास तावडतोब सुरवात केली पाहिजे. ध्येय अतिदूर असलें म्हणजे उन्नतीचा डोंगर चढूंच नये असें का कोण म्हणेल ! प्रत्येक गोष्टीचें किंवा क्रियेचें फल तत्क्षणीं कधींच मिळत नाहीं. पाकनिष्पत्ति करा-वयाची म्हटली तरी २-३ तासांनंतर सुग्रास भोजन मिळेल या आशे-वरच कीं नाहीं ? आणि तेवढ्या अवधींत हात भाजले, भांडें लवंडलें तर त्वरित कुठलें जेवण मिळायला बसलें आहे ? सिद्धि होईपर्यंत पुन्हा निष्पत्तीचा प्रयत्न करणें जरूर आहे. अर्थात् लहानसान गोष्टींत-सुद्धां जर अशा अनेक अडचणी असतात तर अखिल मानवजातीच्या अत्युत्कर्षाच्या मार्गांत किती अडचणी असतील ? म्हणून उन्नतीचा

प्रयत्न करूंच नये हें म्हणणें बरोबर होणार नाहीं. प्रत्येक पिढी अंतिम ध्येयाच्या दिशेनें दर वेळेस थोडी थोडी उन्नत होत आहे कीं नाहीं हेंच पाहणें प्रत्येक पिढींतील समाज-धुरंधरांचें कार्य असतें. आजकाल "समाज-धुरंधर" याचा अर्थ वाटेल त्या मार्गांनीं भरमसाट पैसे मिळवून स्वतःचा बडेजाव मिरवणारे येवढाच झालेला आहे. एखाद्या वेगवान् नदीवर मोठा सेतु बांधावयाचा असला तर त्या प्रवाहाच्या मधोमध खोल खळगे खणून भरभक्कम पायावर जाड जाड स्तंभ उभारावे लागतात. त्यांवर पुलाचा अजस्र सांगाडा आधारला जातो. मानवप्रगतीचेंही असेंच आहे. पूर्वतयारी व मूलभूत कार्येंच भरभक्कम व्हावें लागतें म्हणजेच इहपरलोकींचा मोक्ष साधणारा दिव्य सेतु त्यावर उभारला जाऊं शकतो. हा पाया घालण्याचें किंबहुना तत्पूर्वीचेंही पाया खणण्याचें काम आपल्याला आजच सुरू केलें पाहिजे.

# मनोभूमिकाच बदला

राष्ट्रसेवेच्या कार्यक्रमाची सुरवात प्रत्येकाची मनोभूमिकाच बदलण्यापासून केली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीनें स्वतःच्या मनांत देशभक्तीची किंवा राष्ट्रकार्याची एक प्रकारची तळमळ, टोंचणी किंवा लालसा उत्पन्न करावयास हवी. उठतां-बसतांना, निजतां-बोलतांना किंवा इतर कोणतेंही कार्य करतांना दरक्षणीं प्रत्येकानें स्वतःचे मनास हा प्रश्न सतत विचारीत राहावा कीं, माझ्या दैनंदिन जीवनक्रमांत राष्ट्रकार्य, समाजकार्य किंवा देशकार्य यांस पोषक असें मी काय व किती करतों? याहून आणखी मला किती करतां येणें शक्य आहे? अशा प्रकारच्या जाणिवेचा दिव्य दीप हृदयांत नेहमीं प्रकाश पाडीत राहील तरच बाह्य जीवनांत त्याचा कांहीं उजेड पडेल.

अतिपूर्वेंत जर्मनी व जपानसारख्या स्वतंत्र राष्ट्रांच्या नागरिकांशीं आमचा सहवास वाढूं लागला तसतसा त्यांच्या व हिंदी लोकांच्या वर्तणुकींतील व आचारविचारांतील भेद आम्हांला आपोआप प्रतीत होत गेला. हिंदुस्थानांत राहून आपण आपल्या दैनंदिन व्यवहारांत ज्या कित्येक गोष्टी पोटाशीं आवळून धरतों व नैसर्गिक मानतों त्याच बाहेरील जगाशीं संबंध आल्यावर अत्यंत चमत्कारिक, त्याज्य व मूर्खपणाच्या अशा वाटूं लागतात. जर्मन व जपानी लोक आपसांतील

व्यवहारांत आपापल्या भाषेंतच बोलत, तर त्यांचेसमोर आजचे युद्ध-बंद्यांतील हिंदी कमिशन्ड अधिकारी मात्र मोठ्या तोऱ्यांत आपापसांत इंग्रजींत बोलत. अतिपूर्वेंतील तामीळ व इतर उत्तर हिंदुस्थानी नागरिकसुद्धां एकमेकांशीं नव्याण्णव टक्के इंग्रजींतच बोलत. या इंग्रजी बोलण्यांतसुद्धां वक्ता नेहमीं बोलण्यांतील ऐट, हावभाव, उच्चार इत्यादींत इंग्रजांची पूर्ण नक्कल करण्याचा प्रयत्न करी. हें त्या स्वतंत्र राष्ट्रांचे लोकांस मोठें चमत्कारिक वाटे. प्रथम हिंदी लोकांशीं पूर्ण परिचय झाला नसतांना ते उघड कांहीं बोलून दाखवीत नसत, परंतु मनांतल्या मनांत त्यांचा संताप होई. पुढें पुढें जास्त मैत्री होऊन आम्ही एकमेकांशीं मोकळेपणीं बोलूं लागल्यावर ते आम्हांला उघड उघड म्हणूं लागले कीं, " तुम्ही तोंडानें मात्र म्हणता कीं इंग्रज तुमचे शत्रु आहेत, तुम्ही त्यांचे गुलाम बनलेले आहांत, तुम्हांला स्वतंत्र होण्याची इच्छा आहे वगैरे वगैरे. परंतु तुमच्या वागण्यावरून आम्हांला तरी तुमच्या म्हणण्यांत कांहीं अर्थ आहे असें वाटत नाहीं. तुमची वर्तणूक व वाचा यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. कोणतेही दोन सुशिक्षित हिंदी इसम आमचेसमोरसुद्धां इंग्रजींत—म्हणजे एका परकी भाषेंत—त्यांतही शत्रूचे भाषेंत—बोलण्यास धजतात याचा अर्थ तुमच्या डोळ्यांत परदास्याचीं फुलें पडलीं असल्यामुळें यांतील विकृति व हीनत्व तुमच्या नजरेस येत नाहीं असेंच म्हणावें लागेल. तुमचा आपसांतील खाजगी व जाहीर स्वरूपाचा पत्रव्यवहार, सभा, भाषणें, ठराव हीं सर्व इंग्रजींत चालतात. या सर्व गोष्टी पाहिल्या म्हणजे इंग्रजांस तुम्ही शत्रु समजत असाल हें आम्हांला तरी कांहीं पटत नाहीं..." जपानी व जर्मन लोकांस तर आमचा इंग्रजधार्जिणेपणा येवढाच दिसला, परंतु तेच लोक जर आज हिंदुस्थानांत आले तर त्यांना आमच्या रोमरोमांत भरलेलें परदास्य पाहून तोंडांत बोट घालावेंसें वाटेल. आमच्यांत भिनलेली ही गुलामी कोणत्या थराला पोंचली आहे तें आपण जरा बारकाईनें पाहूं. आपला पोषाख पहा. एखाद्यानें दरबारी तुमान वगैरे चढविलेली आपल्या दृष्टीस पडली तर आपल्याला मळमळतें. हा कसला डोंबाऱ्यासारखा किंवा चपराशासारखा पोषाख

असें आपल्या परदास्यजर्जर मनास वाटतें. पगडी, उपरणें, गंध इत्यादि पाहिलें म्हणजे सर्वांस भडभडून ओकारी येते. एखादा अज्ञानी सनातनी भिक्षुक किंवा तत्सम कोणी तरी गबाळ्या असावा अशीच आपली सर्वांची समजूत होते. परंतु हॅट, कोट, पॅंट, नेकटॉय, कॉलर, बूट, इत्यादि घातलेल्या इसमास माननीय, विद्वान् व थोर व्यक्ति असें आपण चटकन् समजतों. सरकारी अर्ज, पत्रांवरील पत्ता, आपापसांतील खाजगी पत्रव्यवहार हें सर्व आपण अगदीं सहजगत्या इंग्रजींत ठोकून देतों. हें आपल्या इतक्या अंगवळणीं पडलेलें आहे कीं, प्रत्यक्ष आपल्या मातृभूमींत, अगदीं आपापसांत आपण एका परकी भाषेंत, येवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष आपल्या शत्रूच्या भाषेंत, लिहितों, बोलतों यांतील आत्यंतिक हिडीसपणा आपल्या ध्यानींमनींही येत नाहीं. आपल्या राष्ट्रभाषेंत किंवा मातृभाषेंत लिहिणें हें आपल्याला अत्यंत कमीपणाचें वाटूं लागलें आहे. आपल्या बोलण्यांत आपण "मिसेस", "फादर", "सॉरी", "थँक यू" इत्यादि शब्द इतक्या बेमालूमपणें उपयोजितों कीं, त्यांचे राष्ट्रीय प्रतिशब्द अथवा तद्भावनिदर्शक देशी वचनें आपणांस अत्यंत त्याज्य व हीन अशीं प्रतीत होतात. टपाल कचेऱ्या अथवा रेल्वे खात्यांत चौकशी करावयास गेलें म्हणजे स्वतः-च्या मातृभाषेंत अथवा राष्ट्रभाषेंत चौकशी करणाऱ्या इसमास अगदीं अडाणी समजून त्या त्या खात्यांत काम करणारे आपलेच लोक त्या स्वबांधवांकडे दुर्लक्ष करतात. लगेच भाषा बदलून इंग्रजींत त्यांस झाडलें म्हणजे ते वठणीवर येतात. अनेक देशांच्या सीमा ओलांडून, मी मलिन पोषाखांत हातांत एक कातडी पिशवी घेऊन कलकत्ता शहरांत जेव्हां प्रथमच पदार्पण केलें तेव्हां हिंदी भाषेंत बोलणारा माझा अवतार पाहून कित्येक हॉटेलवाल्यांनीं आपादमस्तक मला न्याहाळून जागा असूनसुद्धां नाकारली. आपल्याच देशांत आपल्या राष्ट्रीय भाषेची अशी पायमल्ली होत आहे हें पाहून मला वाईट वाटलें. अंधार पडत चालला होता. कित्येक वर्षांनीं, अनेक मैल पायीं चालत, मी हिंदुस्थानांत प्रथमच पदार्पण केलें होतें. कलकत्त्यासारख्या सर्वस्वीं अपरिचित अशा शहरांत मला रात्रीं झोंपावयास जागा मिळणें अवश्य होतें. पुढच्या

हॉटेलमध्यें गेल्याबरोबर मीं इंग्रजींत बोलण्यास सुरवात केली व जादूची कांडी फिरविल्याप्रमाणें मला तेथें प्रवेश मिळाला. प्रत्यक्ष हिंदी लोकांनीं चालविलेल्या हिंदुस्थानांतील हॉटेलांत जर ही स्थिति तर इंग्लंडमध्यें गोऱ्या लोकांनीं आपल्या शामवर्णाकडे पाहून त्यांच्या हॉटेलांत प्रवेश नाकारला तर आपल्याला वाईट कां वाटावें ? आगगाड्यांत अथवा अन्य जाहीर ठिकाणीं कोणीही " सुशिक्षित " गृहस्थ आपापसांत भांडूं लागले कीं तावातावानें इंग्रजींत भांडूं लागतात. जणुं काय आपली ऐट, राग, दर्जा हीं सर्व इंग्रजी भाषेंतूनच यथार्थपणें प्रतीत होतात! आमचें वाचन व ज्ञानसंकलन सर्व इंग्रजी पुस्तकें व वर्तमानपत्रें यांतूनच होतें. मराठींतून आम्हीं आपल्या करमणुकीच्या लघुकथा वाचाव्यात, पण इतर विद्वत्तापूर्ण ग्रंथ इंग्रजींतच लिहावेत व आम्हीं वाचावेत!

इंग्लंडसारख्या थंड देशांत अकरा वाजेपासून चार वाजेपर्यंत उन्हांत खेळावयास मिळावें म्हणून क्रिकेटचा (चेंडूफळीचा) थंड खेळ निघाला. ब्रिटिश साम्राज्याच्या बाहेर हा खेळ कोणास ठाऊकही नाहीं. आम्हीं गुलाम लोकांनीं मात्र या परकी शत्रुराष्ट्राच्या महाग व नीरस खेळाचें विनाकारण भलतेंच स्तोम माजविलें आहे. यांत शक्ति, युक्ति, बुद्धि किंवा कलाकौशल्य कांहीं नाहीं. दोघांनीं वेळ गमावीत व रेंगाळत खेळत रहावें, अकरा जणांनीं ताटकळत उभें रहावें, ऐशीं हजार बेजबाबदार लोकांनीं आपला अमूल्य वेळ गमावून हा रेंगाळया खेळ पहात टाळ्या वाजवाव्या व शेंकडों लोकांनीं कुरुक्षेत्राकडे डोळे लावून बसणाऱ्या धृतराष्ट्राप्रमाणें रेडिओशीं डोकें खुपसून, वत्सलाहरणानें आनंदित झालेल्या नारदाप्रमाणें आनंद प्रदर्शित करावा, हें लाजिरवाणें नाहीं का ? आपल्या चाळीस कोटि अज्ञ व दीन जनतेपैकीं कितीकांस या खेळापासून कांहीं बोध होतो वा फायदा मिळतो ? त्या मानानें या खेळावर किती पैसा खर्च होतो, विलायतेस जातो व शिवाय देशाचें मार्गदर्शन ज्यांनीं करावें अशा 'सुशिक्षित' तरुण पिढीचा बुद्धिभ्रंश होतो तो निराळाच. याहीपेक्षां सर्वांत हानिकारक म्हणजे, " इंग्रजी तें सर्व चांगलें " अशा भावनेनें आम्हीं जें क्रिकेट खेळाला दत्तक घेतलें

आहे ती भावना. घरांतील पाश्चात्य पद्धतीची बैठक, रहाणी, ब्रिज, बॅड्मिंटन इ. पाश्चात्य खेळांत दृग्गोचर होत असलेला आमचा परधार्जिणेपणा इतक्या पराकोटीला पोंचलेला आहे कीं, आतां आट्यापाट्या, खोखो, हुतुतु इत्यादि बिनखर्ची, शक्तिदायी, स्वदेशी खेळांचा नामोच्चार करणेंही आम्हांला लाजिरवाणें वाटूं लागलें आहे. मग ते खेळण्याचें वा पाहण्याचें तर दूरच राहिलें.

जगांतील इतर देश पाहण्याचें सोडून ज्यानें उठावें त्यानें इंग्लंडचाच ध्यास धरणें, धनिकांनीं उठल्यासुटल्या इंग्लंडलाच जाणें, हिंदुस्थानासारख्या देशांतही कमोडवर शौचाला बसण्याच्या व त्या वेळीं हौसेनें कागद वापरण्याच्या घाण संवयी इंग्लंडमधून स्वदेशी आणणें, सिगरेट, चहा आदि व्यसनें स्मार्त कर्मांइतकींच कसोशीनें घरोघरीं आचरणें, ड्रिल आदि अत्यंत बालिश व कोत्या व्यायामपद्धतींस प्रमाण समजणें, डोळे मिटून परदेशी वस्तु वापरणें, अशीं, सूक्ष्म विचारांतीं, आपल्या रोमरोमांत भिनलेल्या गुलामीचीं अनेक उदाहरणें देतां येतील. प्रत्यक्ष संस्कृत वाङ्मयावर कांहीं प्रश्न उद्भवला तरी आम्ही आमच्या हजारों विद्वानांना डावलून संस्कृतचे र...ट...फ...पाठ केलेल्या एखाद्या "मॅक्समुल्लर"कडे धांव घेतों. आम्हांला मराठी शिकवायलाही लंडन विश्वविद्यालयाचा एखादा गोरा एम्. ए. मिळाला तर त्याला आम्ही लक्ष पगार देऊन त्याच्या तोंडून निघणाऱ्या मुक्ताफळांच्या माळा आमच्या गळयांत घालून मिरवूं. अशी परिस्थिति असतांना आम्हीं नुसतें तोंडानें "इंग्रज आमचे शत्रु आहेत" असें म्हटलें तर कोणाला तें खरें तरी वाटेल का? येवढेंच काय, प्रत्यक्ष एखादा गोरा आमच्यासमोर येऊन उभा राहिला, त्यानें स्वतःच्या कमरेची तलवार आमच्या स्वाधीन केली व "माझ्यावर खुशाल वार करा, मी कांहीं प्रतिकार करणार नाहीं" असें म्हटलें तरी आमचा हात त्याच्यावर वार करण्यास कदापि उठणार नाहीं. हा मनुष्यस्वभावच आहे. ज्या लोकांची भाषा, पोषाख, रीतरिवाज, शिष्टाचार, ज्ञान, खेळ, वाङ्मय, इत्यादींनीं आम्ही भारून गेलों आहोंत, ज्यांचेबद्दलच्या आत्यंतिक प्रेमानें आमचीं हृदयें दुथडी भरून वाहत आहेत, ज्यांचें

विराट स्वरूप पाहून आम्ही गर्भगळित झालेलों आहोंत, ज्यांचें अकटो-पासून विकटोपर्यंतचें ज्ञान व सत्ता पाहून आम्ही स्तिमित झालों आहोंत, आमच्या म्हणून ज्या कांहीं गोष्टी आहेत त्या पाहून आत्म-हत्या करून घेण्याइतकी लाज जेथें आम्हांला वाटूं लागली आहे तेथें बाह्यांग खादीनें झांकून व जेलमध्यें जाऊन स्वातंत्र्यप्राप्ति कधींही होणार नाहीं. खादीचीच कां होईना परंतु हॅट, कोट, पॅंट इत्यादि घालणाऱ्या लोकांचीं मनें गुलामच म्हटलीं पाहिजेत. आपल्या देशांतील राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळाची सभा व ब्रिटिश कॅबिनेटची खास बैठक या दोन्ही अस्सल इंग्रजी वातावरणांत होतात. आपापसांतील इंग्रजींत चाललेल्या खिळोप्याच्या गप्पा, भर सभेंतील इंग्रजी ठराव आणि भाषणें, पोषाख, इंग्रजी शिष्टाचार, वार्ताहरांचे लाघवी व बाजार-बुणगी घोळके यामुळें ही ब्रिटिश कॅबिनेटची चर्चा चालू आहे कीं त्यांचेविरुद्ध शत्रुत्वाची घोषणा करणाऱ्या राष्ट्रीय सभेची राष्ट्रीय बैठक सुरू आहे हाच पाहणाऱ्यास भ्रम पडतो.

## गुलामीचें मूळच नष्ट करा

वर उल्लेखिलेल्या गुलामीचें आपल्यांतून समूळ उच्चाटन करणें हें प्रत्येक व्यक्तीचें व संस्थेचें कर्तव्य आहे. स्वदेशी वस्तु, भाषा, पोषाख, व्यवहार, खेळ, आचार, रीतीभाती या सर्वांची पुनःस्थापना करणें हें अत्यंत अगत्याचें आहे. परकी व पाश्चात्य म्हणून जें जें दिसेल तें अट्टाहासानें उपटून फेंकून दिलें पाहिजे. सर्व हिंदी जनतेच्या रोमरोमांत अशा रीतीनें पाश्चात्यांबद्दलचा द्वेष व त्वेष निर्माण केला पाहिजे. अमुक एक पाश्चात्य गोष्ट चांगली कीं वाईट हा विचार करण्याची ही वेळ नव्हे. ती पाश्चात्य आहे हें एकच कारण तिच्या उच्चाटनास पुरेसें असलें पाहिजे. सर्वसामान्य जन हे राष्ट्राच्या दृष्टीनें लहान मुला-सारखेच अपरिपक्व मनाचे असतात. राष्ट्रकार्यधुरंधरांनीं व विचारी मुत्सद्यांनीं त्यांस शिस्तीच्या धारेंत धरलें पाहिजे. त्यांच्याशीं वादविवाद व विचारविनिमय करण्याची त्यांची पात्रता नसते. विचारविनिमय व वादविवाद यांना वाव दिला म्हणजे मुख्य मुद्दा बाजूलाच राहून त्याला

अनेक फांटे फुटतात, कामाचा विचका होतो आणि प्रकृति तितक्या विकृति होतात.

वर सांगिल्याप्रमाणें पाश्चात्य चिन्हांचें उच्चाटन करणें किती सोपें व अगत्याचें आहे! याला कसल्याही प्रकारची घस सोसावी लागत नाहीं किंवा आपणांवर राज्यकर्त्यांची वक्रदृष्टिही ओढवून घेतल्यासारखें होत नाहीं. परंतु मनाचा दुबळेपणा जात नाहीं व कायावाचामनें स्वदेशीचा पुरस्कार करण्याचा धीर होत नाहीं. चहा, कॉफी, इत्यादि गरम व विषारी पेयें आपल्यासारख्या उष्ण कटिबंधांतील देशांत घेण्याची जरूर नसते; येवढेंच नव्हे तर त्यामुळें पिढ्यान् पिढ्या होणारा शारीरिक व मानसिक ऱ्हास होतो हें आपल्याला निश्चितपणें ठाऊक असूनही सुशिक्षित व विद्वान् म्हणविणारे सर्व लोक हीं पेयें घेतात. त्याबरोबरच कप-बशा, गाळणें, स्टोव्ह, किटली, चमचे, इत्यादि पुष्कळशी भारूडभरती आपल्या स्वयंपाकघरांत ठाणें देऊन बसली आहे. चहा-कॉफीची संवय हें उंटाचें पिलूं असून तें गुलामीचें एक विशिष्ट प्रतीक आहे. गाईचें दूध मुबलक प्रमाणांत पिण्याची अत्युत्तम संवय जाऊन त्या जागीं शरीरनाशक अशा या पाश्चात्य उष्ण पेयांची स्थापना झाल्यामुळें हिंदी जनतेचा कल्पनातीत शारीरिक व मानसिक ऱ्हास होत आहे. याला वेळींच बांध घातला नाहीं तर भविष्य पुराणांत लिहिल्याप्रमाणें लवकरच तीन फूट उंचीची व नानाविध रोगजर्जर पिढी आपणांस दिसूं लागेल. पाश्चात्य संस्कृतीनें आम्हांला कांहीं दिलें असेल तर तें वाढतीं न्यायालयें व रुग्णालयें. ज्या प्रमाणांत आपापसांतील भांडणें व आपल्यांतील रोगराई वाढत जात आहे त्या मानानें अर्थातच हीं न्यायालयें व रुग्णालयें कमी पडतात. कारण दिवसेंदिवस गरीब व दुर्बळ होत जाणाऱ्या जनतेला रुग्णालयांची व न्यायालयांची वाढ झेपणारही नाहीं आणि पुरणारही नाहीं. अशा तऱ्हेनें आपल्यांतील विचारी लोक वेळींच नेटानें कार्याला लागले नाहींत तर आपल्या मायदेशाचें भवितव्य फार दुर्धर आहे असें दुःखानें म्हणावें लागतें.

प्रत्येक व्यक्तीस सुसाध्य असें दुसरें कार्य म्हणजे अखिल हिंदुस्थानांत एक भाषा व एक पोषाख रूढ करण्याचें. आपली मातृभाषा

कोणतीही असो, परप्रांतीय स्वजनांशीं बोलतांना आपण हिंदींत बोलण्याचा व पत्रव्यवहाराचा अट्टाहास धरला पाहिजे. सरकारी दस्तऐवज, अर्ज इत्यादि इंग्रजींत न करतां आपापल्या मातृभाषेंत किंवा राष्ट्रभाषेंत करणें हें प्रथम आपल्या दास्यवृत्तीस कसेंसेंच वाटलें तरी त्यांतलें मर्म कळल्यावर तेंच योग्य वाटेल. मनास जसें वळण लावावें तसें लागतें व पुढें तेंच बरें वाटूं लागतें. इंग्रजी अमल सुरू झाला त्या वेळीं उपरणें, रुमाल किंवा पगडी इत्यादि पोषाख रूढ होता व विदेशी पद्धतीचा पोषाख घालणाऱ्यास बाटगा समजून लोक त्याचा उपहास करीत असत. आतां त्याच्या उलट परिस्थिति झालेली आहे. परंतु यांपैकीं चांगलें वळण कोणतें हें "सुशिक्षित" लोकांनीं समजून सामान्य जनतेस तसें वळण लावावयास हवें.

अखिल हिंदी जनतेकरितां एक पोषाख (एक पुरुषांकरितां व एक स्त्रियांकरितां) ठरविणें जरूर आहे. आमच्या देशांत अनेक प्रांतांचे अनेक भिन्न पोषाख असल्यामुळें एकमेकांबद्दल निष्कारण परकी भाव, द्वेष व बेकी निर्माण होते. युरोप खंडांत कित्येक राष्ट्रें असूनही त्यांचा पोषाख सर्वसाधारणपणें एक आहे. आमचें एक राष्ट्र असूनसुद्धां आमच्यांत अनेक प्रकारचे पेहेराव रूढ आहेत. एका पोषाखाचा दृक्परिणाम सर्वसामान्य जनतेच्या मनावर फार चांगला होतो. आपल्यासारखाच आपल्या इतर देशबांधवांचा पोषाख पाहून आपण एक आहोंत, आपल्यामागें एक मोठी संघशक्ति आहे, असा एक जबरदस्त आत्मविश्वास प्रत्येकाचे मनांत निर्माण होतो. पोलिस अथवा लष्करी इसमाचे हातांत दांडुकेंही नसलें तरी आपण त्याला कां घाबरतों? कारण त्याचा खाकी पोषाख पाहून, त्याच्यामागें केवढी संघटना त्याचा कड घेण्यास तयार आहे ही भावना आपल्या मनांत भीति निर्माण करते. आपण या एका इसमाला कांहीं इजा केली तर समवेषधारी त्याचे इतर संघमित्र आपल्यावर गहजब करतील ही आपली खात्री असते. हल्लीं एखादा तामीळ अथवा बंगाली मनुष्य पंजाबमध्यें गेला तर एकमेकांचा भिन्न वेष, भाषा इत्यादि पाहूनच एकमेकांच्या कपाळास

आंख्या पडतात व त्यांच्यांतील दुजाभाव वाढतो. त्यांचा पेहेराव एका विशिष्ट पद्धतीचाच असला तर प्रांताप्रांतांच्या लोकांतील परकेपणा बहुतांशीं कमी होईल. एका पोषाखाची पकड सर्वसामान्य जनतेवर फार त्वरित व घट्ट बसते. अतिपूर्वेंतील एक उदाहरण येथें उद्धृत करावेंसें वाटतें : अतिपूर्वेंत नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं स्थापिलेल्या हिंदी स्वातंत्र्य सरकारनें बालकसेना व स्त्रीसेना स्थापन केल्या होत्या हें सर्वांस विदित आहेच. स्त्रीसैनिक आपादमस्तक खाकी पोषाखांत असत. सेनेंतील बाल-सैनिक निळी चड्डी, खादीचा सदरा व खादीची टोपी घालीत. अनेक राष्ट्रीय समारंभ साजरे होत ते दिवशीं नेताजींचें किंवा (ते हजर नसल्यास) इतर अधिकाऱ्यांचीं भाषणें होत. बालक-सेना व स्त्रीसेनेचीं पथकें आपापलीं निशाणें घेऊन समोरील मैदानावर रांगेनें बसत. अशाच एका प्रसंगीं कै. रासबिहारी बोस यांचे निधना-संबंधीं दुःखप्रदर्शक सभा भरली होती. या प्रसंगीं नेताजी सिंगापुरांत नव्हते. त्यांचेऐवजीं इतर अधिकाऱ्यांचीं भाषणें झालीं. धो धो जलवृष्टि होऊं लागली तरी त्या स्त्रीसेना व बालकसेनेंतील व्यक्ति भाषण ऐकत निश्चल बसल्या होत्या. एकही व्यक्ति इकडची तिकडे कांहीं हलली नाहीं. याच स्त्रिया व हींच मुलें आपापल्या नागरी पोषाखांत असतीं तर पावसाला भिऊन इकडेतिकडे उठून गेलीं असतीं. परंतु आतां एका पोषाखामुळें त्यांच्यांत एकीची भावना निर्माण झालेली होती. "आपण एक आहोंत व या सर्वांचेमधून आपण एकटेच उठून गेलों तर इतर सैनिक आपल्याला काय म्हणतील ? तें कांहीं नाहीं, कांहीं झालें तरी आपण या पोषाखाचा अपमान होईल असें न वागतां नेटानें बसलेंच पाहिजे." असेंच प्रत्येक व्यक्तीस वाटे. पाश्चात्य देशांतील युद्धकालीन चित्रपट आपण पाहतों तेव्हां सर्व आबालवृद्ध स्त्री-पुरुष एका विशिष्ट पोषाखांत पाहून त्यांच्यांतील एकीच्या भावनेनें आपण किती भारावून जातों ! अर्थात् एका पेहेरावानें एकीची व संघशक्तीची भावना बळकट होण्यास फार मदत होते. कांहीं अज्ञ लोक असें म्हणतात कीं, एकीची भावना मनांतच नसली तर बाह्यांगीं एक पोषाख अंगीकारून आपसांतील एकी कशी वाढेल ? याला उत्तर

असें आहे कीं, बाह्य जगांतील अनेक दृश्य वस्तूंचे व गोष्टींचे मनावर परिणाम होऊनच कोणाचेंही मन व त्यांतील विशिष्ट भावना तयार होत असतात. बाह्य जगाच्या नित्य अवलोकनातूनच भावना निर्माण होतात. फरक येवढाच कीं, आपणांस हवें तसें बाह्यांग निर्माण करून आपण आपल्या मनास हवें तसें सुयोग्य वळण लावूं शकतों. हवें तसें बाह्यांग अंगीकृत करण्याचा आपण खटाटोप केला नाहीं तर यदृच्छेनें मनास जें वळण लागेल तें लागेल. यदृच्छेनें लागलेलें वळण बहुधा अधोगतिकारकच असतें. शिवाय आपल्या जीवनांत असें एकही क्षेत्र नाहीं कीं, ज्यांत आपण आपल्या मनाला विशिष्ट वळण लावण्यास अनुकूल बाह्य परिस्थिति निर्माण करीत नाहीं. ध्यानस्थ बसण्यास आपण शांत, थंड व एकांताचें स्थान शोधतोंच कीं नाहीं! यावर कोणी असें जर म्हणाले कीं, का हो, ईश्वरावर तुमची खरी भक्ति असली तर भर रहदारीच्या रस्त्यांतसुद्धां तुमची ब्रह्मानंदीं टाळी लागली पाहिजे. हें म्हणणें जसें सयुक्तिक नाहीं तसेंच एका पेहेरावानें कृत्रिम एकीच निर्माण होईल या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

हिंदुस्थानांत दुर्दैवानें आज प्रांताप्रांतांतील एकीचाच प्रश्न नाहीं, तर जातीजातींत व पक्षोपपक्षांत असलेल्या अनेक सूक्ष्म भेदांचाही प्रश्न आहे. हे सर्व बहुतांशीं एका राष्ट्रीय पेहेरावानें मिटण्यासारखे आहेत. एक राष्ट्रीय पोषाख ठरवितांना बऱ्याच गोष्टी लक्षांत घ्यावयास हव्या. पहिली म्हणजे हिंदी राष्ट्रीय पोषाखांत पाश्चात्य अथवा कोठल्याही परकी पेहेरावाचा मागमूसही नसला पाहिजे. या दृष्टीनें आपल्या पेहेरावांतील कोट व सदरे इत्यादींची कॉलर, पायघोळ पायजमे, पँट व बूट घालण्याची पद्धत यांना फांटा दिला पाहिजे. राष्ट्रीय पोषाख सुटसुटीत, वीरोचित व आपल्या राष्ट्रीय परंपरेस शोभणारा असाच असला पाहिजे. सुदैवानें हिंदुस्थानांतील अनेक प्रांताप्रांतांच्या व भिन्न जातींच्या सर्व आबालवृद्ध पुरुषांस समान असा एक पोषाख आज हिंदुस्थानांत विद्यमान आहे. याला कोणतीही जातीय वा प्रांतीय हरकत येण्यासारखी नाहीं. शिवाय वर उल्लेखिलेले राष्ट्रीय पोषाखांतील इतर गुणही त्यांत आहेत. हा पोषाख म्हणजे (गुडघ्यापासून खाल-

पर्यंत तंग व गुडघ्यापासून कंबरेपर्यंत सैल असा ) पांढरा शुभ्र दरबारी पायजमा, पांढरे मोजे, पायांत स्लीपर्स ( अथवा रजपुती पद्धतीचें दरबारी पादत्राण ); अंगांत एक सैलसा पांढरा शुभ्र दरबारी सदरा—याच्या लांब बाह्या मनगटाशीं सैल, लांबी अर्ध्या मांड्या झांकण्याइतकी व बिना-कफ किंवा बिना-कॉलरचा असा हा सदरा ( किंवा अंगरखा ) असावा; त्यावर खिसे असलेली एक बंडीवजा जॅकेट व डोक्यावर पांढरी शुभ्र धुतां येण्यासारखी टोपी. हा पोषाख पांढरा शुभ्र ( अंगांतील बंडी अथवा जॅकेट सोडून ), सुटसुटीत, रुबाबदार व आपल्या पूर्वपरंपरेस शोभण्यासारखा असा आहे. पूर्वींचे आपले वीरपुरुष हाच पोषाख परिधान करीत असत. त्यामुळें या दृष्टीनेंही हा पोषाख स्फूर्तिदायक असाच होईल.

सर्व हिंदी पुरुषांनीं घरांत वाटेल तो पोषाख रूढ ठेवला तरी सार्वजनिक व्यवहाराकरितां घराबाहेर पडतांना हाच पोषाख रूढ करावा. अनेक प्रांतांच्या व जातींच्या लोकांनाही हरकत घेण्यासारखें या पोषाखांत कांहीं नाहीं. सर्वांच्या दरबारची हीच पूर्वपरंपरा असल्यामुळें हा पोषाख सर्व हिंदी लोकांनीं अंगीकृत करण्यांत कसलीही अडचण येणार नाहीं. इतरांचेकरितां थांबण्यापेक्षां ज्यांना हा पोषाख व त्याचें महत्त्व पटेल त्यांनीं ताबडतोब स्वतःपुरता तरी हा पेहेराव कायम करणें जरूर आहे. पायघोळ पायजमा, पँट व धोतर इत्यादि परिधान करणारे दरबारी पायजम्याच्या जागीं आपल्या (तूर्त) आवडत्या वस्त्राची योजना सुचवितील. परंतु त्यांनीं असा विचार करावा कीं, हा प्रश्न व्यक्तिव्यक्तीच्या आवडीनिवडीवर सोडून चालणार नाहीं. अखिल भरत-राष्ट्रांतील भिन्न जातींच्या, विविध प्रांतांच्या, अनेक पक्षोपपक्षांच्या, वेगवेगळ्या मतांच्या व संस्थांच्या, निरनिराळ्या वयांच्या लोकांस बहुमतें पटण्यासारखा, आपल्या परंपरेस साजणारा, सुटसुटीत, वीरोचित, काढण्या-घालण्यास व धुण्यास सोपा, उष्णशीत हवामानास साजेसा, बसणें, उठणें, धांवणें इत्यादि क्रियांस सोईचा व कोठल्याही परक्या संस्कृतीशीं कांहीं एक संबंध नसलेला सर्वमान्य असा एकच पोषाख आज हिंदुस्थानांतील जनतेंत एकी व संघटना

निर्माण करण्याच्या दृष्टीनें रूढ करणें आवश्यक आहे. वर उल्लेखिलेला पोषाख हाच सर्व कसोट्यांस पूर्णांशानें उतरणारा असा म्हणजे बहुगुणी पोषाख आहे. कांहीं जण गुडघ्यापर्यंतच्या अर्ध्या विजारी जास्त पसंत करतात; कारण मर्दानी खेळास त्याच योग्य असें त्यांचें म्हणणें आहे. हें म्हणणें तितकेंसें सुयुक्तिक नाहीं. आखाड्यांत उतरून कुस्ती खेळण्यास लंगोटच योग्य म्हणून सर्वांनीं लंगोटच घालावा कीं काय? मर्दानी खेळ अथवा कुस्त्या इत्यादि विशिष्ट क्रियांस विशिष्ट पेहेराव लागला तर तो जरूर करावा, परंतु नित्य सार्वजनिक व्यवहारांत घराबाहेर अखिल हिंदी जनतेनें कोणता पोषाख वापरावा हा मुख्य मुद्दा असतांना इतर प्रश्न उद्भवूं नयेत. हिंदुस्थानांत गांवोगांवीं रस्त्यांतून जाणारे-येणारे सर्व लोक या एकाच विशिष्ट पोषाखांत फिरतांना आपल्याला दृग्गोचर होऊं लागले तर आपल्यांत केवढी एकीची भावना निर्माण होईल याची ज्यानें त्यानें कल्पना करावी.

स्त्रियांचे बाबतींत गोल साडी नेसण्याची प्रथा आपोआपच रूढ होत आहे. यासच जोरानें चालना देऊन हा पोषाख सार्वत्रिक रूढ करणें सोईचें होईल. अर्थात् हा पेहेराव तितकासा सुटसुटीत नाहीं व पुढेंमागें चित्रांतील लक्ष्मी किंवा सरस्वती यांच्या वस्त्रांची पद्धत रूढ करतां आल्यास उत्तमच, नाहींतर तूर्त निकडीचा उपाय म्हणून गोल साडीची प्रथा अंगीकृत करण्यास कांहीं हरकत नाहीं. पायांत चपला असाव्यात. पडद्याची रूढि पाळणाऱ्या स्त्रियांचें जीवन बऱ्हंशीं समाजास निरुपयोगीच होतें. म्हणून पडद्याची चाल काढून टाकण्यास झटणें व आपल्या इकडील हिंदी स्त्रियांचीं शरिरें वाटेल तशीं सुटलेलीं व बेढब असतात तीं सूर्यनमस्कारासारख्या शरीरसौष्ठवास पोषक अशा व्यायामाची अभिरुचि उत्पन्न करून पुढील पिढ्यांच्या वाढीच्या दृष्टीनें सुदृढ, निरोगी, सुटसुटीत व सुंदर करणें आवश्यक आहे. राष्ट्रीय वृत्तीच्या स्त्रियांस फुरसतीच्या वेळीं स्त्री-समाजांत इतर कार्यक्रमा-बरोबरच वरील प्रकारचीं दोन विशिष्ट कार्येंही करण्यासारखीं आहेत.

वर सांगितलेला पोषाख प्रत्येकानें स्वतः अंगीकारून आपल्या सहृ-

वासांत येण्याच्या सर्व व्यक्तींस तो अंगीकृत करण्यास भाग पाडलें तर केवढें मोठें राष्ट्रकार्य होईल! आपल्या पेहेरावांतील सर्व पाश्चात्य खाणाखुणा गेल्यामुळें पाश्चात्यांबद्दलचा द्वेष रोमरोमांत भिनण्यास मदत होईल व आपल्यांतील एकी आणि संघटना वाढेल.

देवनागरी लिपि ही सर्व जगांत अत्युत्तम असल्यामुळें व भारतीय संकृतीची कीर्ति दिगंत पसरविण्यास कारणीभूत होणारें आपलें सर्व प्राचीन ग्रंथभांडार याच लिपींत असल्यामुळें व शिवाय आपल्यांत रूढ असणारे सर्व शब्द याच लिपीनें स्पष्ट व्यक्त होत असल्यामुळेंही हीच लिपि रूढ करणें आवश्यक आहे. आपल्या बंगाली, गुजराती, तामीळ, मलबारी, कानडी व पंजाबी बंधूंनीं निदान सार्वजनिक व्यवहारांत तरी हीच लिपि अंगीकृत करणें आवश्यक आहे. बहुजन हिंदी समाजाची हीच लिपि असून इतर असंख्य लोकांचीही थोड्याफार फरकानें हीच लिपि आहे. गुरखे लोकही देवनागरींतच लिहितात. हिंदी संस्कृतीशीं एकजीव असणारी हीच लिपि प्रसृत करणें आवश्यक आहे.

## आत्मोन्नति व समाजकार्य

यानंतर जो कार्यक्रम आहे त्याचे दोन भाग करतां येतील. यांपैकीं एक भाग आत्मोन्नतीचा व दुसरा भाग समाजकार्याचा. दोन्ही कार्यक्रम एकदम अमलांत आणण्यासारखे आहेत. आत्मोन्नतीच्या कार्यक्रमांत व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक उन्नतीस पोषक अशा सर्व गोष्टींचा अंगीकार करावा लागेल. आधुनिक हिंदी लोक हे आपल्या पूर्वजांपेक्षां गलिच्छ, आळशी, गैरशिस्त, खुजे, डोळ्यांनीं, कानांनीं व दातांनीं अधू, निर्बल, निरुत्साही, रोगजर्जर व निष्क्रिय दिसतात. यांचा उद्धार करण्यास हवा. प्रत्येक घरांतील स्त्री-पुरुषांनीं कामाकरितां आपल्या कमरा कसल्या पाहिजेत. प्रत्येक घरच राष्ट्रकार्याचें एक लहानसें केंद्र बनल्यावर राष्ट्रोद्धार होण्यास फारसा वेळ लागणार नाहीं. घरोघरीं रात्रीं नऊ वाजेपासून पहांटे तीन वाजेपर्यंत झोंपेची वेळ ठरविण्यांत आली पाहिजे. वैद्यशास्त्रदृष्ट्या मध्यरात्रीपूर्वीं तीन तास झोंप पूर्ण होणें आवश्यक आहे व तसेंच पहांटे तीन अथवा फार तर चार

वाजल्यानंतर निजणें तितकेंसें आरोग्यकारक नसतें. या दृष्टीनें 'साडेदहा-अकरापर्यंत जागण्याची आपली आधुनिक गैरशिस्त पद्धत आणि सिनेमा, नाटकें व गाणेंबजावणें इत्यादि कारणांनीं रात्रीच्या रात्री जागून काढणें यांनीं आपली सर्व समाजव्यवस्था बिघडवून टाकलेली आहे. योग्य कालीं निद्रा घेण्याकडे पिढ्यान् पिढ्या दुर्लक्ष झाल्यामुळें पुढील पिढ्या जास्त रोगी व निर्बल बनत चालल्या आहेत, हें लक्षांत न घेणाऱ्या समाजास सुशिक्षित म्हणावयाचें कीं काय? नाटकें, गाणीं व नृत्य इत्यादींचें भलतें स्तोम माजवून " रात्रीशिवाय त्यांस रंग चढत नाहीं " असें म्हणणारे गैरशिस्त लोकच या गैरव्यवस्थेस कारणीभूत झालेले आहेत. लोकमताचें दडपण पाडून झोंपेची वेळ सोडूनच या कला वृद्धिंगत करावयास हव्या. अंधार करण्याची कृत्रिम साधनें, गुणग्राहक लोक व तरबेज कलावंत यांमुळें कलाकृति वाटेल त्या वेळीं सरस वठलीच पाहिजे. शरीरप्रकृति हीच जीवनाचा पाया असल्यामुळें तिच्या अनुषंगानेंच सर्व कलांची वाढ करावयास हवी. पारिजातकाच्या नाजुक फुलांचें कौतुक करतां करतां मुळांनाच पाणी देण्याचें व त्यांची जोपासना करण्याचें विसरून कसें चालेल?

पहांटे तीन वाजतां उठल्यावर चार वाजेपर्यंत प्रातर्विधि, स्नान व प्रार्थना वगैरे. त्यानंतर २ तास म्हणजे ६ वाजेपर्यंत सूर्यनमस्काराचा व्यायाम. जगांतील सर्व व्यायामांत सूर्य नमस्कारांसारखी कमींत कमी वेळांत, जास्तींत जास्त व्यायाम घडवून आणणारी दुसरी व्यायाम-पद्धति नाहीं. सूर्यनमस्कारांपासून बुद्धिमत्ता, चपलता, दीर्घायु, सौंदर्य, शरीरसौष्ठव, आरोग्य व सुदृढता हीं सर्व उत्तम प्रकारें साध्य होत असल्यामुळेंच या व्यायामपद्धतीचा येथें पुरस्कार केलेला आहे. आपली शारीरिक व बौद्धिक अधोगति थांबविण्यास सूर्यनमस्कारांचा अंगीकार करणें जरूर आहे. यानंतर प्रत्येकानें कमींत कमी रोज शेरभर गोदुग्ध प्राशन करावयास हवें. त्यानंतर दिवसांतून दोन वेळां हलका व पौष्टिक आहार ( भोजन ); दिवसभरांत आपला नित्य पोटापाण्याचा व्यवसाय व रात्रीं नऊ वाजतां झोंप. हा कार्यक्रम सुरू केल्यास रुग्णालयें, औषधें व व्याधि यांस आधुनिक जीवनांत आलेलें फाजील महत्त्व व

अवाढव्य स्वरूप एकदम खचेल. चिंता, शरीरवेदना, पैशाचा अपव्यय व परदेशीं जाणारा पैसा बऱ्याच प्रमाणांत कमी होईल. पुढील प्रत्येक पिढी उंच, सुदृढ, तेजःपुंज व सुंदर निर्माण होईल.

वर उल्लेखिलेल्या दैनंदिन कार्यक्रमाबरोबरच चहाकॉफी इत्यादि गरम पेयें व दारू, सिगारेट, तंबाखू, तपकीर, विड्या, भांग इत्यादींचेंही उच्चाटन करावयास हवें. चहाकॉफी इत्यादींनीं पाश्चात्यांच्या गुलामीची आपल्या मनावर असलेली पकड तर व्यक्त होतेच, पण त्याशिवाय आपला शारीरिक ऱ्हासही होतो. हा संपूर्ण राष्ट्रीय कार्यक्रमाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. यांत अध्यात्मिक उन्नतीचा व संत-वृत्तीचा वास येतो असें तरुण नास्तिकांनीं समजूं नये. वरील गोष्टींचें महत्त्व ज्याला पटणार नाहीं तो खऱ्या राष्ट्रीय वृत्तीचा माणूस नव्हे. असा मनुष्य राष्ट्राचा जबाबदार नागरिक म्हणविण्यास सर्वस्वीं अयोग्य ठरेल.

आत्मोन्नतीच्या कार्यक्रमांतील दुसरें एक महत्त्वाचें अंग म्हणजे रोज एक तास तरी कवायत, शिस्त, स्वतःचा बचाव व राष्ट्रभक्ति इत्यादींचें प्रत्येकानें शिक्षण घेणें जरूर आहे. जागोजागीं हिंदुस्थानांत पसरलेले हिंदी स्वातंत्र्यसेनेचे सैनिक हें शिक्षण देण्यास उपयोगी पडतील. त्यांनीं निर्भेळ स्वातंत्र्याच्या वातावरणांत हें शिक्षण घेतलेलें असल्यामुळें त्यांचा अमोल अनुभव वायां जाऊं देणें इष्ट नाहीं. स्वतःचें व्यक्तित्व पूर्णपणें विसरून देशाकरितां आनंदानें प्राणार्पण करण्याची वृत्ति आपल्यांत निर्माण केली पाहिजे. अतिपूर्वेंत नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या हिंदी स्वातंत्र्यसेनेंत याकडे विशेष लक्ष दिलें जात असे. प्रत्येकानें सभाधीट बनून छातीठोकपणें अस्खलित वक्तृत्व करण्यास शिकलें पाहिजे. यांत विद्वत्ता असण्याची जरूरी नाहीं. निर्भेळ राष्ट्रीय वृत्ति, सडेतोडपणा व आत्मविश्वास हीं असलीं म्हणजे पुरे आहे. घरांतील अनेक उत्सव आणि लग्नसमारंभ इत्यादि प्रसंगीं, शाळांतून, संस्थांतून, मित्रांच्या लहान लहान गटांतून रोज अथवा एक दिवसा-आड वक्तृत्वोत्तेजक कार्यक्रम झाले पाहिजेत व यांत उत्तम बोलणाऱ्याचें स्तोम न माजवितां, मुखस्तंभ, लाजाळू, भित्रट व मागें मागें राहणाऱ्या

किंवा भिडस्त लोकांसच पुढें ओढून त्यांचे हंसें न करतां त्यांस सभाधीट वक्ते बनविणें आवश्यक आहे. भित्र्या माणसाचे हातून जगांत कांहीं कार्य होत नाहीं. एकदां लोकांचेबद्दलची मनांतील भीति व लाज नष्ट झाली कीं डोक्यांत अनेक सुंदर कल्पना निर्माण होऊन त्या प्रत्यक्षांत उतरविण्यास कोणताही माणूस आनंदानें तयार होतो.

लहान मुलांच्या राष्ट्रीय शिक्षणाचा पाया त्यांच्या लहानपणींच त्यांचें मन कोमल असतांना घातला गेला पाहिजे. आजकालचीं वडील माणसें आपली ही जबाबदारी विसरतात. चिमण्या-कावळ्यांच्या गोष्टी सांगण्याऐवजीं पराक्रमाच्या व नीतीच्या गोष्टी सांगणें; परवाचा, तोंडचे हिशेब वगैरे शिकविणें; आपल्यास अवगत असलेल्या भाषांत त्यांच्याशीं बोलून सहजगत्या त्यांस भाषाज्ञान देणें; जगांतील नानाविध गोष्टींचें त्यांस रोज नियमानें सामान्य ज्ञान करविणें; व्यवहारांतील गोष्टी व श्लोक इत्यादि शिकविणें; सदाचरण, नम्रता, शौर्य, सभाधीटपणा, इ. नानाविध गुण हरप्रकारें त्यांच्या अंगीं बाणविणें; घोड्यावर बसणें, पोहणें, धांवणें, झाडांवर चढणें, धनुष्यबाण व इतर सहजसाध्य अशा शस्त्रास्त्रांचें शिक्षण देणें; त्यांस व्यायाम, मिताहार, योग्य कालीं निद्रा घेणें, गाईचें दूध इत्यादींचा अंगीकार करावयास लावणें—हें सर्व लहान मुलांचे बाबतींत वडील पिढीचें कर्तव्य असतें. तें न करणारे जन समाजाचे गुन्हेगार होत. आजकाल वरील जाणिवेचा सर्वत्र अभाव दिसतो. लहानपणीं मुलांस लाडानें चहा पाजणें, लहान मुलांचा दुराग्रह चालू देणें, चिमण्या-कावळ्यांच्या गोष्टी सांगणें व एकदां त्यांस शाळेंत घातलें कीं त्यांच्याकडे सर्वस्वीं दुर्लक्ष करणें हीच प्रथा सर्वत्र दिसून येते. पोहणें, झाडावर चढणें इत्यादि आवश्यक अशा लहानसान गोष्टींपासूनसुद्धां आम्ही आमच्या मुलांबाळांस भेदरून परावृत्त करतों इतके आम्ही नेभळे बनलेले आहोंत.

वर उल्लेखिलेल्या आत्मोन्नतीच्या कार्यक्रमांत अर्थातच परकीयांविषयीं रोमरोमांत त्वेष व द्वेष उत्पन्न करणें, व केवळ स्वदेशी वस्तुच नव्हे तर स्वदेशी भाषा, व्यवहार, आचारविचार, रीतीभाती, लोक,

ग्रंथ संग्रहाल



मनुष्यबळ. अशा त्या मतप्रसारास व कार्यप्रसार करण्याकरितां दरिद्राश्रमाकरवी वर्तमानपत्र किंवा मासिक चालविणें, त्याकरितां छापखाना विकत घेऊन तो चालविणें, जमीनी व धान्य पिकविणें, सूत कांतणें व कापड विणणें, इतर घराऊ धंदे अंगीकारणें वगैरे अनेक कामें हातीं घेतां येतील. मात्र विडीचें दुकान किंवा चहाचें हॉटेल अशा तऱ्हेचीं देशविघातक कार्यें दरिद्राश्रमांच्या कार्यक्रमांत कधींही अंतर्भूत होणार नाहींत. अर्थात् अशा प्रकारचें समाजकार्यही विपुल आहे. दरिद्राश्रमाचें कार्य हातीं घेणाऱ्यांस सरकारचें सहाय्यही मिळेल असें समजण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. भीक मागणें हा गुन्हा ठरविणें व भिकारी असतील तेथून त्यांस पोलिसांकरवीं पकडून दरिद्राश्रमांत पाठविणें, हडेलहप्पी व हट्टी भिकाऱ्यांस शिक्षा ठोठावणें अशा तऱ्हेचें पुष्कळसें साहाय्य समाजाचे व लोकमताचे दडपणानें आणि सरकारी कायद्याच्या रूपानें मिळेल.

आत्मोन्नतीचा व त्याबरोबरच समाजकार्याचा हा कार्यक्रम रबराच्या तुकड्याप्रमाणें लवचिक आहे. एक अथवा अनेक व्यक्तींस तो सुरू करणें व स्वतःच्या कुवतीप्रमाणें वाटेल तितका वाढविणें शक्य आहे, कोणीही इतरांकरितां थांबणें आवश्यक नाहीं. इतकें वळण ज्यांस लागेल, येवढें कार्य ज्यांचे हातून घडेल त्यांस पुढचा मार्ग आपोआप दिसूं लागेल. प्रत्यक्ष आपल्या परस्थ राज्यकर्त्यांशीं टक्कर घेऊं इच्छिणाऱ्या व्यक्तींसही त्यांच्या त्यांच्या पराक्रमी वृत्तीस झेंपेल असा कमीअधिक धोक्याचा लवचिक कार्यक्रम विचारवंतांचे लक्षांत यावयास वेळ लागणार नाहीं. तो येथें निवेदन करण्याची जरूर नाहीं. स्वदेशाची सद्यःपरिस्थिति म्हणजे निरक्षरता, अज्ञान, पाश्चात्यांविषयींचें गाढ प्रेम, नेभळेपणा, भ्याडपणा, स्वार्थ इत्यादि लक्षांत घेतां फुरसतीचे वेळीं, कांहीं हालअपेष्टा न सोसतां, कोणताही स्वार्थत्याग न करतां, इंग्रजांचा यत्किंचितही रोष होऊं न देतां केवढें महत्त्वाचें राष्ट्रकार्य प्रत्येकास आपापले नित्य व्यवसाय सांभाळून करतां येणें शक्य आहे, हें दाखविण्याचाच मुख्य उद्देश होता. प्रत्येकानें स्वतःच्या मनाचा दुबळेपणा, लोकांची खोटी लाज व भीति आणि आळस हीं मात्र

त्यागिलीं पाहिजेत. वरील कार्यक्रमांत इंग्रजास आडवें येण्यास यत्किंचितही जागा नाहीं.

वरील कार्यक्रमाबरोबरच देशोद्धाराकरितां इतर कांहीं गुणांची जोपासना हिंदी जनतेनें केली पाहिजे. "मी मोठा व इतर सर्व कनिष्ठ" असें पुष्कळांना वाटतें. या अहंभावामुळें देशाचा व देशकार्यांचा अनेक वेळां नाश झालेला आपण इतिहासांत वाचतों. नम्रता व मित्रभाव वाढेल तेंच खरें ज्ञान व राष्ट्रीय शिक्षण. सर्व मानव एक आहेत, इहलोकींचा त्यांचा वेगवेगळा दर्जा ही केवळ दैवयोगानें प्राप्त झालेली कृत्रिम व अल्पकाल टिकणारी अवस्था आहे, आपल्याला दिलेला अधिकार हा व्यक्तिगत नसून त्यामुळें लोकांस छळणें, त्यांची अडवणूक करणें, त्यांस आपली ऐट दाखविणें इत्यादींचा हक्क आपल्यास पोंचत नसून राष्ट्रकार्य चालण्यास प्रत्येक ठिकाणीं कोणीतरी व्यक्ति असावीच लागते, आज आपण आहोंत, उद्या दुसरें कोणी, अशा तऱ्हेनें राष्ट्रकार्य अव्याहत चालणें आवश्यक आहे. व्यक्तीच्या वरिष्ठ-कनिष्ठपणाचा प्रश्न त्यांत उद्भवत नाहीं, सर्व मानव एकाच ईश्वराचे अंशभूत असून इहलोकींच्या आयुष्यांत प्रत्येकानें आपलें कर्तव्य करणें आवश्यक आहे, ही वृत्ति प्रत्येक नागरिकाची असावी.

राष्ट्रकार्यांत मानापमानासही फांटा दिला पाहिजे. राष्ट्रसभेनेंच अध्यक्षपदावर अधिष्ठित करून पुन्हा तिनेंच खालीं ओढलेले नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांनीं त्रासून व वैतागून राष्ट्रसभाही सोडली नाहीं किंवा राष्ट्रकार्यासही अर्धचंद्र दिला नाहीं. राष्ट्रकार्यांत व्यक्तीनें अहंभावास पूर्णपणें विसरलें पाहिजे. आपल्या कोट्यवधि देशबांधवांचा व राष्ट्राचा जेणेंकरून फायदा होईल तोच आपला मान, व त्यास विघातक तो सर्व अपमान असें समजण्याइतकी प्रत्येक जबाबदार व्यक्ति आपल्या राष्ट्राशीं तादात्म्य पावली पाहिजे. इतर कांहीं इच्छा नसली तरी आपली दिगंत कीर्ति व्हावी असें पुष्कळांस वाटतें, परंतु तेवढीसुद्धां इच्छा असूं नये; कारण प्रसिद्धि व स्तुति यांचेमागें लागलेला माणूससुद्धां कळत किंवा नकळत कोण्या वेळीं देशाचा कसा घात करील अथवा देशकार्याकडे कसा कानाडोळा करील याचा नेम नसतो.

आपण भारताच्या धूलीचे एक कण असून पुढच्यांचा मार्ग मृदु व सुलभ व्हावा या एकमेव उद्देशानें राष्ट्रोन्नतीच्या राजमार्गावर आपला देह झिजविणें हें आपलें कर्तव्य आहे अशी भावना जबाबदार नागरिक म्हणविणाऱ्या प्रत्येक हिंदी व्यक्तीचे मनांत रूढ झाली पाहिजे.

प्रत्येकास " नेताजी " होतां आलें नाहीं तरी वर उल्लेखिलेले सर्व गुण आत्मासात् करून वर सांगितलेला कार्यक्रम अंगीकृत करणें व राष्ट्राचे जबाबदार नागरिक म्हणून जगणें शक्य आहे. येवढें प्रत्येक व्यक्तीनें केलें तरी नेताजी सुभासचंद्र बोस यांच्या अमोल कामगिरीचें, स्वार्थत्यागाचें, पराक्रमाचें, आत्यंतिक देशप्रेमाचें व कर्मयोगित्वाचें चीज केल्यासारखें होईल. नाहींपेक्षां केवळ त्यांचा व त्यांच्या कार्याचा शाब्दिक गौरव करणें म्हणजे तोंडपूजाच होय; त्यानें साध्य दूरच राहील.

समाप्त

अनुक्रम २२८५०
विभाग
क्रमांक ९०२
नों. दि. ३१।३।६९

# द. के. केळकर यांचीं पुस्तकें

★ **संस्कृति-संगम** (दुसरी आवृत्ति) पृष्ठें ४७५. किं. ६ रु.

'झोंपीं गेलेल्यास जागें करणारा व जागें असलेल्यास उभें करणारा हा ग्रंथ आहे.' —डे. व्ह. ट्रा. सोसायटी

'संस्कृतिसंगमांतून भाषासौंदर्याचे हवे तेवढे नमुने काढून दाखवितां येतील.' —सह्याद्रि

'हा ग्रंथ वाचल्याशिवाय कोणींही राहूं नये अशी आमची शिफारस आहे.' — महाराष्ट्र

'पुस्तकांतील भाषा चटकदार व चित्ताकर्षक असल्यानें नवे नवे विचार खच्चून भरलेलीं प्रकरणें वाचीत असतां मेंदूला शीण न वाटतां गुदगुदल्याच होतात.' — केसरी

'कोणत्याही साक्षर गृहस्थानें हा ग्रंथ न वाचणें म्हणजे आपल्या ज्ञानाचा अपुरेपणा ठेवण्यासारखें आहे.' — चित्रमयजगत्

★ **काव्यालोचन** (दुसरी आवृत्ति) पृष्ठें ३२४. किं ५ रु.

'लेखकाचे परिश्रम, बुद्धिमत्ता व विषयप्रतिपादनकौशल्य या गोष्टी पुस्तकांतील कोणतींही चार पानें वाचलीं असतां कळून येतील.' — विविधज्ञानविस्तार

'असला ग्रंथ लिहिण्याची नुसती कल्पना सुचण्यासच आधीं बुद्धीची कितीतरी कमावणी झाली असली पाहिजे.' —त्रिकाळ

'सर्व दृष्टींनीं परिपूर्ण असें हें पुस्तक मराठी टीकावाङ्मयास अपूर्वतेनें भूषणभूत झालें आहे.' — लोकशिक्षण

★ **साहित्यविहार** किं. २ रु.

"पुनः पुनः वाचनानें नवा आनंद देणाऱ्या पुस्तकांत याची गणना करण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं." — लोकमान्य

★ **वादळी वारे** ( तिसरी आवृत्ति छापत आहे. )

**मनोहर ग्रंथमाला, टिळक रोड, पुणें २**

मनोहर ग्रंथमालेचें नमुनेदार मासिक

# वाङ्मय-शोभा

संपादकः—मनोहर महादेव केळकर

गेलीं ८ वर्षें मराठी साहित्याची सेवा अत्यंत नियमितपणें करणारें हें मासिक त्याच्या संकलनपद्धतीमुळें रसिक आणि सुजाण वाचकांचें अत्यंत आवडतें झालें आहे.

गेलीं कांहीं वर्षें हातपाय जखडणारें वृत्तपत्रांच्या कागदावरील नियंत्रण निघाल्यामुळें सर्व वाचकांस **वाङ्मय-शोभा** ह्याच वर्गणींत घरपोंच मिळूं शकेल.

जीवनाशीं संबंध असणाऱ्या अनेक विषयांवरील माहितीपूर्ण व उद्‌बोधक लेख आणि चटकदार कथा हें वाङ्मयशोभेचें वैशिष्ट्य आहे.

वाङ्मयशोभेच्या वर्गणीदारांस **मनोहर ग्रंथमालेचीं प्रकाशनें** वेळोवेळीं वेगवेगळ्या सवलतींनीं मिळतात. यंदा **वर्षारंभ खास अंक** ( मे १९४७ ) प्रसिद्ध झाला. त्याशिवाय **१०० वा खास अंक** ( ऑगस्ट १९४७ ) व **दिवाळी खास अंक** ( नोव्हेंबर १९४७ ) वर्गणीदारांना मिळणार आहेत.

**ट. ह. सह वार्षिक वर्गणी ५ रुपये**

★

— वाङ्मय-शोभा कार्यालय —

**टिळक रोड, पुणें २**


IRBK-0102626

IRBK-0102626